(कार्यालयीन उपयोगासाठी)

# औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद.

(मुंबई प्रांतिक म.न.पा. अधिनियम १९४९ चे
कलम १०६ (३) अन्वये)
मुख्य लेखा परीक्षक यांचा लेखा परीक्षण अहवाल

वार्षिक अहवाल
सन २००८-२००९

# : : अ नु क्र म णि का : :

## लेखा परीक्षण अहवाल: सन २००८–०९

मुख्य लेखा परीक्षक यांचे लेखा परीक्षणाबाबत निवेदन: (पृ.क्र. १ते२ )

### भाग –१

### (अ) विभागनिहाय लेखा परीक्षण तपशिल:


| अ.क्र. | विभागाचे नांव | लेखा परीक्षणाअंतर्गत कालावधी | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| ०१ | लेखा विभाग | सन २००६-०७ ते २००७-०८ | ३ ते ३१ |
| ०२ | वॉर्ड - अ | सन २००६-२००७ | ३२ ते ४२ |
| ०३ | वॉर्ड - क | सन २००२-०३ ते सन २००७-०८ | ४३ ते ६६ |
| ०४ | वॉर्ड - इ | सन २००२-२००७ | ६७ ते ७७ |
| ०५ | पाणी पुरवठा विभाग | सन २००२-०३ ते सन २००५-०६ | ७८ ते ९४ |
| ०६ | ई- टेंडरिंग विभाग | सन २००६-०७ ते सन २००७-०८ | ९५ ते १०० |
| ०७ | जनसंपर्क विभाग | सन २००५-०६ ते सन २००६-०७ | १०१ ते १०४ |
| ०८ | इमारती बांधकाम विभाग | सन २००२-०३ ते सन २००५-०६ | १०५ ते ११९ |
| ०९ | पशुधन विकास विभाग | सन २००५-०६ ते डिसेंबर २००७ | १२० ते १२१ |
| **भाग –२** | | | |
| **ब ) विशेष तपासणी / लेखा परीक्षण तपशील:** | | | **१२२** |
| १० | मा.सभापती स्थायी समिती सभा आदेशानुसार तपासणी : विविध चौकात पेव्हर ब्लॉक बसविणे. | | १२३ ते १३५ |
| ११ | मा.आयुक्त यांचे सुचनेनुसार : केंद्रीय प्राथमिक शाळा पैठणगेट | | १३६ ते १४७ |
| १२ | मा.सभापती स्थायी समितीसभा आदेशानुसार तपासणी :मध्यवर्ती गोदाम येथील ९२ ट्रान्झीट करारपत्रकाबाबत अहवाल. | | १४८ ते १५८ |
| १३ | मा.सभापती स्थायी समिती सभा आदेशानुसार तपासणी : श्री.संजय करपे व नायबराव जंजाळ . | | १५९ ते १६६ |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | मा.सभापती स्थायी समिती सभा आदेशानुसार तपासणी : स्पेक सिस्टीम चौकशी अहवाल. | | १६७ ते २०५ |
| १५ | मा.सभापती स्थायी समिती सभा आदेशानुसार तपासणी : न.भू.क्र.१२९६० मौ.जाफ़रगेट येथील श्री.प्रेमचंद सुराणा व इतर | | २०६ ते २१३ |
| १६ | मा.आयुक्त यांचे सूचनेनुसार तपासणी अहवाल : शिक्षण सेवकाच्या नेमणूकीतील प्रक्रियेतील तक्रारीबाबत. | | २१४ ते २१५ |
| १७ | मा.आयुक्त यांचे सूचनेसुर तपासणी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत खर्चातील अनियमिततेबाबत. | | २१६ ते २१७ |
| १८ | मा.सभापती स्थायी समिती सभा यांचे आदेशानुसार : कामगार अधिकारी रिलायन्स गट समुह योजना चौकशी अहवाल. | | २१८ ते २३६ |
| १९ | काटकसरीच्या उपाययोजना | | २३७ ते २३९ |

**मुख्य लेखापरीक्षक यांचे कार्यालय**
औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद
जा.क्र./मनपा/मुलेप/२०१०/
दिनांक :    /०२/२०१०

प्रति,
**मा.सभापती,**
स्थायी समिती,
औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद.

**विषय :- सन २००८-२००९ या आर्थिक वर्षातील औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबादचा लेखापरीक्षणाचा वार्षिक अहवाल.**

**महोदय,**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०६ (३) अनुसार लेखापरीक्षण विभागाच्या कामकाज विषयक आणि हिशेब तपासणीबाबतचा सन २००८-२००९ या आर्थिक वर्षासाठीचा वार्षिक अहवाल या सोबत सादर करीत आहे.

अ) अहवाल वर्षात लेखापरीक्षण विभागात प्रत्यक्ष लेखापरीक्षणासाठी एकूण मंजूर पदसंख्या ९ असून ०९ कर्मचारी कार्यरत होते. त्यातील ३ कर्मचारी निवडणूक व इतर कामासाठी कार्यरत होते.

ब) मुख्यलेखापरीक्षक या पदाचा कार्यभार, मी, दिनांक ०५ जून २००८ रोजी स्विकारला आहे. सदर पदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर सर्वप्रथम लेखापरीक्षण विभागात कार्यरत असलेला कर्मचारी वर्ग, मंजूर पदसंख्या, विभागामार्फ़त करण्यात येत असलेले कामकाज इत्यादीबाबत आढावा घेतला. त्यामध्ये महानगरपालिका स्तरावरील लेखापरीक्षणाचे स्वरूप, व्याप्ती व कामकाज विचारात घेता लेखापरीक्षणासाठी कर्मचारी वर्ग अपुरा असल्याचे प्रकर्षाने जाणवले. काही कर्मचारी मालमत्ताकर व पाणीपट्टी वसूलीसाठी वॉर्ड कार्यालयामध्ये कित्येक महिन्यांपासून कार्यरत असल्याचे दिसून आले. त्यामुळे असे कर्मचारी पुनश्च विभागामध्ये कार्यरत होण्याच्या दृष्टीने कार्यवाही केली. एकूण मंजूर पदसंख्या पाहता व कामकाजाचे स्वरूप विचारात घेता आजही लेखापरीक्षण विभागाकडे कर्मचारी वर्ग अपुरा असल्याचे नमूद करण्यात येते. याबद्दल प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

क) सन २००८-२००९ या आर्थिक वर्षातील महानगरपालिकेच्या विविध खात्यातील लेखापरीक्षण करण्यासाठी लेखा परीक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे चांगले सहकार्य मिळाले. सर्वानीच आपआपली लेखापरीक्षणाची कामे चांगल्या पध्दतीने पार पाडली. महानगरपालिकेच्या कामाचा व्याप दिवसेंदिवस वाढत असतांना तसेच रेकॉर्ड उपलब्ध होणेस अडचणी असतांना व जास्तीत जास्त सखोलतेने लेखापरीक्षण करतांना

लेखापरीक्षण विभागातील सर्व कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे लेखापरीक्षणाचे काम व्यवस्थीतपणे पार पाडले हे नमूद करणे अगत्याचे आहे.

ड) सन २००७-२००८ या आर्थिक वर्षातील महानगरपालिकेचे निव्वळ महसूली उत्पन्न हे रू.२०२.४९कोटी (सुरूवातीची शिल्लक रक्कम रू.२१.५०) इतके असून खर्च रू.२२४.४२ कोटी इतका आहे. त्याचप्रमाणे सन २००८-०९ या आर्थिक वर्षातील महानगरपालिकचे निव्वळ महसूली उत्पन्न रू. २१५.३७ कोटी (सुरूवातीची शिल्लक रक्कम रू. १०.८६कोटी ) इतके असून खर्च रू. २५१.७३ कोटी इतका झाल्याचे दिसून आले.

इ) सन २००७-०८ व सन २००८-०९ या दोन्ही आर्थिक वर्षात वेतन व भत्ते यावरील खर्च अनुक्रमे रू.६०.८० कोटी व रू. ७०.३७ कोटी इतका आहे. एकूण महसूली उत्पन्न विचारात घेता आस्थापना खर्चाची टक्केवारी ही अनुक्रमे ३०.०२% व ३२.६७% इतकी असल्याचे दिसून आले. **सन २००९-१० पासून सहाव्या वेतन आयोगानुसार आस्थापना खर्च वाढणार आहे. या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिकेचे महसूली उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.**

ई) लेखापरीक्षणाचे अनुषंगाने **मा. सौ.विजया रहाटकर, महापौर, मा.श्री.अब्दुल साजेद अ.सत्तार, सभापती, स्थायी समिती व मा. डॉ.पुरूषोत्तम भापकर, आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद** हे अडीअडचणी लक्षात घेवून अत्यंत आस्थापूर्वक मोलाचे सहकार्य करीत आहेत. त्यामुळे लेखापरीक्षण अधिक सुलभ परिणामकारक व प्रभावी होण्यास मदत झाली आहे. त्यासाठी लेखापरीक्षण विभाग त्यांचा सदैव ऋणी राहील.

मा.उपमहापौर, मा.सभागृहनेता, मा.विरोधी पक्षनेता, सर्व सन्माननीय सदस्य महानगरपालिकेचे सर्व विभागप्रमुख/ शाखा प्रमुख व त्यांच्या चमूकडून जे मोलाचे सहकार्य मिळत आहे, त्याबद्दलही मन:पूर्वक आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

लेखापरीक्षणात आढळून आलेल्या गंभीर बाबी, अपहार व अनियमितता बाबतचे विशेष अहवाल वेळोवेळी मा.स्थायी समितीकडे अवलोकनार्थ सादर केलेले आहेत. त्यानुसार विभाग प्रमुख व खातेप्रमुखांकडून आक्षेप परिच्छेदांचे पूर्तता होऊन कार्यवाहीसह अनुपालन होणे अपेक्षित आहे.

**औरंगाबाद महानगरपालिकेच्या व्यापक हिताच्या अनुषंगाने लेखापरीक्षण अधिक प्रभावी व परिणामकारक होण्यासाठी भविष्यातही सर्वांचे सहकार्य लाभेल, अशी आशा व अपेक्षा व्यक्त करतो.**

आपला विश्वासू,

**(विलास जाधव)**
मुख्य लेखापरीक्षक
महानगरपालिका,औरंगाबाद.

**औरंगाबाद.**
दिनांक :

<u>**प्रत माहितीस्तव सविनय सादर :**</u>

मा.आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद.

मुख्य लेखापरीक्षक
महानगरपालिका,औरंगाबाद.

# लेखा विभाग

## सन २००६-०७ व सन २००७-०८

## लेखापरीक्षण अहवाल.

**अहवाल वर्षात महानगरपालिका अंतर्गत जमा व खर्चाचा आढावा हा लेखा विभागाकडील अभिलेख्यांच्या आधारे घेण्यात आला आहे. त्यानुसार सन २००७-२००८ या आर्थिक वर्षातील प्रत्यक्ष जमा प्रारंभीच्या शिल्लक रकमेसह रक्कम रू.२४२.२४ कोटी इतकी असून (प्रारंभीची शिल्लक रू. २१.५० कोटी ) प्रत्यक्ष खर्च रू. २२४.४२ कोटी इतका आहे. दिनांक १.४.२००८ रोजीची अखेरची शिल्लक रू. १७ कोटी ८२ लाख इतकी असल्याचे निदर्शनास आले आहे. अहवाल वर्षात महापालिका अंतर्गत पदाधिकारी , अधिकारी आणि कर्मचारी यांना वेळोवेळी मंजूर करण्यात आलेल्या अग्रिम रकमा व त्यांचे समायोजन याबाबत लेखा विभागाकडून माहिती घेण्यात आली. तसेच न वटलेले धनादेश व त्यानुषंगाने वसूल झालेल्या रकमा अहवाल वर्षातील महापालिकेद्वारा करण्यात आलेली विविध कर्जफ़ेड या बाबतही तपशिल मागविण्यात आलेला आहे. प्राप्त तपशिलानुसार खालील प्रमाणे अभिप्राय नमूद करण्यात येत आहेत.**

**परिच्छेद क्र.१ : अर्थसंकल्पिय तरतूद आणि प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या रकमेतील तफ़ावतीबाबत:**

अ) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये महापालिकेचे अपेक्षित उत्पन्न व खर्च यांचे अंदाजपत्रक प्रतीवर्षी तयार करण्यात येते. सन २००७-०८ व सन २००८-०९ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पिय तरतूद आणि प्रत्यक्ष जमा व खर्च याबाबत तपासणी केली असता असे दिसून आले की, महापालिकेस प्रत्यक्षात प्राप्त रकमा आणि महापालिकेद्वारा करण्यात आलेला प्रत्यक्ष खर्च हा अर्थसंकल्पिय तरतूदीपेक्षा १० ते २५ % कमी अथवा जादा झालेला आहे. त्याबाबतचा तपशिल हा खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

| **वर्ष** | **जमा (रूपये)** | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मूळ अर्थसंकल्पिय तरतूद | सुधारित अर्थसंकल्पिय तरतूद | प्रत्यक्ष जमा | कमी अथवा जादा रक्कम | टक्केवारी |
| २००७-२००८ | ३०९.३६ कोटी | २५७.६४ कोटी | २२०.७४ कोटी | -८८.६२ कोटी | २८.६५% |
| २००८-२००९ | ३६४.८० कोटी | २८६.१३ कोटी | २४४.४७ कोटी | -१२०.३३ कोटी | ३२.९८% |
| **वर्ष** | **खर्च (रूपये)** | | | | |
| | मूळ अर्थसंकल्पिय तरतूद | सुधारित अर्थसंकल्पिय तरतूद | प्रत्यक्ष खर्च | कमी अथवा जादा रक्कम | टक्केवारी |
| २००७-२००८ | ३४८.१४ कोटी | २५७.७७ कोटी | २२४.४२ कोटी | -११३.७२ कोटी | ३५.५३% |
| २००८-२००९ | ३८५.९४ कोटी | ३०३.७१ कोटी | २५१.७३ कोटी | -१३४.२१ कोटी | ३४.७७% |

वरील तपशिलाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वार्षिक अंदाजपत्रक तयार करतांना मागील वर्षीच्या प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या प्रमाणात तरतूद ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे अर्थसंकल्पिय तरतूदीनुसार जमा व खर्चाची रक्कम आणि प्रत्यक्ष जमा व खर्च यामध्ये तफ़ावत दिसून येते.

तेव्हा, भविष्यात महापालिका प्रशासनाद्वारा सादर होणाऱ्या अर्थसंकल्पामध्ये लक्षणीय तफ़ावत राहणार नाही अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येते.

ब) **पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी यांचेकडील प्रलंबित अग्रिम रकमेबाबत:**

सन २००७-०८ अखेर महापालिका पदाधिकारी /अधिकारी आणि कर्मचारी यांचेकडे एकूण रू. ३०,६६,३७३/- एवढा अग्रिम प्रलंबित असून अहवाल वर्षात पदाधिकारी आणि अधिकारी व कर्मचारी यांना कार्यालयीन कामकाजास्तव व वैयक्तिक कारणास्तव (आजारपण इ.) मंजूर करण्यात आलेल्या अग्रिम रकमेपैकी खाली दर्शविलेल्या तपशिलानुसार एकूण ३० प्रकरणांत रू. २५,३८,७०६/- इतक्या रकमेचे समायोजन अद्यापपावेतो करण्यात आलेले नाही.

## अधिकारी / कर्मचारी यांचेकडील प्रलंबित अग्रिम रकमेबाबतचा तपशिल :

| अ.क्र. | अग्रिम मंजूरीचा दिनांक | अधिकारी / कर्मचाऱ्यांचे नांव | विभाग | अग्रिमाचा हेतू | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १८.४.२००७ | कमलाकर फ़ड | क.नि.व.सं.वि | पेट्रोल | ७८००/- |
| २ | २२.५.२००७ | एस.पी.खन्ना | वॉर्ड अभियंता – ड | माहिती अधिकार | २०,०००/- |
| ३ | २८.५.२००७ | कला सुरेश बोरमनीकर | सभापती वॉर्ड - ड | कोल्हापुर दौरा | ५०,०००/- |
| ४ | ०८.६.२००७ | शे.इब्राहीम शे.इमाम पटेल | सभापती वॉर्ड - क | पुणे दौरा | १०,०००/- |
| ५ | १८.६.२००७ | रावसाहेब मालोदे | क्रिडा विभाग | माहिती अधिकार | ४२६/- |
| ६ | २१.६.२००७ | नदीम अख्तर | वॉर्ड - क | मेंदू ऑपरेशन | ३५,०००/- |
| ७ | ०३.८.२००७ | रावसाहेब मालोदे | क्रिडा विभाग | मानधन वाटप | १०३०२०/- |
| ८ | ०८.८.२००७ | विजय किशनराव खुले | सभापती.शहर सुधार समिती | कल्याण दौरा | १०,०००/- |
| ९ | १४.८.२००७ | रावसाहेब मालोदे | क्रिडा विभाग | मानधन वाटप | १२९८६०/- |
| १० | २९.८.२००७ | रावसाहेब मालोदे | क्रिडा विभाग | मानधन वाटप | १,५०,०००/- |
| ११ | ०१.९.२००७ | रावसाहेब मालोदे | क्रिडा विभाग | मानधन वाटप | २,२५,०००/- |
| १२ | ०५.९.२००७ | रावसाहेब मालोदे | क्रिडा विभाग | बुध्दीबळ मूक बधिरांसाठी | ३,२५,०००/- |
| १३ | २८.९.२००७ | रावसाहेब मालोदे | क्रिडा विभाग | पिंपरी दौरा | ४५०००/- |
| १४ | ४.१०.२००७ | रावसाहेब मालोदे | क्रिडा विभाग | स्विमिंग | ४,३५,०००/- |
| १५ | १६.१०.२००७ | रावसाहेब मालोदे | क्रिडा विभाग | कबड्डी | ३,६०,०००/- |
| १६ | २३.१०.२००७ | रावसाहेब मालोदे | क्रिडा विभाग | लॉंग टेनिस | १,५५,०००/- |
| १७ | २९.१०.२००७ | शे.इब्राहीम शे.इमाम पटेल | सभापती वॉर्ड - क | मुंबई दौरा | २५,०००/- |
| १८ | १३.११.२००७ | रावसाहेब मालोदे | क्रिडा विभाग | कुस्ती | ४९००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९ | २०.११.२००७ | सुमनबाई बाबुलाल घुले | कामगार विभाग | वैद्यकीय | ८०,०००/- |
| २० | २६.११.२००७ | दामोधर एम.शिंदे | सभापती , वॉर्ड -इ | नागपुर | १५,०००/- |
| २१ | ४.१२.२००७ | रावसाहेब मालोदे | क्रिडा विभाग | मानधन वाटप | ३९७००/- |
| २२ | ७.१२.२००७ | रावसाहेब मालोदे | क्रिडा विभाग | ८ डिसेंबर | २५०००/- |
| २३ | १७.१२.२००७ | दिपाली सुनिल पाटील | सभापती वॉर्ड - ब | हैद्राबाद | १,२०,०००/- |
| २४ | ०७.१.२००८ | दामोधर कडुबा दाभाडे | वॉर्ड -ई | वैद्यकीय | ६०,०००/- |
| २५ | १०.१.२००८ | शे.इब्राहीम शे.इमाम पटेल | सभापती , वॉर्ड -क | पिंपरी दौरा | १५०००/- |
| २६ | ०१.२.२००८ | जिवन काळु भिवसने | वॉर्ड - ई | कॅन्सर उपचार | ५०,०००/- |
| २७ | २७.२.२००८ | दिपाली सुनिल पाटील | सभापती , वॉर्ड -ब | कोल्हापुर दौरा | २५०००/- |
| २८ | ०५.३.२००८ | विजय किशनराव खुले | सभापती | मुंबई दौरा | १०,०००/- |
| २९ | २७.३.२००८ | संजय बालय्या | क्रिडा विभाग | शहीद भगतसिंग ट्रॉफ़ी | ३०००/- |
| ३० | २८.३.२००८ | सुमनबाई शांताराम दिवेकर | कामगार विभाग | वैद्यकीय अग्रिम | ५०००/- |
| | | | | **एकूण** | **२५,३८,७०६/-** |

वरील प्रमाणे प्रलंबित अग्रिम रकमेचे समायोजन हे संबंधिताकडून विनाविलंब होणेबाबत विभागाने कार्यवाही करावी असे सूचित करण्यात येते.

क) **लेखा विभागाकडे विना तजविज परत आलेल्या धनादेशांबाबत : (न वटलेले धनादेश):**
अहवाल वर्षात महापालिकेस जकात कर, मालमत्ता कर, पाणीपट्टी व अन्य करापोटी संबंधित व्यक्तिंकडून धनादेशाद्वारे रकमेचे प्रदान करण्यात आलेले आहे. मात्र काही वेळा काही धनादेश हे संबंधिताच्या बँक खात्यामध्ये पुरेसे पैसे नसल्यामुळे वटलेले नाहीत. अहवाल वर्षात रू. ११,०४,३४६/- इतक्या रकमेचे एकूण १०९ धनादेश हे दिनांक ३१.३.२००८ अखेर वटविले गेले नसल्याचे प्राप्त तपशिलावरून स्पष्ट झाले आहे. विभागनिहाय न वटलेल्या धनादेशांचा तपशिल हा खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**सन २००७-२००८ या वर्षातील न वटलेले धनादेश.**

| **अ.क्र.** | **विभागाचे नांव** | **धनादेशांची संख्या** | **धनादेशाची रक्कम रू.** |
|---|---|---|---|
| ०१ | विभाग क्र.१ व वॉर्ड अ | ०५ | ४७,४९९/- |
| ०२ | विभाग क्र.२ व वॉर्ड ब | २० | ९९,९७५/- |
| ०३ | विभाग क्र.३ व वॉर्ड क | -- | -- |
| ०४ | विभाग क्र.४ व वॉर्ड ड | ५६ | ७,५८,३३४/- |
| ०५ | विभाग क्र.५ व वॉर्ड इ | ०३ | २३,०००/- |
| ०६ | विभाग क्र.६ व वॉर्ड फ़ | २५ | १,७५,५३८/- |
| ०७ | मालमत्ता | -- | -- |
| | **एकूण** | **१०९** | **११०४३४६/-** |

विभागाने वरील प्रमाणे रक्कम वसूलीबाबत ठोस कार्यवाही करून अनुपालन सादर करावे.

**ड)** **१) महापालिकेस कर्जापोटी /विविध देयकापोटी देय असलेल्या व अहवाल वर्षात परत फेड केलेल्या रकमांबाबत:**

अहवाल वर्षातील पाणीपुरवठा व जलनि:सारण योजनेसाठी महानगरपालिकेने घेतलेल्या विविध सरकारी संस्था व खुल्या बाजारातील कर्जफ़ेड ही मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १११ अन्वये करण्यात येत आहे. कर्जफ़ेडीबाबतचा तपशिल प्राप्त झाला असून सन २००७-०८ या वर्षात एकूण ९०९९०/- प्रकारच्या कर्जा अंतर्गत रक्कम रू.३७२.२१ कोटी /- अदा करण्यात आलेली आहे. कर्ज प़रत फेडीबाबतचा तपशिल हा खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

| | | **(आकडे हजारात)** | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **कर्ज देणाऱ्या संस्थेचे नांव** | **मुद्दल (रू)** | **व्याज (रू)** | **एकूण (रू)** |
| १ | आयुर्विमा महामंडळ पाणीपुरवठा योजना | २००१७/- | ५४९१/- | २५५०८/- |
| २ | खुल्या बाजारातील कर्ज (महाराष्ट्र जिवन प्राधिकरण) | -- | ९३०७/- | ९३०७ |
| ३ | I D B I | २५२३६/- | २७१३२/- | ५२३६८/- |
| ४ | Open Market | १२००/- | -- | १२००/- |
| ५ | गॅरन्टी फ़ी | २६०७/- | -- | २६०७/- |

**२) <u>सन २००७-०८ अखेर महापालिकेस देणे असलेल्या रकमेचा तपशिल:</u>**

| | | |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांचे विद्युत देयक रक्कम | २४२.४६ कोटी |
| २ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पाणी खरेदी देयक रक्कम | ६१.८४ कोटी |
| ३ | एल.आय.सी. व खुल्या बाजारातील कर्जे व बॅंक कर्जे (मुद्यल) | ६१.८४ कोटी |
| ४ | पोलिस दल पगार व भत्ते | ०.५० कोटी |
| ५ | महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ | ३.०० कोटी |
| ६ | नगररचना आस्थापना खर्च | १.१८ कोटी |
| ७ | १%, २%, ३% व इतर अनामत परतावा | १.३९ कोटी |
| | **एकूण** | **३७२.२१ कोटी** |

**इ) सेवानिवृत्ती वेतन पडताळणी :**

अहवाल वर्षात लेखा विभागाकडून अधिकारी / कर्मचारी यांना प्रदान करावयाच्या सेवानिवृत्ती वेतन विषयक प्रकरणांची वेळोवेळी तपासणी (Pre- Audit) करण्यात आली. तपासणीअंती खालीलप्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

**सन २००७–२००८ मध्ये लेखापरीक्षणा अंती अतिप्रदान केलेल्या वसूल रकमेचा तपशिल खालील प्रमाणे .**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | रूख्मणबाई नामदेव मुनवर | सह .शिक्षिका | १००७ /- |
| २ | शाहेदा बेगम मो.इब्राहीम | सह .शिक्षिका | ११७ /- |
| ३ | लक्ष्मीबाई नारायण | सेविका | ७२० /- |
| ४ | प्रकाश काशिनाथ चांदणे | मजूर | ५३९४/- |
| ५ | साहेबराव जाधव | मजूर | १६६६१/- |
| ६ | हिरामण तोसामा | मजूर | ६०३/- |
| ७ | प्रकाश किसन ओमा | मजूर | ६३४१/- |
| ८ | महिपत चावरिया | मजूर | ६९२७/- |
| | | **एकूण** | **३७७७०/–** |

**सन २००८–२००९ मध्ये लेखापरीक्षणा अंती अतिप्रदान केलेल्या वसूल रकमेचा तपशिल खालील प्रमाणे .**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | कैसर जहॉ | सह.शिक्षिका | ४२१२५/- |
| २ | सुशिलाबाई नामदेव पवार | सह.शिक्षिका | १००४७/- |
| ३ | आर.आर.कुबेर | अग्निशमन अधिकारी | २८,५५९/- |
| ४ | दिपक शिंदे | मजूर | ५१९९/- |
| ५ | अवंतिकाबाई साळवे | मजूर | १९१८/- |
| | | **एकूण** | **८७८४८/–** |

संबंधित कर्मचाऱ्यांकडून सन २००७-०८ व सन २००८-०९ या दोन्ही आर्थिक वर्षात पेन्शन कन्ट्रीब्युशन मधून जास्तीची एकूण रक्कम १,२५,६१८/- ही वसूल करण्यात आली.

**ई) रोख नोंदवहीतील दिनांक ३१/३/२००८ अखेर शिलकेचा ताळमेळ न घालणे बाबत:**

लेखा विभागाकडील सन २००७-०८ या आर्थिक वर्षातील रोखनोंदवहीचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले की, दिनांक ३१.३.२००८ अखेरचे आर्थिक व्यवहाराबाबतच्या नोंदी ह्या सक्षम अधिकारी यांनी प्रमाणित केलेल्या नाहीत. तसेच

दिनांक ३१.३.२००८ रोजी शिल्लक रकमेचा ताळमेळ हा बँक खात्यावरील शिल्लक रकमेशीही घातलेला नाही. रोख रकमेचा नियमित ताळमेळ घेणे ही बाब आर्थिक व्यवहार सुरळीत आणि अचूक ठेवण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असून विभागाने याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

तेव्हा, दिनांक ३१ मार्च २००८ अखेर शिल्लक रकमेचा ताळमेळ हा बँकखात्यावरील शिल्लक रकमेशी घेण्यात यावा आणि कार्यवाहीअंती लेखापरीक्षण विभागास अहवाल सादर करावा असे सूचित करण्यात येते.

**दिनांक ३१/३/२००८ रोजी अखेरची शिल्लक**

| रोखवही नुसार शिल्लक रक्कम रु. | बँक खात्यावरील शिल्लक रक्कम रु. | फरक रक्कम रु. |
|---|---|---|
| २१८५३१७१०/- | २३५०६८०८६/- | १६५३६३७६/- |

**परिच्छेद क्र.२ :विना निविदा खर्च करणे व मुंबई महानगरपालिका अधिनियमांचेही उल्लंघन करणे.**

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक/ दिनांक | तपशिल | रक्कम (रू) |
|---|---|---|---|
| १ | ७२५१<br>१०.१०.२००६ | महापौर चषक फुटबॉल स्पर्धा (बैठक व्यवस्था, मंडप, विद्युत, स्टेज, डेकोरेशन, ध्वनीक्षेपन इ.) | ८,२६,३४०.०० |
| २ | १२.२००७ | झाशीकी राणी व जाणता राजा कार्यक्रम (बैठक व्यवस्था, मंडप, विद्युत, स्टेज, डेकोरेशन, ध्वनीक्षेपन इ.) | १५,६७,६६१.०० |
| ३ | ३१.३.२००८ | स्वामीनी –२००८ कार्यक्रम प्रदर्शन व विक्री (बैठक व्यवस्था, मंडप, विद्युत, स्टेज, डेकोरेशन, ध्वनीक्षेपन इ.) | ११,८२,०२६.०० |
| ४ | ११५७<br>४.६.२००८ | आख्यान महाराष्ट्र (बैठक व्यवस्था, मंडप, विद्युत, स्टेज, डेकोरेशन, ध्वनीक्षेपन) | १५,०६,७७५.०० |
| | | **एकूण** | **५०,८२,८०२.००** |

**(अ)** शासन निर्णय (उद्योग व उर्जा विभाग) क्रमांक भांखस/१०८८/(२५१२) उद्योग –६ दि.०२.०१.१९९२ व शासन निर्णय दि.१६.७.१९९३ नुसार रू.५०,०००/- वरील खरेदी, पुरवठा इत्यादीसाठी निविदा मागविणे अनिवार्य असतांना दरपत्रके मागवून नियमबाह्य खर्च करण्यात आला आहे.

**(ब)** मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ खंड - क (शासन राजपत्र दि.१६.९.२००० ) नुसार रू.१०,००,०००/- व त्यावरील खर्चासाठी मा.स्थायी समितीची मंजूरी आवश्यक असतांना त्याचीही पूर्तता न करताच बेकायदेशीररित्या मोठमोठ्या रकमांची अदायगी झालेली आहे.

**३) लेखा शाखेचे रोखपाल दररोज लाखोंची रोख हाताळतात असे असतांना मुंबइ वित्तीय नियम १९५९ च्या नियम ५२ नुसार त्यांचेकडून सुरक्षा अनामत घेण्यात आलेली नाही. त्यामुळे वरील नियमानुसार तातडीने कार्यवाही अपेक्षित आहे.**

**४) लेखा संहितेतील नियमानुसार लेखा विभागाने अदा केलेल्या रकमेबाबतचे प्रमाणक (देयक) त्यांचेकडे सुरक्षित असणे आवश्यक आहे. परंतु शिक्षण विभागातील सर्व शाळांची वेतन देयके, महानगरपालिका आरोग्य केंद्राची वेतन देयके, अग्निशमन विभागांची वेतन देयके त्या त्या विभागात ठेवून त्याची अदायी केली आहे. त्याची प्रमाणके देयके मात्र लेखा शाखेत ठेवेली नाहीत. त्यामुळे उक्त नमूद विभागाची देयके/ प्रमाणके लेखा शाखेतच ठेवण्यात यावीत.**

**५) देयक नोंद वही न ठेवणे :** देयक नोंद वही न ठेवताच देयके दाखल करून घेणे व आपले इच्छेनुसार पारित करून अदा करण्याची कार्यवाही लेखा विभागात २६ नोव्हेंबर २००८ पर्यंत चालू होती. ही अत्यंत गंभीर बाब आहे. या बाबतीत विभागाने तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**परिच्छेद क्र.३ : Vedeo Shooting प्रित्यर्थ रू.२९६९/– इतक्या अतिप्रदान रकमेबाबत.**

संदर्भ:- प्रमाणक क्र.३६७, दिनांक २९.४.२००६.

लेखा विभागाकडील सन २००६-०७ व सन २००७-०८ या आर्थिक वर्षातील अभिलेख्यांचे लेखापरीक्षण हाती घेण्यात आले असून त्या दरम्यान खालीलप्रमाणे आक्षेपार्ह बाब निदर्शनास आली आहे.

सन २००६-०७ या आर्थिक वर्षातील प्रमाणक क्र.३६७ दिनांक २९.०४.२००६ तपासले असता असे निदर्शनास आले की, मे.गुरूकृपा फ़ोटो स्टुडिओ औरंगाबाद यांना Bill No. ३४१ दिनांक १८.०३.२००६ नुसार अतिक्रमण हटवितांना केलेल्या चित्रीकरणासाठी (Vedeo Shooting) प्रतिदिन रू.१३००/- ऐवजी रू.१५००/- या दराने १२ दिसांसाठी रू.१७१९१ ऐवजी रू.२०१६०/- (१०.२% ऐवजी १२% सर्व्हीस टॅक्स आकारणीसह) अदा केल्यामुळे रू.२९६९/- इतक्या जादा रकमेची अदाई झाली आहे.

करिता, सदर रक्कम रू.२९६९/- ही संबंधिताकडून वसूल करून महापालिका फ़ंडात भरावी व अनुपालन या विभागास सादर करावे असे सूचित केले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र. ४: भविष्य निर्वाह निधीचे ब्रॉडशिट रजिस्टर व लेजर रजिस्टर उपलब्ध करून देण्याबाबत.**

उपरोक्त प्रकरणी आपणास कळविण्यात येते की, लेखापरीक्षण लेखापरीक्षणार्थ भविष्य निर्वाह निधीचे सन २००६-०७ व सन २००७-०८ या आर्थिक वर्षातील ब्रॉडशिट रजिस्टर व लेजर रजिस्टर आवश्यक असल्याने प्रस्तुतचे लेखे उपलब्ध करून देण्यात यावे असे विभागास सूचित केले असता अद्यापपावेतो लेखापरीक्षणास्तव लेखे उपलब्ध करून देण्यात आले नाही.

**परिच्छेद क्र. ५: अंबिका नगर येथीलअपरूटींगच्या कामाचे देयक अदाई वेळी रू.५००१/– जादा रकमेच्या अदाई बाबत.**

संदर्भ:- प्रमाणक क्र.१९७३ दिनांक २१.६.२००६.

लेखा विभागाकडील सन २००६-०७ व सन २००७-०८ या आर्थिक वर्षातील अभिलेख्यांचे लेखापरीक्षण हाती घेण्यात आले असून त्या दरम्यान खालीलप्रमाणे आक्षेपार्ह बाब निदर्शनास आली आहे.

सन २००६-०७ या आर्थिक वर्षातील प्रमाणक क्र.१९७३ दिनांक २१.६.२००६ तपासले असता असे निदर्शनास आले की, श्री. एल.जे.लघाने, औरंगाबाद यांना विषयांकित कामाचे प्रथम व अंतिम देयक अदा करतांना रू.३४३६५४/- ऐवजी रू ३४८६५५/- ही रक्कम विचारात घेवून त्यानुसार देयक अदा केल्यामुळे रू.५००१/- इतक्या जादा रकमेचे प्रदान करण्यात आल्याचे दिसून येते.

करिता, सदर रक्कम रू.५००१/- ही संबंधिताकडून वसूल करून महापालिका फ़ंडात भरावी व अनुपालन या विभागास कळवावे असे सूचित केले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.६ : ट्री टॅक्स ची वसूल केलेली रक्कम बॅंकेत जमा न केल्याबाबत. रक्कम रू.६०७६/–**

लेखा विभागाचे सन २००६-०७ व सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षणा दरम्यान कॅशियर कॅश रजिस्टरची तपासणी करीत असतांना दिनांक २१.८.२००७ रोजी ट्री टॅक्स पोटी वसूल रक्कम रू.६०७६/- ची कॅश रजिस्टर मध्ये पान क्र.१०४ वर नोंद घेण्यात आली मात्र बॅंक स्लीप वरून सदरील रक्कम बॅंकेत जमा केल्याचे दिसून येत नाही.

वरील बाबत खातरजमा करून ट्री टॅक्स रक्कम रूपये ६०७६/- महानगरपालिका फ़ंडात जमा करावी व तसा अहवाल लेखापरीक्षण विभागात सादर करण्याविषयी सूचित केले असता विभागाने सदरील काऊन्टर स्लीप लेखा परीक्षण कार्यरत असतांना सादर केल्यामुळे सदरील परिच्छेद वगळण्यात येत आहे.

**जमा बाजू:**

**परिच्छेद क्र.७:**

लेखा विभागाचे सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण हाती घेण्यात आले असता अंतर्गत कॅशियर कॅश रजिस्टर व बँक स्क्रोल यांच्या नोंदी एकत्रित तपासणी दरम्यान असे निदर्शनास आले की, दिनांक ०२.०७.२००७ रोजी रक्कम रू.३०९३/- महानगरपालिका, खाते क्र.५०१ मध्ये जमा केल्याची नोंद आहे. मात्र कॅशियर कॅश रजिस्टर मध्ये सदर नोंद दिसून येत नाही.

वरील बाबत विभागाने प्रत्यक्ष खातरजमा करून तसा लेखी अहवाल सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेले अनुपालन समाधानकारक असल्याने परिच्छेद वगळण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र.८: सन २००६-०७ मधील निविदा विक्रीचे अर्जाबाबत.**

लेखा विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण हाती घेण्यात आलेले असून या अंतर्गत निविदा विक्री अर्ज ,नोंद रजिस्टर यांची एकत्रित तपासणी दरम्यान असे निदर्शनास आले की, अर्जानुसार निविदा विक्री रजिस्टर मध्ये नोंद करण्यात आली आहे. मात्र निविदा धारकाचे अर्ज तपासणीस्तव उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे वसूल केलेल्या रकमांची व इतर नोंदीची तपासणी करता आली नाही.

| अ. क्र. | निविदा जा.क्र. | दिनांक | स्विकृती दिनांक | एकूण प्राप्त निविदा. |
|---|---|---|---|---|
| १ | १२१/०६ | २४.३.०६ | ३.४.०६ | २९ |
| २ | १२३/०६ | २७.३.०६ | ४.४.०६ | ४ |
| ३ | १२२/०६ | २७.३.०६ | ३.४.०६ | ९ |
| ४ | प्र.स.५०६/०६ | ३.४.०६ | २०.४.०६ | २ |
| ५ | इ.ट.१२/०६ | २९.६.०६ | १३.७.०६ | ८८ |
| ६ | झोन क्र.४ | २६.७.०६ | -- | १८<br>रस्त्याची साफ़सफ़ाई |
| ७ | निविदा /ई/७६/०६ | १८.१२.०६ | ५.१.०७ | १०<br>१% E.M.g. फ़क्त निविदा.कार्यवाही नोंद नाही. |
| ८ | निविदा/ई/१०९/०७ | ६.३.०७ | १३.३.०७ | ०२ |
| ९ | निविदा /ई/१०४/०७ | २६.२.०७ | ९.३.०७ | ०२ |

वरील प्रमाणे तपशिलानुसार निविदा अर्ज लेखापरीक्षणासाठी त्वरीत उपलब्ध करून देण्यात यावेत असे सूचित केले असता उपलब्ध अभिलेख्यांची तपासणी अंती परिच्छेद वगळण्यात येतो.

**परिच्छेद क्र.९ : निविदा खरेदीची रक्कम न भरता निविदा खरेदी करणे बाबत. (रक्कम रू.३५०/-)**

संदर्भ:-१)जा.क्र./मनपा/लेखा/निविदा क्र.८/०७, दिनांक २४.१०.२००७.
२) जा.क्र./मनपा/लेखा/निविदा क्र.०७/०७, दिनांक २४.१०.२००७.

सन २००६-०७ व दिनांक २००७-०८ या आर्थिक वर्षाचे लेखा निविदा विभागाचे लेखा परीक्षण सुरू असून या अंतर्गत निविदा विक्री फ़ॉर्म व निविदा विक्री नोंद रजिस्टर सोबत नोंदी तपासण्यात येत असून या दरम्यान असे निदर्शनास आले की,

१. श्री.एस.एम.शेख यांनी निविदा क्र.११ व १२ अशा दोन निविदा खरेदी केल्या जनरल पा.क्र.२५५२२०/२५५३,दिनांक २९.१०.२००७ द्वारे प्रति निविदा किंमत रू.१७५/- प्रमाणे रू.३५०/- वसूल करणे ऐवजी रू.१७५/- वसूल केले. म्हणजे रू.१७५/- कमी वसूल झाले.
२. श्री.शेख ईसा यांनी निविदा क्र.३व ४ अशा दोन निविदा खरेदी केल्या जनरल पा.क्र.२५५२३०/२५५३,दिनांक २९.१०.२००७ द्वारे प्रति निविदा किंमत रू.१७५/- प्रमाणे रू.३५०/- वसूल करणे ऐवजी रू.१७५/- वसूल केले. म्हणजे रू.१७५/- कमी वसूल झाले.

वरील आक्षेपित रक्कम रू. ३५०/- ही जनरल पावती पुस्तक क्र. २८७१, पावती क्र. २८७०८० व ८१ नुसार रू.३५०/- वसूल करून मनपा फ़ंडात भरणा केला आहे यापुढे भविष्यात अशा प्रकारची चूक होणार नाही यासाठी लेखा विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.१० : लेखा निविदा विभाग सन २००६-०७ टेंडर . फॉर्मच्या विक्री नोंद रजिस्टर व जावक बारानिशी बाबत.**

१. लेखा निविदा विभागाचे सन २००६-०७ जावक बारनिशी तपासली असता असे निदर्शनास आले की, जावक क्र.१,२,२०,२१,२२ एकूण-५ (पाच) निविदा विक्री केल्याची नोंद केली. मात्र निविदा विक्री व निविदा स्विकृती बाबत रजिस्टर मध्ये या क्रमांकाची नोंदी घेतलेली नाही. तसेच निविदा विक्री अर्ज तपासणीसाठी उपलब्ध झाले नाही.
२. लेखा निविदा विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे जावक बारानिशी रजिस्टर मध्ये दिनांक १.४.२००६ ते ८.१२.२००६ पर्यंत निविदा जावक क्रमांक एकूण –२५ नोंदी घेतल्याचे दिसून आले. मात्र दिनांक ९.१२.२००६ ते ३१.३.२००७ (माहे डिसेंबर ते मार्च अखेर) या कालावधीत किती निविदा विक्री झाल्या किंवा नाही याबाबतचा बोध होवू शकला नाही.
३. लेखा निविदा विक्री नोंद रजिस्टर सन २००६-०७ मधील जावक रजिस्टर व निविदा विक्री / स्विकृती रजिस्टरच्या शेवटच्या पानावर पृष्ठांकित प्रमाणित केलेले नाही.

वरील तीनही मुद्यांबाबत विभागाने खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेले अनुपालन समाधानकारक असल्यामुळे परिच्छेद वगळण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र.११ : संचित निधी (Fixed Deposit) रक्कम गूंतवणकीबाबत चा बँकनिहाय तपशील देणे बाबत.**

लेखा विभागाचे सन २००६-०७ व सन २००७-८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण सुरू असून या कालावधीमध्ये महानगरपालिकेने विविध बँकेकडे जी रक्कम संचित निधी **(Fixed Deposit)** म्हणून दीर्घ मुदतीसाठी गुंतविली आहे त्याचा तपशील आवश्यक आहे.

करिता,उपरोक्त कालावधीतील गुंतवणूकीबाबतचा सविस्तर तपशील तीन दिवसांत उपलब्ध करून द्यावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेले अनुपालन असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.१२ : निविदा खरेदी/स्विकृती/निविदा उघडणे प्रक्रीया नोंद रजिस्टर मधील नोंदी बाबत.**

लेखा – निविदा या विभागाचे सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण सुरू असून, या अंतर्गत उपलब्ध अभिलेखे जसे, विभागाचे जावक रजिस्टर, निविदा विक्री अर्ज व निविदा अर्ज नोंद/ उघडणे प्रक्रिया रजिस्टर यांची एकत्रित तपासणी करणेत आली. या दरम्यान असे निदर्शनास आले की,

१. सदर रजिस्टर प्रमाणीत केलेले नाही.

२. निविदा विक्री / स्विकृती ची नोंद घेतली,नियमाप्रमाणे निविदा उघडण्यात आल्याचे प्रस्तुत केलेले आहे. मात्र प्रत्यक्ष निविदा उघडतांना निविदाधारक उपस्थित असल्याबाबत नांव व स्वाक्षरी दिसून येत नाही किंवा संबंधित अधिकारी यांच्याही स्वाक्षरी केल्याचे दिसून येत नाही. अशा निविदांची यादी अ.क्र. १ ते ५९ पर्यंत या सोबत संलग्न केलेली आहे.

वरील बाबत विभागाने खुलासा या विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेले अनुपालन असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.१३ : जनरल पावती पुस्तकाद्वारे वसूल रकमेचा कमी भरणा करणे बाबत.**

कॅशिअर कॅश रजिस्टर व जनरल पावती पुस्तक यांच्या जमा बाजूच्या नोंदी एकत्रित तपासणी करत असतांना खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आली.

**अ) जनरल पावती पुस्तकांद्वारे वसूल केलेल्या रकमेचा कमी भरणा दर्शविणारा तक्ता.**

| अ.क्र. | पावती पुस्तक क्र./पावती क्र. | दिनांक | जनरल पावतीवर दर्शविलोली रक्कम | कॅश रजिस्टर दर्शविलेली रक्कम | फ़रक रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | १८९१/१८९०१५ | २१-८-०६ | २३२०/- | २३०० | २० |
| २ | १८९५/१८९४५३ | ३१-८-०६ | ३५०/- | २५० | १०० |
| ३ | १९९७/१९९६३१ | ९-११-०६ | २८६०/- | २८०० | ६० |
| | | | ५५३०/- | ५३५०/- | १८०/- |

ब) **जनरल पावती पुस्तकांद्वारे वसूल रकमेची कॅश रजिस्टर वर नोंद न दर्शविले बाबतचा तक्ता.**

| अ.क्र. | पावती पुस्तक क्र./पावती क्र. | दिनांक | जनरल पावतीवर दर्शविलोली रक्कम | कॅश रजिस्टर दर्शविलेली रक्कम | फ़रक रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | १८३९/१८३८०० | १०-८-०६ | ४ | -- | ४ |
| २ | १९९८/१९९७४७ | १५-११-०६ | १० | -- | १० |
| ३ | १९९८/१९९७४८ | १५-११-०६ | १० | -- | १० |
| | | | **२४** | **--** | **२४** |

वरील (अ) व (ब) ची आक्षेपित एकूण रक्कम रू.२०४/- जनरल पावती पुस्तक क्र. २८७३ पावती क्रमांक २८७२३१, दिनांक २४.७.२००८ नुसार मनपा फ़ंडात भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा अनियमितता घडू नयेत म्हणून लेखा विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.१४ : शासन प्राप्त अनुदानाची माहिती मिळणे संबंधी.**

उक्त प्रकरणांतर्गत राज्य सरकार तद्वतच केंद्र सरकार कडून औरंगाबाद महानगरपालिकेस वित्तीय वर्ष सन २००६-०७ व सन २००७-०८ या कालावधीत प्राप्त झालेल्या अनुदान निधीची सविस्तर माहिती अत्यावश्यक असल्याने सत्वर उपलब्ध करून द्यावी असे सूचित केले असता विभागाने सादर केलेले अनुपालन असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र.१५ : भांडार विभागातून प्राप्त झालेल्या चलन पावती पुस्तकाचा तपशिल स्टॉक रजिस्टरसह उपलब्ध करून देणे बाबत.**

लेखा विभागाचे लेखापरीक्षण सुरू असून कॅश रजिस्टर तसेच चलन पावती पुस्तकाद्वारे वसूल रकमेची एकत्रित तपासणी सुरू आहे. सदर कामाअंतर्गत सन २००६-०७ व सन २००७-०८ मध्ये नगररचना विभागास प्राप्त झालेल्या चलन पुस्तकाचा तपशिल स्टॉक रजिस्टरसह

लेखापरीक्षण विभागास विनाविलंब उपलब्ध करून देण्यात यावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो स्टॉक अप्राप्त आहे. करिता परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.१६: कोंडवाडा फ़ीस वसूल रकमेपैकी रू.१०००/- चा कमी भरणा करणेबाबत.**

लेखा विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण हाती घेण्यात आले असून या अंतर्गत कॅशियर कॅश रजिस्टर व विविध विभागाचे चलन याच्या नोंदी एकत्रित तपासणी दरम्यान असे निदर्शनास आले की, कोंडवाडा फ़ीसची रक्कम चलन क्र.००४०३५ दिनांक ३०.९.२००६ रोजी रक्कम रूपये १४३०/- दिनांक ३.१०.२००६ रोजी कॅशियरकडे जमा केली मात्र कॅश रजि.क्र.३ पान क्र.७३ मध्ये नोंद रक्कम रू.४३०/- केली म्हणजे रू.१०००/- चा कमी भरणा केल्याचे दिसून आले.

वरील आक्षेपित रक्कम रूपये १०००/- पावती पुस्तक क्र.३२४३ पावती क्र.३२४२३३ दिनांक २.५.२००९ द्वारे महानगरपालिका फ़ंडात भरणा केली आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होणार नाही याची लेखा विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.१७: महानगरपालिका अंतर्गत विविध विभागामार्फ़त चलन वसूल रकमांच्या नोंदी कॅश रजिस्टरमध्ये न घेणे बाबत.(एकूण रक्कम रू.१,२१,५,५६३)**

उपरोक्त संदर्भिय आदेशान्वये लेखा विभागाचे सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना महानगरपालिका अंतर्गत विविध विभागामार्फ़त चलनाद्वारे वसूल करणेत आलेल्या रकमांच्या नोंदी कॅशियर कॅश रजिस्टरमध्ये घेतल्या नसल्याचे दिसून येते.

तरी वरील अनियमिततांबाबत खुलासा करावा असे विभागास सूचित केले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे. करिता परिच्छेद कायम करण्यात येतो. **(सोबत विवरणपत्र- अ)**

**परिच्छेद क्र.१८ : महानगरपालिका अधिकारी /कर्मचारी यांना देण्यात आलेल्या वाहन कर्ज व गृह कर्ज सन २००६-०७ व सन २००७-०८ या वर्षाचे संबंधित अभिलेखे उपलब्ध करून देणेबाबत.**

संदर्भ:- १)या विभागाचे अर्धसमास पत्र क्र.(२) दि.२८.५.०८.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मा.सभापती यांचे आदेशानुसार सन २००६-०७ ते सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण हाती घेण्यात आलेले आहे. लेखापरीक्षण कामी खालील आवश्यक अभिलेखे उपलब्ध करून देण्यात यावेत.

१. अधिकारी / कर्मचारी यांना मंजूर केलेल्या वाहन कर्ज संचिका व वाहन कर्ज वसूल नोंद रजिस्टर.

२. अधिकारी / कर्मचारी यांना मंजूर केलेले गृह कर्ज संचिका व गृह कर्ज वसूली नोंद रजिस्टर. तसेच तद्अनुषंगिक सर्व अभिलेखे.

वरील अभिलेखे उपलब्ध करून देणे बाबत यापूर्वी अर्धसमास पत्र क्र.२ द्वारे कळविलेले आहे. मात्र संबंधित लेखे अद्यापपावेतो अप्राप्त आहे. या अर्धसमास पत्राद्वारे पुन्हा कळविण्यात येते की, सदर लेखे तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावे. जेणेकरून उक्त काम विहीत वेळेत करता येईल असे सूचित केले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे. करिता परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.१९ : महानगरपालिका अंतर्गत विविध विभागामार्फ़त चलन वसूल रकमांच्या नोंदी कॅश रजिस्टरध्ये न घेणे बाबत.**

उपरोक्त संदर्भिय आदेशान्वये लेखा विभागाचे सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण करीत असतांना महानगरपालिका अंतर्गत विविध विभागामार्फ़त चलनाद्वारे वसूल करणेत आलेल्या रकमांच्या नोंदी चलन नं.९६०७ दिनांक ५.१०.२००७ रू.१६०/-रजिस्ट्रेशन फ़िस जवाहर कॉलनी, आरोग्य केंद्र, तसेच चलन नं.७६६१ दिनांक २२.२.२००८ रजिस्ट्रेशन फ़िस रक्कम रू. १६०/- जुनाबाजार आरोग्य केंद्र, च्या नोंदी कॅश रजिस्टर मध्ये घेतल्या नसल्याचे दिसून येते.

तरी आक्षेपित रक्कम रू.१६०/- ही पावती पुस्तक क्र.२८७३ पावती क्र.२८७२९५ दिनांक ३१.७.२००८ रोजी मनपा फ़ंडात भरणा करण्यात आली. यापुढे भविष्यात अशा चूका होणार नाही याची लेखा विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.२० : महानगरपालिका अंतर्गत नगर रचना विभागाचे कार्यालयीन चलन द्वारे वसूल रकमांच्या नोंदी लेखा विभागातील कॅशियर कॅश रजिस्टर मधील नोंदीच्या अनियमिततेबाबत.**

.वरील संदर्भिय आदेशान्वये लेखा विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण सुरू असून, या दरम्यान विभागा अंतर्गतचे कॅशियर कॅश रजिस्टर व विविध विभागातून चलन द्वारे वसूल रकमांच्या नोंदी यांची एकत्रित तपासणी करणेत येत आहे. या दरम्यान नगर रचना विभागाचे कार्यालयीन चलन द्वारे वसूल करणेत आलेल्या रकमांच्या नोंदी कॅशियर कॅश रजिस्टर सोबत तपासणी केली असता खालील अनियमितता निदर्शनास आल्या.

१. चलनद्वारे वसूल रकमांच्या नोंदी कॅशियर कॅश रजिस्टरमध्ये घेणेत आलेल्या नाही.(एकूण रू.१,८८,७१९/-) **(सोबत विवरणपत्र – क)**

२. चलन द्वारे वसूल रकमांचा कमी भरणा दर्शविणाऱ्या नोंदी. (एकूण रू.५३,२८०/-) **(सोबत विवरणपत्र –ड)**

३. चलन द्वारे प्रत्यक्ष वसूल रकमांपैकी अतिरिक्त भरणा दर्शविणाऱ्या नोंदी. (एकूण रू.१,१४,७८३/-) **(सोबत विवरणपत्र – ब)**

वरील बाबत सविस्तर तपशिलवार तक्ते या सोबत जोडलेले आहे. विभागाने याची प्रत्यक्ष खातरजमा करून तसा खुलासा या विभागास सादर करावा. असे सूचित केले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे. करीता परिच्छेद कायम करण्यात येतो. (सोबत तक्ता जोडला आहे.)

**परिच्छेद क्र.२१: लेखापरीक्षणासाठी लेखा विभागातील आवश्यक ते सर्व लेखे उपलब्ध करून देण्याबाबत.**

उपरोक्त विषयांकित प्रकरणी मा.सभापती,स्थायी समिती,महानगरपालिका,औरंगाबाद यांनी संदर्भिय (१) नुसार सूचित केल्याप्रमाणे लेखा शाखेचे विशेष लेखापरीक्षण हाती घेण्यात आलेले आहे. या संदर्भाने आपणास कळविण्यात येते की, लेखा विभागाकडील संचित निधी , स्थायी अनामत Fixed Deposit, अधिकारी / कर्मचारी यांना देण्यात आलेले वाहन कर्ज ,गृहकर्ज, शासन प्राप्त अनुदानाची माहिती, भांडार विभागामार्फ़त नगररचना विभागास वितरीत केलेल्या चलन पावती पुस्तकांचा तपशिल, सन २००६-०७ व सन २००७-०८ या वित्तीय वर्षाचे लेखे लेखापरीक्षणासाठी त्वरीत उपलब्ध करून देण्याबाबत सातत्याने आपल्या विभागाकडे तोंडी व लेखी पाठपुरावा करण्यात येत आहे. अर्धसमास पत्रव्यवहार व स्मरणपत्रे देवूनही लेखा विभागातर्फ़े गांभिर्याने दखल घेऊन लेखापरीक्षणासाठी लेखे उपलब्ध करून दिले नाहीत.

# वार्ड क्र.अ
# वॉर्ड अधिकारी –अ यांच्या अधिपत्याखालील झालेल्या
# जमा बाजूचे लेखापरीक्षण.

## जमा बाजुचे लेखापरीक्षण :

सन २००६-०७ या वर्षातील थकित चाचणी लेखापरीक्षणामध्ये जमा बाजूच्या अभिलेख्यांची तपासणी हाती घेण्यात आली असून तपासणी कालावधीत खाली नमूद केलेल्या नुसार पावती पुस्तकाची पडताळणी करण्यात आली तपासणी करण्यात आलेल्या पावती पुस्तकाबाबतचा तपशिल हा खालील प्रमाणे आहे. सन २००६ ते २००७ या आर्थिक वर्षातील एकूण पुस्तके.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मालमत्ता कर वसूली पावती पुस्तक | - | ६५ |
| २. | पाणीपट्टी कर वसूली पावती पुस्तके | - | ४६ |
| ३. | जनरल पावती पुस्तके | - | २९ |

उक्त पावती पुस्तकाद्वारे वसूल करण्यात आलेली रक्कम ही वेळोवेळी संबंधिताने कॅश मध्ये नोंद घेवून महापालिका फ़ंडात जमा केले बाबत तपासणी करण्यात आली. तसेच संबंधित मालमत्ता धारकाकडील वसूल करण्याच्या कर नोंदी ह्या मागणी रजिस्टर प्रमाणे घेतलेल्या आहेत/नाहीत या बाबतची खातरजमा करण्याच्या दृष्टीने चाचणी लेखापरीक्षण ही करण्यात आले. तपासणी दरम्यान निदर्शनास आलेल्या आक्षेपार्ह बाबीचा तपशिल हा खालील प्रमाणे आहे.

### परिच्छेद क्र. १ : लेखापरीक्षणास्तव आवश्यक ती सर्व वाणिज्य अभिलेखे उपलब्ध करून देणे बाबत.

संदर्भः- जा.क्र./मनपा/मुलेप/१६७ /२००७, दिनांक २०.१०.२००७.

वॉर्ड - अ या विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण हाती घेण्यात आले असून सदर कामी आवश्यक ती सर्व वाणिज्य अभिलेखे जसे मालमत्ता कर वसूली पावती पुस्तके, पाणीपट्‌टी कर वसूली पावती पुस्तके, इरसाल रजिस्टर (कॅश रजिस्टर), मालमत्ता मागणी रजिस्टर, व्यावसायिक पाणीपट्‌टी मागणी रजिस्टर, तसेच जन्म - मृत्यु प्रमाणपत्र फ़ी वसूली जनरल पावती पुस्तक आणि भांडार विभागातून वेळोवेळी घेतलेले विविध साहित्य, विभागाअंतर्गत अद्ययावत ठेवलेले कॅश रजिस्टर कर्मचाऱ्यांचे मासिक पगारपत्रक हजेरीपत्रकासह, कर्मचाऱ्यांचे वैद्यकीय देय परतावा खर्चाबाबतच्या संचिका इत्यादी सर्व लेखे / अभिलेखे तपासणीस्तव उपलब्ध करून देण्यात यावे.

१. वॉर्ड इंजिनियर मार्फ़त विविध विकास कामावर करण्यात आलेल्या खर्चाच्या मंजूर संचिका एम.बी. व प्रोव्हीजन रजिस्टर इ.सर्व अभिलेखे हे लेखापरीक्षणास्तव उपलब्ध करून देण्याची व्यवस्था व्हावी.

२. नविन ड्रेनेज जोडणी बाबतच्या मंजूर संचिका नोंद रजिस्टरसह व ड्रेनेज जोडणी फ़ॉर्म विक्री / शिल्लकचा तपशिल.

३. या वॉर्ड अंतर्गत नविन नळ जोडणी / तात्पुरते नळ कनेक्शन मंजूर संचिका चे नोंदणी रजिस्टरसह व नळ जोडणी फ़ॉर्म विक्रीचा /शिल्लकचा तपशिल.

वरील बाबत अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे. करिता परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.२ : न वटलेल्या धनादेशाबाबत.**

वॉर्ड - अ या विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण हाती घेतलेले आहे. पाणीपट्टी करापोटी घेतलेले धनादेश न वटताच परत येतात अशी न वटलेल्या धनादेशाची यादी सक्षम अधिकारी यांचे स्वाक्षरीने लेखापरीक्षणास सत्वर उपलब्ध करून देण्याविषयी कळविले असता अद्यापपावेतो अनुपालन अहवाल अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र. ३ : वॉर्ड – अ विभागाअंतर्गत एकूण पाणीपट्टी धारकांचा तपशील उपलब्ध करून देणेबाबत.**

वॉर्ड - अ या विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण सुरू असून या कामी खालील लेख्यांची आवश्यकता आहे.

1. दिनांक १.८.२००५ पासून प्रभाग –अ अस्तित्वात आला असून त्यापूर्वी या विभागामध्ये इतर झोन मधून किती पाणीपट्टी धारक समाविष्ट करण्यात आलेले आहे. थकबाकीसह यादी उपलब्ध करून देण्याविषयी सूचित केले असता खालील प्रमाणे यादी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

२. वॉर्ड - अ अंतर्गत सध्या पाणीपट्टीधारक एकूण किती आहेत. तसेच विभागाअंतर्गत पाणीपट्टी मागणी रजिस्टर किती आहेत.

वरील बाबतचा सविस्तर तपशिल लेखापरीक्षण विभागास त्वरीत उपलब्ध करून देण्यात यावा असे सूचित केले असता खालील प्रमाणे माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

**१)**

| **झोन क्रमांक** | **एकूण कनेक्शन** | | | **एकूण थकबाकी** |
|---|---|---|---|---|
| | **१/२''** | **३/४''** | **१''** | |
| २ | १३८० | २८ | ७ | १३१२१०२३/- |
| ७ | ४४६ | -- | -- | ३८११४०१/- |
| ८ | ४६२ | -- | -- | ५२६४०६०/- |
| **एकूण** | **२२८८** | **२८** | **०७** | **२२१९६४८४/-** |

**२) तसेच सध्या वॉर्ड –अ अंतर्गत पाणीपट्टी मागणी रजिस्टर (७१) असून एकूण नळधारक व थकबाकी खालील प्रमाणे आहे.**

| एकूण कनेक्शन | | | एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| १/२" | ३/४" | १" | |
| ८४३८ | ३८ | २० | **७६६३४५२६.००** |

वॉर्ड - अ अंतर्गत एकूण नळ कनेक्शन धारकांकडे आजपर्यंत पाणीपट्टी करापोटी एकूण थकित रक्कम रू.७,६६,३४,५२६/- इतकी आहे. म्हणजेच या वरून असे स्पष्ट होते की, वसूलीबाबत विभागाने कार्यवाही केलेली नाही. यापुढे वसूलीबाबत नियमाप्रमाणे कार्यवाही करून पाणीपट्टी कर वसूल करण्यात यावा असे सूचित करण्यात येते.

**परिच्छेद क्र. ४ : लेखापरीक्षणास्तव आवश्यक ते सर्व अभिलेखे उपलब्ध करून देणे बाबत.**

वॉर्ड - अ या विभागाचे सन २००६-२००७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण सुरू असून या कामी खालील प्रमाणे लेखे लेखापरीक्षणास्तव उपलब्ध करून देण्यात यावे.

१. सन २००६-०७ मधील अभय योजना अंतर्गत सर्व मंजूर संचिका /नळधारक यांचा तपशिल.

२. तात्पुरत्या स्वरूपात मंजूर नळ कनेक्शन मंजूर संचिका.

३. व्यावसायिक नळ कनेक्शन बाबत सविस्तर एकूण तपशिल.

४. घरगूती नळ कनेक्शन एकूण किती याचा तपशिल तसेच नविन नळ कनेक्शन फ़ॉर्मचा तपशिल.

५. नविन कर आकारणी / फ़ेर कर आकारणी / नामांतर बाबतच्या सर्व मंजूर संचिका.

वरील सर्व अभिलेखे त्वरीत लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करून देण्यात यावेत.

विभागाकडून अनुपालन अप्राप्त असल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात आला.

**परिच्छेद क्र.५ : विविध शिर्षाअंतर्गत केलेल्या कामाच्या माहेवार खर्चाचा तपशिल उपलब्ध करून देणे बाबत.**

उक्त संदर्भांकित प्रकरणी कळविण्यात येते की, सन २००६-०७ या वर्षाचे लेखापरीक्षण हाती घेण्यात आले असून या कामी आपल्या विभागाकडील विविध शिर्षांतर्गत केलेल्या कामाच्या माहेवार खर्चाचा तपशिल लेखा विभागातील तरतूद (प्रोव्हिजन रजिस्टर) पुस्तिके नुसार शक्य तितक्या लवकर उपलब्ध करून देण्याविषयी संदर्भिय (२)नुसार कळविण्यात आले असता अद्यापपावेतो तपशिल उपलब्ध करून देण्यात आलेला नाही.

तरी उक्त प्रमाणे लेखे सत्वर उपलब्ध करून देण्याची व्यवस्था व्हावी. तथापि, संबंधित विभागाकडून अनुपालन अप्राप्त असल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.६ : मालमत्ता कराचा दोनवेळा भरणा करणे बाबत रक्कम रू.२६१/-**

वॉर्ड -अ विभागाचे सन २००६-०७ या वर्षीचे लेखा परीक्षण करीत असतांना असे निदर्शनास आले की, मालमत्ता वसूल रकमेचा संबंधिताने बुक क्र.१८०८ पा.क्र.१८० ७१७ दिनांक २६.३.२००७ च्या पावतीचा रक्कम रू.२६१/- दोन वेळा नोंद घेवून २६१/- चा अतिरिक्त भरणा मनपा फ़ंडात केल्याचे दिसून येते.

सदरचा आर्थिक व्यवहार हा अनियमित स्वरूपाचा असून त्या बाबतचा खुलासा अद्यापपावेतो सादर केला नसल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.७ : रक्कम रू.३००/- चा कमी भरणा करणे बाबत.**

वॉर्ड-अ विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षीचे लेखापरीक्षण करीत असतांना इरसाल क्र.७ ची तपासणी केली असता बुक क्र.१७१८ पावती क्र.१७१३९ ची प्रत्यक्षात १०,७००/- रू ची वसूली करण्यात आली. परंतु इसाल मध्ये नोंद घेतांना रक्कम रू.१०,४००/-ची नोंद घेण्यात येवून रक्कम रू.३००/- चा कमी भरणा केल्याचे तपासणी अंती निदर्शनास येते.

उपरोक्त आक्षेपित रक्कम रू.३००/- जनरल पावती पु.क्र.२९६५/२९६४०२, दि.२८.७.२००८ नुसार मनपा फ़ंडात भरणा केला असल्याने परिच्छेद वगळण्यात येतो. भविष्यात अशी चुक होणार नाही याची विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र. ८ : जनरल पावती क्र.१७१६२९ ची इरसाल मध्ये नोंद न घेणे बाबत.**

वॉर्ड -अ या विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना बुक क्र.१७१७ ची पावती क्र.१७१६२९ ची इरसाल मध्ये तपासणी करीत असतांना सदर पावती आधारे रक्कम रू.३०६०/- ची जनरल वसूली केल्याचे पावती वरून दिसून येते. परंतु सदर पावतीची नोंद घेण्यातच आल्याचे दिसून येत नाही म्हणजेच रक्कम रू.३०६०/- मनपा फ़ंडात जमा न केल्याचे दिसून येते.

उपरोक्त आक्षेपित रक्कम रू.३०६०/- पावती पुस्तक क्र.२९६५,पावती क्र.२९६४०२ दि.२८.७.२००८ नुसार मनपा फ़ंडात भरणा केला असल्यामुळे परिच्छेद वगळण्यात आला. यापुढे भविष्यात अशी चुक होणार नाही याची विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र. ९ :पाणीपट्टी वसूल रकमेचा कमी भरणा करणे बाबत रक्कम रू.३००/-**

वॉर्ड -अ विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षीचे लेखा परीक्षण करीत असतांना इरसाल क्र.३ ची तपासणी केली असता बुक नं.२२१५ ची पावती क्र.२२१४३ दिनांक २५.९.२००६ श्री.एस.एम.डायलकर यांच्या कडून पाणीपट्टीचा कर प्रत्यक्षात रक्कम रू.९६०/- वसूल करण्यात आला. परंतु इरसाल मध्ये नोंद करतांना रक्कम रू.६००/- ची नोंद करण्यात आली म्हणजेच ९६०-६००=३६० चा कमी भरणा केल्याचे दिसून येते.

वरील आक्षेपित रक्कम रू. ३६०/-पावती पुस्तक क्र.२९६५ पा.क्र. २९६४०२ , दि.२८.७.२००८ द्वारे मनपा फ़ंडात भरणा केल्यामुळे परिच्छेद वगळण्यात येतो. यापुढे भविष्यात अशी चुक होणार नाही याची विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.१० : पाणीपट्टी रक्कम रू.११२५/- चा कमी भरणा करणे बाबत.**

वॉर्ड -अ च्या विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षीचे लेखापरीक्षण करीत असतांना इरसाल क्र.७ ची तपासणी करीत असतांना बुक क्र.२३९१ पावती क्र.२३९०८५ दिनांक २८.२.२००७ श्रीमती सिमा सुधीर जोशी यांच्या कडून पाणीपट्टी बाबत प्रत्यक्षात वरील पावती आधारे रक्कम रू.२९२५/- ची वसूली करण्यात आली. मात्र इरसाल मध्ये नोंद घेतांना रक्कम रू.१८००/- ची नोंद घेण्यात आली. म्हणजेच २९२५-१८००=११२५/- ची कमी नोंद घेवून उक्त रक्कम मनपा फ़ंडात कमी भरणा केल्याचे दिसून येते.

वरील आक्षेपित रक्कम रू. ११२५/- पावती पुस्तक क्र.२९६५ पा.क्र.२९६४०२,दि.२८.७.२००८ द्वारे मनपा फ़ंडात भरणा केल्यामुळे परिच्छेद वगळण्यात येतो. यापुढे भविष्यात अशी चुक होणार नाही याची विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.११ : पाणीपट्टी वसूल रकमेचा अतिरिक्त भरणा करणे बाबत. रक्कम रू.६००/-**

वॉर्ड -अ विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना इरसाल क्र.६ ची तपासणी केली असता पान क्र.६८ वर बुक क्र.२२१८ पावती क्र.२२१७८५ दिनांक ७.२.२००७ श्री.पी.के.सरोदे यांच्या नावावर प्रत्यक्षात रक्कम रू.१२००/- ची नोंद ही पावती वर दिसून येते. परंतु इरसालवर रक्कम रू.१८००/- ची म्हणजेच रक्कम रू.६००/- अतिरिक्त नोंद घेवून रक्कम रू.मनपा फ़ंडात जमा करण्यात आल्याचे दिसून येते.

सदरच्या अनियमिततेबाबत विभागास पत्र दिले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त असल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र. १२ : एकाच पाणीपट्टी पावतीची दोनदा नोंद घेणे बाबत.**

वॉर्ड -अ विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण सुरू असून सदर पाणीपट्टीची किमान तपासणी करीत असता डिमांड क्र. एन-१३ सी-३ चे रजिस्टरची तपासणी केली असता बुक क्र. २६०८ या पावती क्र. २६०७९५ दि.३०.३.२००७ ची मूळ पावती ही डी.डी.रावते नळ खाते क्र. ४२५९१ रक्कम रू.१८००/- नावाने फ़ाडली असे पावती पुस्तका वरून दिसून येते. सदर पावतीची नोंद ही त्या मूळ खातेदाराच्या पुस्तकावरून दिसून येते. सदर पावतीची नोंद ही त्या मूळ खातेदाराच्या नावावर दिसून येते व परत त्याच क्रमांकाचे बुक क्र. व पावती क्रमांकाची पावतीची नोंद ही डि.बी.बनारसे यांच्या नळ खात्यावर बुक क्र.२६०८ पावती क्र. २६०७९५ ची चूकीची नोंद घेण्यात येवून सदरच्या खातेदाराच्या त्या पावतीनंतर मार्च २००८ पर्यंतचे पाणीपट्टी निरंक केल्याचे दिसून येते. म्हणजेच सदर पावतीच्या मूळ १८००/- चे मनपाचा तोटा झाल्याचे दिसून येते.

सदरच्या पावतीची डबल नोंद घेवून मनपाचे रक्कम रू. १८००/- चे आर्थिक नुकसान केल्याचे दिसून येते. ही अत्यंत आक्षेपार्ह बाब आहे. याबाबत खातरजमा करून तसा अहवाल या विभागास द्यावा असे कळविले असतांनाही अनुपालन अहवाल अद्यापपावेतो अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र. १३ : पाणीपट्टी वसूल रकमेचा कमी भरणा करणे बाबत.**

वॉर्ड -अ विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना इरसाल क्र.९ ची तपासणी केली असता बुक क्र.२६०८ पावती क्र.२६०७७८ दिनांक ३०.३.२००७ श्री.फ़करोद्दीन जुल्फ़ेकार अली यांच्या कडून पाणीपट्टीची रक्कम रू.५३५३/- उपरोक्त पावत्या आधारे वसूल करण्यात आली. परंतु इरसाल मध्ये नोंद घेतांना रक्कम रू.५०००/- ची नोंद घेण्यात आली म्हणजे ५३५३-५०००=३५३/- ची कमी नोंद घेवून कमी भरणा केल्याचे दिसून येते.

तरी आक्षेपित रक्कम रू. ३५३/-, पावती पुस्तक क्र.२९६५ पावती क्र.२९६४०२, दि.२८.७.२००८ नुसार मनपा फ़ंडात भरणा केली. करिता परिच्छेद वगळण्यात येतो. यापुढे भविष्यात अशी चुक होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.१४ : पाणीपट्टी एकाच पावतीची दोन ठिकाणी नोंद होणे बाबत.**

वॉर्ड -अ विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण सुरू असून त्या मध्ये डिमांड क्र.एन-१३-सी-१ ची तपासणी केली असता पेज क्र. ४५ वर बुक नं. २२१६ पा.क्र. २२१५२८ ची पावती श्री. आर.के.कटारिया यांच्या नावावर २०००/- रक्कम रू. पीपी १५.९.२००६ ची नोंद घेण्यात आली असून सदरच्या पावतीची नोंद परत ही पेज क्र.४६ श्री.गाढेकर रघुनाथ यांच्या खात्यावर घेण्यात आल्याचे दिसून येत व सदरील पावतीच्या क्रमांका मध्ये खाडाखोड केल्याचे दिसून येते. म्हणजेच सदरील पावती रक्कम रू.२०००/- ची पान क्र.४६ च्या नोंदी बाबत बोध होत नाही.

सदर पावतीची दोन वेळेस नोंद घेणे ही बाब आक्षेपार्ह आहे. या बाबतचा योग्य तो खुलासा या विभागास करावा. असे कळविले असतांनाही अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र. १५ :पाणीपट्टी रक्कम रू.११२५/– चा कमी भरणा करणे बाबत.**

वॉर्ड -अ चे विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षीचे लेखापरीक्षण करीत असतांना इरसाल क्र.७ ची तपासणी केली असता . बुक क्र.२३९१ पावती क्र.२३९०८६ दिनांक २८.२.२००७ या द्वारे नामे डॉ.कल्पना सुभाष झंवर यांच्याकडून पाणीपट्टी बाबत उक्त पावती द्वारे प्रत्यक्षात २९२५/- ची वसूली केल्याचे दिसून येते. मात्र इरसाल मध्ये नोंद घेतांना १८००/- ची नोंद घेण्यात आली म्हणजेच २९२५-१८००=११२५/- रूपयाची कमी नोंद घेवून उक्त रक्कम मनपा फ़ंडात कमी भरणा केल्याचे दिसून येते.

वरील आक्षेपित रक्कम रू.११२५/-,पावती पुस्तक क्र.२९६५ पावती क्र.२९६४०२, दि.२८.७.२००८ नुसार मनपा फ़ंडात भरणा केली असल्याने परिच्छेद वगळण्यात येतो. यापुढे भविष्यात अशी चुक होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र. १६ : इरसाल रजिस्टर मध्ये भरणा रक्कम कमी लिहून कमी रकमेचा भरणा करणे बाबत.**

प्रभाग-अ या विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना इरसाल क्र.९ ची तपासणी केली असता पान क्र.३७ वर श्रीमती विद्या राजेंद्र कुटा यांच्याकडून जनरल कर पावती क्र.१७१९२१ बुक क्र.१७२० अन्वये रक्कम रू.३०६०/- वसूली केल्याचे दिसून येते. परंतु इरसाल मध्ये नोंद घेतांना फ़क्त रू.२००/- ची नोंद घेण्यात आली. म्हणजेच ३०६०-२००=२८६०/- चा कमी भरणा केल्याचे इरसाल रजिस्टर नोंद वरून दिसून येते.

उपरोक्त आक्षेपित रक्कम रू.२८६०/-, पावती पुस्तक क्र.२९६५ही पावती क्र.२९६४०२, दि.२८.७.२००८ नुसार मनपा फ़ंडात भरणा केली असल्याने परिच्छेद वगळण्यात येतो. यापुढे भविष्यात अशी चुक होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.१७ : पाणी पट्टी रक्कम रू.४१६६/– चा कमी भरणा करणे बाबत.**

प्रभाग-अ विभागाचे लेखा परीक्षण करीत असतांना इरसाल क्र.६ मध्ये पान क्र.६८ वर बुक क्र.२२१८ पावती क्र. २२१७८४ ची नोंद घेताना श्री.नईम खान सुबान यांची पाणीपट्टी कर वसूली ही प्रत्यक्षात पावती वर रक्कम रू.५९६६ /- इतकी वसूल करण्यात आली. मात्र नोंद ही फ़क्त १८००/- रू.ची घेण्यात आली. म्हणजेच ५९६६-१८००=४१६६/- रूपयाची कमी नोंद घेवून मनपा फ़ंडात कमी रकमेचा भरणा केल्याचे दिसून येते.

वरील आक्षेपित रक्कम रू. ४१६६/- ,पावती पुस्तक क्र.२९६५ पावती .क्र.२९६४०२, दि.२८.७.२००८ नुसार मनपा फ़ंडात भरणा करण्यात आल्याचे कळविण्यात आल्याने परिच्छेद वगळण्यात येतो. यापुढे भविष्यात अशी चुक होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.१८ : पाणीपट्टी वसूल रकमेचा कमी भरणा करणे बाबत.**

वॉर्ड -अ या विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना इरसाल क्र.९ ची तपासणी केली असता बुक क्र.२६०८ पावती क्र.२६०७८६ दिनांक ३०.३.२००७ रोजी अ.रझाक हाजी इब्राहीम यांच्या नांवे पाणीपट्टीचा कर उपरोक्त पावती आधारे रक्कम रू.३६००/- प्रत्यक्षात वसूल केल्याचे पावती वरून दिसून येते. परंतु इरसाल वर नोंद घेतांना १८००/- रू ची घेण्यात आली. म्हणजेच ३६००-१८००=१८००/- रू ची रक्कम कमी नोंद घेवून कमी भरणा केल्याचे इरसालच्या नोंदी वरून दिसून येते.

आक्षेपित रक्कम रू. १८००/- पावती पुस्तक क्र.२९६५ पा.क्र.२९६४०२, दि.२८.७.२००८ नुसार मनपा फ़ंडात भरणा केला असल्याचे कळविण्यात आल्याने परिच्छेद वगळण्यात येतो. यापुढे भविष्यात अशी चुक होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र. १९ : पाणीपट्टी पावतीची डिमांड मध्ये दोन वेगवेगळ्या खात्यावर नोंद घेणे बाबत.**

वॉर्ड -अ विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षीचे लेखापरीक्षण सुरू असून पाणीपट्टी डिमांडची तपासणी करीत असता डिमांड क्र. एन-१३-सी-३ या डिमांड मध्ये बुक क्र. २२१६ पावती क्र.२२१६३३ दिनांक १५.४.२००६ रोजी रक्कम रू. १८००/- ची वसूली करून श्री.विनोद वैद्य नळ खाते क्र. ४२६४८ च्या नावावर सदर पावती फ़ाडली असता त्या खातेदाराच्या नावावर सदर पावतीची नोंद घेण्यात आली आहे. परंतु सदर क्रमांकाच्या पावतीची नोंद परत एकदा पान क्र.७६ श्री.अहेर रमेश बाबुराव खाते क्र.४२६४२ यांच्या नावावर सदरच्या पावतीची १८००/- ची नोंद घेण्यात आली आहे असे तपासणीत दिसून येते. तद्नंतर सदर आहेर यांच्या खाते मार्च २००८ पर्यंत पाणीपट्टी भरणा केल्याचे दिसून येते. म्हणजेच आहेर यांच्या नळखात्यावर चूकीने १८००/- रूपयाचा भरणा केला असे दिसून येते. त्यामुळे १८००/- रूपयाचे मनपाचे नुकसान झाले असे दिसून येते.

तरी उपरोक्त बाबत खातरजमा करून त्या बाबतचा योग्य तो खुलासा या विभागास द्यावा.

अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.२० : पाणीपट्टी रक्कम रू.१८००/- ची नोंद न घेताच १८००/- चा कमी भरणा करणे बाबत.**

वॉर्ड -अ विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षीचे लेखा परीक्षण करीत असतांना इरसाल क्र.७ पान क्र.९, बुक क्र.२३८९ पावती क्र. २३८८१८ दिनांक १४.२.२००७ नामे श्री. एस.डी.पोतनिस यांच्याकडून पाणीपट्टीचा कर रक्कम रू.१८००/- उपरोक्त पावतीद्वारे वसूल करण्यात आले. परंतु इरसाल क्र.७ वर नोंद घेतांना सदरच्या व्यक्तीच्या नावासमोर १८००/- ची नोंद घेण्यात आली नाही. म्हणजेच नोंद निरंक दिसून येते. म्हणजेच १८००/- ही रक्कम मनपा फ़ंडात जमा केले नाही असे दिसून येते.

आक्षेपित रक्कम रू.१८००/- पावती पुस्तक क्र.२९६५, पावती क्र. २९६४०२, दि.२८.७.२००८ नुसार मनपा फ़ंडात भरणा करण्यात आली. करिता परिच्छेद वगळण्यात येतो. यापुढे भविष्यात अशी चुक होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र. २१: जनरल पावती द्वारे वसूल रकमेचा मनपा फ़ंडात विलंबाने भरणा करणे बाबत. (एकूण रक्कम रू.४०,८७०/-).**

वॉर्ड - अ या विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे जमा बाजूचे लेखापरीक्षण करीत असतांना असे निदर्शनास आले की, संबंधिताने जनरल पावती द्वारे वसूल रक्कम वेळीच मनपा फ़ंडात भरणा न करता १० महिने ते ११ महिने इतक्या विलंबाने भरणा केल्याचे कॅश रजिस्टर वरील नोंदी वरून दिसून येते.

या बाबतचा सविस्तर तपशिल सोबत जोडलेला आहे. याबाबत विभागाने खुलासा सादर करावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.२२ : जनरल पावती द्वारे पाणीपट्टी कर वसूल रकमेचा भरणा मनपा फ़ंडात विलंबाने करणे बाबत. (एकूण रक्कम रू.४५१००/-)**

वॉर्ड - अ या विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे जमा बाजूचे लेखापरीक्षण करीत असतांना असे निदर्शनास आले की, संबंधिताने जनरल पावती द्वारे पाणीपट्टी वसूल केलेली रक्कम वेळीच मनपा फ़ंडात भरणा न करता ते १७ दिवस ते १३९ दिवस विलंबाने भरणा केल्याचे कॅश रजिस्टर वरून दिसून येते. तसेच पाणीपट्टीचे पुस्तक न वापरता जनरल पुस्तकांचा वापर केल्याचे काय प्रयोजन होत ?.

विलंबाने भरणा केल्याबाबतचा सविस्तर तपशिल या सोबत जोडलेला आहे. याबाबत विभागाने लेखी खुलासा सादर करावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.२३ : पाणीपट्टी कर वसूल रकमेचा भरणा मनपा फ़ंडात विलंबाने करणे बाबत. (एकूण रक्कम रू.७२६२५/-)**

वॉर्ड -अ या विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे जमा बाजूचे लेखापरीक्षण करीत असतांना असे निदर्शनास आले की, संबंधिताने पाणीपट्टी वसूल केलेली रक्कम वेळीच मनपा फ़ंडात भरणा न करता ते १२ ते २८४ दिवस विलंबाने भरणा केल्याचे कॅश रजिस्टर वरून दिसून येते. विलंबाने भरणा केल्याबाबतचा सविस्तर तपशिलया सोबत जोडलेला आहे.

याबाबत विभागाने लेखी खुलासा सादर करावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.२४ : श्री.एन.एस.डांबरे यांच्या पाणीपट्टी खात्यावर दोन चूकीच्या नोंदी घेणे बाबत.**

वॉर्ड -अ या विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षीचे लेखापरीक्षण सुरू असून पाणीपट्टी ही एन-१३ सी-१ डिमांड तपासणी करीत असता बुक क्र. २२१६ ची पावती क्र.२२१५१९ ची मूळ पावती वाय.बी.अंभोरे नळखाते क्र.४२५०९ नामे फ़ाडली आहे असे दिसून येते. सदर पावतीची नोंद ही त्या व्यक्तिच्या खात्यावर तर घेण्यातच आली आहे. तद्नंतरच्या पावतीची नोंद ही श्री.एन.एस.डांबरे नळखाते क्र. ४२५०९ पान क्र.१३७ वर सदर पावतीची परत १०००/- पीपी ची नोंद घेण्यात आली आहे. बुक क्र.२२१६ ची पा.क्र.२२१५३५ ची मूळ पावती बी.बी.क्षिरसागर नळखाते क्र. ४२५०७ नावाने सदर पावती काढली आहे. असे पावती पुस्तकावरून दिसून येते. परंतु सदर पावती ही परत श्री.एन.एस.डांबरे यांच्या नळ खात्यावर उपरोक्त पावती रक्कम रू.९६०/- पीपी नोंद घेण्यात आली.

उपरोक्त बाबतचा सविस्तर अहवाल या विभागास देण्यात यावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

# वार्ड अभियंता –अ
## सन २००६–२००७
## खर्च बाजूचे लेखापरीक्षण.

**<u>खर्च बाजूचे लेखापरीक्षण:</u>**

सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे वॉर्ड अभियंता-अ यांच्या अधिपत्याखालील करण्यात आलेल्या विविध विकास कामांच्या ए-१, बी-१ व स्वेच्छानिधी खर्चाच्या कामाच्या संचिकांची तपासणी करण्यात आली असता खालील बाबी आक्षेपार्ह बाबी निदशनास आल्या.

**परिच्छेद क्र.१: स्वेच्छा निधीतून प्रभाग क्र.३० प्रतापनगर (काचीवाडा) खुल्या जागेत ओटा बांधणे. (अ.प.रक्कम रू.२४,९७३/–)**

कार्यादेश: जा.क्र./मनपा/वॉर्ड-अ/३१९/०६,दि.१४.१२.०६

वॉर्ड- अ अंतर्गत ए-१ निविदेत प्रस्तुत काम एक महिन्यात पूर्ण करणेच्या अटीवर कार्यादेश देण्यात आलेला आहे. प्रस्तुत खर्चाची संचिका तपासणी केली असता असे निदर्शनास येते की, कामाचा आदेश दिनांक १४.१२.२००६ रोजी देण्यात आलेला आहे. म्हणजे दि.१४.१.२००७ रोजी प्रस्तुत काम पूर्ण होणे गरजेचे होते. मात्र काम प्रत्यक्षात दि.२८.२.२००७ रोजी म्हणजे दिड महिना विलंबाने पूर्ण झाल्याचे Completion Certificate वरून दिसते. याबाबत नियमाप्रमाणे दंड वसूल करण्याची कार्यवाही केल्याचे संचिकेत दिसून येत नाही.

याबाबत विभागास खुलासा सादर करण्याविषयी सूचित केले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.२: वॉर्ड क्र.५, पहाडसिंगपुरा सलामपुरे गल्लीत जूनी Rcc ड्रेनेज लाईन काढून नविन SWG ड्रेनेज लाईन टाकणे.**

कार्यादेश: जा.क्र./मनपा/वॉर्ड-अ/५१८/२००७, दिनांक २७.२.२००७.

उपरोक्त विषयांकित खर्चाचे काम हे वॉर्ड - अ अंतर्गत सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात करण्यात आलेले आहे. सदर कामाची अत्यंत तातडी असल्याबाबत संचिका मध्ये नमूद केलेले आहे.संबंधित कामाची निविदा निविदा १४३/०६ दि.२५.९.२००६ प्रकाशित केली व दि.२७.२.२००७ रोजी उघडण्यात आली, दि.२६.३.२००७ रोजी काम पूर्ण झाल्याचे कामाच्या संचिकेवरून दिसते.

सदर कामाची आवश्यकता पाहता काम जवळपास ६ महिने विलंबाने होते ही बाब संयुक्तिक वाटत नाही. तसेच जुने आर.सी.सी. ड्रेनेज लाईन चे पाईप भांडार विभागात जमा करणे बाबत सूचित केल्याचे संचिकेत पृ.क्र.(३) मध्ये परि.क्र. (७) नमूद आहे. मात्र पुढे याबाबत कोणतीच कार्यवाही किंवा पाईप भांडार विभागात जमा केल्याची नोंद झालेली दिसून येत नाही.

वरील बाबत विभागास खुलासा सादर करण्याविषयी सूचित केले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.३: प्रभाग क्र.६ पहाडसिंगपुरा बुध्दलेणी येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे बाबत. (अ.प.रक्कम रू.२,९९,५२६/-)**

कार्यादेश:-जा.क्र./मनपा/वॉर्ड-अ/४८५/०७,दि.१५.२.०७

वरील विषयांकित खर्चाचे काम वॉर्ड - अ यांचे अंतर्गत झालेले असून, संबंधित कामाची अत्यंत गरज असल्याने दि.७.१०.२००५ रोजी कामाची संचिका पृ.क्र.(१) व (२) मध्ये नमूद केलेली आहे. सदर कामाची निविदा दि.४.११.२००६ रोजी काढलेली संचिकेवरून दिसते. तसेच प्रस्तुत काम हे सन २००६-२००७ या आर्थिक वर्षाचे अर्थसंकल्पातून करणेस मा.आयुक्त यांची मान्यता संचिका पृ.क्र.(४) वर दिसते.

प्रस्तुत काम हे सन २००७-२००८ या अर्थसंकल्पामधून केल्याचे संचिका पृ.क्र.(८) व (९) वर नमूद केलेले आहे. संबंधित काम हे दिनांक २२.५.२००७ रोजी पूर्ण झाल्याबाबत चे प्रमाणपत्र संचिका मध्ये जोडलेले आहे. यावरून काम हे अत्यंत विलंबाने कसे करून घेण्यात आले. याबाबत विभागास खुलासा सादर करण्याविषयी सूचित केले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.४: मो.चेलीपुरा येथे शांती टी हाउस समोरील २५० एमएम ड्रेनेज लाईनची दुरूस्ती करणे. (ए-१)**

कार्यादेश: मनपा वॉर्ड -अ/२६३/०६,दि.८.१२.२००६.

उक्त विषयांकित कामाचे लेखापरीक्षण करीत असतांना खालील प्रमाणे आक्षेपित मुद्दे निदर्शनास येतात.

१. विभागाने सदर कामाची अत्यंत तातडी नमूद केलेली आहे. (दि.२५.८.२००६ रोजी)

२. प्रस्तुत कामाची निविदा दिनांक २३.११.२००६ रोजी काढलेली आहे.

३. तातडीचे काम पूर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्रानुसार काम दि.८.१.२००७ रोजी पूर्ण झालेले आहे.

वरील तीनही बाबी एकत्रित पाहता कामाची तातडी पाहता संयुक्तिक वाटत नाही.

वरील बाबत विभागास खुलासा सादर करण्याविषयी सूचित केले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

# वॉर्ड – क

# सन २००२–०३ ते सन २००७–०८ या आर्थिक वर्षातील लेखापरीक्षणाचा अहवाल.

**<u>जमाबाजूचे लेखापरीक्षण :</u>**

सन २००२-२००३ ते सन २००६-०७ या वर्षातील अभिलेख्यांचे थकीत लेखा परीक्षण व सन २००७-२००८ या वर्षाच्या नियमित लेखापरीक्षणामध्ये जमा बाजूंच्या अभिलेख्यांची तपासणी हाती घेण्यात आली असून तपासणी कालावधीत सन २००२-०३ चे लेखापरीक्षण झालेले असून सन २००३-०४ ते सन २००७-०८ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणा दरम्यान खाली नमूद केलेनुसार पावती पुस्तकांची पडताळणी करण्यात आली. तपासणी करण्यात आलेल्या पावती पुस्तकांबाबतचा तपशिल हा खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मालमत्ता कर वसूली पावती पुस्तके | = | २२२ |
| २. | पाणी पट्टी कर वसूली पावती पुस्तके | = | २०३ |
| ३. | जनरल पावती पुस्तके | = | ५२ |

उक्त पावती पुस्तकांद्वारे वसूल करण्यात आलेली रक्कम ही वेळोवेळी संबंधिताने कॅश रजिस्टर मध्ये घेवून मनपा फ़ंडात जमा केल्याबाबत तपासणी करण्यात आली. तसेच संबंधित मालमत्ता धारकाकडील वसूल करावयाच्या कर नोंदी ह्या मागणी रजिस्टर प्रमाणे घेतलेल्या आहेत/नाहीत याबाबतची खातरजमा करण्याच्या दृष्टीने चाचणी लेखापरीक्षणही करण्यात आले. तपासणी दरम्यान निदर्शनास आलेल्या आक्षेपार्ह बाबींचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**<u>जमा बाजूचे लेखापरीक्षण :</u>**

**परिच्छेद क्र. १ : सन २००५–०६ या आर्थिक वर्षात पाणीपट्टीची रक्कम कमी भरणा करणे बाबत.**

प्रभाग – क , (जाफ़रगेट,मोंढा) या विभागाचे सन २००३-२००६ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखापरीक्षण हाती घेण्यात आले असून त्यात सन २००५-०६ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सन २००५-०६ या आर्थिक वर्षात पाणीपट्टी वसूलीचे लेखे तपासणी करीत असता पाणीपट्टी वसूली बुक क्र.१७५२ पावती क्र.१७५१९६ दिनांक १०.१०.०५ ची रक्कम रू.२२००/- वसूल केले असता कॅश रजिस्टर मध्ये रू.२०००/-ची नोंद घेण्यात आली म्हणजेच रू.२००/-चा कमी भरणा केला. जनरल पावती पुस्तक क्र.३०८७/ ३०८६२७ दि. २१/११/०८ अन्वये भरणा करण्यात आला.

१. सन २००५-०६ या आर्थिक वर्षात पाणीपट्टी वसूली बुक क्र.१९४४ पा.क्र.१९४३६४ दिनांक २४.२.२००६ ची प्रत्यक्षात २२५०/- ची वसूली झाली परंतु कॅश रजिस्टर मध्ये नोंद घेतांना २२००/- ची नोंद घेवून रू.५०/- चा कमी भरणा केला.
जनरल पावती पुस्तक क्र.३१०६/३१०५१७ द्वारे रू.५०/- चा भरणा मनपा फ़ंडात केलेला आहे.

२. सन २००५-०६ या आर्थिक वर्षात पाणीपट्टी वसूल बुक क्र.२०२४ पा.क्र.२०२३३९ दिनांक ९.३.२००६ ची वसूल रक्कम रू.५०००/- ची वसूली करून प्रत्यक्षात त्याची कॅश रजिस्टर मध्ये नोंद घेण्यात आली नाही म्हणजेच ५०००/- चा कमी भरणा केला. जनरल पावती पुस्तक क्र. ३१०६/३१०५१३ दि.१३/१/०९ व्दारे भरणा केला.

३. सन २००५-०६ या आर्थिक वर्षाचे पाणीपट्टी वसूली बुक क्र.२१२१ पा.क्र. २१२०४७ व २१२०४८ दिनांक ३१.३.२००६ या दोन पावतीच्या आधारे पाणीपट्टी १८००+ १८०० ची वसूली करण्यात आली असून प्रत्यक्षात या दोन्ही पावतीची कॅश रजिस्टर मध्ये नोंद घेण्यात आली नाही. म्हणजेच १८००+१८०० = ३६०० चा कमी भरणा मनपा फ़ंडात करण्यात आल्याचे दिसून येते. जनरल पावती पुस्तक क्र. ३०८७ दि.३०८६२७ दि. २१/११/०८ व्दारे भरणा केला आहे .

४. सन २००५-०६ या आर्थिक वर्षाचे पाणीपट्टी वसूली बुक क्र.२०२७ पा.क्र. २०२६१२ दिनांक १०.३.२००६ द्वारे १८००/- ची वसूल करण्यात आली परंतु त्याची कॅश रजिस्टर मध्ये नोंद घेण्यात आली नाही म्हणजेच १८००/- चा कमी भरणा करण्यात आला. जनरल पावती पुस्तक क्र.३०८७/३०८६२७ दि.२१/११/०८ व्दारे भरणा केला आहे.
उपरोक्त प्रमाणे एकत्रित आक्षेपित रक्कम रू.१०६५०/- चा संबंधिताने तात्पुरता अपहार केल्याचे निदर्शनास येते. तेव्हा, अशा रकमेबाबत विभागाने खातरजमा करून आक्षेपित रक्कम महापालिका फ़ंडात भरणा जनरल पावती पुस्तक क्र.३०८७/३०८६२७,दिनांक २१.११.२००८ रक्कम रू.२००+५०+३६०० +१८०० व जनरल पावती पुस्तक क्र.३१०६/३१०५१३, दिनांक १३.१.२००९ रक्कम रू.५००० द्वारे भरणा केलेला आहे. विभागाने भविष्यात अशी अनियमीतता होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र. २: सन २००५–०६ या आर्थिक वर्षातील सर्वसाधारण पावती पुस्तकाद्वारे वसूल रक्कम मनपा फंडात कमी भरणा करणे बाबत.**

प्रभाग –क (जाफ़रगेट ) विभागाचे सन २००३-२००६ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखापरीक्षण हाती घेण्यात आले असून सन २००५-०६ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सन २००५-०६ या वर्षात जनरल पा.बुक क्र. १३०८ पा.क्र. १३०७९३ दिनांक २१.२.२००६ या पावती आधारे ५००/- ची वसूली करण्यात येवून प्रत्यक्षात कॅश रजिस्टर मध्ये नोंद घेण्यात आली नाही म्हणजेच ५००/- रू.ची कमी भरणा करण्यात आला.

२. सन २००५-०६ वर्षात कॅश रजिस्टर क्र.६ ची तपासणी केली असता पान क्र.५ ची बेरीज केली असता ५००११३- ५०००६३ = ५०/- चा कमी भरणा करण्यात आला.

३. सन २००५-०६ वर्षात जनरल पा.पु.क्र. १६७१ पा.क्र.१६७०४९ दिनांक २२.३.२००६ या पावती द्वारे रू १००/- वसूल करण्यात आले. परंतु प्रत्यक्षात कॅश रजिस्टर मध्ये नोंद घेण्यात आली नाही. म्हणजेच १००/- चा कमी भरणा करण्यात आला. म्हणजेच एकत्रित रक्कम रू.६५०/- मनपा फ़ंडात कमी भरणा झाल्याचे दिसून येते.

तरी, आक्षेपित रक्कम रू.६५०/- चा मनपा फ़ंडात भरणा जनरल पा.पु.क्र.३०८७/३०८६२७, दिनांक २१.११.२००८ रक्कम रू.६०० व जनरल पा.पु.क्र.३१०६ /३१०५१७, दिनांक ४.१.२००९ रक्कम रू.५० द्वारे भरणा केलेला आहे. यापुढे भविष्यात अशा चुका होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

**परिच्छेद क्र. ३: वॉर्ड – क मधील न वटलेल्या धनादेशाची यादी देणे बाबत.**

वॉर्ड -क कार्यालयाचे सन २००३ ते सन २००८ या कालावधी मधील लेखापरीक्षणाचे काम हाती घेण्यात आले असून त्याकरीता वॉर्ड - क कार्यालयामधील न वटलेल्या धनादेश यादीची आवश्यकता आहे.

तरी कृपया वरील दर्शविल्याप्रमाणे न वटलेल्या धनादेशाची यादी त्वरीत या कार्यालयास पाठविण्यात यावी असे कळवून सुध्दा अद्यापपावेतो यादी अप्राप्त असल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.४ : सन २००६–०७ या आर्थिक वर्षात मालमत्ता कराची रक्कम कमी भरणा करणे बाबत.**

प्रभाग –क (जाफ़रगेट मोंढा) या विभागाचे सन २००३-२००८ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखापरीक्षण हाती घेण्यात आले असून त्यात सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सन २००६-०७ या आर्थिक वर्षात मालमत्ता कर वसूलीचे लेखे तपासणी करीत असता मालमत्ता कर वसूली बुक क्र.१७०६ पावती क्रमांक १७०५२९ दिनांक २२.२.२००७ ची वसूल रक्कम ११२२/- ची वसूली करून प्रत्यक्षात त्याची कॅश रजिस्टर मध्ये नोंद घेण्यात आली नाही. म्हणजेच ११२२/- चा कमी भरणा केला. जनरल पावती पुस्तक क्र.३४१८/३४१७१८ दि. १०/७/०९ अन्वये भरणा केला आहे.

२. सन २००६-०७ या आर्थिक वर्षात मालमत्ता कर वसूली बुक क्रमांक १७०८ पा.क्र.१७०७३५ दिनांक २१.२.२००७ ची वसूल रक्कम ३५८७/- ची वसूली करून प्रत्यक्षात त्याची कॅश रजिस्टर मध्ये नोंद घेतांना ३२६०/- ची नोंद घेवून रक्कम रू.३२७/- चा कमी भरणा केला. जनरल पावती पुस्तक क्र. ३२३६/३२३५६४ दि.२/५/०९ अन्वये भरणा केलेला आहे.

उपरोक्त एकत्रित आक्षेपित रक्कम रू.१४४९/- मनपा फ़ंडात भरणा झाल्याचे दिसून येते. तरी यापुढे भविष्यात अशा चुका होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

**परिच्छेद क्र.५ : सन २००६–०७ या आर्थिक वर्षातील सर्वसाधारण पावती पुस्तकाद्वारे वसूल रक्कम मनपा फ़ंडात कमी भरणा करणे बाबत.**

प्रभाग- क (जाफ़रगेट) विभागाचे सन २००३-२००८ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखापरीक्षण हाती घेण्यात आले असून सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असता खालील आक्षेपार्ह बाब निदर्शनास आली.

सन २००६-०७ या वर्षात जनरल पा.बुक क्र.२०६७ पा.क्र.२०६६८९ दिनांक २०.२.२००७ या पावती आधारे ६५०/- ची वसूली करण्यात येवून प्रत्यक्षात कॅश रजिस्टर मध्ये नोंद घेण्यात आली नाही. म्हणजेच रू. ६५०/- चा कमी भरणा करण्यात आला. जनरल पावती पुस्तक क्र. ३४१८/३४१७१८ दि. १०/७/०९ अन्वये भरणा करण्यात आला असल्याने सदरील परिच्छेद वगळण्यात येतो. तथापि, भविष्यात अशा चुका करु नयेत.

**परिच्छेद क्र.६: भांडार विभागाकडून वितरीत करण्यात आलेल्या नळ कनेक्शन /ड्रेनेज . फॉर्मची वर्षनिहाय माहिती मिळणे बाबत.**

प्रभाग –क (जाफ़रगेट) विभागाचे सन २००३-०४ ते सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखापरीक्षण हाती घेण्यात आले असून त्याकरीता वॉर्ड - क कार्यालयामध्ये भांडार विभागातून वितरीत केलेल्या नळ कनेक्शन/ ड्रेनेज फ़ॉर्मची वर्षनिहाय माहिती विभागाने ठेवलेल्या साठा रजिस्टर व वसूल रकमेसह उपलब्ध करून देण्यात आली असल्यामुळे परिच्छेद वगळण्यात येतो.

**परिच्छेद क्र.७ : सन २००५–०६ या आर्थिक वर्षात रोखपालाच्या स्वाक्षऱ्या नसल्याबाबत.**

प्रभाग – क (जाफ़रगेट) विभागाचे सन २००५-२००६ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखापरीक्षण हाती घेण्यात आले असून सन २००५-२००६ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना खालील तारखेला रक्कम घेतांना रोखपाल यांनी वार्डातून रक्कम स्विकारतांना कॅश रजिस्टरवर स्वाक्षरी केलेल्या नाही. ही बाब आक्षेपार्ह असून याबाबत विभागाने शहानिशा करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा असे सूचित केले असता संबंधित विभागाकडून आक्षेपांची पूर्तता झाली असल्यामुळे परिच्छेद वगळण्यात येतो. (सोबत सविस्तर तक्ता (तपशिल) तथापि, या बाबींची पुनरावृत्ती होणार नाही याबाबत विभागाने दक्षता घ्यावी.

# सन २००५-२००६.

| अ.क्र. | दिनांक | रक्कम | रजिस्टर नं./ चेक नंबर | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २०.१२.२००५ | १४५५६१ | ३/१३ | स्वाक्षरी नाही |
| २ | २६.१२.२००५ | १०८८१० | ३/२२ | स्वाक्षरी नाही |
| ३ | ३१.१२.२००५ | ३९१८८ | ३/३१ | स्वाक्षरी नाही |
| ४ | ३१.०१.२००६ | १०२०३९ | ३/८४ | स्वाक्षरी नाही |
| ५ | ०७.०२.२००६ | २०९१३१ | ४/१५ | स्वाक्षरी नाही |
| ६ | २७.०३.२००६ | ४६२९२६ | ५/७८ | स्वाक्षरी नाही |
| ७ | २९.१०.२००५ | ३८१०९ | २/५७ | स्वाक्षरी नाही |

**परिच्छेद क्र. ८: सन २००७-२००८ या आर्थिक वर्षात पाणीपट्टीची रक्कम कमी भरणा करणे बाबत.**

प्रभाग –क (जाफ़रगेट मोंढा ) या विभागाचे सन २००३-२००८ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखापरीक्षण हाती घेण्यात आले असून त्यात सन २००७-२००८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना सन २००७-२००८ या आर्थिक वर्षात पाणीपट्टी वसूलीचे लेखे तपासणी करीत असता पाणीपट्टी वसूली बुक क्र. २६८१ पावती क्र.२६८१०० दिनांक ५.१२.२००७ ची रक्कम रू.३७५०/- वसूली केली असता कॅश रजिस्टरमध्ये रक्कम १८००/- ची नोंद घेण्यात आली म्हणजेच रक्कम रू.१९५०/- चा कमी भरणा केला.

उपरोक्त प्रमाणे आक्षेपित रक्कम रू.१९५०/- चा महानगरपालिका फ़ंडात भरणा जनरल पावती पुस्तक क्र.३१०६/३१०५१६, दिनांक १४.१.२००९ द्वारे केलेला आहे. तथापि विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.९ : सन २००७-०८ या आर्थिक वर्षात पाणीपट्टीची रक्कम कमी भरणा करणेबाबत.**

प्रभाग – क (जाफ़रगेट मोंढा) या विभागाचे सन २००३-२००८ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखापरीक्षण हाती घेण्यात आले असून त्यात सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असता पाणी पुरवठा विभागाच्या खालील दर्शविलेल्या पावत्यान्वये जमा केलेल्या रकमेचा कमी भरणा करण्यात आला आहे. त्याचे सविस्तर विवरण खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पा.पु.क्र./ पावती क्र. | दिनांक | रक्कम (रू) | कॅश रजिस्टर क्रमांक | कॅश रजिस्टरवर दर्शविलेली रक्कम | फ़रक रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २९४४ २९४३५९ | १३.२.०८ | १८००/- | ४/८५ | ८००/- | १०००/- | Balance |
| २ | २९४६ २९४५१४ | १५.२.०८ | २२००/- | ५/५ | २०००/- | २००/- | paid |
| ३ | २९४६ २९४५६८ | १८.२.०८ | ५४००/- | ५/१३ | ३६००/- | १८००/- | Balance |
| ४ | २९७७ २९७६७३ | ८.३.०८ | २९२५/- | ५/५६ | १८००/- | ११२५/- | paid |
| ५ | २९४२ २९४१६४ | ९.२.०८ | ३६००/- | ४/७४ | १८००/- | १८००/- | paid |
| ६ | २९४२ २९४१९० | ११.२.०८ | ३६००/- | ४/७८ | १८००/- | १८००/- | paid |
| ७ | २९४१ २९४०९० | ६.२.०८ | ३६००/- | ४/६५ | १८००/- | १८००/- | paid |
| | | | | | **एकूण** | **९५२५/-** | |

उपरोक्त प्रमाणे आक्षेपित रक्कम रूपये ९५२५/- चा मनपा फ़ंडात भरणा करण्याबाबत विभागास सूचित केले असता मुद्या क्र. २,४,५,६, व ७ चा भरणा झालेला असून मुद्या क्र.१ व ३ चा भरणा अद्यापपावेतो करण्यात आलेला नाही. सदरील रक्कम लेखापरीक्षणादरम्यान निदर्शनास आली असून अनुपालन असमाधानकारक असल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.१० : सन २००७–२००८ या आर्थिक वर्षात पाणीपट्टीची रक्कम कमी भरणा करणे बाबत.**

प्रभाग – क या विभागाचे सन २००३-२००८ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखापरीक्षण हाती घेण्यात आले असून त्यात सन २००७-२००८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असता खालील आक्षेपार्ह बाब निदर्शनास आली.

सन २००७-२००८ या आर्थिक वर्षात पाणीपट्टी वसूलीचे लेखे तपासणी करीत असता पाणीपट्टी वसूली बुक क्र.२९८४ पावती क्र. २९८३३०, दिनांक ३१.३.२००८ ची रक्कम रू.१८००/- वसूल केली असता कॅश रजिस्टरमध्ये रक्कम १८००/- ची नोंद घेण्यात आली

नाही. फ़क्त संबंधित पावतीवरील नावाची नोंद घेण्यात आली आहे. म्हणजेच रक्कम रू.१८००/- चा कमी भरणा केला आहे.

उपरोक्त प्रमाणे आक्षेपित रक्कम रू.१८००/- चा मनपा फ़ंडात भरणा जनरल पावती पुस्तक क्र. ३१.०४/३१०३०८, दिनांक १५.१२.२००८ रक्कम रू. १८०० चा भरणा झालेला आहे. विभागाने भविष्यात असे होवू नये यासाठी दक्षता बाळगावी.

**परिच्छेद क्र.११ : भांडार विभागाकडून वितरीत करण्यात आलेल्या नळ कनेक्शन फ़ॉर्मची रक्कम कमी भरणा करणे बाबत.**

प्रभाग – क विभागाचे सन २००३-२००८ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखापरीक्षण हाती घेण्यात आले असून त्यात सन २००५-०६ ते सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण करीत असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सन २००५-०६ या आर्थिक वर्षात भांडार विभागाकडून वितरीत करण्यात आलेल्या अ.क्र.५८०१ ते ५९०० मध्ये प्रति फ़ॉर्म ५० रू. प्रमाणे ५९ फ़ॉर्मची रक्कम रू.२९५०/- चा कमी भरणा केला आहे.

२. सन २००५-०६ या आर्थिक वर्षात वितरीत करण्यात आलेल्या अ.क्र.७५५१ ते ८१०० मध्ये प्रति फ़ॉर्म ५० रू. प्रमाणे ५१ फ़ॉर्मची एकूण रक्कम रू.२५५० चा कमी भरणा केला आहे.

३. सन २००७-०८ या आर्थिक वर्षात वितरीत करण्यात आलेल्या अ.क्र.१५०५१ ते १५२५० मध्ये प्रति फ़ॉर्म ५० रू. प्रमाणे ५७ फ़ॉर्मची एकूण रक्कम रू.२८५० चा कमी भरणा केला आहे.

४. नळ कनेक्शन फ़ॉर्म वितरण केल्याबाबत अद्ययावत रजिस्टर विभागाने ठेवलेले नाही.
उपरोक्त एकत्रित आक्षेपित रक्कम रू.८३५०/- चा मनपा फ़ंडात कमी भरणा झाल्याचे दिसून येते.

आक्षेपित रक्कम रू.८३५०/- पैकी मुद्या क्र.२व ३ द्वारे रक्कम रू.५४०० चा भरणा जनरल पावती पुस्तक क्र.३१०४/३१०३०७, दिनांक १५.१२.२००८ द्वारे करण्यात आला आहे. व मुद्या क्र.१ व ४ नुसार रक्कम रू.२९५०/- येणे बाकी आहे. संबंधिताने बाकी रक्कम रू.२९५०/- पा.पु.क्र.३२३६/३२३५३५ ,दि.१७.४.२००९ नुसार भरणा केली आहे. विभागाने भविष्यात असे होवू नये यासाठी दक्षता बाळगावी.

**परिच्छेद क्र.१२ : सन २००३ ते सन २००८ या आर्थिक वर्षातील साठा रजिस्टर अद्ययावत नसले बाबत.**

प्रभाग – क विभागाचे सन २००३-२००८ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखापरीक्षण हाती घेण्यात आले असून साठा रजिस्टर पाहणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. विभागाने ठेवलेले साठा रजिस्टर प्रमाणित केल्याचे दिसून आले नाही.

२. भांडार विभागातून वितरण करण्यात आलेल्या पावती पुस्तकांच्या नोंदी दर्शवितांना भांडार विभागातून प्राप्त झाल्याची दिनांक अथवा वितरण केल्याबाबतचे नोंदी बरोबर घेतलेल्या नाही.

३. भांडार विभागातून प्राप्त झालेल्या पावती पुस्तकाच्या नोंदी साठा रजिस्टर वर घेतांना काही ठिकाणी वॉर्ड अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

४. वित्तीय वर्ष संपले नंतर ह्या वित्तीय वर्षात एकूण आणलेल्या पावती पुस्तकाचा साठा व पुढील वर्षात वापरण्यासाठी शिल्लक साठा या बाबतच्या नोंदी दर्शविलेल्या नाही.

वरील मुद्यांबाबत विभागाने खुलासा सादर करण्याविषयी सूचित केले असता अनुपालन असमाधानकारक असल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.१३ : सन २००३ ते सन २००८ या आर्थिक वर्षातील रजिस्टर व पावत्या तपासणी बाबत.**

प्रभाग – क विभागाचे सन २००३-२००८ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखापरीक्षण हाती घेण्यात आले असून खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. मालमत्ता कराचे जुने रजिस्टर क्र.१०, पान क्र.१७० वरील नोंदीची तपासणी करत असतांना पुढील पाने १७१,१७२,१७३,१७४ आढळून आले नाहीत.

२. रजिस्टरवरील रकमेची वसूली करतांना बऱ्याच प्रकरणात हेड वाईज घेतलेले नाही. फ़क्त सामान्य करात रक्कम घेतलेले दिसते. उदा पान क्र.१६३ रजिस्टर क्र.१०

वरील दोन्ही बाबी आक्षेपार्ह असून या बाबत विभागाने शहानिशा करून लेखापरीक्षण विभागात अनुपालन अहवाल सादर करण्याविषयी विभागास सूचित केले असता अनुपालन असमाधानकारक असल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.१४ :वॉर्ड –क अंतर्गतचे स्वच्छता साहित्याबाबतचे मागणीपत्र, साठा रजिस्टर, वितरण पुस्तिका, डेड स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देणे बाबत.**

उक्त प्रकरणी आपणास कळविण्यात येते की, लेखापरीक्षण विभागास लेखापरीक्षणार्थ मागणी पुस्तिका (Requiremen Register) (Inden) तसेच साठा रजिस्टर (Stock Register) वितरण पुस्तिका ,डेड स्टॉक रजिस्टर अत्यावश्यक आणि अपहिहार्य असल्याने तसेच ठराविक कालमर्यादित लेखापरीक्षण करावयाचे असल्याने प्रस्तूतचे लेखे अतिसत्वर दाखल करण्यात यावे असे सूचित केले असता भांडार विभागाने याबाबतची माहिती/लेखे उपलब्ध करुन न दिल्यामुळे लेखा परिक्षण करता आले नाही.

**परिच्छेद क्र.१५: वित्तीय वर्ष २००२ ते २००७ मध्ये न वटलेल्या धनादेशाची रक्कम अद्यापपर्यंत वसूल न करण्याबाबत.**

वॉर्ड - क येथील वित्तीय वर्ष २००३ ते २००८ चे लेखापरीक्षण करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या .

१. सन २००२-२००८ या वित्तीय वर्षात करदात्या तर्फे मालमत्ता / पाणीपट्टी करापोटी महसूल प्रित्यर्थ धनादेशांद्वारे रक्कम स्विकृत करण्यात आली. परंतु वित्तीय वर्षात काही धनादेश न वटले बाबत लेखा विभागाने वार्ड मध्ये याबाबतची वेळोवेळी माहिती देवूनही न वटलेल्याधनादेशाबाबत करदात्यावर Negotiable Instrument Act १८८१ चे कलम १३८ नुसार कायदेशिर कार्यवाही करणे आवश्यक होते. परंतु कार्यवाही केल्याबाबत दिसून आले नाही.

२. न वटलेल्या धनादेशाबाबत असे निदर्शनास आले आहे की, न वटलेल्या धनादेशाची नोंद Demand Register ला मागणी रजिस्टरला घेण्यात आलेली नाही. त्यामुळे कॅशियरला धनादेश कॅश झाला किंवा नाही याचा बोध होत नाही व त्यामुळे कॅशियर पुढील रक्कम जमा करून घेतात व मागील न वटलेल्या धनादेशाची रक्कम तशीच राहते. करीता प्रत्येक न वटलेल्या धनादेशाची नोंद डिमांड रजिस्टरला घेणे आवश्यक आहे. जे धनादेश वटलेले नाहीत त्या खातेदाराची मागील धनादेशाची रक्कम मनपा फ़ंडात जमा केल्याशिवाय पुढील पावती देवू नये असे कॅशियरला पाबंद करण्याच्या सूचना देणे आवश्यक आहे.

३. धनादेश न वटलेला असतांना व सदरील रक्कम थकबाकी असतांना पुढील वर्षाचा मालमत्ता कर /पाणीपट्टी कर वसूल करण्यात आला आहे. ही बाब अत्यंत आक्षेपार्ह स्वरूपाची आहे.

४. धनादेशाद्वारे वसूल करण्यात आलेल्या धनादेशाचा क्रमांक कॅशि रजिस्टरला दर्शविणे आवश्यक असतांना धनादेश क्रमांक दर्शविलेले नाही त्याबाबतचा सविस्तर तक्ता सोबत दर्शविलेला आहे.

तरी याबाबत विभागाने सविस्तर खुलासा सादर करण्याविषयी सूचित केले असता अनुपालन असमाधानकारक असल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येतो. ( **सोबत विवरण पत्र – अ जोडले आहे)**

## परिच्छेद क्र.१६ : रक्कम रू.६०,०००/– चा दिनांक १९.१.२००५ चा धनादेश न वटल्याबाबत.

उक्त विषयी तत्कालीन झोन नं.८ अंतर्गतच्या नंदादिप सहकारी गृहनिर्माण संस्था स्थित निवास मालमत्ता कर रक्कम रू.६०,०००/- मात्रचा भरणा मालमत्ताधारक श्री.रामदास बाजीराव भोसले यांनी धनादेश क्रमांक ७९४१९८ दिनांक १९.१.२००५ द्वारे पुस्तक क्र.८४० पावती क्र.८३९५० दिनांक १९.१.२००५ रोजी वित्तीय वर्ष २००४-०५ या कालावधीसाठी केला होता.

सदरचा धनादेश बँकेत वटला गेला नाही. तद्नंतर झोनचे वॉर्ड मध्ये रूपांतर झाल्याने सदरची नंदादीप सहकारी हौ.संस्था वॉर्ड - ब मध्ये समाविष्ट झाली असून या विभागातर्फे प्रस्तुतची थकित रक्कम व तद्नंतरची देयकर भरणा केला किंवा नाही याचा खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करण्यासाठी वॉर्ड- ब कार्यालय यांना जा.क्र./मनपा/मुलेप/२००८/३६०,

दि.३१.१२.२००८ नुसार कळविण्यात आले असता अद्यापपावेतो वॉर्ड ब व क या दोन्ही वॉर्ड कडून खुलासा प्राप्त झालेला नसल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र.१७ : सन २००३–२००८ या आर्थिक वर्षातील मागणी रजिस्टर वरील मालमत्ता कर कमी भरणा केल्याबाबत. (रक्कम रु. ८७२०/–)**

प्रभाग – क (जाफ़रगेट) विभागाचे सन २००३-२००८ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखापरीक्षण हाती घेण्यात आले असून लेखापरीक्षण करीत असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मालमत्ताधारक श्री.गणेश श्रीमंत तायडे राहणार इंदिरानगर क्रमांक ४-१२-५७/१२४५ रजिस्टर क्रमांक (जुने) ४०/२३४ वर सन १९८९ ते २००५ पर्यंत मालमत्ता कर रक्कम रू. १३४२४ असतांना नविन माणी रजिस्टर ४०/३५३ वर नोंद घेतांना मागील बाकी रक्कम रू.११९०१ एवढी दर्शविली आहे व जूने रजिस्टर वर मा.पुस्तक क्रमांक १९०/१८९१७ अन्वये रक्कम रू.३२७ चा भरणा केला आहे. म्हणजेच संबंधिताने ११९६ रू. कमी दर्शविले आहे.

२. मालमत्ताधारक महमंद अकबर खॉन महमंद इब्राहीम खान रा.हत्तेसिंगपुरा प्लॉट नं.१५ यांच्याकडे मागणी रजिस्टर क्रमांक (जुने) ९/१ पान क्र.१३९ वर सन ९४ ते २००६ पर्यंतचा मालमत्ता कर रक्कम रू.७५२४ थकबाकी असतांना नविन मागणी रजिस्टर क्रमांक ९/१ पान क्रमांक ५३७ वर सन २००६-२००७ चा भरणा करून घेण्यात आला आहे. म्हणजेच संबंधिताने रक्कम रू.७५२४ चा कमी भरणा केला आहे.

उपरोक्त एकत्रित आक्षेपित रक्कम रू.८७२० मनपा फ़ंडात कमी भरणा झाल्याचे दिसून येते.

तरी आक्षेपित रक्कम रू.८७२०/- ची खातरजमा करून तसा अनुपालन अहवाल सादर करण्याविषयी सूचित केले असता अद्यापपावेतो अनुपालन सादर केलेले नसल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र.१८ : थकबाकी असतांना पुढील रक्कम वसूल केल्याबाबत.**

पाणीपट्टी धारक श्री. तुराबोद्दीन शमशुद्दीन घर क्र. ४-१०-७२/पी खाता क्रमांक १४९१८ रा.कैसर कॉलनी यांच्याकडे सन २०००-२००७ पर्यंत एकूण थकबाकी रू.१४५०० असतांना (जुने रजि क्र.२/१ पा.क्र.१३१) वर सन १९९९ ते २००४ पर्यंत रू.६४०० चा भरणा दर्शवून मागील बाकी रक्कम रू. ८१०० थकबाकी असतांना रक्कम रू.५४००/- दर्शविले आहे. नविन रजि क्र.२/१ पान क्र.२६१ वर रक्कम रू.३६०० बुक क्र.२९९५ /२९९४०१ दिनांक ३१.७.२००८ सन २००६ पर्यंत भरणा दर्शविलेला आहे ही बाब आक्षेपार्ह आहे.

तरी मागील थकबाकी रक्कम रू.८१००/- बाबत खातरजमा करून तसा अनुपालन अहवाल सादर करण्याविषयी सूचित केले असता अनुपालन असमाधानकारक असल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येतो.

## (अ) थकबाकी असतांना नळ खंडीत केल्याबाबत.(रक्कम रू. १०३५०/-)

उक्त विषयान्वये पाणपट्टी धारक श्री.मुजफ़्फ़र खान घ.क्र. ४-१०-७२/पी खाता क्र.१४९२१ रा.कैसर कॉलनी यांच्याकडे जुने पाणीपट्टी रजि क्र.२/१ पा.क्र.१३४ अन्वये संबंधित पाणीपट्टी धारकाच्या नांवे सन २००० ते डिसेंबर २००६ पर्यंत एकूण पाणीपट्टी थकबाकी रू.१७५४०/- असतांना संबंधिताने पाणीपट्टी बुक क्र.२०२१ / २०२०१२ दिनांक ०३.०३.२००५ अन्वये रक्कम रू.७१९०/- चा भरणा केलेला असून रक्कम रू.१०३५० /- अद्याप शिल्लक असतांना संबंधित विभागाने जा.क्र./मनपा/वॉर्ड-क्र/२००६/५२८, दिनांक १२.१२.२००६ रोजी लेखी आदेश काढून नळ खंडीत करून दिनांक १.०३.२००१ पासून नळ बंद असे समजण्यात यावे असे आदेशात नमूद केले आहे. परंतु संबंधिताकडे नळ खंडीत केलेल्या दिनांकापर्यंत रक्कम रू.१०३५०/- शिल्लक असतांना नळ खंडीत करण्यात आला आहे. यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच नविन रजिस्टरवर वॉर्ड -अभियंता अथवा दुय्यम आवेक्षक यांची स्वाक्षरी नाही.

तरी याबाबत विभागाने खातरजमा करून व थकीत रक्कम रू.१०३५०/- संबंधिताकडून वसूल करून तसा अनुपालन अहवाल सादर करण्याविषयी सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा सादर न केल्यामुळे सदरील परिच्छेद कायम करण्यात येतो.

## (ब) थकबाकीदाराचे नळ खंडीत करण्याबाबत.

वरील उक्त विषयी वॉर्ड - क अंतर्गत येणाऱ्या पाणीपट्टी धारकांचे चाचणी स्वरूपात लेखापरीक्षण करीत असतांना संबंधित सोळा नळ धारकाची थकबाकी थकीत असल्याने नळ खंडीत केल्याचे रजिस्टरवरून दिसून येते. तसेच काही नळ धारकांची थकबाकी आढळलेली नाही व नळ कधी बंद केला याची तारीख व प्रशासकीय मान्यता दिसून आलेली नाही.

तरी नळ खंडीत केलेले असतील तर त्याबाबत पंचनामा कॉपी, फ़ोटो, प्रशासकीय मान्यतेची प्रत तीन दिवसांतच्या आत सादर करावी. तसेच सोबत नळ धारकांची यादी आपल्या वॉर्ड अंतर्गत येणाऱ्या इतर भागातील नळ खंडीत केल्याची यादी देण्यात यावी असे सूचित केले असता अनुपालन असमाधानकारक असल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येतो.

### नळ खंडीत केलेल्यांची यादी.

| अ.क्र. | नांव | खाते क्र. | मोहल्ला | रजि.क्र./ पान क्र. | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.हाजी मो.हबीब साहाब | ३१२ | नवाबपुरा | २४/२० | नळ बंद केल्याची तारीख नसल्याने थकबाकी काढली नाही. |
| २ | श्री.कन्हैय्या साहाब बाबुसिंग | ३१७ | नवाबपुरा | २४/२२ | नळ बंद केल्याची तारीख नसल्याने थकबाकी काढली नाही. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | श्री.सय्यद शहा हसनोद्दीन | ३८२ | नवाबपुरा | २४/२६ | नळ बंद केल्याची तारीख नसल्याने थकबाकी काढली नाही. |
| ४ | श्री.देवेंद्र नंदलाल सेठ धनलक्ष्मी) | १७६०५ | नवाबपुरा | २४/५२ | थकबाकी १५४४२/- |
| ५ | श्री.अब्दुल गफ़ार | १०९२ | नवाबपुरा | २४/६५ | नळ बंद केल्याची तारीख नसल्याने थकबाकी काढली नाही. |
| ६ | श्री.म.लुकमान साहेब | १८५९ | नवाबपुरा | २४/१२३ | नळ बंद केल्याची तारीख नसल्याने थकबाकी काढली नाही. |
| ७ | श्री.अब्दुल रहेमान | २०९६ | नवाबपुरा | २४/१४९ | नळ बंद केल्याची तारीख नसल्याने थकबाकी काढली नाही. |
| ८ | श्री.मोहम्मद गौस नुर मोहम्मद | २१४७ | नवाबपुरा | २४/१५५ | नळ बंद केल्याची तारीख नसल्याने थकबाकी काढली नाही. |
| ९ | श्री.अकबर खॉ बिसमिल्ला खॉ | ३८५४ | नवाबपुरा | २४/२३८ | नळ बंद केल्याची तारीख नसल्याने थकबाकी काढली नाही. |
| १० | श्री.गोविंद प्रसाद सुमेर प्रसाद | ३९५९ | नवाबपुरा | २४/२४२ | थकबाकी १७५००/- |
| ११ | श्री.शेख पाशु शेख मालन | ५०२२ | नवाबपुरा | २४/२७० | नळ बंद केल्याची तारीखनसल्याने थकबाकी काढली नाही. |
| १२ | श्री.रियासत बी शे. अमिर | ५०७२ | नवाबपुरा | २४/२७२ | नळ बंद केल्याची तारीख नसल्याने थकबाकी काढली नाही. |
| १३ | श्री.लिलावती मदनलाल मालपाणी | ६०१९ | नवाबपुरा | २४/२९६ | थकबाकी १०२००/- |
| १४ | श्री.मो.हबीब (मज्जीद) बिटको .रोडलाईन्स | ७५६ | नवाबपुरा | २४/३२४ | नळ बंद केल्याची तारीख नसल्याने थकबाकी काढली नाही. |
| १५ | श्री.गणेशलाल चुन्नीलाल | ३३४२ | नवाबपुरा | २४/३३२ | नळ बंद केल्याची तारीख नसल्याने थकबाकी काढली नाही. |
| १६ | श्री.राजुलाल नंदलाल जैस्वाल | १००१० | नवाबपुरा | २४/३६० | नळ बंद केल्याची तारीख नसल्याने थकबाकी काढली नाही. |

**परिच्छेद क्र.१९ : मालमत्ता कर कमी करण्यात आल्याबाबतचे संचिका उपलब्ध करून देणे बाबत.**

वॉर्ड - क अंतर्गत येणाऱ्या मालमत्ता धारकांना मालमत्ता कर लावण्यात आलेले आहेत. सदरील मालमत्ता धारकांची जुने कर योग्य मुल्य जास्त असतांना नविन कर योग्य मुल्य कमी करण्यात आले. त्याबाबतची काही मालमत्ता धारकांची यादी सोबत जोडण्यात आली आहे. तरी जुने करयोग्य मुल्याची माहितीपत्रके व नकाशे आणि नविन करयोग्य मुल्याची माहिती पत्रके उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच इतर मोहल्ल्याचे कर कमी केले असल्यास जुने करयोग्य मुल्य नविन करयोग्य मुल्याची यादी देण्यात यावी असे सूचित केले असता अनुपालन असमाधानकारक असल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येतो.

# मालमत्ता धारकांची यादी.

| अ.क्र. | नांव | मोहल्ला | घर क्र. | जुनी कर योग्य मुल्य | नविन कर योग्य मुल्य | रजिस्टर क्र. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | चंद्रकांत विठ्ठल मोरे | इंदिरानगर | ४/१२/५७/ १९५१ | १०२६० | २३६२ | ४०/१६३ |
| २ | आसाराम डी जाधव | इंदिरानगर | ४-१२-५७ १९५८ | ५३०३ | २०२५ | ४०/१७७ |
| ३ | आशाबी स.लाल | इंदिरानगर | ४-१२-५७ ११६४ | १७९८२ | ४००५ | ४०/१८९ |
| ४ | सरसांडे मगन मोहन | इंदिरानगर | ४-१२-५७ ११६६ | १५९४१ | ६५४६ | ४०/१९३ |
| ५ | केशरबाई नाथा बोंधारे | इंदिरानगर | ४-१२-५७ ११८९ | ६०३७ | १७८७ | ४०/२३९ |
| ६ | कारभारी नागोराव चावरे | इंदिरानगर | ४-१२-५७ १२१७ | १५१२० | २०२५ | जुने रजिस्टर ४०/८७ |
| ७ | वाणी | टाकळकर हौ.सो. | फ़्लॅट नं.३ | ८६४० | १९०१ | १०/४/८७ |
| ८ | मक्बुल अमीर पटेल | बारी कॉ | फ़्लॅट नं.३ | ५४०० | १९०१ | जुने रजिस्टर १०/४/११ |
| ९ | गोविंद भिकाजी जायभाय | इंदिरानगर | ४-१२-५७ १११३ | ८९३४ | १३०७ | ४०/८९ |
| १० | कचरू बालाअप्पा विभुते | संजयनगर | ४-१३-५७ ११३५ | १५४१२ | ७५१९ | ३३/३३३ |

**परिच्छेद क्र.२० : पाणीपट्टी बुकाच्या बोगस नोंदी बाबत.**

प्रभाग – क कार्यालयाचे सन २००३ ते सन २००८ या कालावधी मधील लेखापरीक्षणाचे काम कार्यरत असून त्यात पाणीपट्टी मागणी रजिस्टर पाहणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. पाणीपट्टी धारक शेख मजहर शेख अकबर रा.रशिदपुरा खाते क्र. ५२५३२ जुने मागणी रजिस्टर क्र. ५/१/३२ अन्वये पाणीपट्टी बुक क्र.२४१७०६/२४१६ ,दिनांक २३.१.२००५ रक्कम रू.४४००/- (लमसम) बुक क्र.३१८००/३१८ दिनांक २७.१.२००६ रक्कम रू.३०००/- (लमसम) दर्शविलेले आहे. परंतु वित्तीय वर्ष सन २००६-०७ मध्ये सदरील विभागात पा.पु. क्र.२४१६ आणि २४१८ मधील पान

क्र.२४१७०६ ,दि.२३.१.०७ व पा.क्र.२४१५०६, दिनांक २.१.२००७ वर सदरील नावाची नोंद नाही. त्यातील पा.पु.क्र.३१८ या वित्तीय वर्षात वितरीत झाल्याचे दिसून येत नाही.

२. पाणीपट्टी धारक श्री.शेख खुर्शीद महंमद इब्राहीम रा.रशिदपुरा खाते क्र.(नाही) जुने मागणी रजि.क्र.५/१/४७ अन्वये पाणीपट्टी बुक क्र.१९४४६७/१९४५ दि.१.३.२००६ रक्कम रू.३०००/- (लमसम), बुक क्र.१२८८९३ / १२८९ , दिनांक ४.५.२००७ रक्कम रू.२०००/- (लमसम) दर्शविलेले आहे. परंतु संबंधिताने दर्शविलेल्या वित्तीय वर्षात सदरील पा.पु. पुस्तके चाललेली नाही आणि पा.पु.क्र.१९४५ हे भांडार विभागाच्या नोंदी नुसार वॉर्ड -क या विभागास वित्तीय वर्ष २००५-०६ या वर्षात वितरीत झालेले आहे. सदरील पावतीवर दुसऱ्या नळधारकाचे नांव दर्शविले आहे.

वरील मुद्या क्र.१ व २ मधील नोंदीबाबत विभागाने खातरजमा करून त्याबाबतचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करण्याविषयी सूचित केले असता अद्यापपावेतो सादर न केल्यामुळे सदरील परिच्छेद कायम करण्यात येतो.

# वॉर्ड अभियंता – क
# सन २००५–०६ ते सन २००७–०८ या आर्थिक वर्षातील लेखापरीक्षणाचा अहवाल.

**खर्च बाजूचे लेखापरीक्षण :**

सन २००५-०६ ते सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचे वॉर्ड अभियंता-क यांच्या अधिपत्याखालील करण्यात आलेल्या विविध विकास कामांच्या ए-१, बी-१ व स्वेच्छानिधी खर्चाच्या कामाच्या संचिकांची तपासणी करण्यात आली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

**परिच्छेद क्र.१ : प्रभाग क्र.४१,अशोक नगर येथील श्री.प्रधान यांच्या गल्लीमध्ये नविन ड्रेनेज लाईनचे काम करणे. (अंदाजपत्रकीय रक्कम रू.१,९९,९५०/-)**

संदर्भः- जा.क्र./मनपा/वॉर्ड-इंजि-क/७९३/०७, दिनांक ०३.१२.२००७.

प्रभाग क्र.४१, अशोकनगर येथील श्री.प्रधान यांच्या गल्लीमध्ये नविन ड्रेनेज लाईनचे काम करण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.१,९९,९५०/- चे तयार केले असून त्याप्रमाणे विभागाने ई-टेंडरिंग मार्फ़त निविदा मागविली असता नाझ कन्स्ट्रक्शन यांचे ६ अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.७८% कमी दराची निविदा प्राप्त झाली व त्यास कार्यकारी अभियंता यांनी मान्यता दिलेली आहे.

१. नाझ कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.७८% कमी दराची निविदा प्राप्त झाल्याचे निविदा नियम Clause ५४ (२) अन्वये अतिरिक्त सुरक्षा अनामत (Additional Security Deposit) घ्यावयास पाहिजे होती ती घेतलेली दिसून आलेली नाही.

२. संचिकेतील १) जा.क्र./मनपा/वॉर्ड-क/६८९/०७, दिनांक १४.११.२००७ व २) जा.क्र./मनपा/वॉर्ड इंजि-क/ ७९३/०७, दिनांक ३.१२.२००७ ही दोन्ही नोंद विभागाने ठेवलेल्या जावक रजिस्टर नुसार तपासणी केली असता संचिकेवर दर्शविलेला जावक क्रमांक त्या विभागाने ठेवलेल्या जावक रजिस्टर मध्ये आढळून आलेले नाही.

वरील मुद्यांबाबतचा खुलासा सादर करण्याचे सूचित केले असता अनुपालन प्राप्त झाले असून खुलासा समाधानकारक असल्यामुळे परिच्छेद वगळण्यात येतो. तथापी विभागाने भविष्यात याबाबत दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.२ : प्रभाग क्र.४२,मक्सुद कॉलनी अंतर्गत विविध गल्ल्यांमध्ये मोठ्या व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे.**

संदर्भः- जा.क्र./मनपा/वॉर्ड-इंजि-क/१३५०/०८,दिनांक १२.२.२००८.

प्रभाग क्र.४२, मक्सुद कॉलनी अंतर्गत विविध गल्ल्यांमध्ये मोठ्या व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.२,९९,७४९/- तयार केले असून सन

२००७-८ वर्षातील ज.नि.भांडवली कामे या लेखाशिर्षाअंतर्गत प्रस्तावित केले असून त्यास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिल्यानुसार निविदा मागविली असता मुबारक मेहबुब पठाण यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.२५% कमी दराची निविदा प्राप्त झाली व त्यास मा.आयुक्त यांनी मान्यता प्रदान करण्यात आली.

१. संचिकेतील गुत्तेदाराचे अर्ज दिनांक ७.२.२००८ नुसार अर्ज देवून ५% सुरक्षा अनामत रक्कम ही माझ्या बिलातून कपात करून घ्यावे असे कळवून सुध्दा संबंधित ठेकेदाराच्या बिलातून कपात झाल्याचे दिसून येत नाही.

२. संबंधित ठेकेदाराचे संचिकेतील देयकातून ४% व्हॅट कपात केले परंतु मोजमाप पुस्तिका क्र.१८८६ पान क्र.१७२ वर २% व्हॅटची कपात केली. नियमानुसार संबंधित ठेकेदाराच्या देयकातून ४% व्हॅट कपात करावयास पाहिजे असतांना ती कपात झाल्याचे दिसून येत नाही.

वरील दोन्ही मुद्यांबाबतचा खुलासा विभागाने सादर करण्याचे सूचित केले असता संबंधित विभागाकडून अनुपालन प्राप्त झाले. तथापी विभागाने काम समाधानकारक असल्याची खात्री करुन अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.३ :- प्रभाग क्र.४२,करीम कॉलनी येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे**.

संदर्भ:- जा.क्र./मनपा/वॉर्ड-इंजि-क/२९६/०७, दिनांक ५.२.२००७.

प्रभाग क्र.४२, करीम कॉलनी येथे पेव्हींग ब्लॉक बसविणेसाठी अंदाजपत्रक रक्कम रू.१,९९,९७८/- चे तयार असून सन २००६-०७ वर्षातील नविन कॉंक्रीट रस्ते या लेखा शिर्षाअंतर्गत प्रस्तावित केले असून त्यास मंजूरी दिल्यानुसार निविदा मागविली असता शे.सलीम मोहियोद्दीन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.११% कमी दराची निविदा प्राप्त झाली त्यास मा.शहर अभियंता यांनी मान्यता देण्यात आली.

१. संचिकेतील निविदा नियम ५४(२) नुसार ५% अतिरिक्त सुरक्षा रक्कम संबंधिताकडून घ्यावयास पाहिजे असतांना ते कपात किंवा घेतल्याचे दिसून येत नाही.

२. संबंधित ठेकेदाराच्या देयकातून ४% व्हॅट कपात करावयास पाहिजे असतांना संबंधित ठेकेदाराच्या देयकातून २% व्हॅटची कपात झालेली आहे. नियमानुसार देयकातून ४% व्हॅट कपात करावयास पाहिजे ती कपात झाल्याचे दिसून येत नाही.

वरील मुद्यांबाबतचा खुलासा विभागाने सादर करण्याचे सूचित केले असता संबंधित विभागाकडून अनुपालन प्राप्त झाले असून सदरील काम चांगल्या दर्जाचे झाल्याची तपासणी/खात्री करुन अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र. ४: रिंग व ढापे यांची खरेदी संचिका व स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून देण्याबाबत.**

वॉर्ड - क अंतर्गत वॉर्ड अभियंता अंतर्गत खर्च बाजूचे लेखापरीक्षण सन २००५-२००८ कार्यरत असून या कामी या विभागाचे रिंग व ढापे खरेदी संचिका व स्टॉक रजिस्टरची लेखापरीक्षण कामी आवश्यकता आहे.

तरी सदरील लेखे लेखापरीक्षणासाठी अतिसत्वर उपलब्ध करून देण्याचे सूचित केले असता संबंधित विभागाचे अनुपालन असमाधानकारक असल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.५ : १) वॉर्ड क्र.५१ येथील पाच फूटाच्या गल्ल्यांमधून माती उचलून पेव्हर ब्लॉक बसविणे. अ.प.र.४९९५५५/-**

गुत्तेदार : प्रभाकर मोहिते २६.६०% कमी

संदर्भः- १)जा.क्र./मनपा/वॉर्ड-इंजि-क/३९/२००७, दिनांक १२.१०.२००७.

२) वॉर्ड क्र.५६ मो.तेलंगवाडा जिन्सी शाळेमागे ब्लॉक बसविणे. अ.प.र.१९९९७४/-

गुत्तेदार : मीर वाजेदअली मीर हमिद अली. २६.०२% कमी

संदर्भ :-जा.क्र./मनपा/वॉर्ड-इंजि-क/५९१/२००७, दिनांक ३.११.२००७.

वॉर्ड - क अंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे बाबत निविदा काढण्यात आल्या. त्यानुसार पहिली संचिका ही २६.६०% कमी दराने व दुसरी संचिका २६.०२% कमी दराने मंजूर करण्यात आली. परंतु संबंधिता कडून ५% सुरक्षा रक्कम घेणे आवश्यक होते. तशी सुरक्षा रक्कम घेतलेचे संचिकेत दिसून आले नाही.

वरील बाबत विभागाने खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करण्याचे सूचित केले असता अनुपालन प्राप्त झाले असून काम समाधानकारक झाले असल्याची खात्री करुन विभागाने अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.६ : इंदिरानगर उत्तर भागातील ड्रेनेज लाईन अप्रुटींग करणे / बदलणे. ( अंदाजपत्रकीय रक्कम रू.१,४९,३३५/-)**

संदर्भः- जा.क्र./मनपा/वॉर्ड -इंजि-क/४०/०६, दिनांक १७.५.२००६.

इंदिरानगर उत्तर भागातील ड्रेनेज लाईन अप्रुटींग करणे/बदलणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रू.१,४९,३३५/- तयार केले असून सन २००५-०६ वर्षातील जलनिःसारण देखभाल दुरूस्ती या लेखाशिर्षाअंतर्गत प्रस्तावित केले असून त्यास शहर अभियंता यांनी मंजूरी दिल्यानुसर निविदा मागविली असता श्री.मिर्झा जाफ़र बेग यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.७५% कमी दराची निविदा प्राप्त झाली व त्यास शहर अभियंता यांनी मान्यता प्रदान करण्यात आली.

१. संचिकेतील पृ.क्र.एनएस-२ परिच्छेद क्र.५ (अ) व पृ.क्र. एनएस-६, परिच्छेद क्र.२० नुसार कामातून जे पाईप निकामी निघतील ते पाईप मनपा भांडारात सी-४३ नुसार २५० एमएमचे सिमेंट पाईप फुटलेले ३०-४० पाईप जमा केले आहे तर याबाबतची नोंद कोणत्या रजिस्टरला घेण्यात आली आहे याबाबतची माहिती लेखापरीक्षणास्तव उपलब्ध करून द्यावी.

२. संचिकेतील सी-३७ वरील Completion Report मधील अॅटम नं.१,११ मध्ये अंदाजपत्रकीय Qnty व कामानुसार प्रत्यक्ष Qnty मध्ये २५% पेक्षा वाढ झालेली आहे ती खालील प्रमाणे .

**अंदाजपत्रकीय परिमाण.**

| अॅटम नं. | अंदाजपत्रकीय परिमाण | दर | रक्कम रू. |
|---|---|---|---|
| १ | २८९.२० | ३५.७० | १०,३२४.४४ |
| ११ | १९१.०७ | १६.८० | ३२०९.९७ |

**कामानुसार प्रत्यक्ष परिमाण.**

| अॅटम नं. | सुधारीत अंदाजपत्रकीय परिमाण | दर | रक्कम रू. |
|---|---|---|---|
| १ | ३८७.३१२ | ३५.७० | १३,८२७.०३ |
| ११ | ३६१.३१२ | १६.८० | ६०७०.०४ |

वरील तक्त्यावरून दिसून येते की, वाढीव काम करण्यात आले असून वाढीव कामाबाबत संचिकेत मंजूरी घेतल्याचे दिसून येत नाही.

वरील दोन्ही मुद्यांबाबतचा खुलासा विभागाने लेखापरीक्षण विभागास सादर करण्याचे सूचित केले असता अनुपालन प्राप्त झाले असून सदरील कामाच्या दर्जाबाबत विभागप्रमुखांनी खात्री करुन फ़ेर अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.७ : वॉर्ड क्र.४३ रोशनगेट ते रोशन फ़ंक्शन हॉल पर्यंत लोखंडी जाळ्या बदलणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. (अं.प.रक्क रू.१,९५,०००/-)**

संदर्भ:- जा.क्र./मनपा/वॉर्ड-इंजि-क/१२५/०७,दिनांक ३.७.२००७.

उपरोक्त विषयान्वये वॉर्ड - क अंतर्गत वॉर्ड अभियंता येथील खर्च बाजूचे लेखापरीक्षण कार्यरत असून वॉर्ड क्र.४३ रोशन गेट येथे रोशनगेट ते रोशन फ़ंक्शन हॉल पर्यंत लोखंडी जाळ्या बदलणे व पेव्हर ब्लॉक बसविणे बाबत अं.प.रक्कम रू.१,९५,०००/- ची निविदा काढण्यात येवून

गुत्तेदार गुलाम रसूल यांची २% कमी दराने निविदा मान्य करण्यात येवून काम देण्यात आले त्यामध्ये खालील बाबी निदर्शनास आल्या.

**अंदाजपत्रकीयनुसार अ.क्र.१,२,४, अंदाजपत्रकीय परिमाण.**

| ॲटम नं. | अंदाजपत्रकीय परिमाण | दर | रक्कम रू. |
|---|---|---|---|
| १ | १.१४१५ | ३२९८१.५५ | ३७६४८.४४ |
| २ | ४.०० | १२००.०० | ४८००.०० |
| ४ | ०.३२२ | १८६६.७७ | ६०१.१० |

**कामानुसार प्रत्यक्ष परिमाण.**

| ॲटम नं. | अंदाजपत्रकीय परिमाण. | दर | रक्कम रू. |
|---|---|---|---|
| १ | २.४५१३ | ३२९८१.५५ | ८०८४७.६७ |
| २ | ६.०० | १२००.०० | ७२००.०० |
| ४ | २.९४ | १८६६.७७ | ५४८८.०० |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, अंदाजपत्रकापेक्षा जास्त Qnty दर्शविली आहे व Qnty मध्ये २५% पेक्षा जास्त वाढ झालेली आहे. वाढीव Qnty बाबत मंजूरी घेणे आवश्यक होते. परंतु मंजूरी घेतल्याचे दिसून आले नाही.

वरील मुद्यांबाबतचा खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करण्याचे सूचित केले असता संबंधित विभागाने खुलासा केला आहे. तथापि विभागाने कामाच्या दर्जाबाबत पाहणी/खात्री करुन फ़ेर अनुपालन सादर करावे.

# वॉर्ड – ई (सिडको, चिकलठाणा)
# सन २००३–०४ ते सन २००६–०७ या आर्थिक वर्षातील लेखापरीक्षणाचा अहवाल.

## जमा बाजुचे लेखापरीक्षण:

सन २००२-०३ या वर्षातील थकित चाचणी लेखापरीक्षण व २००३-०४ ते सन २००६-०७ या वर्षाच्या नियमित लेखापरीक्षणामध्ये जमा बाजूच्या अभिलेख्यांची तपासणी हाती घेण्यात आली असून तपासणी कालावधीत खाली नमूद केलेल्या नुसार पावती पुस्तकाची पडताळणी करण्यात आली तपासणी करण्यात आलेल्या पावती पुस्तकाबाबतचा तपशिल हा खालील प्रमाणे आहे. सन २००२ ते २००७ या आर्थिक वर्षातील एकूण पुस्तके.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मालमत्ता कर वसूली पावती पुस्तक | - | १६० |
| २. | पाणीपट्टी कर वसूली पावती पुस्तके | - | २४६ |
| ३. | जनरल पावती पुस्तके | - | ३० |

उक्त पावती पुस्तकाद्वारे वसूल करण्यात आलेली रक्कम ही वेळोवेळी संबंधिताने कॅश मध्ये नोंद घेवून महापालिका फंडात जमा केले बाबत तपासणी करण्यात आली. तसेच संबंधित मालमत्ता धारकाकडील वसूल करण्याच्या कर नोंदी ह्या मागणी रजिस्टर प्रमाणे घेतलेल्या आहेत/ नाहीत या बाबतची खातरजमा करण्याच्या दृष्टीने चाचणी लेखापरीक्षण ही करण्यात आले. तपासणी दरम्यान निदर्शनास आलेल्या आक्षेपार्ह बाबीचा तपशिल हा खालील प्रमाणे आहे.

### अ) जमा –बाजु

**परिच्छेद क्र.१: लेखापरीक्षणास्तव पाणीपट्टी व कराचे पुस्तक क्र. ३८५ उपलब्ध करून न देणे बाबत.**

वॉर्ड-ई या विभागाचे सन २००२-०३ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असता पाणीपट्टी वसूल केलेले पावती पुस्तक क्र.३८५ हे लेखापरीक्षणास्तव आजपावेतो उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.

विभागाने दिलेले अनुपालन असमाधानकारक असून पुस्तक क्र.३८५ गहाळ झाल्याबाबतची संचिका तपासली असता त्यामध्ये नमूद पाणीपट्टीचा भरणा केल्याचे पावती क्र. १-३२ पर्यंतच्या तपासणीसाठी अभिलेखे उपलब्ध करावे तसेच मा.उपआयुक्त (प्र),यांनी दिलेली सूचना दिनांक २२.५.२००२ नुसार पुढील कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तसेच पावती पुस्तक क्र.३८५ गहाळ झाल्याचे जाहिर प्रगटन किंवा गहाळ झाल्याविषयीची तक्रार केल्याचे दिसून येत नाही.

विभागाने जा.क्र./मनपा/प्रअधि-इ/१८८६/२००७,दि.३.१२.२००७ रोजी सादर केलेल्या अनुपालनात तत्कालीन विभागीय अधिकारी व संबंधित कर्मचारी श्री.विश्वनाथ थोरात

कनिष्ठ लिपीक व दैनिक वेतन मजूर श्री.राजेश घुले व श्री.सुभाष तायडे यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ नुसार कडक प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करावी असे सूचित करण्यात येते. तसेच तत्कालीन विभागीय अधिकारी श्री.बी.ई.भारसाखळे हे सुध्दा सदर प्रकरणी नियंत्रण अधिकारी या नात्याने जबाबदार असल्यामुळे त्यांचेविरूध्दही प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करावी.

**परिच्छेद क्र.२: पाणीपट्टी वसूल रकमेचा भरणा न केल्याबाबत. रू.९७१०५/-**

वॉर्ड -ई या कार्यालयाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असता असे दिसून येते की, वेळोवेळी केलेली पाणीपट्टीची रक्कम ही संबंधिताने मनपा फ़ंडात भरणा केल्याची दिसून येत नाही. त्याबाबतचा सविस्तर तपशिल हा खालील प्रमाणे आहे.

## १. पावती पुस्तक पाणी पट्टी –२३४९

| अ.क्र. | नळ धारकांचे नांव | पावती क्रमांक | रक्कम | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | लेव्हीस जॉन | २३४८८९ | २०००/- | ०१.१२.०६ |
| २ | एस.एस.झिने | २३४८९० | १३५०/- | ०१.१२.०६ |
| ३ | अरूण कळे अनिल | २३४८९१ | ८००/- | ०४.१२.०६ |
| ४ | आर.पी.कोलगे | २३४८९२ | १८००/- | ०४.१२.०६ |
| ५ | पी.डी. हुडवेकर | २३४८९३ | १८००/- | ५.१२.०६ |
| ६ | आर.डी. भामरे | २३४८९४ | १८००/- | ०६.१२.०६ |
| ७ | बी.डी.सुमराव | २३४८६९ | १५००/- | ०८.१२.०६ |
| ८ | एम.पी.सोनवणे | २३४८७० | १८००/- | ०८.१२.०६ |
| ९ | एस.एम.वाळके | २३४८७१ | ३६००/- | ०८.१२.०६ |
| १० | महादेव कादी | २३४८४५ | १५००/- | ११.१२.०६ |
| ११ | पी.एस.चव्हाण | २३४८४६ | १८००/- | ११.१२.०६ |
| १२ | व्ही.एस.दाणेकर | २३४८५७ | १८००/- | १५.१२.०६ |
| १३ | एस.एस.कुलकर्णी | २३४८५८ | १४००/- | १५.१२.०६ |
| १४ | डि.जी.निकम | २३४८८८ | १०००/- | १९.१२.०६ |
| १५ | जगन्नाथ उबाळे | २३४८८६ | ३०६०/- | १९.१२.०६ |
| १६ | जी.एम.साळवे | २३४८८७ | १०००/- | १९.१२.०६ |
| १७ | वसंत बाबुराव खरात | २३४८६८ | ९००/- | २९.१२.०६ |
| १८ | एस.जी.तोंडारे | २३४८९५ | १०००/- | ०९.१२.०६ |
| | | एकूण | **२९९१०/-** | |

वरील एकूण १८ पावत्या पावती पुस्तकात फ़ाडण्यात (मूळ)येवून पुस्तकात पुनश्च मागे पुढे चिटकविण्यात आल्याचे तपासणी मध्ये निदर्शनास आले. वरील १८ पावत्यांची रक्कम कॅश रजिस्टरला अथवा मनपा फ़ंडात भरणा करण्यात आलेली नाही.

## २. पावती पुस्तक पाणी पट्टी –२४३१

| अ.क्र. | नळ धारकांचे नांव | पावती क्रमांक | रक्कम | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | डि.सी.व्यवहारे | २४३०६९ | १०००/- | -- |
| २ | आरात काळे | २४३०७० | ६००/- | -- |
| ३ | के.आर.राऊत | २४३०७१ | ५००/- | -- |
| ४ | व्ही.बी.तरपे | २४३०७२ | १४००/- | -- |
| ५ | विष्णु निवृत्ती पवार | २४३०७३ | ३०६०/- | -- |
| ६ | एस.एस.कदम | २४३०७४ | ५००/- | -- |
| ७ | योगेश जाधव | २४३०७५ | ५००/- | -- |
| ८ | के.डी.कुलकर्णी | २४३०९० | १०००/- | -- |
| ९ | एस.एम.कुलकर्णी | २४३०९१ | १०००/- | -- |
| १० | एस.सी.कोटुरकर | २४३०९२ | १०००/- | -- |
| ११ | वाय.बी.विटोरे | २४३०९३ | १०००/- | -- |
| १२ | डि.सी.व्यवहारे | २४३०९४ | २५००/- | -- |
| १३ | शेषराव दगडु पाटील | २४३०९५ | ३०६०/- | -- |
| | | **एकूण** | **१७१२०/-** | |
| | एकूण पावत्या १३ वॉर्ड - ई कार्यालयाचे रोखपाल यांचे ताब्यात आहे. सदर पावत्या (मुळ) असून पावती पुस्तकातून फ़ाडण्यात आलेल्या आहेत. त्याच्या रकमेचा भरणा करण्यात आलेला नाही. | | | |

## ३. पावती पुस्तक पाणी पट्टी –२४४२

| अ.क्र. | नळ धारकांचे नांव | पावती क्रमांक | रक्कम | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | एस.व्ही.निकम | २४४११५ | १८००/- | ०१.०३.०७ |
| २ | ए.एन.भाले | २४४११७ | १८००/- | ०३.०३.०७ |
| ३ | आर.पी.खंदारे | २४४१२१ | १०००/- | ०६.०३.०७ |
| ४ | व्ही.डी.सुमराव | २४४१३५ | ९००/- | १०.०३.०७ |
| ५ | एस.जी.तोंडारे | २४४१३६ | १६००/- | १०.०३.०७ |
| ६ | एम.आर.कोळी | २४४१३७ | १८००/- | १२.०३.०७ |
| ७ | एस.एम.कुलकर्णी | २४४१३८ | १०००/- | ०८.०३.०७ |
| ८ | आर.जी.उशीरे | २४४१३९ | ८००/- | १०.०३.०७ |
| ९ | अंबेकर एन.टि. | २४४१४० | १०००/- | १०.०३.०७ |
| १० | एम.पी.मुंढे | २४४१४१ | १८००/- | १०.०३.०७ |
| ११ | अविनाश सेवाणे | २४४१४२ | २०००/- | १०.०३.०७ |
| १२ | जी.एम.साळवे | २४४१४४ | ५००/- | १०.०३.०७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | व्ही.एम. दाणेकर | २४४१४३ | २०००/- | २४.०२.०७ |
| १४ | एस.बी. रगडे | २४४१४५ | १५००/- | १२.०३.०७ |
| १५ | डि.जी.निकम | २४४१४६ | ८००/- | १२.०३.०७ |
| १६ | सुभाषचंद्र सामंत | २४४१४७ | १८००/- | १२.०३.०७ |
| १७ | शक्करवार अनिल | २४४१४८ | २९२५/- | १२.०३.०७ |
| १८ | ओमप्रकाश गुप्ता | २४४१४९ | १८००/- | १२.०३.०७ |
| १९ | विनायक नेरूरकर | २४४१५० | १८००/- | १२.०३.०७ |
| २० | प्रकाश ज.दळे | २४४१५१ | २९२५/- | १२.०३.०७ |
| २१ | किशोर पवार | २४४१५२ | २९२५/- | १२.०३.०७ |
| २२ | बी.बी.कोलते | २४४१६४ | १०००/- | २३.०३.०७ |
| २३ | एस.पी.जोशी | २४४१६५ | १३००/- | २३.०२.०७ |
| २४ | एम.डी.पिंगळे | २४४१६६ | ३००/- | १२.०३.०७ |
| २५ | एक्स.वाय.झेड | २४४१६७ | २०००/- | २१.०२.०७ |
| २६ | डि.आर.दवंडे | २४४१६८ | २०००/- | १९.०२.०७ |
| २७ | आर.खंदारे | २४४१६९ | १०००/- | १६.०२.०७ |
| २८ | एक्स.वाय.झेड | २४४१७० | १०००/- | १६.०२.०७ |
| २९ | एस.ए.म्हस्के | २४४१७१ | १५००/- | १६.०२.०७ |
| ३० | एस.बी.कुलकर्णी | २४४१८९ | ९००/- | ०६.०३.०७ |
| ३१ | जी.एस.भानुशाली | २४४१६२ | ३६००/- | ०५.०३.०७ |
| ३२ | आर.अे.मकदुळ | २४४११३ | १०००/- | ०५.०३.०७ |
| | | एकूण | **५००७५/-** | |

खालील प्रमाणे पाणीपट्टी पावती पुस्तकांद्वारे मनपा फ़ंडात भरणा न केलेली पुस्तक निहाय एकूण रक्कम .

१. २४३१ -१७१२०/-
२. २३४९ – २९९१०/-
३. २४४२ –५००७५/-

**एकूण रक्कम ९७१०५/-**

अद्यापपर्यात वरील भरणा न केलेली रक्कम रू.९७१०५/- २४ तासाचे आत मनपा फ़ंडात जमा करून लेखा परीक्षण विभागास अनुपालन सादर करावे असे सूचित केले असता विभागाने सदरचे प्रकरणात श्री.अशोक म्हस्के यांना आदेश क्र.मनपा/आस्था-२/३४९/०७, दि. २९.३.२००७ अन्वये निलंबित केलेले आहे. कार्यवाहीअंती उपआयुक्त (म), यांच्या तजविजीनुसार जा.क्र./प्रअधि-इ/५१०/०७ दि.१३.४.२००७ अन्वये प्रकरण वॉर्ड अभियंता – ई यांचेकडे वर्ग केल्याचे अनुपालनात म्हटले आहे. अपहारीत रक्कम रू.९७१०५/- ची वसूली न

झाल्यामुळे संबंधित कर्मचारी श्री.अशोक छगन म्हस्के, मजूर यांचेविरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ नुसार कडक प्रशासकीय कार्यवाही करावी असे सूचित करण्यात येते.

**परिच्छेद क्र.३: मालमत्ता कर वसूली पावती पुस्तक क्र.८१५ पा.क्र.८१४३६ ची दुय्यम पावती प्रत पुस्तकातून गहाळ होणे बाबत.**

वॉर्ड- ई या विभागाचे सन २००४-५ या आर्थिक वर्षाचे जमा बाजूचे लेखापरीक्षण करीत असतांना असे निदर्शनास आले की, मालमत्ता कर वसूली पावती पुस्तक क्र.८१५ मध्ये पावती क्र.८१४३६ ची दुय्यम प्रत पावती पुस्तकामधून गहाळ झालेली आहे. या अनुषांगाने विभागाचे कॅश रजिस्टर २ पान क्र.९९ ही दि.४.१.२००५ वर मे.नवल कुलर्स W-47 यांचे नांवे रक्कम २५९६/- जमा केल्याची नोंद दिसून आली. परंतु प्रत्यक्षात सदर पावतीद्वारे किती रक्कम वसूल करण्यात आली याची खात्री होत नाही.

सदर क्रमांकाची पावतीची दुय्यम प्रत लेखा परीक्षणास्तव उपलब्ध करून द्यावी असे सूचित केले असता अद्यापपावेतो ८१४३६ क्रमांकाची पावतीची दुय्यम प्रत उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर पावतीद्वारे निश्चित किती रकमेची वसूली झाली आहे याचा बोध झालेला नाही.

सबब, सदर प्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यावर प्रशासकीय कार्यवाही करावी असे सूचित करण्यात येते.

**परिच्छेद क्र.४: न वटलेल्या धनादेशाबाबत.**

सन २००६-०७ या वर्षाच्या लेखापरीक्षण कार्यक्रमानुसार वॉर्ड-ई (चिकलठाणा ,सिडको ) सन २००२-०३ ते सन २००६-०७ या आर्थिक वर्षातील अभिलेखे तपासण्यात येत आहेत. सदर तपासणी दरम्यान असे निदर्शनास आले आहे की, विविध प्रकारच्या वसूली बाबतचे सन २००५-०६ या आर्थिक वर्षात २ धनादेश एकूण रक्कम रूपये ६३३९/- व सन ०६-०७ या वर्षात २ धनादेश एकणू रक्कम रू.११८४२/- इतक्या रकमेचे ४ धनादेश न वटता परत आल्याचे धनादेश रजिस्टर वरून दिसून येते. सन २००२ ते सन २००५ या आर्थिक वर्षाचे कोणतेही धनादेश रजिस्टर नोंद लेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.

विभागाला अनुपालन सादर करण्याचे सूचित केले असता विभागाने सादर केलेले अनुपालन असमाधानकारक असून न वटलेल्या धनादेशाची एकुण रक्कम रू.१८१८१/- अद्याप वसूल केलेली नाही. त्यानुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करावी तसेच धनादेश रजिस्टर नोंद लेखे अद्यावत करण्याचे सूचित करण्यात येते.

## सन २००५–०६

| अ.क्र. | धनादेश क्र.दिनांक | रक्कम रूपये | बँकेचे नांव | पार्टीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | १०४८३० १५.२.२००६ | ३०००/- | लोक नागरी सहकारी बँक | रामचंद्र सखाराम मेहर |
| २ | १०४८२९ २५.३.२००६ | ३३३९/- | लोक नागरी सहकारी बँक | रामचंद्र सखाराम मेहर |
| | **एकूण** | **६३३९/–** | | |

## २००६–०७

| अ.क्र. | धनादेश क्र.दिनांक | रक्कम रूपये | बँकेचे नांव | पार्टीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | ०१३९८६ १६.२.२००७ | २०३०/- | FDCC | सुरेश पी. गार्गे |
| २ | ३०८१ ३०.३.२००७ | ९८१२/- | बँकेचे नांव नाही | शोभा विजय थेपाडे |
| | **एकूण** | **११८४२/–** | | |

# वॉर्ड अभियंता –ई

## सन २००५–२००६ ते सन २००६–२००७

## खर्च बाजूचे लेखापरीक्षण.

सन २००५-०६ व सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे वॉर्ड अभियंता –ई यांच्या अधिपत्याखाली करण्यात आलेल्या वॉर्ड मधील विविध विकास कामांच्या संचिकांची तपासणी केली.

**परिच्छेद क्र.१: एकूण बिलातून विमा रक्कम वजावट न करणे बाबत.**

वॉर्ड अभियंता –ई या कार्यालयाचे सन २००५-०६ या आर्थिक वर्षाचे खर्च बाजूचे लेखापरीक्षणा अंतर्गत विविध कामाच्या संचिका तपासणी मध्ये सिडको एन-३ येथे स्केटींग ट्रॅक बसविणे बाबतचे काम पूर्ण करण्यात आले. परंतु एकूण बिलामधून विमा रक्कम १% वजावट न केल्याचे दिसून येते ते खालील प्रमाणे.

| कामाचे नांव | एमबी नं. | पान क्र. | देयकाची रक्कम | विमा रक्कम |
|---|---|---|---|---|
| सिडको एन-३ येथे स्केटींग ट्रॅक चे कामाबाबत. | १५६३ | २१-२२ | ५२,४७८ | ५२५/- |

वरील रक्कम संबंधित गुत्तेदार यांचेकडून वसूल करण्यात येवून २४ तासांच्या आत मनप फ़ंडात जमा करून तसा अनुपालन अहवाल या विभागास सादर करावा असे सूचित करण्यात आले असता विभागाने पावती क्र.२३३८४२,दिनांक ४.१२.२००७ नुसार सदरची रक्कम रू.५३५/- ही संबंधित गुत्तेदाराकडून वसूल केल्याचे कळविले आहे. भविष्यात अशी चुक होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.२: विमाननगर चिकलठाणा येथे ड्रेनेज लाईन टाकणे बाबत. रू.२,८८,२४६/-**

वॉर्ड-ई अभियंता कार्यालयाचे सन २००५-०६ या आर्थिक वर्षाचे खर्च बाजूचे लेखापरीक्षणा अंतर्गत उपरोक्त विषयांकित संचिका तपासणी केली असता प्रस्तावित काम हे निविदेती अटी/शर्तीनुसार कामाची मुदत –२ म्हणजेच १२.६.२००६ रोजी पूर्ण होणे आवश्यक असतांना ते दि.१५.७.०६ म्हणजेच ३३ दिवस विलंबाने केले गेले आहेत ते काम पूर्णत्वाच्या प्रमाणपत्रावरून दिसून येते. तसेच गुत्तेदाराचे संपूर्ण देयक रू.२,८५,४०६/- अदा करते वेळी ३३ दिवसाच्या विलंब दंडाची रक्कम कपात करून घेणे आवश्यक होते. मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्याचे तपासणी मध्ये निदर्शनास आले.

उक्त ३३ दिवस विलंब (दंड) नियमानुसार गुत्तेदाराकडून २४ तासात वसूल करून मनपा फ़ंडात जमा करून तसा अहवाल या विभागास देण्याविषयी सूचित केले असता विभागाने संबंधित गुत्तेदाराकडून ३३ दिवस विलंब दंड रक्कम रू.३३०/- ही पावती क्र.२३३८४५,

दिनांक ५.१२.२००७ अन्वये वसूल केल्याचे कळविले आहे. भविष्यात अशी चुक होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.३: एस.टी.कॉलनी एन–२ येथे पाणी वाहून जाणे करीता गटार बांधून लोखंडी जाळी बसविणे बाबत.**

वॉर्ड -अभियंता –ई कार्यालयाचे सन २००५-०६ या आर्थिक वर्षाचे खर्च बाजूचे लेखापरीक्षण करीत असता उपरोक्त विषयांकित संचिका तपासणी केली असता प्रस्तावित कामा मध्ये नियमानुसार होणारी १% विमा रक्कम रू.५००/- वजा केल्याचे अंतिम देयकातून दिसून येत नाही.

करिता सदरील काम करणाऱ्या गुत्तेदाराकडून रू.५००/- वसूल करून मनप फ़ंडात जमा करून तसा अनुपालन अहवाल सादर करावा.

विभागाने सादर केलेले अनुपालन असमाधानकारक असून विम्याची रक्कम मनपा फ़ंडात जमा करून फेर अनुपालन सादर करण्याविषयी विभागास सूचित केले असता,विभागाने संबंधित गुत्तेदाराकडून विम्याची रक्कम रू.५०७/- ही पावती क्र.२३३८४६, दिनांक ५.१२.२००७ नुसार भरणा केल्याचे कळविले आहे. भविष्यात अशी चुक होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.४: वॉर्ड क्र.७५ संजयनगर मुकुंदवाडी येथे ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे मध्ये ९९९/– रू. जास्त अदाई बाबत.**

वॉर्ड -अभियंता –ई कार्यालयाचे सन २००५-०६ या आर्थिक वर्षाचे खर्च बाजूचे लेखापरीक्षण करीत असता उपरोक्त विषयांकित संचिका तपासणी केली असता विकास कामा अंतर्गत वॉर्ड क्र.७५ संजयनगर मुकुंदवाडी येथे ड्रेनेज लाईनची दुरूस्ती करणे करीता अ.प.रक्कम रू.४९८८८/- नुसार काम करण्यात आलेले आहे.

सदर कामाची रक्कम गुत्तेदारास अदाई करतांना मोजमाप पुस्तिका पान क्र.१४९ देयकाची एकूण रक्कम ४९८३९/- मधून अ.प.रकमेपेक्षा कमी दर ३६.३०% व सर्व कराची कपात होता रक्कम रू.२६४७५/- अदा झालेले आहे.

प्रत्यक्षात एकूण रक्कम ४९८३९/- मधून खालील प्रमाणे रक्कम कपात होणे आवश्यक होते.

| | |
|---|---|
| | ४९८३९= |
| कमी दर ३६.३०% | १८०९१= |
| | ३१७४८= |
| २.३% टॅक्स | ७३०= |
| | ३१०१८= |
| ३% F.S.D | ९५२= |
| | ३००६६= |
| ४% वॅट | १२७० = |

| | |
|---|---|
| | २८७९६= |
| रॉयल्टी | ३२०= |
| | २८४७६= |
| ५% अति.सुरक्षा रक्कम | २५००= |
| | २५९७६= |
| १% विमा रक्कम | ५००= |
| | २५४७६= |

गुत्तेदारास निव्वळ देय असलेली रक्कम रू.२५४७६ गुत्तेदारास अदा करणे ऐवजी रू.२६४७५/- अदा झालेले आहे. म्हणजेच रू.९९९/- गुत्तेदारास जादा अदाई करण्यात आलेली आहे.

उक्त रक्कम संबंधिताकडून २४ तासांचे आत वसूल करून मनप फ़ंडात जमा करावी व तसा अनुपालन अहवाल लेखा परीक्षण विभागास सादर करावा असे सूचित करण्यात आले असता विभागाने संबंधित गुत्तेदाराकडून जादा अदाई रक्कम रू.९९९/- ही पावती क्र.२७४४२७, दिनांक २६.०३.२००८ अन्वये वसूल करून मनपा फ़ंडात भरणा केल्याचे कळविले आहे. भविष्यात अशी चुक होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.५: वॉर्ड क्र.२३, चौधरी कॉलनी येथे जुने आर.सी.सी.पाईप काढून नविन पाईप टाकणे.**

वॉर्ड-ई अभियंता या विभागाचे सन २००६-७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असता उपरोक्त विषयांकित संचिका तपासणी केली असता सदरच्या कामामध्ये संचिकेतील पान क्र.३ तांत्रिक विभाग प्रमुखाने सदरची लाईन मनपाने टाकलेली आहे का ? असल्यास केव्हा याचा खुलासा व्हावा असे नमूद केले व मुख्य लेखाधिकशरी यांनी सुध्दा उपरोक्त मुद्याबाबत शहानिशा होणाऱ्या अटीवर विभागाने कार्यवाही करावी असे नमूद केले असतांना या बाबत कोणताही खुलासा न होता सदरील काम पूर्ण करण्यात आले आहे ही बाब आक्षेपार्ह आहे.

याबाबतचा खुलासा लेखी परीक्षण विभागास द्यावा असे विभागास सूचित केले असता विभागाने सादर केलेले अनुपालन समाधानकारक असून परिच्छेद वगळण्यात येत आहे. तथापि भविष्यात अशी चुक होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.६ : वॉर्ड –ई चिकलठाणा येथे मा.सभापती वॉर्ड इंजिनियर तसेच सदस्या करीता दालन तयार करणे.अ.प.रक्कम रू.९५,४३७/–**

वॉर्ड अभियंता –ई या विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असता उपरोक्त विषयांकित कामाची संचिका तपासणी केली असता संपूर्ण बिल अदाई च्या वेळीस नियमानुसार होणारी १% विमा रक्कम ९५५/- वजा न करताच सदरील अंतिम बिल अदाई केले आहे. त्याबाबत गुत्तेदाराकडून १% विमा रक्कम ९५५/- रू. मनपा फ़ंडात जमा करून, सदरील

१% विमा रक्कम का वसूल केली गेली नाही कारणासह लेखी खुलासा या विभागास सादर करण्याविषयी विभागास सूचित केले असता विभागाने संबंधित गुत्तेदाराकडून विम्याची रक्कम रू.९५५/- ही पावती क्र.२३३८४७, दिनांक ६.१२.२००७ अन्वये वसूल केल्याचे कळविले आहे. तथापि भविष्यात अशी चुक होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.७ : वॉर्ड क्र.८४ मधील विजयनगर येथे मनपा खुली जागा विकसित करणे.**
**अ.प.रक्कम रू.२,४९,४८७/-**

वॉर्ड अभियंता –ई या विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असता उपरोक्त विषयाची संचिका तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, सदरील कामासाठी AMC / WE / 333 /07, दि.६.३.२००७ अन्वये कामाचे आदेश देण्यात आले होते. निविदेतील अटी/शर्ती प्रमाणे काम हे दिनांक ६.५.२००७ रोजी २ महिन्यात पूर्ण होणे आवश्यक होते. परंतु सदरील काम हे दिलेल्या कालावधीत पूर्ण झाले नाही असे दिसून येते. कारण वॉर्ड इंजिनियरचे पत्र जा.क्र.मनपा/वॉर्ड-इ/५७४/०७, दि.४.५.२००७ या पत्रावरून दिसून येते. कारण या पत्रामध्ये सदरील गुत्तेदारास काम चालु करणे विषयी दंडनिय कार्यवाही विषयी सुचित करण्यात आले आहे व या पत्राआधी सुध्दा त्यास काम लवकर सुरू करण्या विषयी पत्र क्र. प्र.अभियंता/ई/५२९/०७, दिनांक १६.४.२००७ या पत्राद्वारे सूचित केले होते. परंतु संचिकेवरून असे दिसून येते की, सदरील काम हे २ महिन्याच्या मुदतीमध्ये पूर्ण झाले नाही व सदरील काम कधी पूर्ण झाले याचे कामपूर्णत्वाचे प्रमाणपत्र संचिकेत उपलब्ध नाही. त्यामुळे सदर काम अद्यापपावेतो पूर्ण झाले किंवा कसे याचा बोध होत नाही.

तरी काम जेवढे दिवस विलंबाने झाले त्या दिवसासाठी सदरील ठेकेदाराकडून विलंबाबाबत नियमानुसार दंड आकारून मनप फ़ंडात जमा करून अनुपालन अहवाल या विभागास द्यावा.

अद्यापपर्यंत विभागाने लेखे उपलब्ध करून दिलेले नाहीत.

**परिच्छेद क्र.८: वॉर्ड क्र.७२ येथे एन-४ सेक्टर डॉ.डोणगांवकर प्लॉट व एमआयटी महाविद्यालय जवळील मोकळ्या जागेस संरक्षित भिंत बांधणे.**
**अ.प.रक्कम रू.४,९५,३९२/-**

वॉर्ड- अभियंता –ई या विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असता उपरोक्त विषयाची संचिका तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, सदर प्रस्तावित कामासाठी मनपाच्या भांडारातून स्टीलचा उपयोग करता येईल असे संचिकेतील परि.क्र.६ मध्ये स्पष्ट नमूद केले असून परि.क्र.१० मध्ये दुय्यम आवेक्षक यांनी पण तसा अहवाल दिलेला आहे की, भांडार मध्ये १० एमएमच्या ८० सळ्या (नग)शिल्लक असून उपयोगात शकतात असे उपअभियंता यांनी सुध्दा नमूद केले म्हणजेच नमूद स्टील कामामध्ये उपयोगात घेतले असे स्पष्ट होते परंतु त्याची होणारी रक्कम कामाच्या देयकातून कपात केल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तुत काम विहीत वेळेत पूर्ण झाल्याबाबत तसे प्रमाणपत्र संचिकेमध्ये /सादरीकरणात दिसून येत नाही. संचिकेत परि.क्र.४२ चे अवलोकन केले असता काम विलंबाने होत आहे असे सादरीकरण आहे. म्हणजेच काम हे विहीत वेळेत पूर्ण झालेले नाही. प्रस्तुत काम हे गुत्तेदाराने

विलंबाने केलेले आहे तर नियमाप्रमाणे दंडात्मक कार्यवाही होणे गरजेचे ठरेल तसे संचिकेमध्ये दिसून येत नाही.

तरी याबाबत विभागाने लेखी खुलासा सादर करावा.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.९ : वॉर्ड क्र.२३, मसनतपूर स्लम येथील स्मशानभूमी विकसित करणे.**
**अंदाजपत्रकीय रक्कम रू.१,४९,८३३/-**

वॉर्ड अभियंता –ई विभागाचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण सुरू असून त्या अंतर्गत उपरोक्त विषयांकित संचिका तपासणी केली असता मसनतपूर येथे सुंदर कन्स्ट्रक्शन या गुत्तेदारास काम देण्यात आले होते. अंतिम बिल अदाईसाठी सदरील संचिका तांत्रिक विभागाकडे पाठविण्यात आली होती. सदर बाबत तांत्रिक विभागाने असे मत नोंदविले आहे की सिमेंट चाचणी (cement testing)चा अहवाल संचिकेमध्ये सादर करण्यात आला नाही. तरी चाचणी अहवाल सादर झाल्यानंतर FSD Release करण्यात यावी असे नमूद केले असतांनाही दि.१८.६.०७ रोजी सदरील गुत्तेदारास FSD परत करणे विषयी संचिका सादर करून FSD परत करण्यात आली आहे व संचिके मध्ये सिमेंट चाचणी (cement testing)अहवाल उपलब्ध नाही.

तरी तांत्रिक विभागाच्या अहवालाकडे संपूर्ण दुर्लक्ष करून सदरील गुत्तेदारास FSD परत केला गेला. म्हणजेच तांत्रिक विभागाचे आदेशाचे पालन होत नाही असे दिसून येते.

याबाबत योग्य तो खुलासा या विभागास देण्यात यावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेले अनुपालन समाधानकारक असून परिच्छेद वगळण्यात येत आहे. तथापी भविष्यात अशा बाबतीत दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.१०: तात्पुरते नळ जोडणी बाबत.**

वॉर्ड अभियंता –ई या विभागाचे सन २००५-०६ व सन २००६-०७ या वर्षाचे लेखापरीक्षण सुरू असता अर्धसमास पत्र क्र.२१ व २५ द्वारे वॉर्ड अभियंता यांना नविन नळ जोडणी फ़ॉर्म सोबत आवश्यक असलेली कागदपत्रांबाबतची माहिती लेखा परीक्षणास्तव उपलब्ध करून द्यावी या बाबत पत्र दिले गेले परंतु आजपावेतो संबंधित माहिती लेखापरीक्षणास्तव उपलब्ध करून देण्यात आली नाही.

त्यामुळे नविन नळ जोडणी संख्येचा निश्चित होध झाला नाही व फ़ॉर्म तपासण्यात आले नाही भांडार विभागातून आलेल्या नळ जोडणी फ़ॉर्म निश्चित संख्याची सुध्दा माहिती देण्यात आली नाही.

याबाबत माहिती देणे विषयी विभागास सूचित केले असता विभागाने नविन नळ जोडणी फ़ॉर्म एकूण १३०० भांडार विभागाकडून प्राप्त झाले असल्याचे कळविले असून फ़क्त १२५६ फॉर्म विक्री रक्कम भरणा केलेली आहे. मात्र ४४ फ़ॉर्मच्या हिशोबाचा ताळमेळ दिसून येत नाही.

## औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद.

## पाणी पुरवठा–१ विभाग

उपअभियंता,पाणीपुरवठा –१, या विभागाचे सन २००२-०३ ते सन २००४-०५ या वर्षातील अभिलेख्यांचे थकित चाचणी लेखापरीक्षण व सन २००५-०६ या वर्षाच्या नियमित चाचणी लेखापरीक्षणामध्ये जमा बाजूंच्या अभिलेख्यांची तपासणी हाती घेण्यात आली असून तपासणी कालावधी मधील तपशील हा खालील प्रमाणे आहे.

### जमा बाजू लेखापरीक्षण:

**परिच्छेद क्र.१:–भांडार विभागातून वितरीत केलेल्या नविन नळकनेक्शन एकूण फ़ॉर्म व एकूण वसूल महसूल संकलन तपशिलाबाबत.**

उक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, आपल्या विभागामार्फ़त मनपा भांडार विभागातून नविन नळ जोडणी फ़ॉर्म आपल्या विभागाला निम्न निर्दिष्ट वर्षामध्ये वितरीत करण्यात आले असून प्रती फ़ॉर्मची किंमत रू.५०/- असे निश्चित केलेले आहे. प्रस्तुतच्या फ़ॉर्मचे कसे व किती वितरण झालेले असून त्याचा महसूल किती वसूल झालेला आहे. या संदर्भात सविस्तर लेखी माहिती लेखापरीक्षण विभागास उपलब्ध करून देण्यात आलेली असून दिलेल्या फ़ॉर्म नं.मध्ये तफ़ावत दिसून येत असल्याने व काही फ़ॉर्म विभागास दिले असल्याने किती फ़ॉर्मचे पैसे जमा झाले आहे किंवा नाही याचा बोध होत नाही.

विभागास अनुपालन सादर करण्याची सूचना दिली असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे. करिता परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.२: सन २००२–०३ ते सन २००५–०६ या वर्षात विभागाअंतर्गत पेयजल वितरणार्थ कार्यरत असणाऱ्या टॅंकर्सची माहिती पुरविणेसंबंधी.**

उपनिर्दिष्ट प्रकरणी कळविण्यात येते की, लेखापरीक्षण विभागास लेखापरीक्षणार्थ निम्ननिर्दिष्ट मुद्यावर आधारीत सविस्तर व मुद्येआधारीत माहिती लेखापरीक्षणार्थ आवश्यक असल्याने ती अतिसत्वर पाठविण्यास विनंती आहे.

१. पाणी पुरवठा-१ विभागाअंतर्गत मनपा मालकीचे व खाजगी टॅंकर किती कार्यरत आहे.
२. कार्यरत असलेल्या टॅंकरच्या पाणी साठा क्षमता व गाडी क्रमांक.
३. प्रति टॅंकर (क्षमतेप्रमाणे) निर्धारीत दर (घरगूती/व्यावसायीक/धार्मिक इ.)
४. संबंधित टॅंकरचे गेट वरील नोंदवही व लॉक बुक.
५. पाणी पुरवठा केल्या संबंधी महसूल वसूलीबाबत विभागाने ठेवलेला तपशिल. (खाजगी /मनपा/मालकीच्या टॅंकरचा स्वतंत्र तपशिल द्यावा).
६. एका टॅंकर करीता प्रतिदिन किती .फेरे मारणे आवश्यक आहे याचा तपशिल.

वरील मुद्यांबाबतची माहिती अद्यापपावेतो अप्राप्त असल्याकारणाने परिच्छेद कायम करण्यात येतो.

## <u>खर्च बाजु लेखापरीक्षण:</u>

उपअभियंता पाणीपुरवठा-१, या विभागाचे सन २००२-०३ ते सन २००४-०५ या वर्षातील अभिलेख्यांचे थकीत लेखापरीक्षण व सन २००५-२००६ या वर्षाच्या नियमित लेखापरीक्षणामध्ये खर्च बाजुच्या अभिलेख्यांची चाचणी स्वरूपात तपासणी हाती घेतली असून तपासणी कालावधीत जे आक्षेप आढळून आले ते खालील प्रमाणे .

**परिच्छेद क्र.१: लेखापरीक्षणास्तव आवश्यक ती सर्व अभिलेखे उपलब्ध करून देणे बाबत.**

उपअभियंता पाणीपुरवठा-१ या विभागाचे सन २००२-०३ ते सन २००५-०६ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण हाती घेण्यात आले असून त्यानुषंगाने खालील आवश्यक सर्व लेखे / अभिलेखे जसे -

विभागाअंतर्गत अद्ययावत ठेवलेले स्टॉक रजिस्टर (साठा रजिस्टर) १ वितरण रजिस्टर १०९,११०, डेड स्टॉक १११, प्रमाणे लेखापरीक्षणासाठी तात्काळ उपलब्ध करून देण्यात आले होते. परंतु रजिस्टर अपूर्ण असल्याकारणाने लेखापरीक्षण होवू शकले नाही. विभागाने सदरील अपूर्ण रजिस्टर अद्यापपावेतो लेखा परीक्षणकामी उपलब्ध न करून दिल्यामुळे सदरचा परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र.२:- सन २००२-०३ मध्ये विविध शिर्षाअंतर्गत केलेल्या कामाच्या माहेवार खर्चाचा तपशिल उपलब्ध करून देणे बाबत.**

पाणी पुरवठा-१ या विभागाचे लेखा परीक्षणाचे काम हाती घ्यावयाचे असून प्रस्तुतचे कामी सन २००२-०३ मध्ये झालेल्या विविध शिर्षाअंतर्गत केलेल्या खर्चाचा तपशिल लेखा विभागातील तरतूद (Provision Register) पुस्तिके नुसार शक्य तितक्या लवकर उपलब्ध करून द्यावे असे विभागास सूचित केले असता विभागाने सादर केलेले अनुपालन समाधानकारक असल्यामुळे परिच्छेद वगळण्यात येतो.

**परिच्छेद क्र.३:- व्यंकटेश नगर भागात १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणे.**

संदर्भ:- जा.क्र./मनपा/पा.पु.-१/९६२/०३, दिनांक ५.१२.२००३.

औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत पाणीपुरवठा –१ विभागामार्फत व्यंकटेश नगर भागात १०० व १५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.१,४८,९४१/- चे तयार करण्यात आले असून सन २००३-०४ च्या पाणी पुरवठा देखभाल दुरूस्ती लेखाशिर्षका अंतर्गत त्यास दि.११.८.२००३ मंजूरी देण्यात आली असून निविदा मागविल्या असता श्री.मन्नान खान यांची (१४.७८६%) कमी दराची निविदा प्राप्त झाली असून त्यास दि.३०.१०.२००३ रोजी मान्यता प्रदान करण्यात आली.

पृ.क्र.८ परि.क्र.२६,२७,२८ नुसार जलवाहिनी टाकण्याचे काम व्यंकटेश नगर अंतर्गत प्रस्तावित असतांना हे काम मुख्य रस्त्यावर करण्यात आले. बदल करतांना मा.आयुक्त यांची

मंजूरी घेण्यात आली नाही याबाबत विभागाने खुलासा सादर केला असून तो असमाधानकारक असल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.४:–रोजाबाग (स्लम) येथे १५० व १०० मि.मि.व्यासाची एसी जलवाहिनी टाकणे.**

संदर्भ:- जा.क्र./मनपा/पा.पु.-१/२२६/०४, दिनांक ३.३.२००४.

पाणी पुरवठा-१ अंतर्गत रोजाबाग (स्लम) येथे १५० व १०० मी.मी. व्यासाची एसी जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.५,९४,२०५/- चे तयार करण्यात आले त्यास मा.आयुक्त यांची दि.८.१०.२००२ रोजी मंजूरी देण्यात आली असून सन २००२-०३ च्या भांडवली कामे पाणी पुरवठा लेखाशिर्षका अंतर्गत त्यास मंजूरी देण्यात आली. निविदा मागविल्या असता श्री.मन्नान खान यांची १८.८०% कमी दराची निविदा प्राप्त झाली त्यास मा.आयुक्त यांची दि.२१.१.२००४ रोजी मान्यता प्रदान करण्यात आली.

१. संचिकेतील पृ.क्र.एनएस-४२ वर परि.क्र.१४३ वरील मनपा तर्फे साहित्याची किंमत रू.५५५२=४० व १०% Store Charges चे रू.५५५=२४ अशी एकूण ६१०७=६४ रू.६१०८ प्रस्तावित असतांना देयकातून रक्कम रू.५६१२/- वसूल करण्यात आले आहे. म्हणजेच रक्कम रू.४९६/- हे वसूल केलेले दिसून येत नाही.
२. मोजमाप पुस्तिका १२०१ ही लेखापरीक्षणास्तव उपलब्ध करून दिलेले नाही.

तरी वरील मुद्यांबाबत खुलासा विभागाने सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेले अनुपालन समाधानकारक असल्यामुळे परिच्छेद वगळण्यात येतो.

**परिच्छेद क्र.५:– वेदांत नगर ते पदमपुरा पर्यंत ३०० मी.मी. व्यासाची ए.सी. व बन्सीलालनगर व पदमपुरा भागात १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणे. अंदाजपत्रकीय रक्कम रू.२८,२५,५२०/–**

संदर्भ:- जा.क्र./मनपा/पापु-१/३१८/२००२, दिनांक २.५.२००२.

वेदान्त नगर ते पदमपुरा पर्यंत ३०० मी.मी. व्यासाची ए.सी. व बन्सीलालनगर व पद्मपुरा भागात १५० मी.मी. व्यासाची ए.सी जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.२८,२५,५०० / चे तयार करण्यात आले असून सदरील खर्च भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखाशिर्षका अंतर्गत प्रस्तावित करण्यात आले त्यास दि.२१.१२.०१ रोजी मा.आयुक्त यांनी मंजूरी देण्यात आली. त्या अन्वये निविदा मागविली असता श्री.मन्नान खान यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची निविदा प्राप्त झाली असून त्यास वाटाघाटी अंती दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराची निविदा मंजूर करण्यात आली असून दि.१.३.०२ रोजी मा.आयुक्त यांनी मान्यता प्रदान करण्यात आली.

१. संचिकेतील पृ.क्र.एनएस-१५ अन्वये परि.क्र.३७च्या सादरीकरणाद्वारे काम सुरू करण्याबाबत संबंधित गुत्तेदाराला कार्यालयीन पत्र -

१. जा.क्र./मनपा/पा.पु-१/३९४/०२, दिनांक २९.५.०२

२. जा.क्र.मनपा/ पा.पु.-१/५१७/०२,दिनांक ३१.७.०२

३. जा.क्र./मनपा/पा.पु.-१/६७२/०२,दिनांक १९.१०.०२

रोजी पत्र देवूनही काम सुरू केलेले नाही. तद्‌वतच दि.२२.१०.०२ रोजी संबंधित गुत्तेदाराने मनपाने दिलेल्या जा.क्र./मनपा/पा.पु.-१/६७२/०२, दिनांक १९.१०.२००२ रोजी दिलेल्या पत्राचे सी-९१ अन्वये खुलासा सादर केला आहे. व त्यामध्ये काम सुरू न करण्याचे कारणे व चार महिन्याची मुदतवाढ मागीतली आहे.

२. संचिकेतील पृ.क्र.एनएस-१६ अन्वये मुद्या क्र.५ मध्ये काम चालु केल्याबाबत दर्शविलेले आहे. तसेच संचिकेतील पृ.क्र.एनएस-१८ वर परि.क्र.४५ अन्वये काम न सुरू केल्यामुळे त्यांना दि.२.९.०२ पासून प्रतिदिन दंड आकारण्यात यावा असे नमूद केले असतांना काम चालु केले आहे. असे म्हणणे योग्य नाही.

३. संचिकेतील पृष्ठ क्र.एनएस-२८ अन्वये परि.क्र.७०,७१ वर साहित्य भांडारात जमा केल्याबाबत नोंद दर्शविलेली आहे. परंतु सी-९१ वर संबंधित गुत्तेदार यांनी पत्र देवून कामाकरीता लागणारे साहित्य माझ्याकडे आहे असे दि.२२.१०.०२ च्या पत्रात नमूद केले आहे. तद्‌वतच साहित्य जमा केल्याबाबतची नोंद असतांना साहित्य किती देण्यात आले याबाबत संबंधित भांडारपाल यांचा अहवाल संचिकेमध्ये नाही. परंतु देयकातून रक्कम रू.६१५१२/- कोणत्या आधारे वजावट करण्यात आले आहे.

४. मोजमाप पुस्तिका क्र.८११ पेज क्र.३९ वर दर्शविलेल्या प्रथम देयकामध्ये मंजूर रक्कम (Passed Amt) रू.१७,७२,१६८.५९ / - मंजूर करावयास पाहिजे असता रक्कम रू.१४१७,७३५/- दर्शविण्यात आली आहे.

५. मोजमाप पुस्तिका क्र.८११ पेज क्र.५१,५२ द्वितीय दरम्यानचे बिल अदा करतांना रक्कम रू.१,५१,३०१/- (Passed Amt) मंजूर करावयास पाहिजे असतांना रक्कम रू.१,२१,०४१/- मंजूर करण्यात आली आहे.

६. प्रथम देयकामध्ये २०% Hydra Testings charges म्हणून रक्कम रू.३५४४३४/- राखीव ठेवण्यात आली होती. सदरील रक्कम दुसऱ्या दरम्यानच्या देयकामध्ये अदा करण्यात आली असतांनाही पुन्हा हीच रक्कम तिसऱ्या व अंतिम देयकात अदा केल्याचे दिसून येते म्हणजेच संबंधिताला रक्कम रू.३५४४३४/- जास्तीचे अदा करण्यात आले आहे.

७. प्रथम देयकाची मंजूर रक्कम (Passed Amt) १७७२,१६८.५९/- वर FSD ,I Tax, Sales Tax वजावट करावयास पाहिजे असतांना तसे न होता चूकीचे पध्दतीने वजा करण्यात आल्यामुळे संबंधित गुत्तेदाराला २५८७३/- जास्तीचे अदा करण्यात आले आहे.

८. द्वितीय बिलामध्ये देयकाची मंजूर रक्कम (Passed Amt)१५१३०१/- वर FSD ,I Tax, Sale Tax वजावट करावयास पाहिजे असतांना तसे न होता १५०९/- जास्त अदा करण्यात आले आहे.

उपरोक्त मुद्यांचे अनुपालन हे असमाधानकारक असल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.६:– प्रभाग क्र ७० मध्ये विविध ठिकाणी १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. व सी. आय. जलवाहिनी टाकणे.(अंदाज पत्रकीय रक्कम रु. ३,७७,२००/–)**

संदर्भ :- जा.क्र./म.न.पा./पा.पु-१/७५/२००४,दि. २८-१-०४.

प्र.क्र. ७० मध्ये विविध ठिकाणी १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. व सी.आय. जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाज पत्रकीय रक्कम रु. ३,७७,२००/- चे तयार करण्यात आले असुन सदरील खर्च भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखाशिर्षका अंतर्गत प्रस्तावित केले असुन त्यास दि. ३१-१०-०३ रोजी मा. आयुक्त यांनी मंजुरी देण्यात आले . त्या अन्वये निविदा मागविली असता. श्री. मन्नान खाान यांची अंदाज पत्रकीय दरापेक्षा १९.९ % कमी दराची निविदा प्राप्त झाली असुन त्यास दि. २३-१३-०३ रोजी मा. आयुक्त यांनी मंजुरी प्रदान करण्यात आली.

१. संचिकेतील निविदा नियम ५४ (२) अन्वये सुरक्षा अनामत रक्कम ठेवणे आवश्यक असतांना सुरक्षा अनामत रक्कम घेतल्याचे दिसुन येत नाही.
२. मोजमाप पुस्तिका क्र. १२०१ पान क्र. ७९ वरील अनुक्रमांक ९. मध्ये ४ ८४० ५०४०/- रुपये घेण्यात आलेले असुन त्या ऐवजी ४ ८४० ३३६०/- ऐवढी रक्कम द्यावयास पाहिजे असतांना संबंधिताला रक्कम रु. १६८०/- जास्तीचे अदा करण्यात आल्याचे दिसुन येते.
३. संचिकेतील पृष्ठ क्र. एन.एस. २० वरील परिच्छे क्रमांक ६७ वर प्रथम देयक अंदा करतांना मंजुर रक्कम (Passed Amount) रु. २,२७,४५१/- घेणे आवश्यक असतांना रक्कम रु. २,०४,७११/- इतकी रक्कम मंजुर करण्यात आलेली आहे. याच रक्कमेवर आय.टी. /एस.टी. /एफ.एस.डी. कपात करण्यात आलेली आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे.
४. तृतिय अंतिम बील अंदा करतांना प्रथम व दरम्यानचे आर.अे. बील रु. २,२७,४५७/- वजावर करुन मंजुर रक्कम (Passed Amount) रु. ५६,५२२/- घ्यावयास पाहिजे होती व त्यावर एस.टी, आय.टी. एफ.एस.डी कपात करावयास पाहिजे होती.
   परंतु तसे न करता संबंधिताने रक्कम रु. २,८३,९७९/- व प्रथम देयक रु. २,०४,७११/- वजावट करून रक्कम रू.७९,२६८/- मंजूर रक्कम (Passed Amt.) दर्शविलेली आहे. व यावरच आय.टी.,एस.टी.,एफ.एस.डी. वजावट केली आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे.
५. प्रथम देयकामध्ये (Hyd. Testing Charges) म्हणून १० % रक्कम रु. २२७४६/- राखुन ठेवण्यात आलेली होती. संचिकेतील पृष्ठ क्र एन.एस. २७ वर परिच्छेद क्र. ७९ नुसार राखीव रक्कम दुत्तिय देयकातुन अंदा करण्यात आलेली आहे. परंतु पुन्हा हीच रक्कम परतावा तक्ता (Refunding Statement)बनुन कार्यकारी अभियंता व उपअभियंता पाणी पुरवठा –१ यांच्या स्वाक्षरीने अंदा करण्यात आली आहे ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे.
६. संचिकेतील पृष्ठ क्र. एन.एस. २४ वरील परिच्छेद क्र. ७१ अन्वेय रु. ३४८०६/- चे साहित्य पुरविण्यात आलेले आहे. परंतु मोजमाप पुस्तिका क्र. १२०१ पान क्र. ८१,८२ वर दुत्तिय देयक नोंद करतांना देयकातुन रु. ३४८०६+४३३०२ = ७८१०८/- साहित्याचे बिल वजावटर केल्याचे दिसुन येते ही बाब आक्षेपार्ह आहे.

७. संचिकेतील पृष्ठ क्र. एनएस- २४ वर परिच्छेद क्र. ७२ नुसार भांडारातुन साहित्याचा पुरवठा करण्याबाबत १. १५० एमएम एस.व्ही. एकूण ४ भांडारात जमा केले परंतु रजिस्टर क्र १०९ पान क्रण १०२ वर अवलोकन केले असता एकूण ३ जमा केल्याची नोंद आले, तसेच रजिस्टर क्र. १११ वर पान क्र.१३ वर ही तीन जमा केल्याची नोंद आहे. २. १०० X १०० X १०० Tee एकूण ५ भांडार जमा केले परंतु रजिस्टर क्र १०९ पान क्र.१०२ वर एकूण २ जमा केल्याची नोंद आहे. परंतु रजिस्टर क्र. १११ वर संबंधित Tee जमा केल्याची नोंद नाही. ३. १५० X १५०X१०० Tee एकूण –१३ भांडारात जमा केले परंतु रजिस्टर क्र. १०९ पान क्र. १०२ वर एकूण ५ जमा केल्याची नोंद आहे. परंतु रजिस्टर क्र. १११ पान क्र. ५४ वर संबंधित Tee एकूण ५ जमा केल्याची नोंद आहे. ४. १५० एमएम टी.पी. एकूण २ नग हे भांडारात जमा केले परंतु रजिस्टर क्र. १०९ व रजिस्टर क्र. १११ वर जमा केल्याची नोंद केली नाही.

करिता, उपरोक्त मुद्यांबाबत विभागाने सादर केलेले अनुपालन असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.७:– विविध व्यासाचे ए.सी.पाईप,सी.आय.पाईप,सि.आय.डी. जॉईन्टस व जेफ़ी जॉईन्टस खरेदी करणे.अं.प.रक्कम रू.९,४९,५१०/–**

संदर्भ:- AMC/W.W.I/744/2003 दिनांक ६.९.२००३.

महानगरपालिका अंतर्गत पाणी पुरवठा-१ या विभागामार्फ़त विविध व्यासाचे पाईप, जॉईन्टस खरेदी करण्यासाठी सन २००२-०३ वर्षातील पाणी पुरवठा भांडवली कामे या लेखाशिर्षाअंतर्गत प्रस्तावित केले असून मे.विजय इंटरप्रायझेस यांना ०.६९४% कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे. सदरील कामाचे देयक अदा करतांना देयकातील एकूण रक्कम ९३८,१७४/- वर ०.६९४% प्रमाणे कमी दर रू.६५११/- वजावट करावयास पाहिजे असतांना वजावट झाल्याचे दिसून येत नाही. सदर संचिकेमध्ये डिलेव्हरी चलनची प्रत उपलब्ध नाही.

करीता, उपरोक्त मुद्याबाबत विभागाने सादर केलेले अनुपालन हे असमाधानकारक असल्याकारणाने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.८:– परिमल सोसायटी येथे १५० मी.मी.व्यासाची डी.आय.के.–९ जलवाहिनी टाकणे. अंदाजपत्रकीय रक्कम रू.६,४८,७०१/–**

संदर्भ:- जा.क्र./मनपा/पा.पु-१/६०/२००४, दिनांक २०.०१.२००४.

परिमल सोसायटी येथे १५० मी.मी. व्यासाची डी.आय.के.९ जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रू.६,४८,७०१/- चे तयार करून त्यास दि.१२.९.०३ नुसार मा.आयुक्त यांची मान्यता घेवून निविदा मागविली असता दोन निविदा प्राप्त झाल्या त्यातून श्री.मन्नान खान यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.७८६% कमी दराची निविदा प्राप्त झाली व त्यास मा.आयुक्त यांनी दिनांक १४.११.०३ रोजी मान्यता प्रदान करण्यात आली.

१. संचिकेतील पृ.क्र.एनएस-१, एनएस-२ वरील परि.क्र.२,३ नुसार मरीमाता येथील १५० मी.मी. डीआय पाईप हे घेवून सदरील काम करावयास आदेशित केले आणि संचिकेतील सी-११ नुसार अंदाज पत्रकातून संबंधित पाईपची किंमत वजावट केलेले आहे. परंतु संचिकेतील पृ.क्र.एनएस-१० परि.क्र.२९ नुसार १५० मी.मी. डीआय पाईप हे भांडारात उपलब्ध न झाल्यामुळे काम सुरू करण्यात आले नाही.

२. संचिकेतील पृ.क्र.एनएस-१० वरील कामाची मुदत ही तीन महिने होती. मुदत ही दि.१९.४.०४ ला संपलेली असतांना दि.१९.९.०४ पर्यंत कार्यालयाने संबंधित ठेकेदारावर काम न सुरू करण्याबाबत काय कार्यवाही/पत्रव्यवहार करण्यात आला.

३. संबंधित ठेकेदाराने बाजारातून आणलेले साहित्य बाबतचे बिल संचिकेत दिसून आलेले नाही.

वरील मुद्यांबाबतचा खुलासा विभागाने सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेले अनुपालन समाधानकारक असल्यामुळे परिच्छेद वगळण्यात येतो.

**परिच्छेद क्र.९ :- प्रभाग क्र.७७ मधील रणमस्तपुरा येथे १५० मी.मी. व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकणे.**

संदर्भ:- जा.क्र./मनपा/पा.पु-१/९५५/२००३, दिनांक २९.११.२००३.

प्रभाग क्र.७७ मधील रणमस्तपुरा येथे १५० मी.मी. व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रू.१,९९,५००/- चे तयार करून त्यास दि.१२.९.२००३ नुसार मा.आयुक्त यांची मान्यता घेवून निविदा मागविली असता एकच निविदा प्राप्त झाली असून मे.राणा कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची निविदा प्राप्त झाली वाटाघाटीसाठी बोलाविले असता ३% कमी दराने निविदा दि.१७.११.०३ रोजी मान्य करण्यात आली.

१. संचिकेतील सी-२३ नुसार अ.क्र.११ वरील निविदा अटीनुसार अनामत रक्कम रू.४०००/- ही सात दिवसांत जमा करावयास पाहिजे असतांना जा.क्र.मनपा/पा.पु-१/८९८/०३,दिनांक १८.११.२००३ रोजी पत्र देण्यात आले परंतु संबंधित पत्रात अनामत रक्कम रू.१०००/- ही जमा करावयास कळविले त्यानुसार संबंधित ठेकेदाराने अनामत रक्कम रू.१०००/- संचिकेतील पृ.क्र.७,८ नुसार परि.क्र.२५ प्रमाणे जमा केल्याचे दिसून येते. म्हणजेच रक्कम रू.३०००/- हे कमी वसूल केलेले आहे.

२. संचिकेतील पृ.क्र.एनएस-९ वरील कामाची मुदत ही दोन महिने होती. मुदत ही दिनांक २९.१.०४ ला संपलेली असतांना दि.४.१०.०४ पर्यंत कार्यालयाने संबंधित ठेकेदारावर काम न सुरू करण्याबाबत काय कार्यवाही / पत्रव्यवहार करण्यात आला.

३. संचिकेतील सी-६१ वरील Royalty chargesचे एकूण रक्कम रू.१००/- इतकी देयकातून कपात करावयास पाहिजे असतांना देयकातून रक्कम कपात झालेली नाही.

४. संचिकेतील देयकाची पाहणी केली असता देयकामधून १% विमा रक्कम रू.१९९५/- कपात करावयास पाहिजे असतांना कपात झाल्याचे दिसून येत नाही.

५. संचिकेतील पृ.क्र.एन एस-१४ वर परि.क्र.४६ वरील अ.क्र.७-१५०×१००Rederहे ×१२.१०kg×२८=३३९/- साहित्य भांडारातून उपलब्ध करून देण्यात आले. परंतु देयकातून सदरील रक्कम वजावट करण्यात आली नाही.

६. मोजमाप पुस्तिका क्र.१३२० लेखापरीक्षणास्तव उपलब्ध झालेले नाही.

तरी रक्कम रू.१००/- व रू.१९९५/- आणि रक्कम रू.३३९/- असे आक्षेपित रक्कम रू.२४३४/- ही जनरल पावती पुस्तक क्र.३६५४, पावती क्रमांक ३६५३०६ दिनांक १२.१.२०१० अन्वये संबंधित ठेकेदाराकडून वसूल करून मनपा फ़ंडात भरणा केली आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होणार नाही याची विभागाने दक्षता घ्यावी असे सूचित करून सदरचा परिच्छेद वगळण्यात येतो.

**परिच्छेद क्र.१०:– क्रांतीचौक ते सिल्लेखाना सिग्नल पर्यंत २०० मी.मी. व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकणे.**

संदर्भ:- जा.क्र./मनपा/पा.पु.-१/८०८/०३,दि.२०.१२.०३

उपअभियंता पाणी पुरवठा-१ अंतर्गत क्रांती चौक ते सिल्लेखाना सिग्नल पर्यंत २०० मी.मी. व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.८,६०,९५५/- चे तयार करण्यात आले. त्यास मा.आयुक्त यांचीही दि.१२.९.२००३ रोजी मंजूरी देण्यात आली असून सन २००२-०३ च्या भांडवली कामे पाणी पुरवठा लेखाशिर्षकाअंतर्गत त्यास मंजूरी देण्यात आली. निविदा मागविल्या असता श्री.व्ही.आर.महाजन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% कमी दराची निविदा प्राप्त झाली संचिकेतील पृ.क्र.एनएस-१४ परिच्छेद क्र.३८ नुसार मा.आयुक्त यांनी मंजूरी प्रदान करण्यात आली.

१. संचिकेतील निविदा नियम ५४(२)अन्वये सुरक्षा अनामत रक्कम ठेवणे आवश्यक असतांना सुरक्षा अनामत रक्कम घेतल्याचे दिसून येत नाही.

२. संचिकेतील पृ.क्र.एनएस-१६ परि.क्र.४५,४६,४७ नुसार सदरील कामाची मुदत ही तीन महिने होती. मुदत ही १९.३.०४ लाच संपलेली असतांना दि.१९.२.०५ पर्यंत संबंधित ठेकेदाराला मुदतवाढ देण्यात आली तरी दि.२२.९.०४ पर्यंत संबंधित ठेकेदाराने काम न सुरू करण्याबाबत शाखा अभियंता याने कोणती कार्यवाही / पत्रव्यवहार करण्यात आली.

३. संचिकेतील सी-५९ वर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय यांना कामाच्या तृतीय पक्षी तपासणी बाबत जे पत्र देण्यात आले त्यावरील जावक क्रमांक हे चुकीचे आहे.

४. संचिकेतील एनएस-२० परि.क्र.५८ नुसार संबंधित ठेकेदाराला भांडारातून २०० एमएम डी.आय.पाईप हे ५५० आरएमटी देण्यात आले होते. यातून ५४४.७० आरएमटी वापरण्यात आलेले व उरलेले ५.३० आरएमटी भांडारात जमा केल्याची नोंद आहे. वाटप रजिस्टर क्र.११० पान क्र.१५ वर २५० आरएमटी आणि पान क्र.३२ वर ३०२.५० आरएमटी देण्यात आल्याची नोंद आहे. म्हणजेच संबंधित ठेकेदाराला २०० एमएम डी.आय.पाईप हे एकूण ५५२.५० आरएमटी देण्यात आलेले असून रजि.क्र.१११ पान क्र. ९ वरही नोंद घेण्यात आली. संबंधित ठेकेदाराला एकूण ५५२.५० आरएमटी पैकी ५.३०

आरएमटी हे भांडारात जमा केल्याची नोंद आहे व देयकातून एकूण ५४४.७० आरएमटी ची रक्कम रू.६,१३,८७७/- ही कपात करण्यात आली म्हणजेच एकूण २.५ आरएमटी हे संबंधित देयकातून कपात झाल्याचे दिसून येते तरी २.५ आरएमटी चे ११२५ प्रमाणे रक्कम रू.२८१८ वसूल करण्यात यावे.

५. संचिकेतील देयकाची तपासणी केली असता देयकामधून १% विमा रक्कम रू.८२००/- कपात करावयास पाहिजे असतांना कपात करण्यात आलेले नाही.

तरी रक्कम रू.२८१८ व रू.८२००/- असे एकूण रू.११०१८/- संबंधित ठेकेदाराकडून वसूल करून वरील मुद्याचा खुलासा विभागाने सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेले मुद्या क्र.१,२ व ३ चे अनुपालन समाधानकारक असल्याकारणाने मुद्या क्र.१,२ व ३ वगळण्यात येतो. तसेच मुद्या क्र.४ व ५ बाबत भरणा केलेला नसल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.११: शहाबाजार प्रभागासाठी २५० मी.मी.व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकणे.**

संदर्भ:- जा.क्र./मनपा/पा.पु.१/८०३/२००३, दिनांक १८.१२.२००३.

उपअभियंता पाणी पुरवठा-१ अंतर्गत शहाबाजार प्रभागासाठी २५० मी.मी.व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.३,८८,४००/- चे तयार करण्यात आले त्यास मा.आयुक्त यांची दि.१९.८.०३ रोजी मंजूरी देण्यात आली असून सन २००३-०४ च्या भांडवली कामे पाणी पुरवठा लेखाशिर्षका अंतर्गत त्यास मंजूरी देण्यात आली. निविदा मागविल्या असता श्री.मन्नान खान यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराची निविदा प्राप्त झाली. श्री.मन्नान खान यांना चर्चेस बोलावले असता संचिकेतील पृ.क्र.एनएस-७ वर परि.क्र.२५ नुसार मान्य करण्यात येवून त्यास कार्यकारी अभियंता यांची मंजूरी प्रदान करण्यात आली.

१. संचिकेतील पृ.क्र.एनएस-९ व एनएस-१० वरील कामाची मुदत ही दोन महिने होती व ही मुदत दि.१८.२.२००४ ला संपलेली असतांना दि.४.१०.२००४ पर्यंत कार्यालयाने संबंधित ठेकेदारावर काम न सुरू करण्याबाबत काय कार्यवाही / पत्रव्यवहार करण्यात आला.

२. संचिकेतील पृ.क्र.एनएस-१७ परि.क्र.४९ वरील ह्या कामासाठी कार्यालया तर्फे साहित्य देण्यात आले होते. त्याची नोंद वाटप पुस्तिका क्र.११० पान क्र.२५ वर खालील साहित्याची नोंद घेण्यात आलेली नाही.

| साहित्याचे नांव | भांडारातून दिलेल्या साहित्याची संख्या | नोंद घेण्यात आलेल्या साहित्याची संख्या | नोंद न घेण्यात आलेल्या साहित्याची संख्या |
|---|---|---|---|
| २५० mm CID Joint | ३९ Nos | १८ | २१ Nos |
| २५० mm AC Pipe | ६० Rmt | -- | ६० Rmt |
| २५० x250x200 Tee | १ Nos | -- | १ Nos |
| २५० x150 Reder | 1 Nos | -- | 1 Nos |
| २५० mm J.P. Joint | 1 Nos. | -- | 1 Nos. |

३. संचिकेतील सी-५३ व सी-५१ अ.क्र.३ मध्ये २×१५१२=४५३६/- असे देयक अदा केलेले आहे. परंतु २×१५१२=३०२४/- देयक अदा करावयास पाहिजे होते. म्हणजेच रू.१५१२/- जास्त देयक अदा करण्यात आले.

४. संचिकेच्या देयकाची पाहणी केली असता देयकामधून १% विमा रक्कम रू.३८२/- कपात करावयास पाहिजे असतांना कपात झाल्याचे दिसून येत नाही.

५. मोजमाप पुस्तिका क्र.१३२० लेखापरीक्षणास्तव उपलब्ध झालेली नाही.

तरी रक्कम रू.१५१२/- व रू.३८२/- संबंधित ठेकेदाराकडून वसूल करून वरील मुद्यांचा खुलासा विभागाने सादर करावा असे सूचित केले असता, प्राप्त झालेल्या अनुपालनात मुद्यानिहाय खुलासा नसल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.१२:– ज्ञानेश्वर नगर येथे १०० मि.मि.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणे.**

संदर्भ:- जा.क्र./मनपा/पा.पु-१/७५४/२००४,दिनांक २४.८.२००४.

उपअभियंता पाणी पुरवठा-१ अंतर्गत ज्ञानेश्वर नगर येथे १०० मि.मि.व्यासाची जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.१७७४२५/- चे तयार करण्यात आले. त्यास कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांची दि.२३.७.२००४ रोजी मंजूरी देण्यात आली असून सन २००४-०५ च्या भांडवली कामे पाणी पुरवठा लेखाशिर्षकाअंतर्गत त्यास मंजूरी देण्यात आली. निविदा मागविल्या असता श्री.मे.एस.कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराची निविदा संचिकेतील पृ.क्र.एनएस-४ परि.क्र.१६ नुसार दि.२१.८.२००४ रोजी मान्य करण्यात आली.

१. संचिकेतील पृ.क्र.६ परि.क्र.२२ नुसार शाखा अभियंता यांनी मे.एस.कन्स्ट्रक्शन यांना काम करण्यासंबंधी जा.क्र./मनपा/पा.पु.-१/९०१/०४, दि.५.१०.०४ अन्वये कळविले होते. संचिकेतील Completion Certificate नुसार दि.२०.१०.०४ रोजी काम पूर्ण केलेले आहे. परंतु संचिकेतील जा.क्र./मनपा/पा.पु.-१/११४२/०४, दि.२४.१२.०४ नुसार छेद जोडणी वरील गळती दुरूस्तीचे काम पूर्ण केलेले नसल्याने बी-१ निविदेच्या कलम-२ अन्वये दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. म्हणजेच काम हे मुदतीत झालेले नसून संबंधित ठेकेदारावर कोणती दंडात्मक कार्यवाही करण्यात आली याचा बोध नाही.

२. संचिकेतील Delivery Challan वरील गाडी क्र.आणि जकात पावती क्रमांक ०९२९२७ नुसार दिलेल्या पावतीवरील गाडी क्रमांकात बदल दिसून येत आहे.

वरील मुद्यांबाबतचा खुलासा विभागाने सादर करावा असे सूचित केले असता अनुपालन असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.१३:– पाणी पुरवठा–१ अंतर्गत विविध झोनच्या दैनंदिन दुरूस्ती च्या कामांकरीता १०० व १५० एमएम चे सी.आय.डी. जॉईन्ट्स खरेदी करणे. रक्कम रू. २४,८२६/–**

संदर्भ:- जा.क्र./मनपा/पा.पु.-१/२७/२००३, दिनांक ९.१.२००३.

उपअभियंता पाणी पुरवठा-१ अंतर्गत संचिका तपासणी अंतर्गत खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

| सी.आय.डी.जॉईन्ट्स क्लास -१५ | दर | संख्या | रक्कम |
|---|---|---|---|
| अ) १०० मी.मी.व्यास | १४२.०० | १०० नग | १४,२००/- |
| ब) १५० मी.मी. व्यास | २३१.०० | ४६ नग | १०६२६/- |

१. सी.आय.डी.जॉईन्ट्स क्लास –१५ पुरवठा केल्याचे बील संचिकेत नाही.

२. संचिकेत देयक (सीसी) ची प्रत नाही.

वरील १ व २ मुद्याबाबत साहित्याचे देयक व व्हाऊचर लेखा विभागाकडून उपलब्ध करून दिल्यानंतर सदरील परिच्छेद वगळण्यात येईल.

**परिच्छेद क्र.१४:- देखभाल व दुरूस्तीच्या कामाकरीता लागणारे विविध व्यासाचे पाईप, जॉईन्ट्स व व्हॉल खरेदी करणे.(अं.प.रक्कम रू.९,९९,७२७/-)**

संदर्भ:- जा.क्र./मनपा/का.अ./पा.पु/४३८/०५,दिनांक ४.३.२००५.

उपअभियंता पाणी पुरवठा-१ विभागा अंतर्गत सन २००४-०५ देखभाल व दुरूस्तीच्या कामाकरीता लागणारे विविध व्यासाचे पाईप, जॉईन्ट्स व व्हॉल खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.९,९९,७२७/- चे तयार करून त्यास मा.आयुक्त यांची दिनांक २.८.२००४ रोजी मंजूरी देण्यात आली. त्यानुसार निविदा मागविली असता मे.ॲकवा इकुप इंजिनियर्स यांची २१.७०४% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराची निविदा प्राप्त झाली. दराच्या वाटाघाटीसाठी बोलावले असता वाटाघाटी अंती २०.७४९% अंदाजपत्रकीय दराने जास्त दराची निविदेस मा.आयुक्त यानी संचिकेतील परिशिष्ट क्र.एनएस-१४ वरील परिच्छेद क्र.४६ नुसार मंजूरी प्रदान करण्यात आली.

१. विविध व्यासाचे ए.सी.पाईप,स्क्रुस व्हॉल्व , सी . आय . डी जॉईन्ट्स,सी.आय.मॅकेनीकल जॉईन्ट्सचा पुरवठा करण्यासाठी संबंधित कंत्राटदाराला कार्यादेश दिल्यानंतर त्याने पुरवठा केलेला असून संचिकेत डिलेव्हरी चलन दिसून येत नाही. तसेच Invoice वर DC क्रमांक,दिनांक गाडी क्रमांक व माल मिळाल्याबद्दल पोच /स्वाक्षरी दिसून आलेली नाही.

२. साठा रजिस्टर क्र.१०९ मधील पान क्र.११८ वरील सी.आय. मॅकेनीकल जॉईन्ट्स ची नोंद घेतलेली असून संबंधित नोंद रजिस्टर क्रमांक १११ (Stores Ledoler) वर सी.आय.मॅकेनीकल जॉईन्ट्स ४०० mmQ = ०२,५०० mmQ=02, 7०० mmQ=02, ची नोंद घेतलेली दिसून आली नाही. आणि रजिस्टर क्र.१११ प्रमाणित करण्यात आलेले नाही.

तरी वरील मुद्यांबाबत खुलासा विभागाने तीन दिवसांत सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अनुपालन सादर केले असून प्रत्यक्ष लेखे पाहणी केल्यानंतर आक्षेप वगळणे योग्य राहील.

**परिच्छेद क्र.१५:– औरंगाबाद महोत्सव सन २००२– सोनेरी महल करिता, पाणी पुरवठा व्यवस्था करणे बाबत**.

संदर्भ:- जा.क्र./मनपा/पा.पु.-१/१९२/०३,दिनांक २२.०३.२००३.

उपअभियंता पाणी पुरवठा अंतर्गत सोनेरी महल करिता पाणी पुरवठा व्यवस्था करणे बाबत. अंदाजपत्रकीय रक्कम रू.५,९१,७००/- ला बी.पी.एम.सी. ॲक्ट १९४९ चे कलम ६७ (३) सी अन्वये मा.आयुक्त यांची संचिकेतील परिशिष्ट क्र.एनएस-७ वरील परिच्छेद क्र.१२ वर मंजूरी घेण्यात आली. त्यानुसार मे.आकाश कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम करून घेण्यात आले.

सोनेरी महलात पाणी पुरवठा करण्यासाठी जा.क्र./मनपा/पा.पु-१/१५१/०३, दिनांक ११.२.०३ रोजी पत्र देवून रक्कम रू.६,००,०००/- मनपा कार्यालयात जमा करण्यासाठी कळविले असता पुरातत्व विभागाने त्यानुसार पावती क्र. ४८५१८/४८६ दिनांक १६.९.२००३ रोजी मनपा कार्यालयात रू.६,००,०००/- चा भरणा केला .परंतु जा.क्र./मनपा/पा.पु-१/५६०/०५ दिनांक २१.६.२००५ रोजी विभागाने सहाय्यक संचालक पुरातत्व विभाग यांना पत्र देवून संबंधित कामावर एकूण रू.६,०३,२२५/- एवढा खर्च झालेला आहे. उक्त कामामध्ये शिल्लक राहिलेली रक्कम रू.३२२५/- भरणा करण्याबाबत पत्र देण्यात येवूनही उक्त रक्कम भरणा झाल्याचे दिसून येत नाही.

करिता, उपरोक्त मुद्यांबाबत विभागाने शहानिशा करून खुलासा सादर करावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त असल्याकारणाने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.१६:– पाणी पुरवठा विभाग –१ अंतर्गतचे मागणी पत्र. (Requirement Register Inden) उपलब्ध करून देण्याबाबत.**

उक्त प्रकरणी आपणास कळविण्यात येते की, लेखापरीक्षण विभागास लेखापरीक्षणार्थ मागणी पुस्तिका (Requirement Register Inden) उपलब्ध करून देण्याबाबत आपणास दिनांक २७.७.२००७ रोजी अर्धसमास पत्र क्र.५ देण्यात आले असतांनाही अद्यापपर्यंत प्रस्तुतचे लेखे लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.

तरी सदरील लेखे अपुर्ण स्वरुपाचे असल्याकारणाने लेखा परीक्षण करता आले नाही.

**परिच्छेद क्र.१७:–हर्सुल जलशुध्दीकरण केंद्रासाठी लागणारी तुरटी खरेदी करणे.**

संदर्भ:- जा.क्र./मनपा/पा.पु-१/१४४/०२,दि.६.३.२००२.

औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत पाणी पुरवठा-१ या विभागा मार्फ़त हर्सूल जलशुध्दीकरण केंद्रासाठी लागणारी तुरटी खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.३१६७००/- चे बनविण्यात आले असून त्यास सन २००१-२००२ वर्षातील रसायन सामुग्री खरेदी या लेखा शिर्षाअंतर्गत प्रस्तावित केले असून उपरोक्त तुरटी पुरवठा करण्यासाठी मे.शिव केमीकल यांना देण्यात आले असून १९०० रू.प्रति मे.टन या दरास मा.आयुक्त यांनी मान्यता प्रदान केली आहे. त्यामध्ये खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. परिच्छेद क्र.४७ नुसार चाचणी अहवाल प्राप्त नसल्यामुळे प्रथम दरम्यानचे देयकात रक्कम रू.५५२०/- राखीव ठेवण्यात आली व नंतर परिच्छेद क्र.८० अन्वये सदरील राखीव १०% रक्कम तीसरे व दरम्यानच्या देयकातून अदा करण्यात आली. तद्वतच परिच्छेद क्र.८२ अन्वये चाचणी अहवाल प्राप्त नसल्यामुळे तीसरे व दरम्यानच्या देयकात १०% रक्कम रू.६९८४/- राखीव ठेवण्यात आली व चाचणी अहवाल प्राप्त झाल्यामुळे उक्त रक्कम रू.६९८४/- अंतीम देयकातून अदा करण्यात आले. परंतु परिच्छेद क्र.१०१ अन्वये पुन्हा याच (परि.क्र.९१९ च्या नोंदीनुसार रक्कम) प्रथम व तृतीय दरम्यानच्या देयकातून तपासणी अहवालसाठी राखून ठेवलेली रक्कम रू.१२५०४/- दि.२५.३.२००४ (Refunding Statement) द्वारे अदा केल्याची दिसून येते.

२. परतावा (Refunding Statement) मध्ये परतावा करतांना यावर जावक क्रमांक व दिनांक दर्शविलेली नाही.

करीता, याबाबत विभागाने अनुपालन सादर केलेले असून खुलासा असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.१८:-हर्सूल जलशुध्दीकरण केंद्रासाठी ब्लीचिंग पावडर खरेदी करणे.**
**अंदाजपत्रक ९,५०,०००/-**

संदर्भः- जा.क्र./मनपा/पा.पु-१/२४०/०४,दिनांक ५.३.२००४.

औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत पाणीपुरवठा-१ अंतर्गत हर्सूल जलशुध्दीकरण केंद्रासाठी सन २००३-०४ मध्ये ब्लीचिंग पावडर खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.९,५०,०००/- ची निविदा काढण्यात आली असून लेखाशिर्षक रसायन सामुग्री खरेदी या शिर्षक अन्वये मे.फ़ेनिक्स केमीकल यांना रक्कम रू.१२८००/- प्रति एमटी दरानुसार (आवश्यकतेनुसार) पुरवठा करण्यास मान्यता देण्यात आली. त्यामध्ये खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मे.फ़ोनिक्स केमीकल्स यांनी दिनांक ११.३.२००४ रोजी १७ एमटी ब्लीचिंग पावडर पुरवठा केल्याचे (DELIVERY CHALLAN) PC/AMC/125 दिनांक ११.३.२००४ जा.क्र./मनपा/का.अ./पापु/२४० दिनांक ५.३.२००४ नुसार गाडी क्र.एमएच-१३ ई -०५४२, आल्याचे दर्शविले आहे. परंतु Cash Memo D.c./No Pc/AMC/124 दिनांक ११.३.०४ Invoice No/PC/AMC/124, दिनांक ११.३.२००४ १७ MT X 12800 = 217600 चे बील आहे. हे संयुक्तिक वाटत नाही.

२. मे.फ़ोनिकस केमीकल्स यांचे प्रथम दरम्यानचे व तीसरे देयकामध्ये चाचणी अहवाल प्राप्त नसल्यामुळे १०% रक्कम देयकातून रक्कम रू.२१७६० व रक्कम रू.१२८००/- राखीव ठेवण्यात आली होती. परंतु अहवाल प्राप्त झाल्यामुळे सदरील देयकात समावेश करून देण्यात आले बाबत परीच्छेद क्र.५०,५४,६०,७०,७५ मध्ये नमूद केले आहे. परंतु देयकातून रक्कम रू.३४५६०/- वजावट झाल्याचे मोजमाप पुस्तिकेत घेतलेल्या देयक नोंदी मध्ये दिसून आले नाही.

३. हर्सूल जलशुध्दीकरण केंद्रासाठी ब्लीचिंग पावडर १०० एमटी चे असतांना ७३ एमटी ब्लीचिंग पावडर खरेदी झाल्याचे संचिकेवरील नोंदी वरून दिसून येते.

तरी उपरोक्त मुद्याबाबत विभागाने अनुपालन सादर केलेले असून खुलासा असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.१९:-हॉटेल वेदान्त ते हमालवाडा पर्यंत २०० मी.मी. तसेच कोकणवाडी चौक ते म्हाडा कॉलनी बन्सीलालनगर पर्यंत १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणे.**

संदर्भः- जा.क्र./मनपा/पा.पु.-१/२१८/०५,दिनांक ०१.०२.२००५.

उपअभियंता पाणी पुरवठा-१ अंतर्गत हॉटेल वेदान्त ते हमालवाडा २०० मी.मी., कोकणवाडी चौक ते म्हाडा कॉलनी बन्सीलालनगर पर्यंत १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.५,९७,७५०/- चे तयार करून संबंधित खर्च भांडवली कामे पाणी पुरवठा सन २००४-०५ लेखाशिर्षका अंतर्गत करण्यात यावे अंदाजपत्रकांस मा.आयुक्त यांची मंजूरी दिनांक १.१.२००४ रोजी देण्यात येवून निविदा मागविली असता मे. एल.के.कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.७८६/- जास्त दराची निविदा प्राप्त झाली गुत्तेदारास दराच्या वाटाघाटी करून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दराच्या निविदेस मा.आयुक्त यांची दि.८.१२.२००४ रोजी मंजूरी प्रदान करण्यात आली.

१. प्रथम दरम्यानच्या देयकातून Hydraulic Testing Charges करीता १५% रक्कम रू.३५,१२०/-राखून ठेवण्यात आली होती. ती विभागाने दि.२२.२.२००६ रोजी परतावा तक्ता नुसार परत देण्यात आले. परंतु संबंधित विभागाने परत देतांना मंजूरी घेण्यात आल्याचे संचिकेत नोंद दिसून आलेली नाही.

२. संचिकेतील परतावा तक्त्यावर जावक क्रमांक दर्शविलेला नाही.

३. संचिकेतील सी-४५ डिलेव्हरी चलन वर ट्रक क्र. व सी-५३ जकात पावतीवरील ट्रक क्रमांक वेगवेगळे दिसून आले.

४. संबंधित ठेकेदाराचे बाजारातून आणलेले साहित्य बाबतचे बिल संचिकेत दिसून आलेले नाही.

तरी वरील मुद्यांबाबत विभागाने अनुपालन सादर केलेले असून खुलासा मुद्यांना अनुसरुन नसल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.२०:-कोटला जलकुंभ परिसरात बायपास पाणी पुरवठा व्यवस्था करणे व इतर दुरूस्तीची कामे करणे.**

संदर्भः- जा.क्र./मनपा/पा.पु.-१/२०७/०५,दिनांक ७.२.२००५.

औरंगाबाद महानगरपालिका पाणी पुरवठा-१ अंतर्गत कोटला जलकुंभ परिसरात बायपास पाणी पुरवठा करणे व इतर दुरूस्तीची कामे करण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.३,०९,५००/- च्या कामासाठी भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखाशिर्षका अंतर्गत प्रस्तावित करून त्यास

मा.आयुक्त यांची दिनांक ९.१२.२००४ रोजी मंजूरी घेवून निविदा मागविली असता श्री.सुरेश बी साधवाणी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दराची निविदा प्राप्त झाली. गुत्तेदारास वाटाघाटी साठी बोलावले असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% जास्त दराने निविदा मान्य करण्यात येवून त्यास मा.आयुक्तांनी दिनांक ३१.१.२००५ रोजी मंजूरी प्रदान करण्यात आली.

१. संचिकेतील पृ.क्र.एनएस-४ वरील परिच्छेद क्र.१३ वर सदरील कामात निघालेले जुने कव्हर, शिडी व व्हॉल मनपा भांडारात जमा करण्याबाबत विभागाने संबंधित गुत्तेदाराला परि.क्र.१३ अन्वये नमूद केले असता याबाबत भांडारात जमा केल्याबाबत नोंद दिसून आलेली नाही.

२. संचिकेतील पृ.क्र.एनएस-१३ व एनएस-१४ वरील परिच्छेद क्रमांक ४५ अन्वये उक्त कामासाठी मुदत ६.४.२००५ पर्यंत होती सदरचे काम पूर्ण करण्यासाठी कोटला जलकुंभावरील मुख्य पुरवठा वाहिनी व मुख्य वितरण वाहीनी कट करून काम करावे लागणार होते व त्यावेळी ऐन उन्हाळ्याचे दिवस संपल्यानंतर विभागाच्या सोईने करावयाचे ठरले परंतु शाखा अभियंता यांच्या स्वाक्षरी वरून दिनांक २३.३.२००६ रोजी काम पूर्ण केले आहे तर हे दिवस ही उन्हाळ्याचे असल्याचे दिसते. तरी आपण दाखविलेले कारण संयुक्तिक वाटत नाही.

३. परिच्छेद क्र.४४ अन्वये दिनांक ३१.३.२००५ रोजी प्रथम देयक अदा करण्यात आले. दुसरे देयक ३१.३.२००६ रोजी देण्यात आले म्हणजेच जवळ जवळ एक वर्षानंतर काम केल्याचे दिसून येते. याबाबत विभागाने कोणती दंडात्मक कार्यवाही केली. करिता, उपरोक्त मुद्यांबाबत विभागाने अनुपालन सादर केलेले असून खुलासा मुद्यांना अनुसरुन नसल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.२१:-मनजीतनगर, व्यंकटेशनगर, शिवशक्ती कॉलनी भागात १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणे.**
**(अ.प.रक्कम रू.३,४५,१४१/-)**

संदर्भ:- जा.क्र./मनपा/पा.पु.-१/८३/०५,दिनांक १८.१.२००५.

औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत पाणीपुरवठा –१ या विभागामार्फ़त मनजीतनगर, व्यंकटेश नगर, शिवशक्ती कॉलनी भागात १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेसाठी अंदाजपत्रक ३,४५,१४१/- च्या कामासाठी भांडवली कामे या लेखा शिर्षाअंतर्गत प्रस्तावित असून अं.प.दरापेक्षा १०% जास्त दराने ठेकेदार मे.एस.कन्स्ट्रक्शन यांना देण्यात आले असून मा.आयुक्त यांनी त्यास मंजूरी दिली आहे. त्यामध्ये खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. परिच्छेद क्र.४५,४६ अन्वये संबंधिताला प्रथम दरम्यानचे देयक अदा करतांना मोजमाप पुस्तिका क्रमांक ११९५ पेज क्र.१६५ ते १७० अन्वये Passed Amount रू.१०३८४१/- घ्यावयास पाहिजे असतांना संबंधिताने रू.९३४५७/- दर्शविली आहे.

२. परिच्छेद क्र.६१ अन्वये दुसरे अंतिम देयक अदा करतांना मोजमाप पुस्तिका क्रमांक १३२६ पेज क्रमांक ११ ते १५ नुसार एकूण रक्कम रू. ३,३१,५६४/- मधून प्रथम

दरम्यानचे देयक (Passed Amount) रू.१०३८४१/-वजावट करावयास पाहिजे असतांना रक्कम रू.९३४५७/- वजावट झाल्याचे दिसून येते.

३. दुसरे व अंतिम देयक अदा करतांना रक्कम रूपये ९८३१/- हे जास्तीचे अदा करण्यात आले आहे.

४. संबंधित गुत्तेदार यांना दुसरे व अंतिम देयक अदा करतांना राखीव ठेवण्यात आलेली १०% रक्कम रू.१०३८४/- देयकातून अदा करण्यात आले असतांना दिनांक २२.२.२००६ रोजीच्या (Refunding Statement) परतावा तक्ता द्वारे पुन्हा अदा करण्यात आले म्हणजेच संबंधिताला २०७६८/- रू. अदा करण्यात आले.

५. परतावा रक्कम रू.१०३८४/- अदा करतांना मंजूरी घेणे आवश्यक असतांना मंजूरी घेतल्याचे दिसून येत नाही.

६. परतावा तक्ता (Refunding Statement) वर जावक क्रमांक, कामाचे नांव दर्शविलेले नाही. म्हणजेच संबंधिताने रक्कम २०२१५/- जास्तीचे अदा केले आहे.

तरी याबाबत विभागाने अनुपालन सादर केलेले असून खुलासा मुद्यांना अनुसरुन नसल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.२२:- जवाहर कॉलनी येथील पाणी पुरवठा सुधारण्यासाठी ३५० मी.मी.व्यासाचा जलवाहिनीवर व्हॉल बसविणे तसेच सिंधी कॉलनी गेट जवळ १५० मी.मी.व्यासाचा व्हॉल बसविणे.**

संदर्भ:- जा.क्र./मनपा/पा.पु.-१/८१७/२००५,दिनांक २६.८.२००५.

उपअभियंता पाणी पुरवठा अंतर्गत जवाहर कॉलनी येथील ३५० मी.मी.व्यासाचा जलवाहिनीवर व सिंधी कॉलनी गेट जवळ १५० मी.मी.व्यासाचा व्हॉल बसविणे बाबत मा.कार्यकारी अभियंता यांच्या कार्योत्तर आदेशानुसार ठेकेदार श्री.सुरेशा सांधवानी यांच्याकडून मंजूरीची किंमत रू.२४,७२६/- व कार्यालयीन साहित्याची किंमत रू.२९७३१/- नुसार एकूण रू.५४४५७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले.

१. संचिकेतील कार्यालयीन साहित्य देण्यात आलेला व्हॉल ३५० एमएम हा चेतक घोड्याजवळ बसविण्यात आला याची नोंद संबंधित रजिस्टर क्र.११० वर घेण्यात आल्याचे संचिकेवरून दिसून येत नाही. तसेच सिंधी कॉलनी येथील जुना व्हॉल १५० एमएम काढण्यात आला व भांडारात जमा करणे बाबत संबंधितास सांगितले असता संबंधिताने केव्हा सदरील व्हॉल भांडारात जमा केले याबाबत बोध होत नाही.

तरी वरील मुद्यांबाबतचा विभागाने अनुपालन सादर केलेले असून खुलासा असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.२३:– हर्सूल जलशुध्दीकरण केंद्रासाठी तुरटी खरेदी करणे.**
**अ.प.रक्कम रू.३,६५,०००/–**

संदर्भ:- जा.क्र./मनपा/का.अ./पा.पु./१२७/०४,दिनांक १२.२.२००४.

औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत पाणीपुरवठा-१ या विभागामार्फ़त सन २००३-०४ या वर्षासाठी लेखाशिर्षक रसायन सामुग्री खरेदी अंतर्गत प्रस्तावित केले असून मे. फ़ोनिक्स केमीकल यांना १८९० प्र.मे.टन दरानुसार मान्यता देण्यात आली. त्यामध्ये खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. आय.एस.मानकाप्रमाणे १४५ मे.टन तुरटी हर्सूल जलशुध्दीकरण केंद्रासाठी खरेदी करण्यासाठी स्वतंत्र निविदा जा.क्र./मनपा/लेखा/नि/३९/०३,दिनांक २९.९.२००३ रोजी काढण्यात आली. परंतु डीसी क्रमांक पीसी/एएमसी/१०४,दिनांक २७.१०.२००४ रोजी खरेदी केलेली १५ एमटी तुरटी (गाडी क्रमांक एमएच-२०,एफ़- ५३९२) हर्सूल जलशुध्दीकरण केंद्रावर न उतरवता ती फ़ारोळा जलशुध्दीकरण केंद्रावर उतरवण्यात आल्याचे डीसी वरील नोंदी वरून दिसून येते.

२. पाणीपुरवठा-१ अंतर्गत हर्सूल जलशुध्दीकरण केंद्र आहे व फ़ारोळा हे जायकवाडी स्थापत्य या विभागा अंतर्गत असून दोन्ही विभागाचे स्वतंत्र बजेट असतांना स्वतंत्र खरेदी केली जाते. तरी १५ एमटी टन तुरटी कशी खरेदी करण्यात आली.

३. मोजमाप पुस्तिका क्रमांक ९७० पान क्रमांक ६१ यावर फ़ारोळा साठी खरेदी केल्याचे व साठा रजिस्टर क्रमांक १०९ पेज क्रमांक १०५ वर नोंद ही पाणीपुरवठा –१ च्या रजिस्टरवर आहे.

४. फ़ारोळा साठी खरेदी केलेल्या १५ एमटी खरेदीसाठी रक्कम रू.२८४२६/- एवढा झाल्याचे संचिकेतील कॅश मेमो वरून दिसून येते.

तरी उक्त मुद्यांबाबत विभागाने अनुपालन सादर केलेले असून खुलासा मुद्यांना अनुसरुन नसल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.२४:– पाणी पुरवठा–१ अंतर्गत हर्सूल जलशुध्दीकरणासाठी खरेदी करण्यात आलेल्या ब्लिचिंग पावडर/ तुरटीचे साठा रजिस्टर व लॉगबुक उपलब्ध करून देणे बाबत.**

पाणी पुरवठा-१ येथील, सन २००२-०३ ते सन २००५-०६ चे लेखापरीक्षण कार्यरत असून लेखापरीक्षण कामी खरेदी केलेल्या ब्लिचिंग पावडर व तुरटीचे साठा रजिस्टर (Stock) व लॉगबुक आवश्यकता असल्याने सदरील लेखे अतिसत्वर उपलब्ध करून देण्यात यावे असे सूचित केले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त असल्याकारणाने परिच्छेद कायम करण्यात येतो.

# ई–टेंडरींग

## जमा बाजूचे लेखापरीक्षण

## दिनांक १२.६.२००६ ते ३१.३.२००७.

औरंगाबाद महानगरपालिका,कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा – १ अंतर्गत ,ई-टेंडरिंग विभागाचे दिनांक १२.६.२००६ ते ३१.३.२००७ या काळातील अभिलेख्यांचे चाचणी लेखापरीक्षण जमा बाजूंच्या अभिलेख्यांची तपासणी हाती घेण्यात आली असून तपासणी कालावधी मध्ये खाली नमूद केल्यानुसार निविदा नोटीसद्वारे वसूल केलेल्या रकमेचा भरणा मनपा फ़ंडात जमा केलेल्या अभिलेख्यांची तपासणी हाती घेण्यात आली असून तपासणी कालावधीमधील तपशिल हा खालील प्रमाणे आहे.

**परिच्छेद क्र. १ : टेंडर नोटीस क्र.८, दिनांक २१.६.२००६ अन्वये कोरी निविदा रक्कम कमी वसूल केल्याबाबत.**

औरंगाबाद महानगरपालिका,कार्यकारी अभियंता पा.पु.-१ अंतर्गत ई- टेंडर या विभागाचे दिनांक १२.६.०६ ते ३१.३.२००७ या वर्षाचे लेखापरीक्षण करत असतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. टेंडर नोटीस क्र.८, दिनांक २१.६.२००६ अन्वये दर्शविलेल्या निविदानुसार रक्कम रू.२०,१६०/- दर्शविलेली आहे.

२. ई- टेंडर विभागामार्फ़त विक्री करतांना सदरील टेंडरची किंमत रू.५०४०/- एवढी घेण्यात आली आहे. त्याबाबतचा सविस्तर तक्ता खालील प्रमाणे .

| चा .नं. | नो.नं. | पावती क्र. | कोड नं. | टेंडर क्र. | ठेकेदाराचे नांव | निविदेची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| ५१८ | ०८ | ८३२ | ०८ | ०६ | एम.ए.सिद्यीकी | ५०४० |
| ५१८ | ०८ | ८३३ | ०८ | ०७ | एम.ए.सिद्यीकी | ५०४० |
| ५१८ | ०८ | ८३४ | ०८ | ०८ | एम.ए.सिद्यीकी | ५०४० |
| ५२२ | ०८ | ८२९ | ०८ | ०६ | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | ५०४० |
| ५२२ | ०८ | ८३० | ०८ | ०७ | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | ५०४० |
| ५२२ | ०८ | ८३१ | ०८ | ०८ | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | ५०४० |
| ५२६ | ०८ | ८२५ | ०७ | ०४ | मॉसकोट कन्स्ट्रक्शन | ५०४० |
| ५२७ | ०८ | ८२६ | ०८ | ०६ | मॉसकोट कन्स्ट्रक्शन | ५०४० |
| ५२७ | ०८ | ८२७ | ०८ | ०७ | मॉसकोट कन्स्ट्रक्शन | ५०४० |
| ५२७ | ०८ | ८२८ | ०८ | ०८ | मॉसकोट कन्स्ट्रक्शन | ५०४० |

३. सदरील निविदेची किंमत टेंडर नोटीस नुसार रक्कम रू.२०१६०/- व सदरील ठेकेदारांना देण्यात आलेल्या पावती सुध्दा रक्कम रू.२०१६०/- असतांना रक्कम रू.५०४०/- कोणत्या आधारे स्विकारण्यात आली आहे.

४. ई-टेंडर विभागामार्फ़त उपलब्ध रजिस्टर नुसार दर्शविलेली रक्कम रू.५०४०/- ची पावती लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

५. ई-टेंडर विभागामार्फ़त ठेवण्यात आलेले रजिस्टर हे प्रमाणित नसून संबंधित रजिस्टरची पेजींग केलेले नाही. सदरील रजिस्टर प्रमाणित असणे आवश्यक होते परंतु ते दिसून आलेले नाही.

तरी विभागाने याबाबत खातरजमा करून सविस्तर लेखी खुलासा सादर करण्याविषयी सूचित केले असता विभागाने सादर केलेले अनुपालन समाधानकारक असल्याने परिच्छेद वगळण्यात येतो.

**परिच्छेद क्र. २ : कॅश रजिस्टर वरील नोटीस क्र.२२ च्या रकमेबाबत.**

संदर्भ:- कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/मुलेप/२६८/०८,दिनांक १३.१०.२००८.

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा-१ अंतर्गत ई-टेंडर या विभागाचे सन २००६-७ या वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना खालील आक्षेपार्ह बाब निदर्शनास आल्या.

१. ई – टेंडर विभागामार्फ़त निविदा रक्कम म्हणून वसूल करणेत आलेली निविदांची रक्कम भरणा करतांना गुत्तेदारास विभागामार्फ़त पावती देण्यात आल्याबाबत ई-टेंडर विभागाने ठेवलेले कॅश रजिस्टर मध्ये नमूद केलेले आहे. आणि सदर रकमेचा भरणा लेखा विभागात केल्याबाबत नोंद आहे. मात्र संबंधिताचे दैनंदिन कॅश वसूल रजिस्टर मध्ये दर्शविलेले पावती क्रमांक प्रमाणे तपासणी केली असता सोबतच्या तक्त्यानुसार प्रत्यक्षात संबंधिताचे दैनंदिन कॅश रसिटर व मनपा मध्ये भरणा दर्शविणारे कॅश रजिस्टर यामध्ये नमूद पावती क्रमांका प्रमाणे दर्शविलेली रक्कम यांमध्ये व गुत्तेदाराच्या नावांमध्ये तफ़ावत दिसून येते. याबाबत प्रत्यक्ष स्थिती दर्शविणारा तक्ता या सोबत जोडलेला आहे.

२. ई-टेंडर विभागातील लेखा विभागात भरणा केलेले कॅश रजिस्टर प्रमाणित केलेले दिसून येत नाही.

वरील बाबत संबंधित विभागाने समर्थनिय लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेले अनुपालन समाधानकारक असल्याने परिच्छेद वगळण्यात येतो.

**परिच्छेद क्र.३ : ई –टेंडरींग विभागाअंतर्गत निविदा वसूल रकमेचा अतिरिक्त भरणा व कमी भरणा करणे बाबत.**

**१)अतिरिक्त भरणा रू.५७८०/– २) कमी भरणा रू.१०५९०/–**

कार्यकारी अभियंता पा.पु-१ अंतर्गत ई -टेंडरींग या विभागाचे सन २००६-२००७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. ई-टेंडर विभागामार्फ़त विविध कामाच्या निविदा विक्री वसूल रकमेचा जास्तीचा /अतिरिक्त भरणा केल्याचे विभागाने अद्ययावत ठेवलेले दैनंदिन निविदा विक्री रजिस्टर व चलन द्वारे कॅश भरणा करून तशी नोंद घेतलेले कॅश रजिस्टर यांची एकत्रित तपासणी केली असता वसूल रक्कमेपेक्षा रू.५७८०/- अतिरिक्त भरणा केल्याचे निदर्शनास येते. सदर जास्तीचा भरणा विभागाने कोठून व कसा केला याबाबत लेखी खुलासा करावा.

२. ई-टेंडर विभागामार्फ़त विविध कामाच्या निविदा विक्री वसूल रकमेपेक्षा कमी भरणा केल्याचे संबंधिताचे, दैनंदिन निविदा विक्री रजिस्टर व चलनद्वारे कॅश रजिस्टर यांची एकत्रित तपासणी केली असता वसूल रकमेपेक्षा रू.१०५९०/- चा कमी भरणा केल्याचे निदर्शनास येते.

वरील मुद्या क्र.१ व २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्याबाबतचे सविस्तर स्थिती दर्शविणारा तक्ता या सोबत सलग्न केलेला आहे.

विभागाने कमी भरणा केलेली रक्कम तात्काळ मनपा फ़ंडात भरणा करून वरील बाबत लेखी अनुपालन लेखापरीक्षण विभागास सादर करावे असे सूचित केले असता सादर केलेले अनुपालन समाधानकारक असल्याने परिच्छेद वगळण्यात येतो.

**परिच्छेद क्र.४ : निविदा नोटीस क्र.१९,२२,१०२ च्या विक्री रकमेबाबत.**

कार्यकारी अभियंता पा.पु-१ अंतर्गत ई -टेडरिंग विभागाचे सन २००६-७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना असे निदर्शनास आले की,

१. निविदा नोटीस क्र.१९, चलन क्र.५९२३/१ ,दिनांक ०१.०८.२००६ नुसार रक्कम रू.५८००/-

२. निविदा नोटीस क्र.२२ नुसार- चलन क्र.४९५८/३ दिनांक २७.२.२००७ रू. ३०,०००/- चलन क्र. ४९६०/३, दिनांक १.३.२००७ रू.१०,०००/-
चलन क्र.४९६१/३, दिनांक २.३.२००७ रू.१,३५,०००/-
चलन क्र.४९६४/३ दिनांक ५.३.२००७ रू.७०,०००/-

३. निविदा नोटीस क्र.१०२, चलन क्र.४९५९ /३ दिनांक ०१.०३.२००७ रू.५२०/-
वरील प्रमाणे विभागाने एकूण रक्कम मनपा फ़ंडात भरणा केल्याचे उपलब्ध लेख्यांवरून दिसते. मात्र निविदा नोटीस द्वारे विभागामार्फ़त प्रत्येकी किती टेंडर विक्री करणेत आलेली आहे. त्या पोटी किती रक्कम वसूल करणेत आलेली आहे. याचा बोध होत नाही.

याबाबत विभागाने सविस्तर खुलासा लेखा परीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता सादर केलेले अनुपालन समाधानकारक असल्याने परिच्छेद वगळण्यात येतो.

# जनसंपर्क विभाग
## खर्च बाजूचे लेखापरीक्षण
## सन २००५-०६ ते २००६-०७.

**<u>खर्च बाजू :</u>**

जनसंपर्क विभागाचे सन २००५-०६ ते सन २००६-०७ या वर्षातील अभिलेख्यांचे लेखापरीक्षणामध्ये खर्च बाजुच्या अभिलेख्यांची तपासणी हाती घेतली असून तपासणी कालावधीत जे आक्षेप आढळून आले ते खालील प्रमाणे .

**परिच्छेद क्र.१:- छायाचित्र व व्हिडीओ छायाचित्रणावर होणाऱ्या खर्चाबाबत.**

महानगरपालिकेच्या जनसंपर्क विभागाचे सन २००५-२००६ व सन २००६-२००७ या वर्षाचे लेखा परीक्षण करतांना असे निदर्शनास आले की, महानगरपालिकेच्या पदाधिकारी/अधिकारी यांच्या अख्यात्यारीत सार्वजनिक कार्यक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, जयंती, पुण्यतिथी, उद्घाटने या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते व अशा कार्यक्रमांचे छायाचित्रण/व्हिडीओ छायाचित्रण करण्यासाठी मनपाचा जनसंपर्क विभाग हा कार्यक्रमांच्या दिवशी ऐनवेळी संपर्क साधून कार्यक्रमांचे छायाचित्रण करून घेण्यात येते. त्यासाठी प्रशासनातर्फ़े कोणतेही कार्यादेश देण्यात येत नाही ही बाब नियमबाह्य आहे. एका कार्यक्रमाचे किती छायाचित्रकारांनी छायाचित्रण करावे व किती छायाचित्रे काढावीत याबाबत

कोणतीही मर्यादा पाळण्यात येत नाही. छायाचित्रकार काढलेल्या छायाचित्रांचे बिल सादर करतो व त्याला त्याचे देयक अदा करण्यात येते त्याची पडताळणी करण्यात येत नाही असे लेखापरीक्षणा दरम्यान निदर्शनास आले.

छायाचित्रकारांच्या देयक संचिकांची तपासणी करतांना प्रत्येक छायाचित्रकाराने साधारणत: २५० ते ४५० छायाचित्र + अल्बम (किंमत रू.२५० ते ३००) ची बिले सादर केलेली निदर्शनास आली. परंतु तपासणी करतांना देयक संचिकांमध्ये २० ते २५ फ़ोटो आढळून आले एकही देयक संचिकांमध्ये अल्बम सह फ़ोटो आढळून आलेले नाहीत. म्हणजेच छायाचित्रकारांना जादा रक्कम दिल्याचे निदर्शनास येते. बिलामध्ये नमूद छायाचित्रे व संचिकामध्ये उपलब्ध छायाचित्रे याचा मेळ बसत नाही तसेच मनपाच्या अर्थसंकल्पात विविध कार्यक्रमाच्या छायाचित्रणासाठी रकमेची स्वतंत्र तरतूद ही करण्यात येत नाही. लेखापरीक्षण करतांना सन २००५-२००६ व सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात छायाचित्रणावर अनुक्रमे रू.५,४७,६८९/- व रू.७,३४,६०४/- असा अवाढव्य खर्च करण्यात आला. मनपाची सध्याची आर्थिक स्थिती गंभीर असल्याने अशा खर्चावर वेळीच आवर घालणे योग्य होईल त्यादृष्टीने प्रशासनाने काटकसरीचे धोरण अवलंबून खर्चाला मर्यादा घालणे योग्य होईल. सोबत तक्ता जोडला आहे.

यापूर्वी मा.आयुक्त यांनी जा.क्र/मनपा/स्विस/५४२/०७ दिनांक १९.१२.२००७ या कार्यालयीन आदेशान्वये छायाचित्र व व्हिडीओ छायाचित्रणावर होणारा अमर्याद खर्च कमी कसा करता येईल या काही सूचना करण्यात आल्या होत्या.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध सांस्कृतिक, सार्वजनिक व इतर कार्यक्रमांचे काढण्यात येणाऱ्या छायाचित्रांचे देयकांवर मर्यादा ठेवणे साठी सहकार्य करणे बाबत संदर्भिय पत्रकान्वये यापूर्वी कळविण्यात आलेले आहे. विविध आकारामधील छायाचित्रांची देयके लेखा विभागास मंजूरीस्तव सादर करणे लेखा परीक्षणाचे दृष्टीकोनातून अयोग्य आहे. छायाचित्रांचे देयकांवर होणाऱ्या अमर्याद खर्चास बंधन घालणे तसेच छायाचित्रांवरील खर्चात काटकसर करणेसाठी महानगरपालिकेच्या विविध सांस्कृतिक व इतर कार्यक्रमांचे छायाचित्र काढणे व व्हिडीओ चित्रीकरण करणे साठी खालील प्रमाणे कार्यपध्दती ठरविण्यात येत असून त्यानुसार अंमलबजावणी करण्यात यावी.

१. महानगरपालिकेच्या सार्वजनिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची छायाचित्रे काढणे अथवा व्हिडीओ चित्रीकरण करणे साठी संबंधित विभागाने जनसंपर्क विभागास कळवून रितसर पूर्व परवानगी घ्यावी.

२. महानगरपालिकेच्या विविध सार्वजनिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची छायाचित्रे काढणे तसेच व्हिडीओ चित्रीकरणासाठी ज्या छायाचित्रकारास जनसंपर्क विभागामार्फ़त कार्यादेश देण्यात आलेले आहेत त्यांचेच देयक अदा करण्यात येईल.

३. महानगरपालिकेच्या एकाच शासकीय कार्यक्रमाकरीता एकत्रित एकच देयक अदा केले जाईल, वेगवेगळी देयके दाखल करता येणार नाही. अशी देयके प्राप्त झाल्यास अदायगी बाबत त्यांचा विचार करता येणार नाही.

४. महानगरपालिकेचे सर्व स.पदाधिकारी व विभाग प्रमुख यांना त्यांचेशी संबंधित कार्यक्रमांच्याच फ़क्त छायाचित्रांच्या अतिरिक्त प्रती उपलब्ध करून देण्यात येतील व तेवढ्याच छायाचित्रांचेदेयक संबंधित छायाचित्रकारास छायाचित्रांचे जिल्हा दर सूची व जिल्हा माहिती कार्यालयाचे मान्य दरानुसार अदा करण्यात येईल.

५. महानगरपालिका जनसंपर्क विभागाने महापालिकेच्या सार्वजनिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची छायाचित्रे व व्हिडीओ चित्रीकरण करणे बाबत छायाचित्रकारास आदेशित केल्यास छायाचित्रकाराने सदर कार्यक्रमांच्या छायाचित्रांच्या प्रती, सीडी तसेच व्हिडीओ चित्रीकरण केल्यास त्याची व्हिडीओ कॅसेट जनसंपर्क वीीगास छायाचित्रांचे देयकासोबत दाखल करणे आवश्यक आहे त्या शिवाय असे देयक संबंधित छायाचित्रकारास अदा करण्यात येणार नाही.

महानगरपालिकेच्या वेळोवेळी संपन्न होणाऱ्या विविध सांस्कृतिक, सार्वजनिक व इतर शासकीय कार्यक्रम प्रसंगी काढण्यात येणाऱ्या छायाचित्र व व्हिडीओ चित्रीकरणाचे देयकांवर होणारा अमर्याद खर्च कमी करणे व या खर्चावर मर्यादा ठेवणेसाठी वरील प्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात येत असून त्यानुसार अंमलबजावणी व्हावी.

परंतु त्या सूचनांचे काटेकोरपणे पालन होताना दिसून येत नाही याबद्दल प्रशासनाने कठोरपणे एक कार्यपध्दती निश्चित करून त्यानुसार अंमलबजावणी व्हावी असे पहावे जेणे करून मनपाचा आर्थिक फ़ायदा होईल.

विभागाने याबाबत खुलासा सादर करावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे. करिता परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.२ :अभिलेखे प्रमाणित नसणे बाबत.**

जनसंपर्क विभागाचे सन २००६-२००७ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण करतांना राज्यस्तरीय व स्थानिक दैनिकांची जाहिरात देयके प्रोव्हिजन रजिस्टर व छायाचित्रकारांचे छायाचित्र देयक साठा रजिस्टर यांची तपासणी केली असता सदरील रजिस्टर हे सक्षम अधिकाऱ्याकडून प्रमाणित केले नसल्याचे व रजिस्टरला रितसर पेजींग केली नसल्याचे निदर्शनास आले. सदरची अभिलेखे हे विभागाचे महत्वाची दस्ताऐवज असल्याने ते प्रमाणित असावीत असे नियम आहेत.

तरी विभागाने याबाबत खुलासा सादर करावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे. करिता परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.३ : अभिलेखे प्रमाणित नसणे बाबत.**

जनसंपर्क विभागाचे सन २००५-२००६ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण करतांना राज्यस्तरीय व स्थानिक दैनिकांची जाहिरात देयके प्रोव्हिजन रजिस्टर व छायाचित्रकारांचे छायाचित्र देयक साठा रजिस्टर यांची तपासणी केली असता सदरील रजिस्टर हे सक्षम अधिकाऱ्याकडून प्रमाणित केले नसल्याचे व रजिस्टरला रितसर पेजींग केली नसल्याचे निदर्शनास आले. सदरची अभिलेखे हे विभागाचे महत्वाची दस्ताऐवज असल्याने ते प्रमाणित असावीत असे नियम आहेत.

तरी विभागाने याबाबत खुलासा सादर करावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे. करिता परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.४ : ६० छायाचित्रांची जादा रक्कम अदा करणे बाबत.**

जनसंपर्क विभागाचे सन २००६-०७ चे लेखापरीक्षण करतांना छायाचित्र देयकांचे श्री.भिमाशंकर नावंदे यांचे मनपाच्या विविध कार्यक्रमाचे घेतलेली छायाचित्रांचे देयक तपासणी करतांना बिल क्र.१२४, दिनांक ३०.५.२००६ अन्वये रू.१०८७५/- अदा करण्यात आले. बिलामध्ये अनुक्रमांक १६ वर ७५ रंगीन फ़ोटो नमूद केले असून रू.२५/- प्रति कॉपी प्रमाणे १८७५/- अदा करण्यात आले. परंतु याची नोंद छायाचित्र साठा रजिस्टरवर घेतांना १५ अशी घेण्यात आली.

परिणामी ६० छायाचित्राची रक्कम रू.१५००/- जादा अदा करण्यात आले असे प्रथम दर्शनी निदर्शनास येते.

विभागाने याबाबत लेखी खुलासा सादर करावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे. करिता परिच्छेद कायम करण्यात येतो.

## छायाचित्रण / व्हिडीओ शुटींग देयकांबाबतचा तक्ता.
## सन २००६-२००७

| अ.क्र. | फ़ोटोग्राफ़रचे नांव | बिल क्रमांक व दिनांक | एकणू फ़ोटो संख्या | एकूण बिल रक्कम रू. | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.भिमाशंकर नावंदे | १२० दि.१७.४.२००६ | ३७५ | १२५७५/- | सोबत अल्बम |
| २ | श्री.आर.व्ही.पाटील | २५१ दि. १५.५.२००६ | ३१५ | ८४५०/- | सोबत अल्बम |
| ३ | श्री.योगेश लोंढे | ९१ दि .२४.४.२००६ | ३९० | ७३००/- | सोबत अल्बम |
| ४ | रविराज कलेक्शन | ७० दि .२१.६.२००६ | ५८० | ११६००/- | सोबत अल्बम |
| ५ | रॉयल फ़ोटो स्टुडिओ | ८५२ दि .३०.६.२००६ | व्हिडीओ शुटींग सी.डी. | १३२०/- | व्हिडीओ शुटींग सी.डी. |
| ६ | शिवम फ़ोटो स्टुडिओ | २१५ दि .९.१०.२००६ | २८० | ७२००/- | सोबत अल्बम |
| ७ | श्री.नरेंद्र ठोके स्टुडिओ | २०६५ दि .३.१०.२००६ | ९२ | ३३००/- | सोबत अल्बम |
| ८ | गुरूकृपा फ़ोटो स्टुडिओ | ६४ दि .९.३.२००७ | ३६५९ | २९२९५/- | सोबत अल्बम |
| ९ | रेवन फ़ोटो स्टुडिओ | २७४ दि .१४.३.२००७ | २१३ | ८३७५/- | सोबत अल्बम |

# इमारती बांधकाम विभाग
## लेखापरीक्षण अहवाल
## सन २००२-३ ते सन २००५-०६.

**परिच्छेद क्र.१ :बिल्डर्स हॉ.सोसायटी मधील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे बाबत.अ.प.रक्कम रू.१,९८,०००/-**

इमारत बांधकाम या विभागाचे सन २००३ ते ०४ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षण तपासणीअंती उपरोक्त विषया अंतर्गत खालील बाबींचे आक्षेपार्ह आढळून आले.

१. प्रस्तावित रेखांकनाची खुली जागा व रस्ता Overlap होत असल्याने विकास योजनेतील ५० डीपी रस्त्याची रूंदी (पान क्र.एनएस-१६ परि.क्र.३४ अन्वये नगररचना विभागाच्या अहवाला नुसार)कायम ठेवल्यास सदरील खुल्या जागेचे क्षेत्र अंदाजे ११५.०० चौ.मी. कमी होणार आहे.

२. पान क्र.एनएस-१८ अन्वये मा.आयुक्त साहेब यांची मंजूरी झाल्यास उर्वरीत खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधण्यात येईल. मात्र या संदर्भात मा.आयुक्त यांची मंजूरी घेण्यात आलेली नाही किंवा त्यांच्या निदर्शनास आणून दिलेले नाही.

३. आपल्या विभागामार्फ़त मंजूर गुत्तेदारास पत्र जा.क्र./मनपा/इ.बां/१३१/०४,दिनांक १३.७.२००४ अन्वये नमूद केले की कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ठ दर्जाचा चालु असून तो त्वरीत तोडून परत बांधावा.(अंदाजे १२ मीटर लांबी व १.२० मी उंचीचे काम तोडून) या संदर्भात वारंवार लेखी (या पूर्वी दोन पत्र) व तोंडी सुचना देवूनही कामात सुधारणा केली जात नसल्याचे दिसून आले. निविदेतील बी-१ नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल व निकृष्ठ बांधकामाचे देयक दिले जाणार नाही. असे नमूद केले आहे. परंतु या संदर्भात संचिकेत अहवाल दिसून येत नाही व पुढे काय कार्यवाही गुत्तेदारावर करण्यात आली याचा बोध होत नाही. वरीष्ठ पातळीवर ही बाब निदर्शनास आणून न दिल्याचे दिसून येत आहे.

४. संबंधित गुत्तेदारास कामाचे अंतिम देयक कोणत्या आधारे अदा करण्यात आले याचा खुलासा नाही.

५. देयक अदा करण्यापूर्वी बीलाची तपासणी तांत्रिक विभागामार्फ़त न झाल्याचे संचिकेत दिसून येत आहे. मंजूर गुत्तेदारास वर्क ऑर्डर दिनांक ३१.१.२००४ अन्वये तामील करण्यात आले. कामाची मुदत दोन महिने निविदा अटी /शर्तीनुसार होते. वास्तविक काम दोन महिन्यात संपविणे जरूरीचे होते. दिनांक २९.१०.०४ संपले व आपल्या विभागामार्फ़त मुदतवाढ दि.३०.१०.०४ पर्यंत मंजूरीस्तव सादर करण्यात आले. संबंधित गुत्तेदारा विरूध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात आली नाही.

उपरोक्त मुद्यांचे अनुपालन प्राप्त असून असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र. २ : सिल्लेखाना सिग्नल जवळील कब्रस्थान विकसित करणे बाबत.**
**अ.प.रक्कम रू.१९८७५०/–**

इमारत बांधकाम विभागाचे सन २००३ ते ०५ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षण तपासणी अंतर्गत उपरोक्त विषयाच्या कामाच्या संदर्भात खालील बाबींचे आक्षेपार्ह आढळून आले.

१. प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रक व अंतिम देयक यांची तपासणी तांत्रिक विभागामार्फ़त झाल्याचे दिसून येत नाही.

२. सदरील कामाचे मंजूर गुत्तेदार यांस वर्क ऑर्डर जा.क्र./मनपा/इ.बां./२८८/०४, दिनांक १९.८.०४ अन्वये तामील करण्यात आले. त्यात काम पूर्ण करण्याची मुदत दोन महिने नमूद करण्यात आली आहे.

परंतु काम मुदतीत न होता काम दिनांक १८.१२.२००४ रोजी फ़ायनल झाले आहे. म्हणजे सदर काम चार महिन्यात पूर्ण झाले. दोन महिने काम उशिरा झालेले आहे.

उशिर झाल्याबाबत संचिकेत खुलासा केलेला नाही. गुत्तेदारास अंतिम देयक अदा करण्यात आले.

उपरोक्त मुद्यांचे अनुपालन प्राप्त असून असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र. ३ : १) घाटी गौतमनगर येथे समाज मंदिराची कुंपण भिंत बांधणे व फ़रशी बसविणे. अ.प.रक्कम रू.२,०६,८७१/–**
**२) मनपाच्या बन्सीलालनगर येथील भगवान महावीर सांस्कृतिक सभागृह व बॅडमिंटन हॉल यांस रंगकाम व विविध दुरूस्ती करणे .**

इमारत बांधकाम विभागाचे सन २००३ ते ०४ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षण तपासणी अंती खालील बाबींचे आक्षेपार्ह आढळून आले आहे.

विषय क्र.१ अंतर्गत खालील मुद्ये–

१ . संचिका पान क्र.एनएस–२ अन्व्ये गौतमनगर येथील बौध्द विहाराची जमिन खाजगी व्यक्तिच्या नावाने आहे असे नमूद करण्यात आले.

या संदर्भात मालमत्ता विभाग, नगररचना विभाग इ. विभागाचा अभिप्राय घेणे आवश्यक होते ते घेतल्याचे दिसून येत नाही.

२ . सदरील कामाच्या अंदाजपत्रक मंजूरीच्या संदर्भात प्रभाग समितीची मंजूरी घेण्यात आलेली नाही.

३. विषय क्र.१ –२ च्या कामाचे अंतिम देयक तयार करून मंजूर गुत्तेदाराचे बील अदा करण्यात आले. परंतु तांत्रिक विभागा मार्फ़त बीलाची तपासणी करण्यात आलेली नाही.

उपरोक्त मुद्यांचा खुलासा सादर करण्याविषयी सूचित केले असता मुद्यांचे अनुपालन प्राप्त असून असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र. ४ : पडेगांव कत्तलखाना हाडाचे गोडावून बांधकाम व दुरूस्ती करणे बाबत.**
**अ.प.रक्कम रू.१,१७,७०५/-**

इमारत बांधकाम विभागाचे सन २००३-०४ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षण तपासणी अंती उपरोक्त विषयाच्या कामा अंतर्गत खालील बाबींचे आक्षेपाई आढळून आले.

१. प्रस्तावित कामाची मंजूरी प्रभाग समितीची घेतल्याचे दिसून येत नाही.

२. संचिका पान क्र.एमएस/७ अन्वये परिच्छेद क्र.२६ नुसार कामाचे आदेश (वर्क ऑर्डर) संबंधित गुत्तेदार यांस तामील करण्यात आले. तद्नंतर संबंधित गुत्तेदारास कामाची आखणी (मार्क आऊट) देण्यात येणार होते. परंतु संबंधित गुत्तेदार यांनी कामाची आखणी न घेता काम चालु केले आहे. सक्षम अधिकारी सोबत स्थळ पाहणी अंतर्गत काय मानकदंड (Specifications) प्रमाणे होत नसल्याचे दिसून आले.

३. संचिका पान क्र. एनएस-८ अन्वये दिनांक २६.८.२००३ रोजी मो.हाजी इस्माईल यांनी पत्र देवून काम निकृष्ठ दर्जाचे चालु असल्याबाबत संबंधित विभागास पत्र दिले.

४. दिनांक २७.८.२००३ रोजी विभागामार्फ़त कामाची स्थळपाहणी केली असून गेट, विटकाम व डब्बर काम (Specifications) प्रमाणे नसल्याचे दिसून आले असू नमूद केले आहे.

५. संचिका पान क्र.एनएस-९ अन्वये विभागामार्फ़त प्रस्तावित कामाचे प्रथम व अंतिम देयक रक्कम रू.७०,७१७/- संबंधित गुत्तेदारास अदा करण्यात आले.

६. प्रस्तावित कामाचे अंतिम देयक तांत्रिक विभागा मार्फ़त तपासणी न करता पुढील कार्यवाही करण्यात आली.

७. सदरील अर्धसमास पत्रातील मुद्या क्र.२,३ व ४ बाकी बाबत विभागा मार्फ़त खुलासा न करता संबंधित गुत्तेदार यास देयक अदा करण्यात आले ही गांभिर्याची बाब आहे.

८. प्रस्तावित काम पूर्ण करण्याची मुदत निविदा शर्ती व अटी अन्वये एक महिन्याची होती. वर्क ऑर्डर दिनांक २७.७.२००३ ला गुत्तेदार यांना तामील केली. काम दिनांक २६.८.२००३ ला पूर्ण करणे नियमाप्रमाणे आवश्यक होते. परंतु गुत्तेदार यांनी काम दि.२.९.२००३ ला फ़ायनल केले. कामाची मुदतवाढ घेण्यात आलेली नसून काम मुदतीत न झाल्याबाबत संचिकेत दंडनिय कार्यवाही बाबत वरीष्ठांकडे सादर करण्यात आलेले नाही. त्याबाबत उल्लेख पण करण्यात आलेला नाही. मात्र उपअभियंता यांनी वरीष्ठांकडे दंडाची कारवाई सादर न करता देयकातून १२ दिवसाचे प्रति दिवस ५०/- रू. प्रमाणे ६००/- वजा केले आहे. याबाबत वरीष्ठांची दिशाभूल केल्याचे स्पष्टपणे जाणवते.

उपरोक्त मुद्यांचा खुलासा सादर करण्याविषयी सूचित केले असता मुद्यांचे अनुपालन प्राप्त असून असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र. ५ :१) वॉर्ड क्रमांक ४ मधील हर्सुल स्मशानभूमी विकसित करणे बाबत.**
**अ.प.रक्कम रू.१,९९,२००/-**
**२) एन-९ येथील मनपा शाळेची दुरूस्ती व रंगरगोटी करणे बाबत.**
**अ.प.रक्कम रू.१,००,०००/-**

उपरोक्त विषयी कामाअंतर्गत सन २००३ ते ०४ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षण तपासणी अंती खालील मुद्दे आक्षेपार्ह दिसून आले आहेत.

वरील दोन्ही कामाच्या संचिका तपासल्या असता अंदाजपत्रक व अंतिम देयकाची तपासणी अहवाल तांत्रिक विभागा मार्फ़त झाल्याचे दिसून येत नाही.

संदर्भिय मुद्यांचा खुलासा सादर करण्याविषयी सूचित केले असता उपरोक्त अनुपालन प्राप्त असून असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र. ६ : खोकडपुरा (सिल्लेखाना )येथील कब्रस्थानास संरक्षित भिंत बांधणे बाबत.**

इमारत बांधकाम विभागाचे सन २००३ ते ०४ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षण तपासणी अंती उपरोक्त विषयी खालील बाबींचे आक्षेपार्ह आढळून आले.

प्रस्तावित कामाचे मंजूर एजन्सी यांचे काम अंतर्गत करारनामा करण्यात आला. परंतु करारनाम्यावर मा.शहर अभियंता यांची मंजूरी झालेली नाही. संबंधित एजन्सी वर्क ऑर्डर तामील करण्यात आले. या संदर्भात आपल्या विभागामार्फ़त खुलासा सादर करण्यात यावा असे सूचित केले असता अनुपालन प्राप्त असून असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र. ७ : आंबेडकरनगर वार्डातील गौतमनगर मधील सामाजिक सभागृहासमोर सांची स्तंभ बांधणे बाबत. अ.प.रक्कम रू.१,६२,९३५/-**

इमारत बांधकाम विभागाचे सन २००३-०४ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षण तपासणीअंती उपरोक्त विषयान्वये खालील बाबींचे आक्षेपार्ह आढळून आले.

संचिका पान क्र.एनएस-२ अन्वये प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.१,६२,९३५/- चे शहर सौंदर्यीकरण या लेखाशिर्षकाअंतर्गत मान्यता घेवून काम पूर्ण करण्यात आले. परंतु सदर काम मा.नगरसेविका सौ.शकुंतला इंगळे यांच्या वार्डा अंतर्गत असल्याने दि.१९.५.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत विषय क्रमांक ३९४/१ अन्वये संबंधित स.नगरसेविका यांच्या स्वेच्छा निधीतून मनपाच्या जागेवर सांचीचा स्तंभ प्रवेशद्वार बांधण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

वास्तविक स्वेच्छा निधीतून सदर काम करणे आवश्यक होते तसे न करता लेखा शिर्षा अंतर्गत शहर सौंदर्यीकरण या मधून खर्च करण्यात आले.

या प्रकरणी संबंधित विभागाने खुलासा सादर करावा असे सूचित केले असता अनुपालन प्राप्त असून असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र. ८ : मसनतपूर येथील अशोकनगर स्मशानभूमी व पावरलूम कब्रस्थान विकसित करणे बाबत. अ.प.रक्कम रू.२,८२,७१५/-**

इमारती उद्यान बांधकामाचे सन २००३-०४ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षण तपासणी अंती खालील मुद्यांचे आक्षेप आढळून आले आहेत.

तांत्रिक विभागामार्फ़त अंदाजपत्रक तपासणी केली संचिका पान क्र.एनएस-७ अन्वये परिच्छेद क्र.७ अन्वये नमूद केले आहे की, जुनी वायर व इतर सामान उद्यान विभागात जमा करण्यात यावी. परंतु संचिकेत सदर सामान जमा केल्याचे दिसून येत नाही.

या संदर्भात विभागामार्फ़त खुलासा सादर करावा असे सूचित केले असता अनुपालन प्राप्त असून असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र. ९ : हर्सुल येथील वाचनालयाची दुरूस्ती करणे बाबत.**

इमारती बांधकाम विभागाचे सन २००२-०३ व २००५-०६ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षण तपासणी अंतर्गत विषयांकित दर्शविलेल्या कामाच्या संदर्भात खालील बाबींचे आक्षेपार्ह आढळून आले.

हर्सुल येथील वाचनालयाची दुरूस्तीच्या कामात तांत्रिक विभागाच्या स्थळ पाहणी अहवाल संचिका पान क्र.एनएस-४,५ अन्वये व परि.क्र.१५,१६ नुसार वाचनालयावरील पत्रे बदलण्याचा प्रस्ताव योग्य आहे. नविन पत्रे बसवितांना जुने सर्व पत्रे मनपा भांडारमध्ये जमा करावीत Detail Estimate form अन्वये एकूण चार खोल्यांचे पत्रे बदलल्याचे दिसून आले. परंतु भांडार विभागात जुने पत्रे जमा केल्याचे संचिकेत दिसून येत नाही.

या संदर्भात या विभागास खुलासा सादर करावा असे सूचित केले असता अनुपालन प्राप्त असून असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र. १० :वॉर्ड क्र.५४, देशमुखनगर येथील खुल्या जागेवर व्यायामशाळा बांधणे बाबत. अ.प.रक्कम रू.२,००,०००/-**

इमारत बांधकाम विभागाचे सन २००२-०३ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षणाअंती उपरोक्त विषयी अंतर्गत खालील बाबींचे आक्षेपार्ह आढळून आले आहे.

१. सदर जागा रेखांकनातील खुली जागा असून मनपाच्या मालकीची आहेत. खुल्या जागेचे एकूण क्षेत्रफ़ळ ८८६.६२ चौ.मी. आहे. नियमा अन्वये खुल्या जागेच्या एकूण क्षेत्राचे १०% क्षेत्रावर बांधकाम करता येते. त्यानुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले.
२. संबंधित विभागाने स.सभापती व स.नगरसेवक यांच्या पत्रा अन्वये अ.प.तयार करून वरीष्ठांकडे सादर केले. परंतु विभागामार्फ़त स्थळपाहणी केल्याचे दिसून येत नाही.
३. तांत्रिक विभागाचा स्थळ पाहणी संचिका पान क्र.एनएस-८,९ अन्वये मनपाच्या खुल्या जागेवर (मालकीच्या) १५×३२ चौ.मीटरवर अतिक्रमण झाल्याचे नमूद केले.
४. पान क्र.एनएस-१० नुसार मा.आयुक्त यांनी आदेशित केले की, प्रथम अतिक्रमण ताबडतोब काढावे तसेच पान क्र.एनएस-१२ अन्वये मा.आयुक्त यांनी प्रस्तावित कामाला प्रशासकीय मंजूरी दिली. त्यात निर्देश केले की, अतिक्रमण काढल्यावर कामाची सुरवात करावी.
५. आपल्या विभागामार्फ़त काम सुरू करण्यापूर्वी मालमत्ता विभाग, स.नगररचना विभागास अतिक्रमणाच्या संदर्भात वारंवार पत्रव्यवहार व पाठपुरावा केल्याचे दिसून आले. त्यावर

नगररचना विभागामार्फ़त व प्रशासकीय अधिकारी सोबत जाऊन जागेच्या अतिक्रमणाबाबत मार्कआऊट (सिमांकन) देण्यात आले.

६. संबंधित विभागामार्फ़त अतिक्रमण शेवटपर्यंत हटविण्यात आले नाही. त्यामुळे स.सभापतीच्या पत्रान्वये कामाचे स्थळ बदलून काम पूर्ण करण्यात आले. स्थळबदली बाबत वरीष्ठांची मंजूरी घेण्यात आली.

७. मा.आयुक्त यांचे आदेश असतांनाही सदर जागेवरचे १५×३२ मीटरचे अतिक्रमण हटविण्यात आलेले नाही.

सदरील अतिक्रमणाबाबतची आजची स्थिती काय आहे. आपल्या विभागामार्फ़त प्रशासकीय अधिकारी व मालमत्ता विभाग यांचे खुलासा घेवून या विभागास अनुपालन सादर करावे असे सूचित केले असता उपरोक्त मुद्यांचे अनुपालन प्राप्त असून असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र. ११ :सन २००३-०४ ते सन २००५-०६ मध्ये कलम ६३(३) (सी) अंतर्गत करण्यात आलेल्या कामाचा तपशिल उपलब्ध करून देणे बाबत.**

इमारत बांधकाम उपविभागाअंतर्गत खर्चाचे चाचणी लेखापरीक्षण हाती घेण्यात आलेले आहे. या उपविभागामार्फ़त विषयांकित कालावधी मध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका,अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (सी) अंतर्गत करण्यात आलेल्या कामाचा तपशिल व संचिका लेखापरीक्षणास्तव आवश्यक आहेत.

वरीलप्रमाणे तपशिल / संचिका उपलब्ध करून देण्याविषयी सूचित केले असता सदरील लेखे अप्राप्त असल्याकारणाने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र. १२ :सन २००३ ते ०४ या आर्थिक वर्षात प्रोव्हिजन रजिस्टर नुसार झालेल्या कामाच्या संचिका उपलब्ध करून देणे बाबत.**

इमारत बांधकाम उपविभागाचे सन २००३-०४ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षण हाती घेण्यात आले असून त्याकामी खालील संचिकांची आवश्यकता आहे.

१. नंदनवन कॉलनी येथील मनपाच्या खुल्या जागेवर रंगमंच बांधणे.
अंदाजपत्रकीय रक्कम रू.१,९९,१५५/-

२. केसरसिंगपुरा आरक्षण क्र.८९ सि.स.न.१८०८८ ते १८०९२ वर भिंत बांधणे.
अ.प.रक्कम रू.२,९९,८००/-

३. बेगमपुरा येथे सुलभ शौचालय बांधणे.अ.प.र.रू.५,९९,४००/-

४. औरंगपुरा येथे सुलभ शौचालय बांधणे.अ.प.र.रू.५,५०,०००/

५. एन-३ सिडको परिसरात स्केटींग ट्रक बांधणे. (मा.राजेंद्र दर्डा)
अ.प.रक्कम रू.१०००००/-

६. संशोधन केंद्र येथे पार्टीशन व इतर कामे.अ.प.र.रू.१,३९,९५६

७. काली मस्जिद नवाबपुरा कब्रस्थान मध्ये पाथवे तयार करणे. अंदाजपत्रकीय रक्कम रू.२,९९,१९५/-

८. भगवती कॉलनी गारखेडा परिसर खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे. अ.प.रक्कम रू.२,८२,८४८/-
९. समर्थनगर डॉ.कोरान्ने व आडगांवकर यांच्या घरासमोर खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे बाबत. अंदाजपत्रकीय रक्कम रू.२,१७,९३०/-
१०. गुरूरामदास विद्यानिकेतन कॉलनी येथे खुल्या जागेचा विभाग करणे. अ.प.रक्कम रू.४,६०,०००/-
११. भरतनगर जवळील शंभुमहादेव नगर खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे. अ.प.रक्कम रू.१,५८,७४४/-
१२. नेहरू पॅलेस,भोईवाडा मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे. अ.प.रक्कम रू.१,२७,६५०/-

इत्यादी वरील प्रमाणे संचिका उपलब्ध करून देण्याविषयी विभागास सूचित केले असता अद्यापपावेतो लेखे अप्राप्त असल्याकारणाने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र. १३ :भिमपुरा भावसिंगपुरा येथे हॉल बांधणे. अ.प.रक्कम रू.२,८९,२०३/-**

इमारत बांधकाम उपविभागाचे सन २००४-०५ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षण तपासणीस्तव उपरोक्त विषयी खालील बाबींचे आक्षेपार्ह आढळून आहे आहेत.

१. प्रस्तावित काम नविन शौचालय बांधणे बाबत.अ.प.सादर करण्यात आले होते. तथापि अ.प.तांत्रिक विभागामार्फ़त तपासणी झाल्याचे दिसून आले.
२. पान क्र.एन-११ परि.क्र.२८ अन्वये शौचालया ऐवजी सभागृह बांधण्याचा प्रस्ताव सादर झाला.
३. पान क्र.एन-१२ परि.क्र.३१ अन्वये मा.आयुक्त यांनी आदेशित केले की, प्रस्तावित सभागृहाची गरज आहे काय ? ते स्पष्ट करावे गरज असल्यास त्याचे प्लान, अंदाजपत्रक,स्थळपाहणी सह सादर करावे. आदेशान्वये अंदाजपत्रकात दुरूस्ती करून सादर करण्यात आले. परंतु तांत्रिक कक्षा मार्फ़त अं.प.तपासणी झाल्याचे दिसून आलेले नाही.
४. प्रभाग समिती अ मध्ये प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला आहे की, वॉर्ड क्र.३७ भिमनगर येथे सुलभ शौचालय बांधणे या कामाची अ.प.रकमेस मंजूरी घेण्यात आली. वास्तविक कामाचे स्वरूप व अ.प.रक्कम बदल झाल्याबाबत प्रभाग समिती अ च्या निदर्शनास आणून देणे आवश्यक होते. परंतु तसे न झाल्याचे दिसून आले आहे.
५. प्रस्तावित कामाचे अंतिम देयक सुध्दा तांत्रिक कक्षामार्फ़त तपासणी न झाल्याचे दिसून आले.

उपरोक्त मुद्यांचा खुलासा या विभागास सादर करावा असे सूचित केले असता उपरोक्त मुद्यांचे अनुपालन प्राप्त असून असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

## परिच्छेद क्र. १४: हर्सुल येथे प्रा.शाळासाठी स्वच्छतागृह बांधणे. अ.प.रक्कम १,३८,८१८/-

इमारत बांधकाम उपविभागाचे सन २००४ –०५ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षण तपासणी अंती खालील बाबींचे आक्षेपार्ह दिसून आले.

१. अंदाजपत्रकास व अंतिम देयकांस तांत्रिक विभागामार्फ़त तपासणी केल्याचे दिसून आलेले नाही ?

२. मंजूर गुत्तेदाराने कामा अंतर्गत करारनामा सादर केला असून त्यावर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी झालेली नाही.

३. संचिका पान क्र.सीएस/३३,३४ अन्वये उपअभियंता यांनी सिमेन्टच्या संदर्भात प्रमाणपत्र प्रमाणित केले. परंतु सिमेंटची १६६ बॅगची पावती जोडलेली नाही.

४. प्रस्तावित कामाच्या कालावधीतच आपल्या विभागामार्फ़त ए-१ निविदा अन्वये खालील कामे करण्यात आले.

   अ. हर्सुल मनपाच्या प्रा.शाळेत पाण्याची व्यवस्था करणे.अ.प.रक्कम रू.२४७१७/- चे काम गुत्तेदार श्री.मो.शफ़ीक यांच्या कडून करण्यात.

   ब. हर्सुल मनपा प्रा.शाळेत दुरूस्ती करणे बाबत. अ.प.रक्कम २४९९०/- चे काम गुत्तेदार श्री.व्ही.के.परदेशी यांच्या कडून करण्यात आले.

५. प्रस्तावित कामाच्या वेळी स्थळ पाहणी करते वेळी अ,ब, चे काम निदर्शनास आले असेलच तरी दोन्ही कामे ए-१ निविदेमध्ये करून घेण्यात आली. स्थळ पाहणी मध्ये या सर्व बाबी नजरेत आल्यावर प्रस्ताव एकत्रित सादर करून बी-१ नमुना निविदेतील कार्यवाही केली असती. मात्र कामाचे विभाजन का करण्यात आले. याचा बोध होत नाही. वास्तविक मा.आयुक्तांचे आदेश जा.क्र.मनपा/मआ/डीपी-२००४/३५५, दि.२९.७.०४ द्वारे आदेशित करण्यात आले त्यात नमूद केले की, कामाचे तुकडे पाडून कामे करण्यात येवू नये असे मा.आयुक्तांचे आदेश असतांना मात्र आपल्या विभागामार्फ़त आदेशाचे पालन न करता

   तिन्ही कामासाठी वेगवेगळ्या संचिका प्रस्तावित करून काम पूर्ण केले. ही प्रक्रिया संपूर्णपणे चूकीची आहे.

   उपरोक्त मुद्याचा खुलासा या विभागास सादर करावा असे सूचित केले असता उपरोक्त मुद्यांचे अनुपालन प्राप्त असून असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

## परिच्छेद क्र.१५:वॉर्ड क्र.३७ पद्मपाणी कॉलनी येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे.

इमारत बांधकाम विभागाचे सन २००४ ०५ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षण तपासणी अंती उपरोक्त विषया अंतर्गत खालील बाबींचे आक्षेपार्ह आढळून आले आहेत.

१. प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रकीय व अंतिम देयक तांत्रिक विभागामार्फ़त तपासणी न झाल्याचे दूिसन आले आहेत.

२. संचिका पान क्र. एनएस-२,३ नुसार स.न.२७/३ पद्मपाणी हौ.सो.ची मुळ रेखांकन संचिका या विभागातील उपलब्ध अभिलेखात आढळून येत नाही.

३. रेखांकन नकाशा प्रमाणे सदर रेखांकनास मा.उपसंचालक नगररचना औरंगाबाद मार्फ़त दिनांक ६.११.७३ द्वारे मंजूरी दिलेली आहे. त्यावेळेस सदर जागा वि.यो.नुसार निवासी क्षेत्रात समाविष्ट होती. त्यामुळे सदर प्रकरणात वरिष्ठ स्थळावर निर्णय घेणे योग्य राहील असे नमूद करण्यात आले. मात्र ही बाब मा.आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिलेली नाही.

४. प्रत्यक्ष स्थळ पाहणी अन्वये उपरोक्त मंजूर रेखांकना प्रमाणे जागेवर विकास झालेला आहे. भूखंडधारकांना बांधकाम परवाना सुध्दा मनपाने दिलेला आहे. तेव्हा शासन न वि.वि. यांचे कडील दि.१० जून १९९६ रोजीचे निर्णयाचा विचार करता खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधण्यास हरकत नाही.

५. दिनांक १० जून १९९६ रोजीचे निर्णयाचा मसुदा किंवा परिपत्रक संचिकेत जोडलेले नाही. उपरोक्त मुद्यांचा खुलासा या विभागास सादर करावा असे सूचित केले असता उपरोक्त मुद्यांचे अनुपालन प्राप्त असून असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र. १६ :केसरसिंगपुरा येथील खुल्या जागेत उद्यान विकसित करणे बाबत.**
**अ.प.रक्कम रू.१,५०,०००/-**

इमारत बांधकाम उपविभागाचे सन २००४-०५ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षण तपासणी अंती उपरोक्त विषयी खालील बाबीचे आक्षेपार्ह आढळून आले आहे.

१. आपल्या विभागामार्फ़त अ.प.तयार करून बी-१ निविदा कार्यवाही पूर्ण करण्यात आली.

२. प्रस्तावित कामाची स्थळ पाहणी करून अ.प.तयार करण्यात आलेले नाही.

३. प्रस्तावित कामाच्या खुल्या जागेत उद्यान विकसित करणेच्या कामासाठी सदर ठिकाणी कामाची आखणी करून देण्यासाठी गेले असता तेथील नागरिकांनी काम करणेसाठी मज्जाव केला आहे. त्यामुळे काम होवू शकले नाही.

४. प्रस्तावित कामाच्या खुल्या जागेच्या मालकी हक्काच्या संदर्भात, मालमत्ता विभाग व स.स.नगररचना विभागामार्फ़त अभिप्राय घेण्यात आलेले नाही.

५. स.नगरसेवक यांनी फ्रेन्डस कॉलनी येथील खुल्या जागेमध्ये उद्यान विकसित अशी पत्राद्वारे विनंती केली आहे. त्यानुसार कामाचे स्थळ बदल करण्याची प्रक्रिया करण्यात आली आहे.

६. प्रस्तावित कामाचे प्रस्ताव प्रभाग समिती – क यांची मान्यता घेण्यात आली. मात्र कामात बदल म्हणजे स्थळ बदल करण्यात आले या बाबत प्रभाग समितीच्या निदर्शनास आणून दिलेले नाहीत.

७. प्रस्तावित कामाचे मंजूर गुत्तेदाराचे कामा अंतर्गत करारनामा व वर्कऑर्डर पूर्वीच्या कामाच्या नावाने करण्यात आलेले आहेत.

८. केसरसिंगपुरा येथील मनपाच्या खुल्या जागेबाबत ज्यावर आपण प्रस्तावित काम करणार होतो त्या जागेची आजची स्थिती काय आहे. आपल्या विभागामार्फ़त प्रशासकीय अधिकारी व मालमत्ता विभाग यांचे खुलासे घेवून या विभागास अनुपालन सादर करावे.

९. अ.प.व अंतिम देयक याची तपासणी तांत्रिक कक्षा मार्फ़त झालेली नसून बिलाची अदाई करण्यात आली.

उपरोक्त मुद्यांचा खुलासा या विभागास करण्यात यावा असे सूचित केले असता उपरोक्त मुद्यांचे अनुपालन प्राप्त असून असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.१७ :ए-१ निविदेत आपल्या विभागामार्फ़त झालेल्या कामाच्या संदर्भात.**

इमारत बांधकाम उपविभागाचे सन २००४-०५ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षण तपासणीअंती उपरोक्त विषया अंतर्गत खालील कामे झालेली आहेत. त्याची यादी.

**मुद्या क्र.अ:**

| अ. क्र. | कामाचे नांव | अ.प.रक्कम | वर्क ऑर्डर | एजन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.४३ मधील एन-१२ डी-३ समोर काँक्रीट करणे. | २४९९९/- | १०५६/०५ २८.१.०५ | लाड समुद्र |
| २ | वॉर्ड क्र.४३ मधील एन-१२ डी-२ समोर काँक्रीट करणे. | २४९६२/- | १०५८/०५ २८.१.०५ | पुंड |
| ३ | वॉर्ड क्र.४३ मधील एन-१२ डी-१ समोर काँक्रीट करणे. | २४९०८/- | १०५५/०५ २८.१.०५ | लाड समुद्र |
| ४ | वॉर्ड क्र.४३ मधील एन-१२ डी-३ घरासमोरील जागेवर काँक्रीट करणे. | २४९०८/- | १०४५/०५ २८.१.०५ | एन.जी.दौड |
| ५ | एन-१२ डी –५० समोरील खुल्या जागेत काँक्रीट करणे. | २४९८६/- | १०३०/०५ २८.१.०५ | संतोष पदार |
| ६ | वॉर्ड क्र.४२ एन-१२ खुल्या जागेत काँक्रीट,पेव्हमेंट करणे. | २४९७८/- | १०३४/०५ २८.१.०५ | आर.बी.समुद्र |
| | एकूण | **१,४९,८१९/-** | | |

स.नगरसेवक यांच्या मागणीनुसार आपल्या विभागामार्फ़त स्थळ पाहणी झाली.

उपरोक्त दर्शविलेल्या यादीतील सर्व कामाचा प्रस्ताव आपल्या विभागामार्फ़त ए-१ निविदा मार्फ़त एकूण सहा कामे करण्यात आली. सर्व कामाचे एकूण अ.प.रक्कम रू.१,४९,८१९/- इतकी होत आहे. सर्व एकाच वार्डातील आहेत. प्रस्तावित कामाचे स्वरूप एकाच प्रकारचे होते. सर्व कामाची वर्क ऑर्डर एकाच तारखेस दि.२८.१.०५ ला देण्यात आलेली आहेत.

मात्र काम विविध एजन्सी मार्फ़त करून घेण्यात आलेली आहे.

देयकाची अदाई सुध्दा एकाच तारखेस करण्यात आली आहे. अनुपालन प्राप्त असून असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**मुद्या क्र ब:**

| अ. क्र. | कामाचे नांव | अ.प.रक्कम | वर्क ऑर्डर | एजन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | महापौर बंगला PVC टँक बसविणे. | ११५६०/- | -- | |
| २ | मा.महापौर बंगला रंगकाम करणे. | २४७७८/- | ११२०/०५ १.२.०५ | सुजाता हक गुत्तेदार |
| ३ | मा.महापौर बंगला रंगकाम करणे. | २४४०६/- | १२२१/०५ १.२.०५ | शे.अफ़सर गुत्तेदार |
| | **एकूण** | **६०७७४/-** | | |
| | | | | |

उपरोक्त कामही अ.मुद्यानुसार सारखे काम होते. मुद्या क्र. अ सर्व कामाचे प्रस्ताव एकत्रीत करून अ.प.तयार करून बी-१ निविदेत कार्यवाही करणे आवश्यक होते.

मुद्या क्र.ब सर्व कामाचे प्रस्ताव एकत्रित करून बी-१ निविदेत कार्यवाही करणे आवश्यक होते.

परंतु आपल्या विभागामार्फ़त मुद्या क्र.अ, व ब च्या कामाचे विभाजन करून काम पूर्ण केले आहेत. वॉर्डातील कामाचे विभाजन (तुकडे ) करून काम करण्यात येवू नये या संदर्भात मा.आयुक्तांचे आदेश जा.क्र./मनपा/मआ/डीपी/२००४/३५५ दि.२३.७.०४ द्वारे आदेशित करण्यात आले. त्यात स्पष्टपणे नमूद केले की कामाचे तुकडे पाडून काम करण्यात येवू नये. मात्र आपल्या विभागामार्फ़त मुद्या क्र. अ व ब अन्वये काम झालेली आहेत.

मा.आयुक्तांच्या आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येत आहे.

उपरोक्त मुद्याचा खुलासा या विभागास सादर करावा असे सूचित केले असता उपरोक्त मुद्यांचे अनुपालन प्राप्त असून असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

## परिच्छेद क्र. १८: फ्रेन्डस कॉलनी येथील खुली जागा विकसित करणे.अ.प.रक्कम रू.१,५०,०००/-

इमारत बांधकाम उपविभागाचे सन २००४ ते २००५ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षण तपासणीअंती उपरोक्त विषयाअंतर्गत खालील बाबींचे आक्षेपार्ह आढळून आले आहे.

१. प्रस्तावित कामाच्या कालावधीतच आपल्या विभागामार्फ़त केसरसिंगपुरा येथील खुल्या जागेत उद्यान विकसित करणे अ.प.रक्कम रू.१,५०,०००/- चे काम करण्याकरीता संचिका सादर केली गेली होती त्यात बी-१ निविदाची प्रक्रिया पूर्णपणे करून एजन्सीला वर्क ऑर्डर देण्यात आली. पुढे मात्र सदर ठिकाणी जागेच्या वादामुळे काम होवू शकले नाही. पुढे तेच काम स्थळबदल करून फ्रेन्डस कॉलनी येथील खुली जागा विकसित

करण्याचे सादर करून काम पूर्ण केले गले आहे. मात्र केसरसिंगपुरा येथील कामा अंतर्गत संचिकेत कामाचे स्थळदर्शक नकाशा जोडलेली आहे. वास्तविक स्थळ बदल झाल्यावर फ्रेन्डस कॉलनी येथील खुल्या जागेचे स्थळदर्शक नकाशा जोडणे आवश्यक होते. ते जोडले नसल्याने नेमके काम कोणत्या ठिकाणी झाले याचा बोध होत नाही.

२. आपल्या विभागामार्फ़त याच कालावधीत दुसरी संचिका फ्रेन्डस कॉलनी येथील जागा विकसित करणे अ.प.रक्कम रू.१,५०,०००/- ची संचिका सादर करून काम पूर्ण केले गेले. त्यात स्थळदर्शक नकाशा जोडलेला आहे.

३. केसरसिंगपुरा येथील कामाचे स्थळ बदलून फ्रेन्डस कॉलनी येथील जागा विकसित करणे याचे वर्क ऑर्डर जा.क्र./मनपा/उबा/२८२/०४,दिनांक १९.८.२००४ अन्वये गुत्तेदार श्री.एज.जे.लहाने गुत्तेदार मार्फ़त काम पूर्ण केले.

४. फ्रेन्डस कॉलनी येथील खुली जागा विकसित करणे याचे वर्क ऑर्डर जा.क्र./मनपा/उबा/२८१/०४,दिनांक १९.८.२००४ अन्वये गुत्तेदार श्री.एज.जे.लहाने याच्या कडून काम पूर्ण केले.

५. उपरोक्त मुद्या क्र.३ व ४ या कामाचे वर्क ऑर्डर एकाच तारखेला व एकाच गुत्तेदाराला देणयत आलेले आहे. काम एकाच वॉर्डाचे असून कामाचे स्वरूप एकाच प्रकारचे होते. कामाचे विभाग करण्यात आले आहे.

६. दोन्ही कामाचे अ.प.एकत्रित करून कार्यवाही केली असती तर यात मनपाचा फ़ायदा झाला असता.

७. वार्डाच्या कामा संदर्भात मा.आयुक्तांचे आदेश जा.क्र./मनपा/डीपी/२००४/३५५, दिनांक २३.७.२००४ द्वारे आदेशित करण्यात आले. त्यात स्पष्टपणे नमूद केले की कामाचे तुकडे पाडून काम करण्यात येवू नये मात्र आपल्या विभागामार्फ़त कामाचे तुकडे करून कार्यवाही केल्याचे स्पष्टपणे दिसून येते यावरून मा.आयुक्तांच्या आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येत आहे. प्रस्तावित कामाचे अ.प. व अंतिम देयक तांत्रिक कक्षा मार्फ़त तपासणी झाल्याचे दिसून येत नाही.

उपरोक्त मुद्यांचा खुलासा या विभागास सादर करावा असे सूचित केले असता उपरोक्त मुद्यांचे अनुपालन प्राप्त असून असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.१९ : सन २००४ ते ०५ या आर्थिक वर्षात झालेल्या कामाच्या तांत्रिक कक्षाच्या अभिप्राय संदर्भात.**

इमारत बांधकाम उपविभागाचे सन २००४ -०५ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षण तपासणीअंती आपल्या विभागामार्फ़त खालील दर्शविलेली कामे पूर्ण केली गेली त्यांची यादी.

| अ.क्र. | कामाचे नांव | अ.प.रक्कम रू. |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.२४ स.न.४३ श्रेयनगर येथील मनपाच्या खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधणे. | २,००,०००/- |
| २ | प्रभाग क्र.२१ खिंवसरा पार्क येथील जागा विकसित करणे. | १,००,०००/- |
| ३ | भावसिंगपुरा पेठेनगर जवळील भिल्ल समाज स्माशन भूमी विकसित करणे. | १,९९,३५०/- |
| ४ | वॉर्ड क्र.९ मधील चिकलठाणा आठवडी बाजार जवळील स्मशानभूमी विकसित करणे. | -- |
| ५ | प्रभाग क्र.२१ देवानगरी येथील मनपाच्या खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधणे. | १,५०,०००/- |
| ६ | औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथील खुल्या जागा विकसित करणे. | १,९९,०००/- |
| ७ | जयविश्वभारती कॉलनी डॉ.पिंपळनेरकर यांच्या घरासमोरील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे. | १,५०,०००/- |
| ८ | हर्सुल येथील स.न.१७९/पार्ट मधील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे. | १,८८,४२४/- |
| ९ | रमानगर प्रभागात डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या बाजुस व्यायाम शाळा ऐवजी हॉल बांधणे. | २,४९,३१३/- |
| १० | प्रभाग क्र.५४ सुराणानगर येथील खुली जागा विकसित करणे. | १,९९,९०००/- |
| ११ | मुकुंदवाडी स्मशानभूमी विकसित करणे. | १,९९,७५०/- |

आपल्या विभागामार्फ़त सन २००४-०५ या आर्थिक वर्षात बऱ्याच प्रमाणात कामे झालेली असून चाचणी लेखापरीक्षण तपासणीस्तव जवळपास सर्व संचिका तांत्रिक कक्षाच्या तपासणी व अभिप्रायासह कार्यवाही पूर्ण झाल्याचे दिसून आले आहे. मात्र विषयांकित यादीत दर्शविलेल्या एकूण ११ संचिका तांत्रिक कक्षाचे मार्फ़त तपासणी व अभिप्राय न घेता कार्यवाही पूर्ण केल्या गेल्याचे दिसून आले आहेत. ही बाब आक्षेपार्ह आहे. यादीतील इतर आक्षेपार्ह बाबी खालील प्रमाणे आहे.

१. यादी क्र.३ च्या प्रस्तावित कामात उपअभियंता यांनी ४४७ बॅग सिमेन्ट वापराबाबत प्रमाणपत्र प्रमाणित केले. परंतु ४४७ सिमेन्ट बॅगची पावती जोडलेली नाही.

२. अ)यादी क्र.५ प्रस्तावित कामाच्या संचिका पान क्र.एनएस-२
अन्वये मा.मुख्य लेखाधिकारी यांच्या तजवीज अन्वये मनपाच्या मालमत्ता विभागाकडे मालमत्तेची नोंद असल्याबाबत मालमत्ता विभागाचा अभिप्राय घेणे मात्र संचिकेत अभिप्राय घेतल्याचे दिसून येत नाही.

ब) कामाचे मंजूर गुत्तेदार यांचे कामा अंतर्गत करारनामा सादर केला मात्र करारनाम्यावर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही. गुत्तेदारास वर्क ऑर्डर तामील करण्यात आले.

३. यादी अ.क्र.८ प्रस्तावित कामाच्या संचिकेत स्थळदर्शक (काम करणारे स्पष्ट स्थळ) नकाशा जोडलेले नाही. काम झालेल्या स्थळाचा बोध होत नाही.

४. यादी अ.क्र.११ प्रस्तावित कामाच्या संचिका पान क्र.सीएस/४६ नुसार सदर कामा अंतर्गत ३४३ सिमेन्ट बॅग वापरण्यात आल्याचे उपअभियंता (गार्डन बांध) यांनी प्रमाणित केले असे नमूद आहे. मात्र सिमेन्ट बॅग ३४३ ची पावती जोडण्यात आलेली नाही.

करीता उपरोक्त मुद्याचा खुलासा या विभागास सादर करावा असे सूचित केले असता उपरोक्त मुद्यांचे अनुपालन प्राप्त असून असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.२० : सन २००५ ते ०६ या आर्थिक वर्षात कार्योत्तर मंजूर झालेल्या कामाच्या संदर्भात.**

इमारत बांधकाम विभागाचे सन २००५ ते ०६ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षण तपासणी अंती खालील कामाचे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या,

आपल्या विभागामार्फ़त कार्योत्तर मंजूरीची काही कामे झालेली असून त्यापैकी खालील दोन कामास मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी घेतल्याचे दिसून येत नाही.

१. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील विविध
दालनाचे नुतनीकरण व किरकोळ दुरूस्त्या करणे.
अ.प.रक्कम रू.२,३८,२४४/- सदर काम अ.प.दरास
गुत्तेदार (मन्नानखान यांच्या मार्फ़त)

२. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मध्ये विविध ठिकाणी नोव्हापॅन पार्टीशन ॲल्युमिनियम दारे, खिडक्या इ.कामे अ.प.रक्कम २,३९,३८६/- चे सदर काम अ.प.दरात गुत्तेदार मे.एल.के.कन्स्ट्रक्शन मार्फ़त करण्यात आले.

विषय क्र. २ च्या कामा संदर्भात संचिका पान क्र. एनएस/३ अन्वये परिच्छेद क्र.६ नुसार मुख्य लेखाधिकारी यांच्या अहवालात नमूद केले की प्रशासकीय इमारत या लेखा शिर्षकात विविध कामे करणेसाठी ७.०० लक्ष तरतूद ठेवण्यात आली होती ती तरतूद उपलब्ध नसल्याने तसे कळविणे योग्य. मात्र आपल्या विभागाच्या सक्षम अधिकारी यांच्या अहवालात प्रशासकीय इमारत या लेखाशिर्षकाअंतर्गत एकूण ३३ लक्ष तरतूद आहे. असे नमूद केले आहे. मा.लेखाधिकारी व आपले अहवाल या मध्ये विसंगती दिसून येत आहे.

करिता उपरोक्त मुद्यांचा खुलासा या विभागास सादर करावा असे सूचित केले असता उपरोक्त मुद्यांचे अनुपालन प्राप्त असून असमाधानकारक असल्याने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र. २१ : सन २००४ ते ०५, सन २००५–०६ मध्ये झालेल्या खर्चाचे तपासणी करीता मोजमाप पुस्तिका उपलब्ध बाबत.**

इमारत बांधकाम उपविभागाअंतर्गत खर्चाचे चाचणी लेखा परीक्षण हाती घेण्यात आलेले आहे. या उपविभागामार्फ़त विषयांकित कालावधी मध्ये करण्यात आलेल्या कामाच्या खर्चा संदर्भात खालील प्रमाणे मोजमाप पुस्तिका लेखा परीक्षणास्तव आवश्यक असल्यामुळे त्वरीत उपलब्ध करून द्याव्यात.

१. सन २००४-०५ या वर्षातील मोजमाप पुस्तिका
 १२६४ १३५२ ७४२ ,१०३९, **एकूण ०४**.

२. सन २००५–०६ या वर्षातील मोजमाप पुस्तिका १०३७ , १०५७ , १२६२ , १२६० , १४४८ ,१३५५,१०३७,११०८,१०७८,७६०,१४४७,१५२५,१२५७,१४९२ **एकूण १४**

वरील प्रमाणे मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास्तव उपलब्ध करून देण्यासाठी आपल्या अधिपत्याखालील कर्मचाऱ्यांना तोंडी सूचना दिलेल्या आहेत. मात्र अद्यापपावेतो आवश्यक त्या मोजमाप पुस्तिका उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत.

तरी वरील प्रमाणे मोजमाप पुस्तिका तीन दिवसांत उपलब्ध करून द्याव्यात असे सूचित केले असता अद्यापपावेतो लेखे अप्राप्त असल्याकारणाने परिच्छेद कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र. २२ : इमारत बांधकाम उपविभागाचे लेखा परीक्षण तपासणी अहवालाच्या संदर्भात.**

इमारत बांधकाम उपविभागाचे सन २००३ ते ०४, २००४ ते ०५, सन २००५-०६ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षण तपासण्यात आले.

संबंधित विभागाच्या तीन वर्षाच्या सर्व संचिका तपासण्यात आल्या असून सन २००४-०५ या आर्थिक वर्षाच्या एकूण संचिका पैकी (०७) सात संचिकांचे देयक तपासणी करीता मोजमाप पुस्तिका उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत.

सन २००५-०६ या आर्थिक वर्षाच्या सर्व संचिका तपासण्यात आल्या असून त्यापैकी एकूण (१४) संचिकाचे देयक तपासणी करीता मोजमाप पुस्तिका उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. मोजमाप पुस्तिका उपलब्ध करून न दिल्याबाबत अर्धसमास पत्र क्र.२१, दि.२१.८.०७ देण्यात आले आहेत. तीन वर्षाच्या तपासणी अंती संबंधित विभागास आक्षेपार्ह २१ अर्धसमास आजपावेतो तामील करण्यात आले.

# पशुधन विकास विभाग
## वार्षिक लेखापरीक्षण कार्यक्रम सन २००५-०६ माहे डिसेंबर २००७ मध्ये केलेल्या लेखापरीक्षणाचा अहवाल.

**अ) जमा बाजू लेखापरीक्षण :**

**परिच्छेद क्र.१ : प्राणी संग्रहालय प्रवेश फ़ी वसूल रकमेचा कमी भरणा करणे बाबत.**

पशुधन विकास विभागाच्या सन २००५-०६ व सन २००६-०७ या आर्थिक वर्षातील अभिलेख्यांची तपासणी हाती घेण्यात आली असता त्या दरम्यान खालील आक्षेपार्ह बाब निदर्शनास आली आहे.

१. प्राणी संग्रहालय (सिध्दार्थ उद्यान) येथील दिनांक २७.११.२००६ रोजी प्रवेश फ़ी प्रित्यर्थ वसूल केलेली रक्कम ही रू.९०००/- इतकी असून सदर रकमेचा भरणा दिनांक २९.११.२००६ रोजी लेखा विभागामध्ये करतांना रू.९००/- इतका केला असल्याचे निदर्शनास आले आहे. परिणामी, रू.८१००/- इतक्या रकमेचा कमी भरणा झाल्याचे दिसून येते.

करिता, सदर कमी भरणा रकमेची वसूली संबंधिताकडून करावी व अनुपालन अहवाल तीन दिवसांत सादर करणेबाबत सदर विभागास कळविण्यात आले असता विभागाने सादर केलेले अनुपालन समाधानकारक असल्याने सदरील परिच्छेद वगळण्यात येत आहे.

**ब) खर्च बाजू :**

**परिच्छेद क्र.२: सन २००५-०६ वर्षातील बीफ़ खरेदीपोटी जादा अदाई बाबत. रू.५४४९.५०/-**

सन २००५-०६ या आर्थिक वर्षातील बीफ़ पुरवठा रजिस्टर व देयक संचिका यांची एकत्रित तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाब निदर्शनास आली आहे.

माहे फ़ेब्रुवारी २००६ मध्ये Stock Register मध्ये एकूण ५ दिवस ठेकेदाराकडून पुरवठा घेण्यात आलेला नाही असे दर्शविण्यात आलेले आहे. (Off Day) मात्र ठेकेदाराने दिनांक ०२.०३.२००६ रोजी सादर केलेल्या देयकामध्ये ४ दिवस Off day दर्शविलेले आहे. परिणामी, माहे फ़ेब्रुवारी २००६ मध्ये २३ दिवस पुरवठा × प्रति दिन परिमाण २५९.५ कि × रू.२१/- = १२५३३८.५०/- इतके देयक सादर करणे आवश्यक असतांना २४ दिवसांसाठी देयक रू.१३०७८८/- चे देयक सादर केले आहे म्हणजेच रू.५४४९.५० इतक्या जादा रकमेचे देयक सादर केले आहे. त्यामुळे विभागाने ठेकेदाराच्या देयकाआधारे रू.१३०७८८- रू.२००=

रू.१३०५८८/- ठेकेदारास अदा करण्यात आले आहेत. परिणामी रू.५४४९.५० जादा करण्यात आले आहेत.

करिता, रू.५४४९.५० ही रक्कम संबंधित ठेकेदाराकडून तीन दिवसांत वसूल करून महापालिका फंडात करावी व अनुपालन सादर करावे असे विभागास सूचित केले असता विभागाने सादर केलेले अनुपालन समाधानकारक असल्याने परिच्छेद वगळण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र.३: सन २००५-०६ या आर्थिक वर्षातील प्राणी संग्रहालयासाठी पशुखाद्य इ. खरेदी बाबत.**

उपरोक्त आर्थिक वर्षातील खरेदी बाबत निविदा संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. सदर सन २००५-०६ या आर्थिक वर्षामध्ये प्राणी संग्रहालयासाठी लागणाऱ्या विविध खाद्य खरेदीसाठी जा.क्र. मनपा / मुपसंअ / ५४९/२००५ दि.२९.०१.२००५ नुसार निविदा सूचना वर्तमानपत्रातून प्रसिध्दीस देण्यात आली. सदर निविदा सूचनेमध्ये तपशिल, निविदा पत्रकाची किंमत, अनामत रक्कम व कालावधी असा तपशील देण्यात आला आहे. निविदेमध्ये प्राणी संग्रहालयासाठी ८ खाद्य प्रकार समाविष्ट करण्यात आलेले आहेत. मात्र सदर निविदा प्रसिध्द करतांना सन २००५-०६ या आर्थिक वर्षात लागणारे खाद्य प्रकारांचे परिमाण /संख्या नमूद करण्यात आलेली नाही. सदर बाब अनियमित स्वरूपाची असल्याचे मत आहे. खाद्य प्रकारांच्या परिमाणाशिवाय संबंधित ठेकेदारांनी निविदेमध्ये दर नमूद केले असून या दरांना (काही दरांना वाटाघाटी अंती) सक्षम मान्यता घेतली आहे. परिमाणाशिवाय प्राप्त झालेले दर हे निश्चितच समर्थनिय नाहीत. कारण पशुधन विकास विभागाने खाद्य प्रकारांचे परिमाण(Quantity) निविदेमध्ये नमूद केले असते तर निश्चितच प्राप्त दरांपेक्षा कमी दर प्राप्त होवून काही प्रमाणात महापालिकेचा आर्थिक फ़ायदा झाला असता असे नमद करण्यात येते.

२. निविदा दर मान्यतेअंती बीफ़ खन्नी ल्युसर्नघास किराणा माल, पशुपक्षी खाद्य, मासे व झिंगे, भाजीपाला व फ़ळफ़ळावळ या सर्व खाद्य पदार्थाच्या पुरवठा आदेशावर संचालक, प्राणीसंग्रहालय यांची स्वाक्षरी नसल्याचे स्पष्ट निदर्शनास आले आहे. त्यामुळे सदर बाब अनियमित/ नियमबाह्य आहे.

वरील मुद्यांबाबत विभागाने खुलासा करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेले अनुपालन असमाधानकारक असल्याने फ़ेर-अनुपालन सादर करावे.

# विशेष तपासणी अहवाल
# सन २००८-२००९
# भाग -२

# विविध चौकात पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामाबाबतचा चौकशी अहवाल.

(मा.सभापती,स्थायी समिती, महानगरपालिका,औरंगाबाद यांचे पत्र दिनांक १०.०६.२००८ नुसार )

औरंगाबाद शहरातील विविध चौकत इटालियन काँक्रीट पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामाचे सन २००६-०७ च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसूचीनुसार (D.S.R) रक्कम रू.१,३८,८५,०००/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.८०६/०५, दिनांक १८.०५.२००७ नुसार मान्यता मिळालेली आहे. सदरचे काम हे बाराव्या वित्त आयोगाच्या निधीतून प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

सर्वसाधारणपणे पुढील प्रमाणे चौकातील कामे प्रस्तावित केली आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | महावीर चौक | - | रक्कम रू.४३,७२,१२२/- |
| २. | रेल्वेस्टेशन चौक | - | रक्कम रू.२०,१३,८८८/- |
| ३. | पंचवटी चौक | - | रक्कम रू.१६,८६,१०१/- |
| ४. | आझाद चौक | - | रक्कम रू.२६,७२,१२४/- |
| ५. | चंपा चौक | - | रक्कम रू.१४,६३,११२/- |
| ६. | टिव्ही सेंटर चौक | - | रक्कम रू.१३,०६,५११/- |
| | **एकूण** | **-** | **रक्कम रू.१,३८,८५,०००/-** |

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने सदर कामासाठी दुसऱ्या वेळेस निविदा मागविल्या असता एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त निविदांचे दर हे पुढील प्रमाणे होते.

१. मे.राणा कन्स्ट्रक्शन - १५.२५% जास्त दराने

२. मे.एम.ए.सिद्यीकी - २४.००% जास्त दराने.

वरील प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी म्हणजे मे.राणा कन्स्ट्रक्शन यांची निविदा वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०४.२५% जास्त दराने सदरील काम करण्यास संबंधित गुत्तेदाराने संमती दिली आहे. याअनुषंगाने मा.आयुक्त यांच्या शिफ़ारसीअंती स्थायी समितीसमोर सदरील प्रस्ताव सादर करण्यात आला. मा.स्थायी समिती ठराव क्र.३०२, दिनांक १७.०१.२००८ अन्वये रू.१,३८,८५,०००/- इतक्या रकमेचे काम मे.राणा कन्स्ट्रक्शन यांचेमार्फ़त अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०४.२५% जास्त दराने करून घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. मा.स्थायी समितीने दिलेल्या मान्यतेप्रमाणे मे.राणा कन्स्ट्रक्शन यांना सदर काम करणेस कार्यादेश क्र. एएमसी/७०९/२००८, दिनांक १४.०२.२००८ अन्वये निर्गमित करण्यात आले. कार्यादेशाप्रमाणे उक्त काम पूर्ण करणेस १२ महिन्यांचा कालावधी देण्यात आलेला आहे. म्हणजेच दोन चौकांचे काम हे आतापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते, मात्र तसे झाल्याचे दिसून येत नाही.

दिनांक २२.०३.२००८ रोजी उप-अभियंता (बांधकाम-१) यांनी सहाय्यक अभियंता यांना सूचित केले की, अतिरिक्त शहर अभियंता यांनी पेव्हर ब्लॉकची प्रत्यक्ष स्थळावर पाहणी

केली असून प्रत्यक्ष स्थळावर दिलेल्या सूचनेनुसार देयकाबाबत नियमानुसार कार्यवाही करावी. त्यानंतर सहाय्यक अभियंता यांनी नमूद केले आहे की, पेव्हर ब्लॉकचे Schedule बी नुसार सर्व साहित्य संबंधित गुत्तेदाराने साईटवर साठा केले आहे. त्याची अतिरिक्त शहर अभियंता यांनी स्वत: पाहणी केली आहे.गुत्तेदाराने Advance Against Material ची मागणी केली आहे. MPW Code Form ५० (PW.४४७) Para १०.२.१९ नुसार संबंधित गुत्तेदाराकडून Indenture for Secured Advances करिता Bond Paper वर करारनामा करून ७५% इतके देयक देता येते. पुरवठा दरानुसार रक्कम रू. ७७,७५,८२२/- च्या ७५% अग्रिम रक्कम रू.५८,३१,८६६/- त्यानुसार रू.५८३१८६६/- चे देयक तयार केले आहे ज्याची नोंद मोजमाप पुस्तिका २२१४ पृ.क्र.१ ते वर घेण्यात आली आहे.

संचिकेच्या तपासणीवरून असे आढळून येते की, मार्च -२००८ अखेरीस उक्त कामासाठी साहित्यापोटी रक्कम रू. ८१,०६,२९४/- चे देयक मंजूर केले असून त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| • | मंजूर देयक रू | ८१,०६,२९४/- |
| • | वजावटी : १)Retension Amt. | ८,१०,६२९/- |
| | २)I.T. 2.3% | १,८६,४४५/- |
| | ३)VAT 2% | १,६२,१२६/- |
| | ४)FSD ३% | २,४३,१८९/- |
| | ५) Testing Charges | ८१६०२/- |
| | ६)Amount to be paid after P & F | <u>२२,७३,८८८/-</u> |
| • | निव्वळ अदा केलेली रक्कम रू. | <u>४३,४८,४१५/-</u> |

दिनांक १०.६.२००८ रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये काही सन्माननीय सदस्यांनी वरील कामाची चौकशी करण्याची मागणी केली व त्यानुसार मा.सभापती,स्थायी समिती, महानगरपालिका , औरंगाबाद यांनी सदर प्रकरणी मुख्य लेखा परीक्षक यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेशित केले आहे.

**<u>स्थळपाहणी:</u>**

१. मा.स्थायी समितीच्या आदेशानुसार कामाची चौकशी करणेस प्रथमत: संबंधित विभागाकडून कामाची संचिका व मोजमाप पुस्तिका इत्यादी मागविण्यासाठी या कार्यालयाचे पत्र क्र.-मनपा/मुलेप/९९/२००८,दिनांक ११.६.२००८ हे देण्यात आले होते. तथापि संचिका व मोजमाप पुस्तिका प्रत्यक्षात दिनांक १६.६.२००८ रोजी प्राप्त झाली. संचिका व मोजमाप पुस्तिका प्राप्त झाल्यानंतर निविदे अंतर्गत असलेल्या कामांची जागा पाहणी करणेस्तव या कार्यालयाचे पत्र क्र. मनपा/मुलेप/१०७/२००८,दिनांक १६.६.२००८ अन्वये उपअभियंता यांना कळविण्यात आले. त्यानुसार दिनांक १७.०६.२००८ रोजी प्रत्यक्ष साईटवर जाऊन प्राथमिक पाहणी केली, त्यावेळी अति.शहर अभियंता,श्री.एम.डी.सोनवणे, श्री.एस.डी.काकडे (उपअभियंता,बांध-१),

श्री.एम.बी.काझी (उपअभियंता,) श्री.भालचंद्र पैठणे (कार्यालय अधिक्षक) व श्री.तौफ़िक काझी (कनिष्ठ अभियंता) हे हजर होते. या कामाशी संबंधित अभियंता व गुत्तेदार यांनी सदरील कामाच्या सर्व साईटस व पेव्हर ब्लॉक्सचे साठे (Stack) दाखविले.

२. पाहणी नंतर प्रत्यक्ष स्थळावर झालेले काम व प्रत्यक्ष स्थळांवर तसेच इतरत्र ठेवलेले पेव्हर ब्लॉकचे साठ्यांचे मोजमाप सविस्तररित्या सादर करण्यासाठी संबंधित अभियंता यांना सूचना देण्यात आलेल्या होत्या त्याप्रमाणे संबंधित अभियंता यांनी दिनांक १९.०६.२००८ रोजी सविस्तर मोजमाप सहीनिशी या कार्यालयात सादर केले, त्याचा तपशील पुढील प्रमाणे.

**अ. मौलाना आझाद चौक येथील साठा :**

लांबी × रूंदी × उंची
१३.७० × ८.५० ×२.५० = २९१.१२ घन मीटर

**ब. <u>प्लॉटवरील साठा:</u>**

लांबी × रूंदी × उंची
१३.५० × ८.६० ×२.९० = ३३६.६९ घन मीटर
१३.२५ × ४.२० ×२.८५ = १५८.६० घन मीटर
६.५० × २.२० ×२.५० = ३५.७५ घन मीटर
७.० × १.५० ×२.५० = २६.२५ घन मीटर
८ × ०.९० ×२.५० = १८.० घन मीटर
९.० × १.० ×२.५० = २२.५० घन मीटर
१३.६० × १.० ×२.५० = ३४.१७ घन मीटर

**क. महावीर चौक:**

लांबी × रूंदी × उंची
४.३० × १.८० ×४.० = ३०.९६ घन मीटर
१.५० × २.५० ×१.८० = ६.७५ घन मीटर
१.५० × ३.०० ×२.२० = ९.९० घन मीटर
= ९७०.६९ घन मीटर
किंवा =९७०६.९० वर्गमीटर – (अ)

**ड. पंचवटी चौक येथे प्रत्यक्ष केलेल्या कामाचे मोजमाप.**

१. २०×२३ = ४६० वर्गमीटर
२. २०×१९.५० = ३९० वर्गमीटर
३. २०×२४ = ४८० वर्गमीटर
४. २१.६०×२२.५० = ४८६ वर्गमीटर
= १८१६ वर्गमीटर. – (ब)

**पेव्हर ब्लॉकचे एकूण परिमाण(क्षेत्रफ़ळ) अ + ब**

९७०६. +१८१६.०० = ११५२२.९० वर्गमीटर

३. दिनांक १७.०६.२००८ रोजीच्या प्रत्यक्ष भेटीत फ़क्त पंचवटी चौकातील काम प्रगतीपथावर असल्याचे दिसून आले. इतर कोणत्याही चौकात या कामाबाबत काहीही केल्याचे आढळून आले नाही. आझाद चौकापासून सुमारे ४०० फ़ूट अंतरावर पेव्हर ब्लॉक्सचा साठा करून ठेवल्याचे आढळून आले आहे. त्याशिवाय महावीर चौक व पंचवटी चौक येथे पेव्हर ब्लॉक्सचे साठे दर्शविण्यात आले. तसेच चंपा चौकापासून साधारणत: अर्धा किलोमीटर अंतरावर गुत्तेदाराच्या जागेत पेव्हर ब्लॉकचा साठा संबंधिताने दाखविला.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त मोजमाप, मोजमाप पुस्तिकेत नोंदविलेले मोजमापे तसेच संचिकेत केलेल्या विविध टिपण्या व सादरीकरण यांची शहानिशा करण्यात आली. प्रत्यक्ष स्थळावर प्रथमत: एका साठ्याचे मोजमाप पडताळणी करणेचे ठरले त्यानुसार आझाद चौक येथे रस्त्याच्या जवळील भागात ठेवण्यात आलेल्या पेव्हर ब्लॉकच्या साठ्याचे मोजमापे घेण्यात आली, त्याचा तपशील खालील प्रमाणे.

दिनांक १९.६.२००८ रोजी प्राप्त झालेले उपअभियंता यांनी सादर केलेले मोजमाप

१३.७०×८.५×२.५ = २९१.१२ घनमीटर

दिनांक २०.०६.२००८ रोजी प्रत्यक्ष आढळून आलेले मोजमाप

१३.५×७.८०×२.३० = २४२.१९ घनमीटर.

| | |
|---|---|
| मागच्या बाजूस असलेल्या पोकळ्याची वजावट | ८१.७७ घनमीटर |
| निव्वळ मोजमाप - (वजावटी जाता) | १६०.४२ घनमीटर |

४. प्रत्यक्ष आझाद चौक येथील मोजमाप तपासणी केली असता दि.१९.६.२००८ रोजी दिलेले मोजमाप व प्रत्यक्ष दिनांक २०.६.२००८ रोजी घेण्यात आलेल्या मोजमापात तफ़ावत आढळून येते व प्रत्यक्षात साठ्याचे घनफ़ळ (Volume) हे १६०.४२ घनमीटर असतांना संबंधित कनिष्ठ अभियंता, उपअभियंता , यांनी २९१.१२ घनमीटर इतक्याचा साठा असल्याचे दर्शविले आहे, म्हणजेच प्रत्यक्षात सदरील साठा हा ४५% कमी आढळून आला आहे.

५. साहित्यापोटी देण्यात आलेल्या अग्रीम रकमेसाठी दिनांक २३.३.२००८ रोजी Indenture Bond (Notorised) केले असल्याचे आढळून येते. मोजमाप हे दिनांक २३.३.२००८ ला नोंदविण्यात आल्याचे मोजमाप पुस्तिकेत नोंदविलेले आहे. परंतु प्राप्त साहित्य हे दिनांक २९.३.२००८, दिनांक ३१.३.२००८, दिनांक २.४.२००८, दिनांक ४.४.२००८, दि.५.४.२००८, दि.६.४.२००८, दि.७.४.२००८, दि.८.४.२००८,दि.९.४.२००८, दि.१०.४.२००८, दि.११.४.२००८, दि.१२.४.२००८, दि.१३.४.२००८

दि.१४.४.२००८, दि.१५.४.२००८, दि.१६.४.२००८, दि.१७.४.२००८ व दि.१८.४.२००८ रोजी बंचप्रमाणे प्रयोगशाळा तपासणीसाठी पाठविण्यात आले असल्याचे आढळून येते.यावरून असे स्पष्ट होते की. प्रत्यक्ष संपूर्ण साहित्य हे दिनांक २३.३.२००८ रोजीच प्राप्त झाले नव्हते. त्यानंतर दिनांक १८.४.२००८ पर्यंत सदरील साहित्य प्राप्त झालेले आहे व त्याचा नमुना (Sample) प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविला आहे.

**इतर महत्वाचे मुद्ये:**

१. संचिकेत बी-१ नमुना म्हणजेच निविदाच्या अटी व शर्ती आढळून आल्या नाहीत.

२. मोजमाप पुस्तिका क्र. २२१४ पान क्र. १ ते ६ वर नोंदविलेली मोजमापे ही प्राप्त साहित्याचे नग मोजून नोंदविल्याचे आढळून येते. म्हणजेच प्राप्त साहित्य हे ४०५७३९ नग प्राप्त झाल्याचे नोंदविलेले आहे. उक्त मोजमापे कोणत्या शास्त्रीयआधारे मोजण्यात आले याचा तपशील मोजमाप पुस्तिकेत नसल्याने सदरहू पेव्हर ब्लॉक्सची मोजणी कशी केली याचा बोध होत नाही.

३. दि.१९.०६.२००८ रोजी संबंधित अभियंता यांनी स्वाक्षरीसह सादर केलेले साठ्यांचे मोजमाप हे Stackwise आहेत. जेकी मोजमाप पुस्तिकेत नोंदविलेल्या पध्दतीच्या विपरीत आहेत. मोजमाप पुस्तिकेत पेव्हर ब्लॉकची संख्या ४०५७३९ नग दाखवून त्याचे एकूण परिमाण (क्षेत्रफ़ळ) पुढील प्रमाणे दर्शविले आहे.

४०५७३९× ब्लॉकचे क्षेत्रफ़ळ ०.०२८४ = ११५२२.९८ वर्गमीटर ($m^2$)

परंतु दिनांक १९.०६.२००८ रोजी सादर केलेले साठ्यांचे मोजमाप हे पुढील प्रमाणे दर्शविले आहे.

**लांबी × रूंदी × उंची = एकूण क्षेत्रफ़ळ (घन मीटर मध्ये)**

त्याचे रूपांतर वर्गमीटरमध्ये करून मापांची गोळा बेरीज केल्याचे दिसून येते.

४. ठेकेदारास देण्यात आलेली अग्रिम रक्कम (Advance) ही कार्यालयीन पध्दत तसेच MPWD Manual परिशिष्ट २४ च्या तरतूदी नुसार खालील उणिवा आढळून आल्या.

अ)संबंधित गुत्तेदाराची मोजमाप पुस्तिकेवर स्वाक्षरी नसणे.

ब) उपअभियंता यांनी १००% कामाची तपासणी केलेली नसणे.

क) अति.शहर अभियंता यांनी किमान ५% कामाची तपासणी केलेली नसणे.

५. Account Code प्रमाणे साहित्याच्या किंमतीचे ७५% च्या मर्यादेत Advance देणे अपेक्षित आहे. परंतु प्रत्यक्षात पारीत केलेले देयक हे अंदाजपत्रकीय बाबींमधील किंमतीच्या ७५% एवढे घेण्यात आलेले आहे. तसेच साहित्याच्या किंमतीवर ४.२५% जादा देणे आवश्यक नसतांना देखील ४.२५% जादा देण्यात आले आहे जेकी Account Code च्या तरतूदीचे उल्लंघन करणारे आहे.

६. पेव्हर ब्लॉकच्या परिमाना संदर्भात अतिरिक्त शहर अभियंता,महानगरपालिका,औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्र.१५९/०८, दिनांक २३.६.२००८ अन्वये कळविले आहे की, सदरील कामाची आपणा सोबत प्रत्यक्ष स्थळ पाहणी झालेली असून पंचवटी चौक, आझाद चौक व

चंपा चौका जवळील जागेत पेव्हर ब्लॉक जमा करण्यात आल्याचे आपणांस प्रत्यक्ष स्थळावर दाखविण्यात आलेले असून पंचवटी चौकातील झालेल्या कामाची प्रत्यक्ष मोजमापे आझाद व चंपा चौकातील जमा केलेल्या ब्लॉकची ढोबळपणे घेतलेली स्टॅक मेजरमेंट नुसार पूर्ण पेव्हर ब्लॉक असल्याबाबत आपल्या निदर्शनास आणून देण्यात आलेले आहे व सद्यस्थितीत बाबा पेट्रोल पंप व आझाद चौकात स्थळावर ब्लॉक बसविण्याची कार्यवाही अत्यंत रहदारीचा चौक असल्याने दिवस रात्र काम सुरू असल्याने कामाच्या आवश्यकतेनुसार संबंधित गुत्तेदाराद्वारे पेव्हर ब्लॉक हलविण्यात येत असल्याबाबत लेखी पत्राद्वारे कल्पना देण्यात आलेली आहे. त्यामुळे आपणांकडे असलेल्या स्टॅक मेजरमेंट च्या मोजमापात दररोज बदल होण्याची शक्यता आहे.

अतिरिक्त शहर अभियंता यांना पेव्हर ब्लॉकच्या साठ्याबाबत कोणतीही विचारणा केली नसतानाही त्यांनी खुलासा पाठविला आहे, जो की चौकशीला मान्य करता येणार नाही. कारण आझाद चौकात चौकशी समितीने दिनांक २०.०६.२००८ रोजी ज्यावेळी पेव्हर ब्लॉकचा साठा मोजला, त्यावेळी आझाद चौकात पेव्हर ब्लॉक बसविल्याचे कोठेही दिसले नाही. त्यामुळे पेव्हर ब्लॉक गुत्तेदाराकडून हलविणेची बाब चौकशीत गृहीत धरता येणार नाही. तसेच संबंधित गुत्तेदार पेव्हर ब्लॉक काढतांना/हलवितांना बाहेरील बाजूचा स्टॉक अगोदर हलवील. परंतु प्रत्यक्ष पाहणीत आतील बाजूस पोकळी असून सदरील पोकळीतून पेव्हर ब्लॉक्स काढले असणे केवळ अशक्य आहे. त्यामुळे अतिरिक्त शहर अभियंता यांनी केलेला दावा मान्य करता येत नाही.

# पेव्हर ब्लॉक चौकशीचे निष्कर्ष

१. पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम हे पुढील चौकात करण्याचे प्रस्तावित आहे.

१. महावीर चौक
२. रेल्वेस्टेशन चौक
३. पंचवटी चौक
४. आझाद चौक
५. चंपा चौक
६. टी.व्ही.सेंटर चौक

चौकशीअंतर्गत प्रत्यक्ष स्थळपाहणी दिनांक १७.६.२००८ रोजी केली असता फ़क्त पंचवटी चौकातील काम अंतिम टप्प्याच्या प्रगतीपथावर असल्याचे आढळून आले. बाकी इतर चौकाच्या बाबतीत या कामाबाबत कोणतीही कार्यवाही दिसून आली नाही.

२. सदरील कामाअंतर्गत संबंधित ठेकेदाराने एकूण ४०५७३९ नग पेव्हर ब्लॉक्स उक्त चौकातील साईटवर साठा (स्टॉक) केल्याचा दावा या कामाशी संबंधित अभियंत्यांनी केला आहे. या साठ्यांपैकी प्रत्यक्ष स्थळ पाहणीअंतर्गत दिनांक २०.६.२००८रोजी आझाद चौकाजवळील साठ्याची समक्ष मोजमापे घेतली असता कामाशी संबंधित अभियंत्यांनी दिलेल्या पेव्हर ब्लॉकच्या (२९१.१२ घ.मी.) परिमानाच्या सुमारे ५५% (१६०.४२ घ.मी.)आढळून आला. म्हणजेच पेव्हर ब्लॉक्सचे परिमाण ४५% ने कमी आढळून आले.

३. झालेल्या कामाची मोजमापे, मोजमाप पुस्तिका क्र.२२१४ मधील पान क्र.१ ते ६ वर घेण्यात आली असून ती श्री.काझी तौफ़िक अहमद, सहा.अभियंता यांनी नोंदविली असून त्यावर श्री.काकडे, एस.डी.,उपअभियंता (बांधकाम) यांनी व श्री.एम.डी.सोनवणे, अति.शहर अभियंता यांनी मान्यतेची स्वाक्षरी केलेली आहे.

४. सदरील प्रकरणी पेव्हर ब्लॉकच्या दर्जाची तपासणी ही शासकीय तंत्रनिकेतन धुळे व एस.जी.एस. प्रा.लि. पुणे येथून केल्याचे दिसून येते. औरंगाबाद येथे शासकीय तंत्रनिकेतन ,शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय व एम.जी.एम.चे जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालय अशी दर्जेदार तपासणी यंत्रणा उपलब्ध असतांना पेव्हर ब्लॉकची तपासणी बाहेरील संस्थांकडून करण्याचा उद्येश काय होता हे लक्षात येत नाही.

५. पेव्हर ब्लॉकच्या दर्जा तपासणीसाठी त्याचे नमूने साधारणपणे दिनांक १८.०४.२००८ पर्यंत पाठविले आहेत. जेव्हा माल प्राप्त होतो, तेव्हाच चाचणीसाठी त्याचे नमूने आपण पाठवतो. यावरून असे दिसते की, संपूर्ण पेव्हर ब्लॉकचे नग (Quantity) ही मार्च २००८ अखेरीस प्राप्त झालेली नसतांनाच संबंधित ठेकेदारास अग्रिम अदाई केलेली आहे.

६. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता परिच्छेद क्रमांक १०.२.२१ मधील टीप -२ नुसार नंतरच्या महिन्यात म्हणजेच, एप्रिल –२००५ मध्ये बांधकामावर वापरण्यासाठी

साहित्य आवश्यक नसेल तर शक्यतोवर, मार्च महिन्याच्या शेवटी प्रतिभूती आगाऊ रकमा देऊ नयेत. याही नियमातील तरतूदींचा भंग केल्याचे दिसून येते. कारण अद्यापपर्यंतही सदरील पेव्हर ब्लॉकचे साहित्य पूर्णपणे वापरलेले नाही.

७. सदरील कामाच्या संचिकेची तपासणी केल्यानंतर संबंधित ठेकेदारास अग्रिम देण्याची शिफ़ारस श्री.एम.डी.सोनवणे,अति.शहर अभियंता यांनीच प्रथमत: केल्याचे आढळून आले. अतिरिक्त शहर अभियंता यांच्या सूचनेनुसार उपअभियंता (बांधकाम)श्री.काकडे एस.डी. यांनी सहाय्यक अभियंता यांना अग्रिमाचे (Advance) देयक तयार करण्याच्या सूचना दिल्याचे दिसून आले.

८. संबंधित ठेकेदारास अग्रिम रक्कम रू.५८,३२,४०६/- देण्यात आले आहे. मात्र ( आयकर इ.च्या वजाती जाता) ठेकेदारास निव्वळ रक्कम रू.४३,४८,४१५/- देण्यात आलेली आहे.

९. आतापर्यंत प्राप्त झालेल्या साहित्याची म्हणजेच ४०५७३९ नग पेव्हर ब्लॉकची संपूर्णपणे मोजणी अशक्य आहे. कारण त्यातील बराचसा साठा ठेकेदाराच्या चंपा चौकाजवळील स्वत:च्या मालकीच्या जागेत ठेवला आहे व तेथे चारपाच आक्रमक कुत्रेही ठेवलेले आहेत. त्यामुळे तो साठा स्वतंत्रपणे अचानक व व्यवस्थितरित्या तपासता येत नाही. म्हणून केवळ आझाद चौकाजवळील साठा मोजला असता साधारणपणे तो या कामाशी संबंधित अभियंत्यांनी दिलेल्या परिमाणाच्या केवळ ५५% आढळून आला आहे. याचाच अर्थ असा होतो की, एकूण साठा जो मोजमाप पुस्तकात दर्शविला आहे,तो देखील अचूक नाही त्यात सुमारे ४० ते ४५% घट किंवा कमी आहे. म्हणजेच साधारणपणे एकूण रू.७७,७५,८२२/- रकमेच्या पेव्हर ब्लॉकच्या ६०% पेव्हरब्लॉक्स प्राप्त झाल्याचे गृहीत धरले तरी, प्राप्त झालेल्या साहित्याची किंमत साधारणपणे रू.४६,६५,४९३/- येते. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता (MPW Account Code) परि.१०.२.२१ नुसार प्राप्त साहित्याच्या ७५% म्हणजेच रू.३४,९९,१२०/- एवढेच अग्रिम ठेकेदारास देणे अनुज्ञेय ठरते.

१०. महानगरपालिका,औरंगाबादची आर्थिक स्थिती लक्षात घेवून व तसेच अनेक ठेकेदारांची कामे पूर्ण होवून त्याची अंतिम देयकांची प्रदाने प्रलंबित असतांना सदरील कामाच्या प्रकरणी अग्रिमाची घाई का व कशासाठी केली, यात महापालिकेचे कोणते हीत साधले, हे प्रश्न अनुत्तरीत आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता परिच्छेद क्रमांक १०.२.२१ नुसार (सोबत परि.१ जोडला आहे.) नियमाप्रमाणे कंत्राटदारास आगाऊ रकमा देण्यास मनाई आहे. तथापि, अपवाद म्हणून आकस्मिकता किंवा तातडीच्या वेळी (Emergency) प्राप्त साहित्याच्या किंमतीच्या केवळ ७५% अग्रिम देता येतो. या नियमांचे पालन झालेले नाही.

११. उपरोक्त बाबी लक्षात घेता अग्रिम अदाईची शिफ़ारस महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखासंहिता परि.क्र.१०.२.२१ नुसार योग्य दिसून येत नाही.

१२. सदरील कामाच्या देयकाच्या तपासणीअंती असेही दिसून येते की, लेखा विभागातही या देयकाची छाननी/ तपासणी योग्य प्रकारे केलेली नाही. सदरील अग्रिमाचे (Ist RA Bill) देयकातील परिगणना ही चुकीची असतांना लेखा विभागाने ते कसे पारीत केले याचा बोध होत नाही.

१३. सदरील कामाच्या चौकशीत आढळलेल्या बाबी गंभीर व चिंतनीय असल्याने या संपूर्ण कामाची सक्षम तांत्रिक प्राधिकाऱ्यामार्फ़त सखोल चौकशी करून प्रत्यक्षात प्राप्त झालेले साहित्य व झालेल्या कामाची रक्कम निर्धारित करावी त्यानंतर जादा दिलेल्या अग्रिमाची व्याजासह (१२.५% दराने) संबंधित ठेकेदाराकडून वसूली करावी लागेल.

या सर्व प्रकारास जबाबदार असलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांवर प्रशासनाने योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी, असे या चौकशीचे मत आहे.

# परिशिष्ट –१.

## महाराष्ट्र सार्वजनिक बांधकामे लेखासंहिता.

## महत्वाचे उतारे

**परि.क्र.१०.२.१९.**

तयार बांधकामासाठी ज्याला कंत्राट दिले असेल त्या कंत्राटदाराला परिच्छेद १०.२.२१ (क) अन्वये विभागीय अधिकाऱ्याने प्रतिभूत आगाऊ रक्कम दिली असेल तेव्हा, नमुना ५०(सा.बां.४४७) मधील करारनाम्यावर कंत्राटदाराने सही केली आहे हे पाहिले पाहिजे आणि आगाऊ रकमांचा तपशीलवार लेखा नमुना ४७(सा.बां.४१०) मधील बिलाच्या भाग दोन मध्ये ठेवला पाहिजे. कंत्राटदाराने कामाच्या जागेवर आणलेल्या प्रत्येक प्रकारच्या सामानांच्या संबंधात व विभागीय अधिकाऱ्याच्या आदेशान्वये दिलेल्या आगाऊ रकमांच्या संबंधात वेगवेगळ्या नोंदी असाव्यात या आगाऊ रकमा, कंत्राटदाराने केलेल्या बांधकामाच्या बिलातून वजाती करून वसूल केल्या पाहिजेत. कारण सामान हे बांधकामासाठी वापरण्यात येते व बांधकामाच्या ज्या बाबींसाठी त्याचा वापर करण्यात येतो त्या बाबींसाठी प्रत्यक्ष मोजणीच्या आधारावर बिल केले जाते. याचे पालन केले जात आहे हे पाहण्यासाठी बिलाचे भाग एक व दोन हे ताडून पाहिले पाहिजेत. वसुल्या केल्यानंतर,भाग दोन मधील संबंधित बाबींच्या अदत्त रकमा या, “वजा - मागील बिलापासून मोजलेल्या बांधकामात वापरलेले परिमाण” या स्तंभात, बिलाच्या भाग एक मध्ये पार पाडलेले म्हणून दर्शवलेल्या बांधकामांच्या बाबींवर कंत्राटदाराने वापरलेल्या सामानांइतक्याच सामानाच्या वजा नोंदी करून, कमी कराव्यात.

**टीप १.–** मोजणी पुस्तकात सामानांच्या परिमाणाची कोणतीही नोंद करू नये. परंतु बिलावर छापलेल्या प्रमाणपत्र ३ वर उपविभागीय किंवा विभागीय अधिकाऱ्याने परिच्छेद १०.२.२१ (क) च्या अनुसार सही करावी.

**टीप २.–** रूपये २,००० आणि त्यापेक्षा जास्त, प्रतिभूत आगाऊ रकमांच्या बाबतीत कंत्राटदाराकडून करारनामा बंधपत्र करून घेण्यात यावे व ते फ़क्त पहिले प्रदान देण्याचे वेळीच करून घ्यावे. त्यानंतरची प्रदाने करतांना बंधपत्र करून घेण्याची आवश्यकता नाही.

**घ.– कंत्राटदारांना आगाऊ रकमा देणे.**

**परि.क्र.१०.२.२१.**

नियमाप्रमाणे कंत्राटदारास आगाऊ रकमा देण्यास मनाई आहे आणि प्रत्यक्ष केलेल्या कामाव्यतिरिक्त ज्या पध्दतीने इतर कोणीतीही प्रदाने केली जात नाही ती पध्दती ठेवण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करावी. तथापि, पुढील प्रकरणे त्याला अपवाद आहेत :-

(क) ज्या कंत्राटदाराचे कंत्राट तयार बांधकामाचे आहे अशा कंत्राटदाराच्या बाबतीत, जागेवर आणलेल्या सामानांच्या प्रतिभूतीवर त्याला आगाऊ रक्कम हवी असते. विभागीय अधिकाऱ्यांस अशा प्रकरणांमध्ये,(त्यांनी स्वत: निर्धारित केल्याप्रमाणे) अशा सामानांच्या मूल्याच्या ७५ टक्केपेक्षा अधिक नसेल इतक्या आगाऊ रकमा मंजूर करता येतील, मात्र ते सामान अनाशवंत स्वरूपाचे असावेत आणि ज्या अन्वये शासनाला सामानांवर धारणाधिकार मिळेल व कंत्राटदाराने बांधकाम पार पाडण्याचे पुढे ढकलल्यामुळे किंवा सामानांच्या तुटीमुळे किंवा गैरवापरामुळे होणाऱ्या हानीपासून आणि त्यांच्यावर योग्य ते लक्ष ठेवण्यासाठी व त्यांच्या सुरक्षित अभिरक्षेसाठी होणाऱ्या खर्चापासून शासन सुरक्षित राहील असा रीतसर करार केलेला असला पाहिजे. ज्याच्यावर आगाऊ रक्कम दिली आहे ते सामान प्रत्यक्षात कामाच्या जागेवर आणलेले आहे, कंत्राटदारास त्यांच्या प्रतिभूतीवर यापूर्वी कोणतीही आगाऊ रक्कम मिळालेली नाही आणि बांधकामांच्या ज्या बाबींसाठी पूर्ण कामाचे दर कबूल करण्यात आले आहेत त्या बांधकामांच्या बाबींवर वापरण्यासाठी कंत्राटदारास ते सामान आवश्यक आहे, असे प्रमाणपत्र उपविभागीय अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याने दिल्यावरच अशा आगाऊ रकमांची प्रदाने केली जातील. असे प्रमाणपत्र देणारा अधिकारी हा, परिणामत: घडेल अशा कोणत्याही अतिप्रदानांसाठी व्यक्तिश: जबाबदार धरला जाईल. अशा प्रकारे दिलेल्या आगाऊ रकमांच्या वसुल्या या कंत्राटदारावर सोपवलेले संपूर्ण काम पूर्ण होईपर्यंत पुढे ढकलण्यात येऊ नये. या वसुल्या, सामान वापरले असेल त्याप्रमाणे कंत्राटदाराच्या केलेल्या बांधकामाच्या बिलांमधून कराव्यात आणि बांधकामाच्या ज्या बाबीत त्यांचा वापर केला असेल त्या बाबींचे बिल करण्यात येईल. तेव्हा तेव्हा आवश्यक त्या वजाती कराव्यात.

**टीप १.–** कंत्राटदाराला,बांधकामाच्या जागेवर आणलेल्या वाळू, डांबर इत्यादींवर प्रतिभूत आगाऊ रकमा देता येतील; मात्र अशा आगाऊ रकमा मंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्याचे, हे सामान खराब होणार नाही किंवा इकडे तिकडे जाणार नाही हे पाहण्याची योग्य ती खबरदारी घेतलेली आहे, याबाबत समाधान झाले असले पाहिजे.

**टीप २.–** नंतरच्या महिन्यात, म्हणजेच, एप्रिलमध्ये बांधकामावर वापरण्यासाठी सामान आवश्यक नसेल तर, शक्यतोवर,मार्च महिन्याच्या शेवटी प्रतिभूत आगाऊ रकमा देऊ नयेत.

**टीप ३.–** सेंटरींग, पाण्याचे नळ टाकणे व कामगारासाठी झोपड्या बांधणे इत्यादींसाठी वापरलेल्या सामानांच्या संबंधात कंत्राटदारास प्रतिभूत आगाऊ रकमा देऊ नयेत कारण कराराच्या अटीनुसार, त्या बाबी काम पूर्ण झाल्यानंतर शासनाची मालमत्ता रहात नाहीत.

**टीप ४.–** शासनाच्या पूर्वमंजूरीशिवाय उक्त्या कामगारांना कोणत्याही प्रतिभूत किंवा अन्यथा आगाऊ रकमा देऊ नयेत.

(ख) विभागीय अधिकाऱ्यास, कामे पार पाडण्यासाठी, भारतीय विद्युत अधिनियम,१९१० अन्वये विद्युत पुरवठा उपक्रमास आगाऊ रकमा देण्याच्या पूर्ण शक्ती आहेत.

(ग) इतर सर्व बाबतीत, शासनास नुकसानीपासून सुरक्षित ठेवण्यासाठी व आगाऊ रकमा देण्याची पध्दती सर्वसामान्य होण्यास किंवा पूर्णपणे आवश्यक असेल त्याहून जास्त मुदतीपर्यंत चालू राहण्यास प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेऊन अपवादात्मक परिस्थितीत व केवळ शासनाच्या मंजूरीने अनिवार्य असतील अशा आगाऊ रकमा प्राधिकृत करता येतील.

<u>टीप १.-</u> प्रतिभूत आगाऊ रकमापासून वेगळ्या असलेल्या, सामान, यंत्रसामग्री इ.च्या प्रतिभूतीवर (विशिष्ट कंत्राटाच्या विशेष अटींनुसार) आगाऊ रकमा दिल्या असतील तेव्हा ते सामान, यंत्रसामग्री इत्यादी गोष्टी, आगाऊ रकमा देण्याच्या वेळीच शासनाकडे नमुना ५० क मध्ये निसंशयपणे तारणगहाण ठेवाव्यात. त्या सामानमध्ये गहाणदार म्हणून शासनाचा हितसंबंध आहे असे नमूद करून विमा कंपन्यांच्या असोसिएशन पूलमध्ये त्या सामानांचा विमा उतरवण्यासही कंत्राटदाराला भाग पाडावे.

<u>टीप २.-</u> अपवादात्मक परिस्थितीत, जर कंत्राटदारांना कर्जे द्यावयाची असतील तर ती पुरेशा प्रतिभूतीवर द्यावीत, केवळ वैयक्तिक प्रतिभूतीवर देऊ नयेत.

<u>टीप ३.-</u> जेव्हा जेव्हा खाजगी व्यक्तींना आगाऊ रकमा देण्याच्या दृष्टीने खाजगी व्यक्तीच्या मत्तेच्या मूल्यांकनाचा प्रश्न उपस्थित होईल तेव्हा तेव्हा मूल्यांकनासाठी कामावर नेमलेला तांत्रिक अधिकारी हा एकतर राज्याचा किंवा केंद्राचा सरकारी अधिकारी असावा आणि जर अर्हताप्राप्त सरकारी अधिकारी उपलब्ध नसेल तर बिनसरकारी तांत्रिक अधिकारी नियुक्त करता येईल ; तथापि त्याची निवड शासनाकडून करण्यात यावी.

<u>परि.क्र.१०.२.२२</u>.

प्रत्यक्षपणे पार पाडलेल्या बांधकामासाठी करावयाचे आगाऊ प्रदान (परिच्छेद २.१.१.(३) पहा) हे, बांधकामाच्या ज्या परिमाणाबद्दल पैसे दिलेले आहेत त्याहून कमी नसलेल्या परिमाणाचे काम प्रत्यक्षात करण्यात आले आहे अशा अर्थाच्या (उप विभागीय अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या) जबाबदार अधिकाऱ्याच्या प्रमाणपत्रावर करता येईल आणि असे प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यास, परिणामत: त्या बांधकामावर कोणतेही अतिप्रदान झाल्यास, व्यक्तिश: जबाबदार धरण्यात येईल. तथापि, कोणत्याही परिस्थितीत तपशीलवार मोजणीशिवाय अंतिम प्रदान करता येणार नाही.

<u>टीप-</u> विभागीय अधिकाऱ्यांना ,त्यांनी पुरवलेल्या सामानांच्या अदमासे मोजणीवर, केलेल्या बांधकामासाठी ज्या शर्ती असतील तशाच शर्तीवर कंत्राटदारांना आगाऊ रकमा देण्यास प्राधिकृत केले आहे.

# परिशिष्ट –२
# पेव्हर ब्लॉक चौकशीचे मुद्दे

१. उल्लेखित काम कोणकोणत्या चौकात करण्यात आलेले आहे ?

२. किती प्रमाणात काँक्रीट पेव्हींग ब्लॉक साईटवर आलेले आहेत.

३. त्याची अंदाजे किंमत किती होते.

४. झालेल्या कामाचे मोजमाप कोणत्या अभियंत्याने घेतले ?

५. संबंधित ठेकेदारास ८० लक्ष रूपयांचे देयक अदा करण्याची कोणी शिफ़ारस केलेली आहे.

६. आतापर्यंत झालेले काम ८० लक्ष रूपये किंमतीचे झाले आहे काय ?

७. साईटवर झालेल्या पेव्हींग ब्लॉकची किंमत अदा केलेल्या रकमेइतकी होते का ?

८. देयक अदा करण्याबाबतची शिफ़ारस योग्य आहे का ?

# केंद्रीय प्राथमिक शाळा, पैठणगेट ,
## महानगरपालिका,औरंगाबाद
## अभिलेखे तपासणी अहवाल.

**मुद्या क्र. १ : महानगरपालिका प्राथमिक शाळा, पैठण गेट या शाळेला मिळालेली अनुदाने, त्यांच्या नोंदी विनियोग इत्यादी.**

सर्व शिक्षण मोहिमे अंतर्गत शाळा अनुदान सन २००३-०४ व सन २००४-०५ या आर्थिक वर्षाकरीता शासन परिपत्रक क्र. मप्राशिप/सहसं/सशिओ/२००२-०३/२४६१, दि.४.९.२००२ तसेच महानगरपालिका शिक्षण विभाग यांचे पत्र क्र. मनपा/शिक्षण/१९३५/०२-३ दिनांक १०.१२.२००२ प्रमाणे सदर शाळेस प्राप्त अनुदान सर्वशिक्षा अभियान अंतर्गत खर्च करणे बाबत अटी लागू केलेल्या दिसून येतात. त्याप्रमाणे शाळेमार्फ़त खर्च करणे आवश्यक ठरते. जसे गणित पेटी, विज्ञान पेटी, जिव/रसायन व पदार्थ विज्ञानातील आवश्यक उपकरणे /खेळणी साहित्य इ.बाबींवर खर्च अपेक्षित आहे. शालेय समितीचे अध्यक्ष व शाळेचे मुख्याध्यापक यांच्या संयुक्त खात्यावर रक्कम जमा असावी. सदर खर्च करणेस शालेय कमिटीची बैठक घेवून सल्ला मसलतीने योग्य तीच खरेदी / दुरूस्तीची मान्यता घेवूनच खर्च करणे, केलेल्या खर्चाबाबत सविस्तर विनियोग प्रमाणपत्रासह विहित नमुन्यात अहवाल सादर करणे बंधनकारक आहे. परंतु लेख्यांची तपासणी करतांना या सर्व बाबींचा अंतर्भाव दिसून आला नाही. अनुदान फ़क्त खर्च करणे असा ग्रह ठेवून वर्षे संपण्याच्या शेवटच्या दिवशी एकाच वेळी, दि.३१.३.२००४ रोजी खरेदी केल्याचे चिकट बुकावरून दिसते. महानगरपालिका शाळा केंद्रीय प्राथमिक शाळा, पैठणगेट या शाळांना सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सन २००३-०४ व सन २००४-०५ या आर्थिक वर्षात शिक्षण विभागामार्फ़त मिळालेले अनुदान खर्चाकरीता शिक्षण विभागाचे परिपत्रकाप्रमाणे म्हणजे शालेय कमिटीची बैठक घेवून मान्यता घेवूनच खर्चाबाबत अहवाल व प्रमाणपत्रासह सादर करणे गरजेचे ठरते, तसे दिसून येत नाही.

**मुद्या क्र.२ : स्टॉक रजिस्टर व कॅश बुक, यातील नोंदी बाबत.**

शाळेमार्फ़त केलेली खरेदी /खर्च हा वित्तीय वर्ष संपण्याच्या शेवटच्या दिवशीच केल्याचे बिलावरून स्पष्ट होते. केलेला खर्च हा नियमाप्रमाणे शालेय साहित्यासाठी करणे गरजेचे होते. परंतु साधारण वस्तु खरेदी करून विनाकारण अनुदानाचा खर्च दर्शविलेला वाटतो. अनुदान मिळालेली रक्कम नियमाप्रमाणे बँकेमध्ये ठेवून आवश्यकतेनुसार रक्कम काढणे अभिप्रेत आहे. त्यामुळे झालेला सर्व व्यवहार हा शंकास्पद वाटतो. म्हणजे अनुदान रकमेचा विनियोग योग्य पध्दतीने केलेला नाही. असे प्रथमदर्शनी दिसून येते.

१. सन २००३-०४ या आर्थिक वर्षामध्ये दि.१८.६.०५ , दि.१५.६.२००० रोजी वस्तु खरेदी केल्याबाबतचे बिले दिसून येतात.

२. वस्तु खरेदीच्या बिलामध्ये दिनांक /रक्कम/वस्तु मध्ये खाडाखोड केल्याचे दिसून येते.

३. किर्द रजिस्टर मधील नोंदी व साहित्य खरेदी बिले यांचा ताळमेळ घेता आलेला नाही. (मारूती इंटरप्रायजेस बिल नं.२०८ नुसार खरेदी खेळणी एकूण रू.१०००/-)

४. सन २००४-५ या वर्षामध्ये शाळेमार्फ़त किर्द रजिस्टरवर दिनांक १०.६.०५ रोजी नविन नळ कनेक्शन करीता रू.४०००/- व खेळणी खरेदी रू.३०००/- अशा नोंदी दिसून आल्या. पाहणी केली असता किर्द रजिस्टरचे पाने चिटकविलेले दिसून आले. हि बाब शंकास्पद आहे.

५. दिनांक २६.४.२००६ तसेच दिनांक ९.११.२००६ रोजी खेळाचे साहित्य व लाऊड स्पिकर खरेदी करण्याकरीता देयक क्र.९३८ दि.३१.३.०६ रक्कम रू.४०००/- देयक क्र.९५० दि.३१.३.०६ रूपये २०००/- देयक क्र.४९७ दि.८.३.०७ रू.४०००/- या अन्वये खरेदी झाल्याचे दिसून येते. परंतु सदरील देयकाच्या दिनांकामध्ये खाडाखोड झाल्याचे दिसून येते.

**६.** स्टॉक रजिस्टर क्र.२ तपासणी केली असतांना पान क्र.१ वर साहित्याचे नांव व संख्या दिसून येते. (दि.५.४.२००४) सदरील स्टॉक रजिस्टरवर सक्षम अधिकाऱ्यांची स्वाक्षरी दिसून येत नाही.

७. पान क्र.२ वर सन २००४-०५ ची साहित्याची नोंद दिसून येते. परंतु वेळोवेळी खरेदी केलेल्या साहित्याची नोंद स्टॉक रजिस्टर मध्ये दिसून येत नाही.

**मुद्या क्र.३: शालेय पोषण आहार योजने अंतर्गत तांदूळाची मागणी, प्राप्त तांदूळ, शिल्लक तांदूळ इत्यादी बाबत.**

सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षामध्ये शालेय पोषण आहार योजने अंतर्गत तांदूळाची मागणी, प्राप्त तांदूळ, शिल्लक व खिचडी देयकांबाबत उपलब्ध अभिलेख्यांआधारे तपासणी करण्यात आली. त्यामध्ये साठा रजिस्टर व वितरण रजिस्टर मधील नोंदी भिन्न असल्याचे दिसून आले. तपशील पुढील प्रमाणे -

## सन २००० ते २००१ तांदूळ वाटप

| माहे | साठा रजिस्टर विद्यार्थी संख्या | वितरण रजिस्टर वि.संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| **जुन २०००** | ३८७ | ३८१ | |
| जुलै २००० | ३८७ | ३८७ | माहे जुलै २००० वर्ग १ ला ते ५ वा विद्यार्थी संख्येच्या नोंदी मध्ये खाडाखोड दिसून येते. साठा रजि.वर ३८७ विद्यार्थी नोंद व वितरण रजिस्टरवर ३८१ विद्यार्थी ची नोंद दिसून येते. |
| ऑगस्ट२००० | ३७० | ३८१ | |
| सप्टेंबर २००० | ३६० | ३८१ | |
| ऑक्टोबर २००० | ३८५ | ३८१ | माहे ऑक्टो २००० मध्ये साठा रजिस्टर मध्ये वर्ग १ ला ते ५ वी विद्यार्थी संख्येच्या नोंदी मध्ये व्हाईटनर द्वारे खाडाखोड केल्याचे दिसून येते. |
| नोव्हेंबर २००० | ३८५ | ३८१ | |
| डिसेंबर २००० | ३८५ | ३८१ | माहे डिसे. २००० मध्ये साठा रजिस्टर मध्ये वर्ग १ ला ते ५ वी विद्यार्थी संख्या ३८५ वितरण रजिस्टर मध्ये ३८१ विद्यार्थी संख्या दिसून येते. प्रत्यक्षात साठा रजिस्टरवर ताळमेळ दिसून येत नाही. |
| जानेवारी २००१ | ३७७ | ३८१ | |
| फ़ेब्रुवारी २००१ | ३७७ | ३८१ | |
| मार्च २००१ | ३६० | ३८१ | |

**टिप: तपासणीस्तव हजेरी पट वर्ग १ ते ५ पर्यंतचे उपलब्ध झाले नाही.**

## सन २००१ ते २००२ तांदूळ वाटप

| माहे | साठा रजिस्टर विद्यार्थी संख्या | वितरण रजिस्टर विद्यार्थी संख्या | हजेरी पट संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| जुन २००१ | ३२३ | ३०७ | | माहे जून २००१ मध्ये वर्ग १ ली ते ५ वी वर्ग संख्येमध्ये साठा रजि. मध्ये ४३१ विद्यार्थी संख्या असे दर्शविण्यात येते. परंतु त्यापैकी ३२३ विद्यार्थ्यांना तांदूळ वाटप करण्यात आल्याचे दिसून येत नाही. |
| जुलै२००१ | ३२३ | ३०७ | | |
| ऑगस्ट२००१ | ३२३ | ३०७ | | |
| सप्टेंबर २००१ | ३०० | ३०७ | | |
| ऑक्टोबर २००१ | १८१ | ३०७ | | |
| नोव्हेंबर २००१ | १८१ | ३०७ | | |
| डिसेंबर २००१ | १८१ | ३०७ | | |
| जानेवारी २००२ | ३०० | ३०७ | | |
| फ़ेब्रुवारी २००२ | ३०० | ३०७ | | |
| मार्च २००२ | ३०० | ३०७ | | |

**टिप: हजेरी पट तपासणीस्तव उपलब्ध झाले नाही.**

**मुद्या क्र.४: सन २००३-०४ व सन २००४-०५ मधील खिचडीच्या देयकांबाबत.**

सन २००३-२००४ व सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत खिचडीचे देयकांची तपासणी करण्यात आली आहे. त्यामध्ये सन २००४-०५ या वर्षात संबंधित ठेकेदारास रू.४९८९/- इतक्या रकमेचे अतिप्रदान झाले आहे. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे .

**सन २००३-२००४ खिचडी शिजवून देण्याचे देयक.**

| माहे | प्रत्यक्ष हजेरी पटावरील एकूण विद्यार्थी संख्या वर्ग १ ते ५ | साठा /वितरण रजि.वरील गोषवारा प्रमाणे एकूण विद्यार्थी संख्या वर्ग १ ते ५ | साठा रजि. एकूण विद्यार्थी संख्या | खिचडी शिजवून देण्याची देयकाची रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| जून २००३ | २९९ | २७९ | २७९ | छळश्रश्र | |
| जुलै २००३ | ३१५ | २५५ | २५५ | Nill | |
| ऑग २००३ | ३१८ | ७५४० | ७४०७ | रू.३७०४/- | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सप्टे २००३ | ३१८ | ७२७५ | ७१४९ | रू.३५७५/- | |
| ऑक्टो २००३ | ३१० | -- | ३८४२ | रू. ४७८४/- | |
| नोव्हे २००३ | ३०९ | ६४८५ | ५७२६ | | |
| डिसे २००३ | ३११ | ८०८४ | ७३१० | रू.९७३५/- | |
| जाने २००४ | ३११ | ७१५३ | ६६२६ | | |
| फ़ेब्रु २००४ | ३११ | ६५२० | ५५३४ | | |
| मार्च २००४ | ३११ | -- | २८६५ | १४३२ | |
| एप्रिल २००४ | | -- | ४६४५९ | | |
| | | | ३२२२९/- | **रू. २३२३०/-** | |

## खिचडी शिजवून देण्याच्या देयकाबाबत.
## सन २००४-२००५

| माहे | प्रत्यक्ष हजेरी पटावरील एकूण विद्यार्थी संख्या वर्ग १ ते ५ | साठा /वितरण रजि.वरील गोषवारा प्रमाणे एकूण विद्यार्थी संख्या वर्ग १ ते ५ | साठा रजि. एकूण विद्यार्थी संख्या | खिचडी शिजवून देण्याची देयकाची रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| जून २००४ | ३३२ | | | | |
| जुलै २००४ | ३३२ | २४३३ | १९८५ | १९८५ | माहे जुलै खिचडी देण्याच्या बिल गोषवारा प्रमाणे ९९२/- रू. होत असतांना १९८५/- अदा करण्यात आले.म्हणजेच ९९३/- रू. जास्तीचे अदा करण्यात आले. |
| ऑग २००४ | ३२६ | ८३१७ | ७००४ | ३५०२ | |
| सप्टे २००४ | ३२५ | ७२४९ | ४७२२ | २३६१ | |
| ऑक्टो २००४ | ३२३ | ७६५९ | ६११६ | ३०५८ | |
| नोव्हे २००४ | ३२९ | १९९८ | १६२५ | ८१३ | |
| डिसे २००४ | ३३१ | ८८०६ | ७७७१ | ४९९१ | माहे डिसे २००४ मध्ये विद्यार्थी संख्या ७७७१×०.५० पैसे =३८८६/- रू. इतके बिल होत असतांना खिचडी शिजवण्याचे बिल ४९९१/- रू. बिल अदा करण्यात आले म्हणजेच ११०५/- रू. जास्तीचे अदा करण्यात आले. |
| जाने २००५ | ३३० | ७२८२ | ६०८४ | ३९७७ | माहे जाने.०५ मध्ये एकूण विद्यार्थी संख्या ६०८४×०.५० पैसे =३०४२/- रू.इतके बिल होत असतांना प्रत्यक्षात ३९७७/- रू. बिल अदा करण्यात आले म्हणजेच ९३५/- रू. जास्तीचे बिल अदा करण्यात आले. |
| फ़ेब्रु २००५ | ३३० | ७६१३ | ६४१४ | ४१८५ | माहे फ़ेब्रु ०५ मध्ये विद्यार्थी संख्या ६४१४×०.५० पैसे =३२०७/- रू इतके बिल होत असतांना खिचडी शिजविण्याचे प्रत्यक्ष बिल ४१८५/- रू. बिल अदा करण्यात आले म्हणजेच रू.९७८/- जास्तीचे अदा करण्यात आले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मार्च २००५ | ३३४ | ७६१३ | ६६०० | ४२७८ | माहे मार्च ०५ मध्ये विद्यार्थी संख्या ६६००×०.५० पैसे =३३०० रू. इतके बिल होत असतांना प्रत्यक्ष रू. ४२७८/- बिल अदा केले म्हणजेच ९७८/- रू. जास्त अदा केल्याचे दिसून येते. |
| एकूण | | | ४८,३२१/- | **२९१५०/-** | |

**<u>विशेष टिप</u>** :- सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षा मध्ये वर्ग १ ते ५ एकूण उपस्थित विद्यार्थी संख्या व सदर वर्षा मध्ये प्राप्त तांदूळ ४३ क्वि. उपलब्ध झाल्याचे साठा रजिस्टरवरून दिसून येते. नियमाप्रमाणे प्रति विद्यार्थी १०० ग्रा.तांदळाची खिचडी देणे बंधनकारक असतांना प्राप्त तांदळावरून प्रति विद्यार्थी १०० ग्रा. पेक्षा कमी तांदूळ खिचडी वाटप झाल्याचे स्पष्ट होते. परंतु खिचडी शिजवून देण्याचे देयक हे मात्र प्रति विद्यार्थी संख्या ५० पैसे आहे.

१. सत्कार केटरर्स यांनी ऑगस्ट २००३ या महिन्यामधील खिचडी शिजवून देण्याच्या

२. देयकामध्ये (देयक क्र.२२१ दिनांक ३१.८.०३) एकूण विद्यार्थी संख्या, शाळेचे दिवस या बाबत कोणताही उल्लेख दिसून येत नाही व मूळ देयकामध्ये खाडाखोड केल्याचे दिसते. (रक्कम रू.३७०४/-)

३. सत्कार केटरर्स यांनी सप्टेंबर २००३ या महिन्यात मधील खिचडी शिजवून देण्याच्या देयकामध्ये (देयक क्र.२२२ दि.३०.९.२००३) एकूण विद्यार्थी संख्या शाळेचे दिवस याबाबत कोणताही उल्लेख दिसून येत नाही. (रक्कम रू.३५७५/-)

४. सत्कार केटरर्स यांनी माहे नोव्हेंबर २००३ या महिन्यामधील खिचडी शिजवून देण्याच्या देयकामध्ये (देयक २००३ दिनांक ३०.११.२००३) एकूण विद्यार्थी संख्या शाळेचे कामाचे दिवस या बाबत कोणताही उल्लेख दिसून येत नाही. (रक्कम रू.४७८४/-)

**मुद्या क्र.५ : तांदूळ वाटप व हजेरी पट तपासणी.**

शालेय पोषण आहार सन २००० ते २००२ या आर्थिक वर्षामध्यें एकूण मिळालेले तांदूळ व वर्ग १ ली ते ५ वी पर्यंत उपस्थित एकूण विद्यार्थी संख्या या नोंदी तपासण्याकरीता उपलब्ध करून दिलेल्या साठा रजिस्टर मध्ये खाडाखोड करून व्हाईटरने नोंदी घेतल्याचे दिसून येते. परिणामी ताळमेळ घेता आलेला नाही. वाटपाबाबतचा तपशील खालील तक्त्यामध्ये दर्शविला आहे.

| **अ.क्र.** | **दिनांक** | **वर्ग** | **साठा रजिस्टर विद्यार्थ्यांवर दर्शविलेली संख्या** | **प्रत्यक्ष तांदूळ वाटप रजिस्टर विद्यार्थी संख्या** | **शाळेचे हजेरी रजिस्टर विद्यार्थी संख्या** |
|---|---|---|---|---|---|
| १ | २३.६.०३ | १ ला | ४४ | ५४ | ३४ |
| २ | २३.६.०३ | २ रा | ५१ | ४२ | ४१ |
| ३ | २३.६.०३ | ३ रा | -- | -- | -- |
| ४ | २३.६.०३ | ४ था | ४४ | ८१ | ७७ |
| ५ | २३.६.०३ | ५ वा अ+ब | ९१ | ४३ अ<br>३८ ब | ४६ अ<br>३२ ब |

तांदूळ वाटप करण्यात आलेल्या रजिस्टर मध्ये विद्यार्थ्यांच्या पालकांची स्वाक्षरी एक सारख्या असल्याचे दिसून येते.

**वर्ग १ ला**

एकूण मुले -२१ असल्याचे दिसते परंतु ७ विद्यार्थ्यांना तांदूळ वाटप झाल्याचे वाटप रजिस्टरवरील स्वाक्षरीवरून दिसते. तसेच एकूण ३२ मुलींपैकी ७ मुलींना तांदूळ वाटप केल्याचे वाटप रजिस्टर स्वाक्षरी वरून दिसून येते.

**वर्ग २ रा.**

एकूण १५ विद्यार्थ्यांना तांदूळ वाटप झाल्याचे स्वाक्षरी वरून दिसून येते. सदरील स्वाक्षरी हे एक समान असल्याचे वाटप रजिस्टर वरून दिसते. त्यामुळे तांदूळ वाटप बाबत शंका निर्माण होते. वर्ग-२ रा मधील सर्व २७ मुलींना तांदूळ वाटप झाल्याचे तांदूळ वाटप रजिस्टर वरून दिसून येते. परंतु सदरील स्वाक्षऱ्या ह्या एक सारख्या असल्याचे दिसून येते. त्यामुळे तांदूळ वाटपाबाबत शंका निर्माण होते.

**वर्ग ४ था**

गोषवारा प्रमाणे जून २००२ ते मार्च २००३ पर्यंत वर्ग चौथी मध्ये एकूण मुले / मुली यांची संख्या ५९/६० देण्यात आलेली आहे. तांदूळ वाटप करतांना मुले /मुली यांची संख्या ८१ दाखविण्यात आलेली आहे. म्हणजे २१ मुले / मुली जास्तीची आढळून येते.

**वर्ग ५ वा – अ**

सन २००२-०३ मध्ये वर्ग -५ मध्ये गोषवारा मध्ये एकूण मुले /मुली ४५ संख्या असल्याचे दाखविण्यात आले आहे. तांदूळ वाटप करतांना ४३ मुले /मुली यांनाच तांदूळ वाटप झाल्याचे वाटप रजिस्टरच्या स्वाक्षरी वरून दिसून येते.

**वर्ग –५ वी – ब**

वर्ग ५ वी ब मध्ये गोषवारा मध्ये एकूण ३२ मुले / मुलींची संख्या दाखविण्यात आली. तांदूळ वाटप रजिस्टर मध्ये ३८ मुले / मुलींची संख्या दिसून येते. परंतु तांदूळ वाटप रजिस्टर मध्ये मुले / मुली यांच्या स्वाक्षऱ्या एक सारख्या असल्याचे दिसते. त्यामुळे तांदूळ वाटपा बाबत शंका निर्माण होते.

१. दिनांक २१.०९.२००४ रोजी शालेय पोषण आहार शिधा पत्रिका क्र. WP ०६६७८४ दुकान क्र.५२ यांच्या मार्फ़त ८७५ Kg. तांदूळ वितरित केल्याबाबत शिधा पत्रिका पान क्र.५ वर सरळ नोंद आहे. पोच पावतीवर ८२५ Kg ची मिळाल्याबाबत पोहच देण्यात आली आहे. म्हणजेच ५० Kg ची तफ़ावत दिसून येते.

२. दिनांक १८.१०.२००४ रोजी शालेय पोषण आहार शिधा पत्रिका WP ०६६७८४ दुकान क्र.५२ च्या शिधा पत्रिका पान क्र.५ वर ९०० Kg. तांदूळ दिल्याचे नोंद दिसून येते. परंतु साठा रजिस्टरवर इतकेच तांदूळ प्राप्त झाल्याबाबत नोंद दिसून येत नाही.

४. दिनांक १९.२.२००५ रोजी शालेय पोषण आहार शिधा पत्रिका क्र. WP ०६६७८४ दुकान क्र.५२ च्या शिधा पत्रिका पान क्र.५ वर ८०० Kg. तांदूळ वितरित केल्याची नोंद दिसून येते. परंतु साठा रजिस्टरवर ८०० Kg. तांदूळ शाळेला प्राप्त झाल्याबाबत नोंद पावतीवर दिसून येत नाही.

५. स्टॉक रजिस्टर क्र. -२ तपासणी केली असतांना पान क्र.१ वर साहित्याचे नांव व संख्या दिसून येते. (दि.५.८.०४) सदरील स्टॉक रजिस्टर वर सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी दिसून येत नाही.

६. पान क्र.२ वर २००४-०५ मधील साहित्याची नोंद दिसून येते. परंतु वेळोवेळी खरेदी केलेल्या साहित्याची नोंद स्टॉक रजिस्टर मध्ये दिसून येत नाही.

**मुद्या क्र.६ : गणवेष वाटपाबाबत तपासणी.**

सन २००२-०३ ते सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षामध्ये भांडार विभागाकडून प्राप्त शालेय गणवेश, प्रत्यक्ष विद्यार्थी संख्या व वाटप केलेल्या गणवेशांबाबत तपासणी केली असता त्यामध्येही काही प्रमाणात अनियमितता दिसून आली आहे. ती खालीलप्रमाणे तक्त्यांमध्ये नमूद केली आहे.

**सन २००२–२००३ गणवेष वाटप.**

| वर्ग | मुले | मुली | भांडारातून प्राप्त संख्या | वाटप करण्यात आलेली गणवेष संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ ला | २१ | ३१ | | ५२ | |
| २ रा | १४ | २७ | | ४१ | गोषवारा रजिस्टरवर मुलांची एकूण संख्या १४ दाखविण्यात आली. परंतु वाटप करतांना १५ विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आल्याचे दिसून येते. म्हणजेच एका विद्यार्थ्याला जास्तीचे गणवेश वाटप केला गेला |
| ३ रा अ | २९ | ३० | | ५९ | |
| ४ था | २० | ३० | | ५० | |
| ५ वा अ | १६ | २५ | | ४१ | मिळालेले गणवेशच्या तक्त्यावर खाडाखोड दिसून येते. |
| ५ वा ब | १३ | १९ | | ३२ | |
| ६ वा अ | २२ | २७ | | ४९ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ वा ब | १४ | ३२ | | ४६ | |
| ७ वा अ | १६ | २५ | | ४१ | |
| ७ वा ब | १२ | ३१ | | ४३ | |
| बालवाडी | २५ | ४० | | ६५ | |

**सन २००३-२००४ गणवेष वाटप.**

| वर्ग | मुले | मुली | भांडारातून प्राप्त संख्या | वाटप करण्यात आलेली गणवेश संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ ला अ | २३ | ३४ | | ५७ | प्रत्यक्ष भांडारातून ५५ गणवेश प्राप्त असतांना ५८ विद्यार्थ्यांना गणवेश वाटप केल्याचे दिसून येते तर ३ विद्यार्थ्याला जास्त गणवेश दिल्याचे गणवेशाबाबत ताळमेळ दिसून येत नाही. |
| २ रा | २० | ३२ | | ५२ | प्रत्यक्ष वाटप रजि. एकूण मुलींची संख्या ३१ दाखविण्यात आली. |
| ३ रा | १५ | २७ | | ४२ | |
| ४ था अ | २९ | २९ | | ५८ | प्रत्यक्षात भांडारातून गणवेश ५१ मिळाले परंतु वाटप करते वेळेस ५८ विद्यार्थ्यांना वाटप केल्याचे दिसते म्हणजेच ७ गणवेष जादा वाटप केल्याचे दिसून येते. |
| ५ वा अ | ३७ | ६५ | | १०२ | प्रत्यक्षात वाटप रजिस्टरवर १०३ विद्यार्थ्यांना गणवेश वाटप केल्याचे दिसून येते. म्हणजेच एका विद्यार्थ्याला जास्तीचा गणवेश वाटप केल्याचे दिसून येते. |
| ६ वा अ-ब | २९ | ४२ | | ७१ | भांडारातून एकूण ७१ गणवेश मिळाले परंतु वाटप रजि. वर एकूण ७४ विद्यार्थ्यांना वाटप केल्याचे दिसते तर ३ गणवेष जास्तीचे वाटप केल्याचे दिसते. |
| ७ वा अ-ब | ३४ | ५५ | | ८९ | एकूण ९१ विद्यार्थ्याला गणवेश वाटप करण्यात आले आहे परंतु प्रत्यक्षात ८९ हजेरी पटावर असतांना २ गणवेश जादा वाटप केल्याचे दिसून येते. |
| बालवाडी | | | | | गणवेश वाटप रजि.गोषवारा वर सन २००३ -०४ या वर्षा मध्ये बालवाडी चे विद्यार्थ्याला एकूण ६४ गणवेश वाटप केल्याचे दिसून येते. परंतु वाटपाबाबत नोंद व स्वाक्षरी सहीत कोणतेही माहिती वाटप रजि. मध्ये उपलब्ध नसल्याचे ,वाटपाबाबत कोणताही बोध होत नाही. |

## सन २००४–०५ गणवेष वाटप.

| वर्ग | मुले | मुली | भांडारातून प्राप्त संख्या | वाटप करण्यात आलेली गणवेश संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ ला अ | १२ | २८ | | ४० | |
| १ला ब | २५ | २५ | | ५० | प्रत्यक्षात ५० विद्यार्थी असतांना ५४ विद्यार्थ्यांना गणवेश वाटप केल्याचे वाटप रजि. नोंद वरून दिसते. म्हणजेच ४ गणवेश जादा वाटप केल्याचे दिसते. |
| २ रा | १८ | ३८ | | ५६ | |
| ३ रा | २७ | ३६ | | ६३ | |
| ४ था | १३ | २८ | | ४१ | २ गणवेश कमी वाटप केल्याचे दिसून येते. |
| ५ वा अ | १८ | १९ | | ३७ | |
| ५ वा ब | १७ | २५ | | ४२ | |
| ६ वा अ | १४ | ३० | | ४४ | |
| ६ वा ब | १९ | ३० | | ४९ | |
| ७ वा अ | १५ | २२ | | ३७ | |
| ७ वा ब | १४ | २२ | | ३६ | |
| बालवाडी | २० | ३८ | | ५८ | बालवाडी वर्गातील ५७ विद्यार्थ्याला गणवेश वाटप केल्याचे दिसून येते. म्हणजेच एका विद्यार्थ्याला कमी वाटप केल्याचे दिसून येते. |

### मुद्या क्र.७ : मासिक वेतन देयक के.प्रा.शा.पैठणगेट (सन २००० ते २००५ पर्यंत)बाबत तपासणी.

सन २००० ते २००५ या कालावधीत अदा केलेल्या मासिक वेतनाबाबत देयकांच्या तपासणी दरम्यान असे दिसून आले की, १५ देयकांमधील वेतनाची रक्कम अदा केली नाही. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे.

## मासिक वेतन अदा न करण्यात आलेली रक्कम.

| अ.क्र. | शिक्षकांचे नांव | व्हाऊचर क्र./ दिनांक | माहे | मासिक वेतन रक्कम रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मासेदा बेगम महंमद कासिम | ८२३<br>३.८.०१ | जुलै २००१ | ४९०९/- | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | माजेदा बेगम महंमद कासिम | १२७४<br>३.११.०१ | ऑक्टो २००१ | ५२९३/- | माहे ऑक्टोबर २००१ मासिक देयक मंजूर केले बाबत नियमानुसार सक्षम अधिकारी यांची मंजूरी नमूद केलेली दिसून येत नाही. |
| ३ | माजेदा बेगम महंमद कासिम | २३.११.०१ | नोव्हे २००१ | २०६८/- | |
| ४ | सौ.आसिया सुलताना भ्र मुस्तफ़ा | १४५<br>३.५.०२ | एप्रिल २००२ | ४८७०/- | |
| ५ | कैसर खातुन अनिस अहमद | ५८५<br>९.८.०२ | एप्रिल ०२ ते जून ०२ | ३२२/- | |
| ६ | अन्सारी फ़रिदा यास्मीन | ८४६<br>३.१.०३ | डिसे ०२ वेतन | ५१५४/- | |
| ७ | तब्बसुम जहाँ महंमद मजीद अली | ७५५ | सप्टे २००० | ४२८४/- | |
| ८ | श्रीमती शमीमुन्निसा सै.हाशम अली | ९३७ | ऑक्टो २००० बोनस | २४१९/- | |

## अनुदानित शाळाचे देयक.

| अ.क्र. | शिक्षकांचे नांव | व्हाऊचर क्र./ दिनांक | माहे | मासिक वेतन रक्कम रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.शेख वलीयोद्दीन मोईनोद्दीन | १०४<br>६.५.२००४ | **एप्रिल २००४** | ६८२१/- | |
| २ | श्रीमती असमा परवीन | ५३०<br>४.९.२००४ | ऑग २००४ | ७५७३/- | |
| ३ | अनिता शामराव पाटील (शि.से) | ७४६<br>३.११.२००४ | ऑग २००४ | ३०००/- | |
| ४ | श्रीमती मुशरित बेगम ताजोद्दीन | १२१८<br>४.३.२००५ | फ़ेब्रु २००५ | ११,२७१/- | |
| ५ | शमीमुन्निसा बेगम हाशम अली | १२१८<br>४.३.२००५ | फ़ेब्रु २००५ | ६५८०/- | |
| ६ | श्रीमती अन्सारी फ़रिदा अजित रहेमान | १२१८<br>४.३.२००५ | -- | ६२०३/- | |
| ७ | अनिस फ़ातेमा रहीमोद्दीन | १२१८<br>४.३.२००५ | -- | ८२८५/- | |
| ८ | श्री.शेख वलीयोद्दीन (स.शि.) | १०८८<br>४.२.२००५ | जाने २००५ | ७४३४/- | |
| ९ | श्रीमती अजिजा महंमद हयात | १०८८<br>४.२.२००५ | जाने २००५ | ८३३३/- | |

**<u>तपासणीचे मुद्येनिहाय अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत :</u>**

१. शासनाकडून प्राप्त अनुदान खर्च करण्यासाठी यापुढे शालेय कमिटीची बैठक घेऊन मान्यतेनुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

२. प्राप्त अनुदान रकमेच्या विनियोगा संदर्भाने निदर्शनास आलेल्या अनियमिततांबाबत संबंधिताकडून खुलासा घेण्यात यावा.

३. साठा रजिस्टर व वितरण रजिस्टर नोंदीमधील तफ़ावतीबाबत संबंधिताकडून खुलासा घ्यावा.

४. शालेय पोषण आहार योजनेतील खिचडीचे देयकातील अतिप्रदान रक्कम रू ४९८९/- ही संबंधित ठेकेदाराकडून वसूल करावी.

५. तांदूळ वाटप रजिस्टर व हजेरी पट या मधील विद्यार्थी संख्येतील तफ़ावतीबाबत संबंधिताकडून खुलासा घ्यावा.

६. शालेय गणवेश वाटपातील अनियमिततेबाबत संबंधिताकडून खुलासा घ्यावा.

७. मासिक वेतन देयक अदाई मधील आर्थिक अनियमितता ही विभागप्रमुखांनी तपासून खातरजमा करावी व तद्नंतर यथोचित कार्यवाही करावी.

# मा.सभापती,स्थायी समिती, महानगरपालिका,औरंगाबाद यांचे पत्र क्र. १६२/०८, दिनांक १९.७.२००८ नुसार

## मध्यवर्ती गोदाम येथील ९२ ट्रान्झीट करारपत्रकांचा लेखापरीक्षण अहवाल.

१. दिनांक ८.१२.२००५ ते २३.१२.२००५ या कालावधीमधील ९२ करारपत्रकापैकी ८८ करारपत्रके जकात विभागाकडून प्राप्त झाली आहेत. सदर करारपत्रकाचे जकात विभागाकडून प्राप्त झालेल्या रहदारी पावती पुस्तक क्र.९१०८,९१०९ व ९११० व अनामत पावती पुस्तक क्र.३,४ व ५ व Rechecking Register अन्वये लेखापरीक्षण केले असता असे निदर्शनास आले आहे की, प्राप्त ८८ करारपत्रकापैकी फ़क्त चारच करारपत्रकाच्या रहदारी पावत्या बनविण्यात आल्या आहेत. उर्वरीत ८४ करारपत्रकाच्या रहदारी पावत्या बनविण्यात आलेल्या नाहीत. बनविण्यात आलेल्या चार रहदारी पावत्यांपैकी फ़क्त रहदारी पावती क्र.९१०७३० सोबत अनामत रक्कम रू.२००/- ठेवण्यात आली आहे. उर्वरीत तीन रहदारी पावती सोबत अनामत रक्कम ठेवण्यात आलेली नाही. वास्तविक सदरील तिन्ही रहदारी पावत्यांसोबत अनामत रक्कम ठेवणे जरूरी होते. परंतु प्रत्यक्षात तसे झालेले नाही. (प्रपत्र – अ जोडण्यात आला आहे) .

२. ८८ करारपत्रकापैकी फ़क्त चारच करारपत्रकाच्या रहदारी पावत्या बनिवण्यात आलेल्या आहेत व उर्वरीत ८४ करारपत्रकाच्या रहदारी पावत्या बनविण्यात आलेल्या नाहीत म्हणजेच या ८४ करारपत्रकावरील एकूण L.R. /डागांची संख्या २१८३ चा माल शहरात उतरविण्यात आला किंवा सदर माल शहराबाहेर गेला याचा स्पष्ट उलगडा होवू शकत नाही. तसेच सदरील माल शहरातच उतरविण्यात आल्याची शक्यताही नाकारता येवू शकत नाही.

३. कॅश रजिस्टरवर दर्शविलेल्या नोंदीनुसार रहदारी पावती पुस्तक क्र.९११० पावती क्र.९१०९०२ दिनांक १७.१२.२००५ ची रक्कम रू.५०/- ची नोंद घेण्यात आलेली नाही. तसेच दिनांक २१.१२.२००५ रोजी रहदारी पुस्तक क्र.९११० (पावती क्र. ३६-५०) एकूण पंधरा पावत्या असतांना प्रत्यक्ष १४ पावत्यांची रक्कम जमा करण्यात आली आहे म्हणजेच एक पावतीचे रक्कम रू.५०/- चा कमी भरणा करण्यात आला आहे. असे दोन्ही मिळून रक्कम रू.१००/- चा कमी भरणा करण्यात आलेला आहे. (तक्ता ब सोबत जोडण्यात आला आहे.)

४. करारपत्रक क्र.४८१२४ दिनांक १७.१२.२००५ गाडी क्र. HR-३८ /९१३७ ची नोंद Rechecking Register ला घेतल्याचे दिसून येत नाही.

५. मध्यवर्ती गोदाम येथील करारपत्रक नोंदणी रजिस्टर ची तपासणी केली असता रजिस्टर प्रमाणीत केल्याचे दिसून येत नाही. तसेच रजिस्टरवर दैनंदिन गोषवारा काढण्यात

आलेला नाही. त्यामुळे गोडाऊन मध्ये नेमका किती माल अनलोड केलेला आहे याचा बोध होत नाही.

६. एकूण ८८ करारपत्रकांपैकी ज्या चार करारपत्रकाच्या रहदारी पावत्या बनविण्यात आलेल्या आहेत त्यापैकी तीन रहदारी पावत्यांवर दर्शविलेल्या L.R. /डागांची संख्या चूक असल्याचे निदर्शनास येते. फ़क्त करारपत्रक क्र.४८२१२ दिनांक २२.१२.२००५ गाडी क्र. HR-३८ /E-२१५३ या करारपत्रकावर दशविल्याप्रमाणे रहदारी पावतीवर L.R. / डागांची संख्या बरोबर असल्याचे दिसून येते. त्याचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | करारपत्रक क्र. | गाडी क्र. | करारपत्रकावरील व Rechecking Register वर दर्शविलेल्या नोंदी | रहदारी पावती क्र. वर दर्शविलेल्या नोंदी. | फ़रक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४३९७१ | MH-२२ ११५० | ४६ | ९१०७३० १० दि.८.१२.०५ | ३६ कमी | अनामत पावती क्र.२७५ दि.८.१२.२००५ (रू.२०० /-) |
| २ | ४८१८१ | HR-३८ ६६९५ | १५ | ९१०९३८ ३९ दि.२१.१२.०५ | २४ जास्त | क्र.२,३ व ४ ची अनामत रक्कम ठेवण्यात आलेले नाही . |
| ३ | ४८२०७ | MP-०६ E-३९९७ | ३३ | ९१०९७१ ६४ दि.२३.१२.०५ | ३१ जास्त | |
| ४ | ४८२१२ | HR-३८ २१५३ | ३० | ९१०९७० ३० दि.२३.१२.०५ | निरंक | |

उक्त बाबींमुळे जकात नियमांचे उल्लंघन झालेले दिसून येते. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

७. सदरील अनियमिततेच्या कालावधीत मध्यवर्ती गोदाम येथे पुढीलप्रमाणे कर्मचारी प्रत्यक्ष काम करीत होते.

अ) जकात निरिक्षक (तपासणीसाठी)

१) श्री.अशोक बी.शितोळे

२) श्री.शैलेश अंबट.

ब) जकात निरिक्षक (पुनर्तपासणीसाठी )

१) श्री.म.का.सुरे

२) श्री.सुधीर जोशी.

वरील कर्मचारी हे सदरील अनियमिततेसाठी प्रत्यक्षात जबाबदार ठरतात आणि या सर्वांवर योग्य ते नियंत्रण न ठेवून श्री.बी.ए.वाहूळ, तत्कालीन जकात अधिक्षक यांनी निष्काळजीपणा (Lack Of Supervision) केल्याचे दिसून येते. याबद्दल प्रशासनाने योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी.

# मा. स्थायी समिती सभा दि. १९.०९.२००५ ठराव क्र. ८६ नुसार च्या सुचनेनुसार श्री.संजय किसनराव करपे व श्री.नायबराव भिवसन जंजाळ,कनिष्ठ लिपीक यांना सन २००२-०३ मधील आर्थिक गैरव्यवहरातील अपहार प्रकरणी बडतर्फी कार्यवाहीत झालेल्या विलंबाबाबत चौकशी अहवाल.

**पार्श्वभूमी :**

मुख्य लेखापरीक्षक यांनी मा.आयुक्त यांच्याकडे गोपनीय पत्र जा.क्र./मनपा/मुलेप/ २५९/ ०३ , दिनांक १३.११.२००३ अन्वये विभाग क्र.७ येथील लेखापरीक्षणाअंती निदर्शनास आलेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत (सन २००२-०३) कळविलेले आहे. त्यानुसार लेखा तपासणीअंती खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्याचे कळविले आहे.

१. दिनांक २६.२.२००३ ते ३१.३.२००३ पर्यंत जमा रकमेचे कॅश रजिस्टर उपलब्ध न झाल्याने सदरच्या कालावधीतील पावती पुस्तकाआधारे जमा रक्कम निश्चित करण्यात आली असून ती रक्कम रू.६३१४४६६/- इतकी आहे. सदर रकमेचा भरणा झाला आहे किंवा कसे याबाबत निश्चितपणे पडताळणी करण्यासाठी मुख्यालयातील रोखपाल यांच्याकडील उक्त कालावधीतील जमा रकमेच्या रजिस्टरसोबत तपासणी करण्यात आली. तपासणीअंती असे निदर्शनास आले आहे की, उक्त कालावधीत विभाग क्र.७ येथून रू.६२१७३४० ही रक्कम मुख्यालयात जमा झाली आहे. म्हणजेच ६३१४४६६, ६२१७३४० = ९७१२६ ही रक्कम मनपा फ़ंडात भरण्यात आलेली नाही. त्यामुळे या रकमेचा अपहार झाल्याचा निष्कर्ष नोंदविलेला आहे.

२. दिनांक ३०.८.२००२ रोजी पावती पुस्तक क्र.३५७ मधील पावती क्र.०३५६९६ ते ०३५७०० या ५ पावत्या आधारे रू.६७८८ वसूल करण्यात आले असून संबंधित इरसाल रजिस्टरमध्ये सदर रकमेची नोंद घेण्यात आलेली नसल्यामुळे सदरच्या रकमेचाही अपहार झाल्याची खात्री होते.

३. मुख्यालयातील भांडार शाखेकडून वितरीत केलेल्या पावती पुस्तकांची विभाग क्र.७ येथील स्टॉक रजिस्टरवर पडताळणी केली असता असे निदर्शनास आले की, दिनांक ११.३.२००३ रोजी पावती पुस्तक क्र.६४७ ते ६८१ असे एकूण ३५ पावती पुस्तक वितरीत करण्यात आलेले असून त्यापैकी पुस्तक क्र.६५५ हे लेखा परीक्षणास्तव उपलब्ध करून देण्यात आलेले नसल्यामुळे व त्याबाबत कॅश रजिस्टर उपलब्ध नसल्यामुळे डिमांड रजिस्टरवरील नोंदी विचारात घेण्यात आल्या असून सदरच्या पावती पुस्तकामधील ९० पावत्यांच्या नोंदी तपासण्यात आल्या आहे. त्या पावत्यांची एकूण रक्कम रू.११५८८१/- इतकी असून सदरची रक्कम मनपा फ़ंडात जमा झाल्याचे निदर्शनास आले नसल्याने सदर रकमेचा अपहार झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येते. उर्वरीत १० पावत्यांच्या नोंदी कोठे ठेवण्यात आल्या आहेत याबाबतचे अभिलेख लेखापरीक्षण कालावधीमध्ये विभागीय अधिकारी यांनी उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. त्यामुळे

वसूलीची रक्कम निश्चितपणे समजू शकलेली नाही. तसेच पावती पुस्तक क्र. ६६८ हे उपलब्ध करून दिले नसल्याने त्याआधारे रक्कम वसूल झाली आहे किंवा कसे व वसूल झाली असल्यास रकमेचा भरणा झाला आहे किंवा कसे याबाबत शंका निर्माण झाली आहे व सदरची बाब अत्यंत आक्षेपार्ह आहे असेही अहवालात नमूद आहे.

४. अहवाल वर्षात वसूल केलेल्या रकमांचा भरणा संबंधित कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी केलेला नसून काही रकमा १ ते ६ महिन्यापर्यंत उशिरा जमा केल्या आहेत. दिनांक १.४.२००२ ते २५.२.२००३ या कालावधीतील कॅश रजिस्टरवर संबंधित रोखपाल व विभागीय अधिकारी यांनी नियमित स्वाक्षरी केली नसल्याने सदरची बाब आक्षेपार्ह आहे.

५. पावती क्र.२८६/२९५१८, दिनांक ३.७.२००२ अन्वये रू.१७५६/- वसूल करण्यात आले मात्र रू.१४५६/- मनपा फ़ंडात जमा केल्यामुळे रू.३००/ कमी भरण्यात आले तसेच पावती क्र. २९७/२९६७७, दिनांक २९.७.२००२ अन्वये रू.१८३०/- वसूल करण्यात आले आहे. मात्र रू.६३०/- जमा केल्याने रू.१२००/- कमी जमा करण्यात आले आहे.

६. दिनांक १४.३.२००३ रोजी विविध करापोटी जमा झालेली रक्कम रू.१५०१४७ ची नोंद चालन क्र.८५५ वर घेण्यात आली असून सदरची रक्कम मनपा फ़ंडात कशी जमा करण्यात आली. याबाबत समाधानकारक खुलासा विभागीय अधिकारी यांनी दिलेला नाही. सदरच्या कालावधीचे इरसाल गहाळ झाले आहे असे समजल्यामुळे तपासणीस्तव उपलब्ध होऊ शकले नाही. त्यामुळे उक्त रकमेबाबतचा व्यवहार संशयास्पद आहे. वरील मुद्दा क्र.१,२,३ व ५ मधील नमूद केलेली रक्कम रू.२२१२९५/- चा अपहार झाला असल्याचा प्राथमिक निष्कर्ष निघतो असेही अहवालात नमूद केलेले आहे.

या अनुषंगाने तत्कालीन सहा.आयुक्त श्री.टी.जी.जाधव यांनी दिनांक २५.११.२००३ रोजी विभागीय अधिकारी यांना लेखापरीक्षणास्तव आवश्यक ते अभिलेखे उपलब्ध करून देण्याबाबत सूचित करण्यात यावे. तसेच झालेल्या अनियमितते संदर्भाने तत्कालीन रोखपाल व विभागीय अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देवून खुलासा मागविणे बाबत अभिप्राय नोंदविला यास उपआयुक्त (प्र) यांनी दिनांक २५.११.२००३ रोजी मान्यता दिली. मान्यतेनुसार विभागीय अधिकारी यांना दिनांक १.१२.२००३ रोजी पत्र देण्यात आले तसेच तत्कालीन रोखपाल श्री.जंजाळ व विभागीय अधिकारी श्री.शहाणे यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली.

या संदर्भाने मा.आयुक्त यांच्याकडून दिनांक ४.१२.२००३ रोजी पत्र प्राप्त झाले त्या अनुषंगाने मा.आयुक्त यांच्या आदेशानुसार आर्थिक गैरव्यवहारात संबंधित असणाऱ्या कर्मचाऱ्यांविरूध्द निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी व संबंधित अधिकाऱ्यांची बदली करण्यात यावी. तसेच या प्रकरणात पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करावा. उक्त संदर्भाने विभागीय अधिकारी श्री.शहाणे यांची बदली करण्यात आली तसेच तत्कालीन रोखपाल श्री.जंजाळ व श्री. करपे यांच्याही बदल्या करण्यता आल्या.

दिनांक ६.१२.२००३ रोजी तत्कालीन सहा.आयुक्त यांनी प्रकरणाचे गांभीर्या लक्षात घेवून तत्कालीन रोखपाल श्री.जंजाळ व श्री.करपे यांना निलंबीत करून खाते चौकशी प्रस्तावित करणे तत्कालीन विभागीय अधिकारी यांच्या विरूध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करणे व तत्कालीन विभाग आयुक्त श्री.विजय जावरे यांना कर्मचाऱ्यांवर नियंत्रण न ठेवण्याबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी असे अभिप्राय नोंदविले. त्या अनुषंगाने दिनांक ६.१२.२००३ रोजी उपआयुक्त (प्र) , यांनी मान्यता देवून प्रकरण मा.आयुक्तांकडे सादर केले. मा.आयुक्त यांच्या दिनांक ८.१२.२००३ च्या मान्यतेनुसार श्री.संजय करपे व श्री.एन.बी.जंजाळ यांना दिनांक ९.१२.२००३ रोजी निलंबीत करण्यात आले. तत्कालीन विभागीय अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. सदर नोटीसच्या अनुषंगाने तत्कालीन विभागीय अधिकारी यांनी दिनांक १२.१२.२००३ रोजी खुलासा सादर केला. तसेच दिनांक १५.१२.२००३ रोजी तत्कालीन विभाग आयुक्त श्री.विजय जावरे यांनी खुलासा केला. याबाबत दिनांक १८.१२.२००३ रोजी संचिका सादर करण्यात आली.

दरम्यानच्या कालावधीमध्ये विभाग क्र.७ चे लेखापरीक्षण चालू असतांना गैरव्यवहाराबाबतचे अहवाल वेळोवेळी सादर केलेला आहे तो पुढील प्रमाणे.

| **अ.क्र.** | **मुख्य लेखापरीक्षक यांचे पत्र क्र.** | **दिनांक** | **कळवलेली गैरव्यवहाराची रक्कम** |
|---|---|---|---|
| १ | २४२/०३ | १८.१०.२००३ | १६०७५ |
| २ | २५२/०३ | १३.११.२००३ | २२१२९५ |
| ३ | २६५/०३ | ३.१२.२००३ | २९४३३७ |
| ४ | २७५/०३ | ९.१२.२००३ | ७५४५१ |
| ५ | २८५/०३ | १९.१२.२००३ | १००१४८ |
| ६ | ०७/०४ | ६.१.२००४ | ३०९३४० |
| ७ | १४/४/०४ | ३१.१.२००४ | ३५७६२९ |
| | | | **१३७४२७५** |

मुख्य लेखापरीक्षक यांनी एकूण रक्कम रू.१३७४२७५/- एवढ्या रकमेचा /गैरव्यवहार झाल्याचे नमूद केले व हा अहवाल अंतिम समजण्यात यावा असे नमूद केले. या प्रकरणात दिनांक १५.११.२००३ रोजी तत्कालीन रोखपाल श्री.एन.बी.जंजाळ यांच्या विरूध्द पोलिस स्टेशन सिडको येथे तक्रार नोंदविण्यात आली होती. मुख्य लेखापरीक्षक यांच्या अंतिम अहवालानुसार एकूण रक्कम रू.१३७४२७५/- एवढ्या रकमेचा अपहार बाबत तक्रार नोंदविण्यासाठी तत्कालीन सहा.आयुक्त श्री.टि.जी.जाधव यांनी दिनांक ८.३.२००४ रोजी संचिकेत अभिप्राय नोंदविला यास उपआयुक्त (प्र) यांनी मान्यता दिली. त्यानुषंगाने विभागीय अधिकारी विभाग क्र.७ यांना गुन्हा नोंदविणे बाबत दिनांक ९.३.२००४ रोजी पत्र देण्यात आले.

दिनांक १५.३.२००४ रोजी तत्कालीन सहा.आयुक्त श्री.टी.जी.जाधव यांनी श्री.जंजाळ व करपे (निलंबीत कर्मचारी) यांच्या विरूध्द विभागीय चौकशी करण्याची कार्यवाही प्रस्तावित केली व चौकशी अधिकारी म्हणून श्री.एस.डी.पानझडे -कार्यकारी अभियंता व सादर करता अधिकारी म्हणून श्री.वसंत निकम, उपअभियंता यांची नियुक्ती करण्याबाबत दिनांक २२.३.२००४ रोजी मा.आयुक्त यांनी मान्यता दिल्यानुसार आदेश निर्गमित करण्यात आले. निलंबीत कर्मचाऱ्यांना द्यावयाचे दोषारोपपत्र मा.आयुक्त यांच्या दिनांक ६.४.२००४ रोजीच्या मान्यतेनुसार देण्यात आले. पुढील कार्यवाहीसाठी संचिका चौकशी अधिकारी यांच्याकडे दिनांक २२.४.२००४ रोजी वर्ग करण्यात आली. चौकशी अधिकारी श्री.पानझडे यांनी सदर चौकशी करण्यास असमर्थता दर्शविली. त्यामुळे अन्य चौकशी अधिकारी नियुक्त करण्यासाठी दिनांक ५.५.२००४ रोजी संचिका सादर करण्यात आली. सदर संचिकेवर तत्कालीन सहा.आयुक्त श्री.टी.जी.जाधव यांनी चौकशी अधिकारी बदलण्याबाबत दिनांक ११.५.२००४ रोजी अभिप्राय नोंदविले. तद्नंतर उपआयुक्त(प्र), यांनी चौकशी अधिकारी म्हणून श्री.कमलाकर फ़ड ,तत्कालीन कर मुल्य निर्धारक व संकलक यांची नियुक्ती करण्याबाबत कार्यवाही प्रस्तावित केली. त्यास दिनांक ११.५.२००४ रोजी आयुक्तांनी मान्यता दिली. मान्यतेनुसार चौकशी अधिकारी नियुक्ती बाबतचे आदेश दिनांक १५.५.२००४ रोजी निर्गमित करण्यात आले. पुढील कार्यवाहीसाठी संचिका चौकशी अधिकारी श्री.फ़ड यांच्याकडे दिनांक १९.५.२००४ रोजी वर्ग करण्यात आली. चौकशी अधिकारी यांनी दिनांक १८.१२.२००४ रोजी गोपनीय स्वरूपात चौकशी अहवाल मा.आयुक्तांकडे सादर केला. सदर अहवालातील निष्कर्षावर मुद्येनिहाय अभिप्राय पाठविण्यासाठी मा.आयुक्तांचे स्वीय सहाय्यक यांनी मुख्य लेखाधिकारी यांना दिनांक ११.३.२००५ रोजी पत्र दिले. त्यानुषांगने दिनांक २०.७.२००५ रोजी मुख्य लेखाधिकारी यांनी निष्कर्षावर मुद्येनिहाय अभिप्राय दिले. यानुसार चौकशी अधिकारी यांनी सादर केलेला चौकशी अहवाल व त्यावर मुख्य लेखाधिकारी यांनी दिलेले अभिप्राय या अनुषंगाने दिनांक २८.७.२००५ रोजी संचिका सादर करण्यात आली. त्यावर तत्कालीन सहा.आयुक्त श्री.टी.जी.जाधव यांनी चौकशी अधिकारी यांच्याकडून प्राप्त चौकशी अहवाल व त्यावर मुख्य लेखाधिकारी यांनी नोंदविलेले अभिप्राय या अनुषंगाने पुनश्च संचिका चौकशी अधिकारी यांच्याकडे वर्ग करण्याबाबत दिनांक १६.८.२००५ रोजी अभिप्राय नोंदविला. यावर उपआयुक्त (प्र) , यांनी कृपया चर्चा असा अभिप्राय दिला. दिनांक ८.९.२००५ रोजी प्रकरणात चर्चा होऊन विधी सल्लागार यांचा अभिप्राय घ्यावा असे उपआयुक्त (प्र), यांनी नमूद केले. त्यानुसार दिनांक ९.९.२००५ रोजी संचिका विधी विभागाकडून पाठविण्यात आली. यावर दिनांक १३.९.२००५ रोजी विधी सल्लागार यांनी खालील प्रमाणे अभिप्राय नोंदविला.

१. उपलब्ध न झालेली पावती पुस्तके शोधणे आवश्यक आहे.

२. नळ बंद असल्याबाबत ज्या कर्मचाऱ्यांनी रजिस्टरला नोंदी घेतल्या व आर्थिक गैरव्यवहार केला त्यांचे हस्ताक्षरे हस्ताक्षर तज्ञाकडे पाठविण्यासाठी योग्य.

३. तो पर्यंत रक्कम रू.१३७४२७५/- ही अपहाराची रक्कम समजून चौकशी अहवालातील दोषी व्यक्तिंविरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम ५ मध्ये कठोर शिक्षा व बी.पी.एम.सी.ॲक्ट १९४९ चे कलम

५६ मधील ५६ (ग) अन्वये सेवेतून काढून टाकण्याची शिक्षा प्रस्तावित करणे योग्य.

उपरोक्त अभिप्रायावर दिनांक २२.९.२००५ रोजी मा.उपआयुक्त (प्र) यांनी अभिप्रायातील मुद्या क्र.१ व २ च्या संदर्भाने संबंधित कर्मचाऱ्यांची नावे प्रभाग अधिकारी (ब) यांच्याकडून मागविण्यात यावे व मुद्या क्र.३ च्या अनुषंगाने स्थायी समितीसमोर सेवेतून काढून टाकण्याबाबतचा प्रस्ताव सादर करणे योग्य असे अभिप्राय नोंदविले. त्यावर दिनांक ६.१०.२००५ रोजी आयुक्त यांनी मान्यता दिली.

दिनांक ६.१०.२००५ रोजी मा.आयुक्तांनी श्री.जंजाळ व श्री.संजय करपे यांना बडतर्फ़ करण्याबाबत मान्यता देण्यात आली. त्यानुषंगाने सदर संचिका दिनांक ११.१०.२००५ रोजी उपआयुक्त (प्र) , यांच्याकडे येऊन दिनांक १३.१०.२००५ रोजी संचिका आस्थापना विभागात प्राप्त झाली. दिनांक २१.१०.२००५ रोजी कनिष्ठ लिपीक श्री.वैद्य यांनी प्रस्तावाचा प्रारूप तयार करून दिनांक ५.१२.२००५ रोजी तत्कालीन सहाय्यक आयुक्त श्री.रविंद्र निकम यांनी स्थायी समितीसमोर प्रस्तावाची प्रारूप मान्यतेस्तव तथापि संबंधिताविरूध्द कठोर शिक्षा करण्यापूर्वी कारणे दाखवा नोटीस देवून बडतर्फ़ का करण्यात येऊ नये याबाबत प्रथमत/ खुलासा मागविणे तद्नंतर बडतर्फ़ीचा प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवणे योग्य असा अभिप्राय नोंदवून संचिका उपआयुक्त (प्र) यांच्याकडे सादर करण्यात आली. दिनांक १२.१२.२००५ रोजी मा.उपआयुक्त (प्र), यांनी संचिकेतील परिच्छेद ११९ (अ) बाबत कर्मचाऱ्यांची नावे मागवा असा अभिप्राय नोंदविला त्यानुसार दिनांक १३.१२.२००५ रोजी प्रभाग अधिकारी (ब) यांना पत्र देण्यात आले. दिनांक १३.१२.२००५ रोजीच्या पत्राची माहिती अप्राप्त असल्यामुळे दिनांक ३०.१२.२००५ रोजी सदर प्रकरणात परत स्मरणपत्र देण्यात आले.

त्या अनुषंगाने दिनांक १०.१.२००६ रोजी प्रभाग अधिकारी यांनी पत्राच्या उत्तरी उपलब्ध अभिलेखानुसार पावती पुस्तक क्र.६५५ ,६६८ व २१६ ही पुस्तके उपलब्ध नाहीत व जल अदालत निर्णयानुसार काही नळ कनेक्शन बंद करण्यात आलेले आहेत. तसेच लेखापरीक्षण सन २००२-०३ मध्ये ज्या खातेधारकांची नळ बंद असल्याचे / केल्याचे ऑडीटमध्ये निदर्शनास आलेले असेल त्याची नावे, खाते क्रमांक याची माहिती मिळाल्यास त्यानुसार नळ बंद असल्याची नोंद घेतलेल्या कर्मचाऱ्यांची नावे कळविण्यात येतील असे कळविले. यात कर्मचाऱ्यांची नावे कळविण्यात आलेली नाही. सदर माहिती दिनांक १८.१.२००६ रोजी आस्थापना शाखेस प्राप्त झाली. सदर पत्राच्या माहितीच्या आधारे दिनांक २७.१.२००६ रोजी सदर संचिका संबंधित लिपीक श्री.वैद्य,कनिष्ठ लिपीक यांनी सादर केले. तत्कालीन सहाय्यक आयुक्त श्री.रविंद्र निकम यांनी गहाळ पुस्तके उपलब्ध होत नसतील तर पुस्तके गहाळ झाल्याबाबत पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविणे बाबत प्रभाग अधिकारी (ब) यांना आदेशित करणे योग्य व संचिकेतील परिच्छेद ११७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रकरण हस्ताक्षर तज्ञाकडे पाठविणे योग्य असा अभिप्राय दिनांक २७.१.२००५ रोजी नोंदविला. मा.उपआयुक्त (प्र) यांच्याकडे वर्ग केली व उपआयुक्त (प्र) यांनी दिनांक २.२.२००६ रोजी संचिकेवर पोलिस स्टेशनच्या एफ़.आय.आर.बाबत

सद्यस्थितीची माहिती घ्यावी असा अभिप्राय नोंदवून सदर संचिका आस्थापना विभागास प्राप्त झाली. त्यानुषंगाने दिनांक ८.३.२००६ रोजी पोलिस निरीक्षक सिडको यांना पत्र देण्यात आले.

पोलिस निरीक्षक सिडको यांनी दिनांक १४.३.२००६ च्या पत्राच्या अनुषंगाने प्रकरणाची सद्यस्थिती पुढील प्रमाणे नमूद केली. कार्यालयीन दस्ताऐवजात खाडाखोड करणे तसेच कार्यालयीन अभिलेख गहाळ करणे, शासकीय रकमेचा अपहार करणे याबाबत पोलिस स्टेशन सिडको गुन्हा रजिस्टर नं.३५/०४ कलम ४०९,३४ भा.द.वि. दिनांक २८.१.२००४ रोजी दाखल असून सदरचा गुन्हा हा मा.कोर्टात न्यायप्रविष्ट आहे. सदर गुन्ह्याचा कोर्ट केस क्र. आरसीसी नं.४०९/०४, दिनांक २९.३.२००४ असा आहे. त्यानुसार दिनांक ३१.३.२००६ रोजी तत्कालीन कनिष्ट लिपीक श्री.वैद्य यांनी संचिका सादर करून तत्कालीन सहाय्यक आयुक्त-१ श्री.रविंद्र निकम यांनी त्यावर अभिप्राय नोंदवून दिनांक ५.४.२००६ रोजी अभिप्राय उपआयुक्त (प्र) यांच्याकडे वर्ग करून उपआयुक्त (प्र) यांनी दिनांक ६.६.२००६ रोजी अभिप्राय नोंदविला.

तत्कालीन सहाय्यक आयुक्त-१ श्री.बीपीन वाहूळ यांनी सचिका दिनांक ६.६.२००६ पासून प्रलंबित असल्याबाबत सविस्तर टिप्पणी सादर करण्यासाठी संबंधित लिपीक श्री.अशोक जाधव यांना दिनांक ४.७.२००६ रोजी आदेशित केले. दिनांक ९.७.२००७ रोजी तत्कालीन कनिष्ट लिपीक श्री.अशोक जाधव यांनी दिनांक ९.७.२००६ रोजी सदर प्रकरणात सादर केले की, माझी बदली नव्यानेच आस्थापना –१ विभागात दिनांक ९.६.२००६ पासून झालेली आहे. प्रकरणाची माहिती माझे तत्कालीन वरीष्ट यांच्या निदर्शनास आणून दिली. व मी या विभागात नव्यानेच आलो असल्याने मार्गदर्शनाबाबत विनंती केली त्यावेळी त्यांनी उपआयुक्त यांच्याशी चर्चा करून कार्यवाही करण्यात येईल असे सूचविले. तद्नंतर आस्थापनेवर ५७ पदांच्या भरतीसाठी कार्यवाही सुरू झाली ती माहे सप्टेंबर २००६ पर्यंत चालू होती. या कामाच्या व्यापात संचिका विलंबाने सादर करण्यात आली. यानंतरसुध्दा माझे वरीष्ठांनी संचिका मा.उपआयुक्त (म) यांच्याकडे घेवून गेले होते असा खुलासा सादर केला. यावर तत्कालीन सहा.आयुक्त श्री.बीपीन वाहूळ यांनी दिनांक २४.७.२००७ रोजी पुढील प्रमाणे अभिप्राय नोंदविला.

१. सेवेतून बडतर्फ़ करण्यापूर्वीची कारणे दाखवा नोटीस देण्यासाठी संचिकेची पृ.क्र.२९ वर परिच्छेद क्र.१२३ व प्रस्तावित केले आहे तशी नोटीस देण्यात आलेली नाही. नळ बंद असल्याबाबत ज्या कर्मचाऱ्यांनी नोंदी रजिस्टरला घेतल्या व आर्थिक गैरव्यवहार केला त्यांची नावे हस्ताक्षर तज्ञाकडे पाठविण्याचे आदेश संचिकेत परिच्छेद ११९ मध्ये झालेले आहेत. त्यावर कार्यवाही झालेली नाही. वॉर्ड कार्यालयामार्फ़त देखील नावे उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत. उपआयुक्त (म) यांच्याकडे वर्ग केली. तद्नंतर दिनांक १७.८.२००७ रोजी मा.उपआयुक्त (म) यांनी अभिप्राय नोंदवून संचिका मा.आयुक्त यांच्याकडे सादर केली. मा.आयुक्त यांनी संचिका प्रलंबित असणाऱ्या अधिकाऱ्यांविरूध्द कार्यवाही करण्यात यावी तसेच श्री.जंजाळ व श्री.करपे यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी असे नमूद केले. त्यानुसार दिनांक २९.८.२००७ रोजी श्री.जंजाळ व श्री.संजय

करपे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. श्री.करपे यांनी दिनांक ५.९.२००७ रोजी खुलासा सादर केला. व श्री.जंजाळ यांनी खुलासा सादर करण्यासाठी मुदत वाढविण्याची मागणी केली. त्यावर दिनांक १०.९.२००७ रोजी तत्कालीन लिपीक श्री.अशोक जाधव यांनी सहा.आयुक्त –१ यांच्याकडे संचिका सादर केली. तत्कालीन सहा.आयुक्त-१ श्री.बिपीन वाहूळ यांनी दिनांक १३.९.२००७ रोजी अभिप्राय नोंदवून सदर संचिका उपआयुक्त (म) यांच्याकडे सादर करून त्याच दिवशी संचिका मंजूर करण्यात आली. श्री.एन.बी.जंजाळ यांनी दिनांक ४.९.२००७ रोजी कारणे दाखवा नोटीसला उत्तर देण्यासाठी मुदतवाढ मागून घेतली होती. त्यानुषंगाने त्यांनी दिनांक २४.९.२००७ रोजी कारणे दाखवा नोटीसच्या अनुषंगाने खुलासा सादर केला त्यानुसार तत्कालीन संबंधित लिपीक श्री.अशोक जाधव यांनी दिनांक ३.१०.२००७ रोजी उपरोक्त खुलाशाच्या अनुषंगाने संचिका सादर केली. सदर प्रकरणात तत्कालीन सहा.आयुक्त श्री.बीपीन वाहूळ यांनी सविस्तर विवरण दिनांक ५.११.२००७ रोजी पुढील अभिप्राय नोंदविला.

१. चौकशी अधिकारी यांचा चौकशी अहवाल .

२. श्री.एन.बी.जंजाळ यांचा खुलासा

३. श्री.संजय करपे यांचा खुलासा अवलोकनास्तव सादर. सदर संचिका उपआयुक्त (म) यांच्या कडे सादर केली. उपआयुक्त (म) यांनी दिनांक ६.११.२००७ रोजी संचिकेवर चर्चा करा असा अभिप्राय नोंदवून संचिका आस्था-१ विभागात पाठविली.

सदर संचिकेवर दिनांक २५.२.२००८ रोजी तत्कालीन सहा.आयुक्त श्री.बिपीन वाहूळ यांनी दिनांक ६.११.२००७ पासून संचिका कोणाकडे प्रलंबित होती याबाबत खुलासा सादर करावा असे नमूद केले. त्यावर तत्कालीन लिपीक श्री.अशोक जाधव यांनी सदर संचिका दिनांक ५.११.२००७ रोजी आवक जावक लिपीक श्री.टारपे यांनी स्विकारलल त्यावर उपआयुक्त यांनी चर्चा करावी असा अभिप्राय नोंदविला म्हणून सदर संचिका चर्चा करण्यासाठी सहा.आयुक्त –१ यांच्याकडे ठेवली होती म्हणून सांगितले. त्यावर सहा.आयुक्त –१ बीपीन वाहूळ यांनी संचिका जर माझ्याकडे आली असती तर प्रकरणात चर्चा करून निर्णय घेता आला असता परंतु संचिका उशिरा सादर झाल्याने चर्चा करता आली नाही. त्यामुळे आवक जावक विभागातील संबंधितास कारणे दाखवा नोटीस द्यावी व संबंधिताविरूध्द कार्यवाही प्रस्तावित करावी असा अभिप्राय नोंदवून संचिका उपआयुक्त (म) यांच्याकडे पाठविली व त्यावर उपआयुक्त (म) यांनी स्वाक्षरी करून सदर संचिका आस्था –१ वर्ग केली. त्यावर तत्कालीन सहा.आयुक्त –१ श्री.बीपीन वाहूळ यांनी त्या संचिकेवर अभिप्राय नोंदविली की, श्री.लाहोटी कार्यवाही करावी व पुढील कार्यवाहीसाठी प्रकरण सादर करावे.

तद्नंतर सहा.आयुक्त –१ श्री.अय्युब खान यांनी दिनांक २१.७.२००८ रोजी सविस्तर टिप्पणी सादर करून प्रकरण उपआयुक्त यांची मंजूरी घेवून मा.आयुक्तांकडे प्रकरण सादर करण्यात आले. सदर प्रकरण मा.आयुक्त यांनी दिनांक २०.८.२००८ रोजी मंजूरी देवून सदर प्रकरणात श्री.जंजाळ व श्री.संजय करपे यांना महाराष्ट्र नागरी सेवा

शिस्त अपिल नियम १९७९ चे कलम ५ नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२ ह) अन्वये महानगरपालिका सेवेतून बडतर्फ़ करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर सादर केला.

## चौकशी समितीचे निष्कर्ष व अभिप्राय.

१. विभागीय कार्यालयांमध्ये (सध्या प्रभाग किंवा वॉर्ड कार्यालयात) वारंवार आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे लेखापरीक्षणाअंती उघडकीस आलेले असल्याने आणि त्यावर विभागीय अधिकाऱ्यांनी कुठलेही नियंत्रण ठेवलेले नाही. भविष्यात अशी पुनरावृत्ती होऊ नये म्हणून प्रभाग (वॉर्ड) कार्यालयातील रोखपाल हे लेखा विभागाकडील लेखाधिकारी किंवा प्रमुख लेखापाल यांच्या नियंत्रणाखाली ठेवावेत. व रोख पालामार्फ़त होणारे सर्व आर्थिक व्यवहार अशा अधिकाऱ्याने वेळोवेळी तपासून खात्री करावी अशी शिफ़ारस करण्यात येते.

२. सदरील प्रकरणातील संचिकेचा सखोल अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की, तीन अवधींमध्ये सदरील संचिका सादर करण्यात प्रदीर्घ असा विलंब झालेला आहे.

   १. दिनांक १४.११.२००६ ते दिनांक ०४.०७.२००७ (एकूण २३२ दिवस) या कालावधीत संचिकेत कोणतीही कार्यवाही झालेली दिसून आली नाही.

   २. दिनांक ०६.११.२००७ ते दिनांक २५.२.२००८ (एकूण ११२ दिवस) या कालावधीत संचिकेत कोणतीही कार्यवाही झालेली दिसून आली नाही.

   ३. दिनांक ०५.०४.२००८ ते दिनांक १५.०७.२००८ (एकूण १०२ दिवस) या कालावधीत संचिकेत कोणतीही कार्यवाही झालेली दिसून आली नाही.
   उक्त तीनही कालावधीच्या विलंबासाठी श्री.अशोक जाधव, आस्थापना –१, लिपीक पूर्णत: जबाबदार असल्याने त्याचेवर प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी. असे चौकशी समितीची शिफ़ारस आहे.

   ४. सदरील प्रकरणी संचिका इतर सर्व संबंधित सहाय्यक आयुक्त व उपआयुक्त यांनी वेळोवेळी सादर करून चालू ठेवलेली असल्याने विलंबाबाबत त्यांना दोषी धरता येणार नाही. असे चौकशी समितीचे मत आहे.

# मा.स्थायी समिती सभा दिनांक १ जुलै २००८ मध्ये दिलेल्या आदेशानुसार स्पेक या संस्थेने केलेल्या मालमत्ता सर्वेक्षणाच्या कामाचा चौकशी अहवाल.

## प्रस्तावना

दिनांक ८.१२.१९८२ रोजी औरंगाबाद महानगरपालिका अस्तित्वात आली.मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि ड मधील प्रकरण ८ चे कराधान नियम १५ (२) व २० (२) प्रमाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मालमत्तांना कर आकारणी करता येते. त्यानुसार महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर सन १९८७ साली सर्वप्रथम संपूर्ण शहरातील मालमत्तांचे कर आकारणीसाठी सर्वेक्षण करण्याचे काम हाती घेण्यात आले व त्या सर्वेक्षणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी दोन वर्षानंतर म्हणजेच दिनांक १.४.१९८९ पासून करण्यात आली. या सर्वेक्षणाचे वेळी जुन्या नगरपालिका अस्तित्वात असतांनाच्या जुन्या मालमत्तांचे ज्यात कोणत्याही प्रकारचे बदल नाही अशा मालमत्तांचे जुने कर योग्य मुल्य कायम ठेवून ज्या मालमत्तांचे वापरात बांधकामात बदल अथवा वाढ झाल्या आहेत अशा मालमत्तांचे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने ठरवून दिलेल्या दरानुसार कर योग्य मुल्य कायम करण्यात आले. सदरील सर्वेक्षणास ठर्शींळीळर्ही असे संबोधण्यात आले. सर्वेक्षीत मालमत्तांचे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कराधान नियमातील नियमानुसार विहीत कर आकारणी प्रभाग निहाय आकारणी पुस्तकांत नोंदी घेऊन कर आकारणी प्रभाग निहाय आकारणी पुस्तके तयार करण्यात आली. सदरील सर्वेक्षणाचे वेळी शहरातील मालमत्तांची संख्या ६०,०६५ इतकी होती व एकूण कर योग्य मुल्य रू.१५.३१ कोटी इतके होते.

सन १९८९ नंतरच्या कालावधीमध्ये संपूर्ण शहरातील मालमत्तांचे एकाच वेळी सर्वेक्षण करण्यात आलेले नाही. तथापि, प्रत्येक वेळी नविन बांधकामांना कर आकारण्यात येतो. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि **ड** प्रकरण ८ मधील नियम २१ प्रमाणे दर चार वर्षाला नविन आकारणी पुस्तके तयार करून कर आकारणी कायम करणे आवश्यक आहे. तथापी याचे पालन औरंगाबाद महानगरपालिकेच्या कर आकारणी विभागाने केलेले नाही. महानगरपालिका अधिनियमाच्या या तरतूदीचे पालन केले नसल्याने कर आकारणीच्या बाबतीत अनागोंदी कारभार झाल्याचे दिसून येते. याबाबत प्रशासनानेही योग्य ती दखल घेतल्याचे दिसून येत नाही. दरवर्षी आकारणी पुस्तके अद्यावत न केल्यामुळे सुध्दा शहरात एकूण किती मालमत्ता आहेत व त्यावरील एकूण किती कर येणे बाकी आहे याचा निश्चित असा ताळमेळ बसलेला दिसून येत नाही.

## २. मालमत्ताचे खाजगी संस्थेकडून सर्वेक्षण करणे.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या वित्तीय वर्ष सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पात शहरातील मालमत्तांचे खाजगी संस्थेकडून सर्वेक्षण करण्याचा प्रस्ताव मंजूर झाला. त्यानंतर मूल्य निर्धारण अधिकारी यांनी दिनांक ०४.०६.२००३ रोजी मालमत्तांचे सर्वेक्षणाबाबत पुढील प्रमाणे अहवाल दिला आहे.

सर्व साधारण सभा व स्थायी समिती बैठकीत वेळोवेळी हा विषय चर्चीला जात आहे. सर्व साधारण सभेने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने प्रशासनाने पावले उचलण्याचा प्रयत्न सुरू केला. भिवंडी, निजामपुर महानगरपालिकेच्या धर्तीवर याबाबत निविदा काढण्यासाठी प्रस्ताव कार्यवाही अंतर्गत आहे. मुख्य लेखाधिकारी महानगरपालिका,औरंगाबाद यांनी भिवंडी, निजामपुर महानगरपालिकेच्या सक्षम अधिकाऱ्यांकडून याबाबतची संपूर्ण माहिती घेतली आहे.

मालमत्तांचे खाजगी संस्थेकडून सर्वेक्षण करण्यासाठी त्यांना पुरवावी लागणारी प्राथमिक माहिती अद्ययावत असणे गरजेचे आहे. या करीता शहरातील मालमत्तांचा कर आकारणी विभाग व विभागीय कार्यालये यांच्याकडील अभिलेख अद्ययावत असणे गरजेचे आहे. सन १९८९-९० साली संपूर्ण शहराचे एकाच वेळी सर्वेक्षण करण्यात आले व त्या अनुषंगाने आकारणी पुस्तके तयार करण्यात आली व त्यानंतरच्या प्रत्येक आर्थिक वर्षात तितक्या मालमत्तांची वाढ झाली त्याबाबतची नविन आकारणी पुस्तके तयार करून मागील अभिलेखाबाबत जुनीच आकारणी पुस्तके अधिग्रहीत व अधिप्रमाणित (Authintication and Adoption) करण्यात आले.अधिनियमातील तरतुदीनुसार कराधान नियम, नियम क्र.२१ अन्वये दर चार वर्षानंतर एकदा मालमत्ता कर आकारणी पुस्तके नव्याने लिहण्याची आवश्यकता आहे. तथापि सन १९८९-९० पासून ते आजतागायत विविध प्रशासकीय कारणाने आकारणी पुस्तके नव्याने लिहण्यात आली नाही. त्यामुळे या संविधानिक तरतुदीची पूर्तता करणे आवश्यक असून त्याकरीता सध्या अस्तित्वात असलेल्या १,३४,००० मिळकतींची नविन आकारणी पुस्तकात नोंद घेणे आवश्यक राहील. व या करीता संगणकाचा वापर करून नविन आकारणी पुस्तके तयार करता येतील. खाजगी संस्थेला सर्वेक्षणाचे काम देण्यापूर्वी मूळ अभिलेख अद्ययावत करून देणे गरजेचे आहे व या कामी कर आकारणी विभाग क्र.२ साठी एक संगणक व दोन ऑपरेटर कर आकारणी विभाग –१ करीता एक अतिरिक्त ऑपरेटर पुरविणे गरजेचे आहे. दोन महिन्याच्या कालावधीत सर्व अभिलेख अद्ययावत करण्याचे काम कर आकारणी विभागाकडून करण्यात येईल. दरम्यानच्या काळात ज्या ज्या महानगरपालिकांनी मालमत्तांचे सर्वेक्षण खाजगी संस्थेकडून करून घेतले असेल किंवा प्रक्रिया चालु असेल अशा ठिकाणी आपल्या महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी भेटी देवून या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी व प्रस्तावातील त्रुटी त्या अनुषंगाने घ्यावयाची काळजी याचा तपशिलाने अभ्यास करून निविदा काढण्यासाठी एक परिपूर्ण प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. जेणेकरून भविष्यात या प्रयोगामुळे कोणतीही कायदेशिर अडचण निर्माण होता कामा नये. तसेच जनसामान्या मध्ये महानगरपालिकेच्या धोरणाविषयी असंतोष निर्माण होऊ नये याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

खाजगी संस्थेमार्फ़त सर्वेक्षण करतांना सर्वेक्षण करणारी संस्था ही कर योग्य मूल्यामध्ये होणाऱ्या वाढीवर टक्केवारी नुसार त्यांचा फ़ायदा निश्चित करते त्यामुळे साहजिकच संस्थेकडून कर योग्य मुल्य झपाट्याने वाढविले जाईल. परंतु असे कर योग्य मुल्य वाढवितांना विद्यमान कायद्याच्या तरतुदींचा भंग होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक राहील. मालमत्ता कराची योग्य आकारणी व वसूली करण्याचे संविधानिक अधिकार हे औरंगाबाद महानगरपालिकेस असल्याने खाजगी संस्थेने सर्वेक्षणा मध्ये केलेल्या चुकांची जबाबदारी ही महानगरपालिका प्रशासनालाच घ्यावी लागणार आहे. प्रकरणे न्यायप्रविष्ट झाल्यास खाजगी संस्थेला जबाबदार धरता येणार नाही. करीता याबाबत अत्यंत गांभीर्याने विचार करून व सर्व बऱ्या वाईट परिणामाचा सखोल व तुलनात्मक अभ्यास केल्यानंतरच निविदा काढण्याची कार्यवाही सुरू करण्याची आवश्यकता आहे.

## ३. खाजगी संस्थेकडून मालमत्तांचे सर्वेक्षणास काही नगरसेवकांचा विरोध.

दिनांक ९ जुलै २००३ च्या स्थायी समिती सभेने खाजगी संस्थेमार्फ़त औरंगाबाद शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण व संगणकीकरण करण्याच्या अनुषंगाने निविदा काढण्याचे आदेशित केले होते.

त्यानंतर दिनांक १ ऑगस्ट २००३ रोजी कॉम्रेड सय्यद अली सलामी अशफ़ाक व इतर ९ नगरसेवकांनी तत्कालीन आयुक्तांना निवेदन दिले होते. त्यात शहरातील मालमत्तांचे कर आकारणीसाठी खाजगी संस्थेकडून सर्वेक्षण करू नये म्हणून विनंती केली होती. त्यांनी मांडलेले महत्वाचे मुद्दे असे -

१. मुळातच चालु आर्थिक वर्षात विकास कामासाठी भांडवल निधी उपलब्ध नसल्याने अनेक वार्डातील विकासाची कामे रद्द करण्यात आली आहेत.

२. मूळ अर्थसंकल्पात दलित व मुस्लिम बहूल वार्डातील विकास कामांची तरतूद कमी करून अन्याय केलेला आहे.

३. मूळात ३७ कोटी मालमत्ता कराची थकबाकी असतांना केवळ ७ कोटीची वसूली झाली आहे. उर्वरीत ३० कोटी थकबाकीची वसूली करण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्नांची आवश्यकता आहे.

४. मालमत्ता कराच्या वसूलीसाठी खाजगी संस्थेची मदत घेणे योग्य परंतू केवळ कर आकारणीसाठी मालमत्तांचे सर्वेक्षण करणे व त्याकरीता निविदा काढणेचा प्रस्ताव म्हणजे जनतेच्या नजरेत धूळफ़ेक करून महापालिकेचा पैसा अकारण उडविणे आहे. यामध्ये काही मूठभर लोकांचे हित साधणे हाच उद्देश आहे.

५. औरंगाबाद महापालिकेत कर आकारणीसाठी साधारणपणे २७ अधिकारी / कर्मचारी काम करतात त्यांचेवर होणारा खर्च कायम ठेवून खाजगी संस्थेचा अतिरिक्त बोजा पडणार आहे, याचा प्रशासनाने विचार करणे गरजेचे आहे.

६. वरील बाबींचा विचार करून आमच्या शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण खाजगी संस्थेमार्फ़त करण्यास विरोध आहे. तरी सदरील खाजगी संस्थेकडून सर्वेक्षणाचे कामाचा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

## ४. खाजगी संस्थेकडून मालमत्तांचे सर्वेक्षणास मान्यता.

सन २००३-२००४ च्या औरंगाबाद महानगरपालिकाच्या अर्थसंकल्पात शहरातील मालमत्तांचे खाजगी संस्थेकडून करण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला होता आणि तो प्रस्ताव मंजूरही झाला. त्यानंतर स्थायी समितीच्या दिनांक ९.७.२००३ च्या सभेत खाजगी संस्थेमार्फ़त औरंगाबाद शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण व संगणकीकरण करण्याच्या कामाची निविदा काढण्याचा प्रस्ताव प्रशासनाने मांडला आणि तो सर्वानुमते मंजूर झाला.

औरंगाबाद महानगरपालिकेने शहराच्या हद्दीत असलेल्या मालमत्तांचे सर्वेक्षण करून मालमत्ता कर आकारणी करणे व संगणकीकरण करणे बाबत खाजगी संस्थेकडून निविदा मागविण्यता आले. एकूण ८ सिलबंद निविदा प्राप्त झाल्या पैकी चार निविदा धारकांची निविदा उघडण्यात आली तयाची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | दर प्रती मिळकत | गुण ५० पैकी |
|---|---|---|---|
| १ | M/s Sungrace Engineering project Pvt. Ltd. Pune. | रू.१५७ प्रती मिळकत | २५.५५ |
| २ | M/s Monarch Surveyors & Contractor, Pune. | रू.२७० प्रती मिळकत | ३८.५५ |
| ३ | M/s Speck System Ltd . Hydrabad. | रू.१५३ प्रती मिळकत | ४२.५५ |
| ४ | M/s JMK infotech Aurangabad. | रू.३८१ प्रती मिळकत | ३०.४४ |

प्राप्त झालेल्या निविदामध्ये स्पेक कं.चा दर सर्वात कमी रू.१५३/- प्रती मालमत्ता आला होता. तसेच प्रात्यक्षिकातही सर्वात जास्त गुण ४२.५५ स्पेक सिस्टीम्स यांना मिळाले होते. त्यानुसार दिनांक २६.२.२००४ रोजी स्पेक सिस्टीम लि.हैद्राबाद या संस्थेस शहराच्या हद्दीत असलेल्या मालमत्तांचे सर्वेक्षण करून मालमत्ता कर आकारणी करणे व संगणकीकरण करणे बाबत कंत्राट देण्यात आलेले आहे. सदर संस्थेस दि.२६.२.२००४ रोजी कार्यादेश देणेत आलेला आहे. संस्थेस करारनाम्याचे अटी-शर्तीनुसार सहा महिन्यात काम पूर्ण करावयाचे होते.

स्पेक संस्थेस प्रथम कामाची मुदतवाढ दि.३१.१२.०४ पर्यंत देण्यात आलेली होती. संस्थेबरोबर महानगरपालिकेने केलेल्या निविदेतील अटी-शर्ती प्रकरण –२ मधील कलम १० नुसार महानगरपालिकेने स्पेक कंपनीस दि.०१.०१.२००५ पासून रू.५०००/- प्रती दिवस याप्रमाणे दंड आकारण्यात येत आहे.

दि.०१.०१.२००५ पासून ते ३१.१२.२००७ पर्यंत एकूण दिवस १०९५ होतात, त्यावर प्रती दिवस रू.५०००/- प्रमाणे दंडाची रक्कम रू.५४,७५,०००/- इतकी होते.

सदर संस्थेस दि.३१.१२.२००७ पर्यंत मुदत वाढ देण्यात आलेली आहे. तसेच दि.०१.०१.२००५ पासून रू.४९,०५,०००/- इतका दंड संस्थेचे अदा करण्यात आलेल्या देयकातून वसूल करण्यात आलेला आहे.

स्पेक संस्थेला आतापर्यंत रू.१,१८,७२,५१९ इतका मोबदला महानगरपालिकेतर्फे अदा करण्यात आलेला आहे.

## ५. सर्वेक्षण संस्थेने करावयाची कामे

सर्वेक्षण व संगणकीकरणाचे कामांत प्रामुख्याने पुढील बाबींचा समावेश आहे.

१. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ व त्याखालील नियमांतील तरतूदींचे पालन करून औरंगाबाद शहरातील प्रत्येक मालमत्तेचे सर्वेक्षण तीन व्यक्तींचा एक गट (ज्यात एक अभियंता, एक सर्वेअर व एक क्लार्क राहील) प्रत्यक्ष जागेवर जाऊन स्थळ पाहणी करणे.

२. प्रत्येक सर्वेक्षण केलेल्या मालमत्तेस स्वतंत्र असा घर क्रमांक देऊन त्यावर विहीत नमुन्यातील अॅल्युमिनियम नंबर प्लेट लावणे.

३. प्रत्येक मालमत्तेचा स्थळदर्शक नकाशा आणि मालमत्तेचा तपशील दर्शविणारा नकाशा (Floor Plan) तयार करून संगणकीकृत करणे.

४. वॉर्ड निहाय मालमत्ता दर्शविणारा नकाशा सर्व मालमत्तांचे चतु:सिमा दर्शविणारा नकाशा (Ward Plan) तयार करणे.

५. या संबंधी तयार करण्यात आलेला डर्ष्टिुरीश व त्यातील माहिती प्रत्येक संगणकात प्रस्थापित (Install) करून देणे.

६. दहा संगणक संच, दहा लेझर प्रिंटर्स, स्टेशनरी इत्यादी सामग्री काम संपल्यानंतर महानगरपालिकेला देणे.

७. मालकी हक्कासंबंधीची कागदपत्रे मालमत्ताधारकाकडून सर्वेक्षणाच्यावेळी प्राप्त करून देणे.

८. संस्थेने सर्वेक्षणाच्या वेळी घेतलेले मोजमाप विहित नमुन्यात मालमत्ता धारकांच्या स्वाक्षरीसह प्राप्त करून देणे.

**थोडक्यात सर्वेक्षण करतांना प्रस्तुत करण्यात आलेल्या सर्वेक्षण व संगणकीकरण करणेच्या कामात खालील बाबींचा समावेश आहे.**

१. सद्यस्थितीत कर आकारणी पुस्तकांतील नोंदविलेल्या मालमत्तांच्या नोंदीचे संगणकीकरण करणे. (Data Feeding करणे)

२. शहरातील संपूर्ण मालमत्तांचे सर्वेक्षण करून संगणकीकरण करण.(Data Feeding चे काम करणे)

३. शहराचे झोन निहाय नकाशे तयार करणे, त्या त्या झोन Assesment Ward पाडून Assesment Ward चे नकाशे तयार करणे त्यांचे संगणकीकरण करणे.

४. प्रत्येक मालमत्तांचे (अस्तित्वात असलेल्या व सर्वेक्षणात नोंद केलेल्या मालमत्तांचे) Location Map व Floor Plan तयार करणे, कर आकारणी प्रभाग निहाय सर्वेक्षित मालमत्तांची पडताळणी जुन्या अभिलेखाशी करून ,वापरा बाबत बांधकामातील वाढ /बदल इत्यादींची नोंद घेऊन दिलेल्या कर आकारणीचे दरांनुसार Zonewise व Wardwise आकारणी पुस्तके तयार करणे, खास नोटीस तामिल करणे, आक्षेप रजिस्टर तयार करणे, आक्षेप निकाली काढल्यानंतर त्यांची नोंद आकारणी पुस्तकात घेणे, Zonewise समरी रजिस्टर व Demand Register तयार करणे, मागणी बील देणे, प्रत्येक घरावर मालमत्ता क्रमांकाची पट्टी ठोकणे इत्यादी कामांचा समावेश आहे.

वर नमूद केलेली सर्व कामे ज्यात Physical Survey व Computerisation ची एकत्रित गुंफ़ण आहे. हे काम हाती घेतल्यामुळे सर्व मालमत्तांची नोंद ठ्शलींव ला होईल. संपूर्ण मालमत्तांचे कर आकारणी अभिलेख हा Computerised झाल्यामुळे तसेच व्यस्थित नकाशे तयार झाल्यामुळे सद्यस्थितीतील प्रतीवार्षिक मालमत्तांचे कराचें मागणीत मोठ्या प्रमाणावर वाढ होईल. सद्यस्थितीमध्ये एकूण कर योग्य मुल्य रू.५५ कोटी इतके असून प्रतीवर्ष मागणी रू.२३ कोटी आहे. ज्यात सर्वेक्षणानंतर वाढ होऊन अंदाजे एकूण कर योग्य मुल्य रू.१०० कोटी होईल. प्रत्येक मालमत्तांचे Wardwise नकाशे तयार केल्यामुळे व मालमत्तांवर क्रमांक टाकल्यामुळे Bill OF Demand तामिल करणे सोपे जाईल पर्यायाने मालमत्ता कराची वसूली ही करणे सोपे जाईल.

**सर्वेक्षण करतांना पुढील महत्वाच्या अटी व शर्ती प्रस्तुत करण्यात आल्या.**

अ) प्रत्येक मालमत्तेचा सर्वे संस्थेची तीन व्यक्तिंची टीम (ज्यात एक इंजिनियर,एक सर्वेयर व एक कारकून असेल) करेल.

ब) सर्वेक्षण संस्था/ एजन्सी घर नंबराच्या प्लेट्स तयार करून त्या प्रत्येक मालमत्तेच्या घराच्या दरवाजावर विशिष्ट ठिकणी बसविण्यात येईल. प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे वेळी एजन्सी प्रत्येक मालमत्तेच्या दरवाजावर मार्कर पेनने घर क्रमांक लिहील.

क) नंबर प्लेट ही ॲल्युमिनियम धातूची व ४ मीमी जाड, २२० मीमी × ७५ मीमी लांबी रूंदीची राहील त्यावर झोन नंबर, असेसमेंट ,वॉर्ड नंबर व घरनंबर राहील.

ड) स्थळनकाशा,(Location Plan) जोत्याचा नकाशा (Floor Plan) व आकारणी प्रभाग(Assesment Ward / Zone Plan) नकाशा तयार करून संगणकीकृत करणे.

इ) सर्वेक्षण कामाचे एक संगणक प्रणाली (Software) संगणकात प्रस्थापित (Instal) करणे. ज्यात प्रभागनिहाय इमारती व जागांची माहिती असेल, कर मूल्य निर्धारण आकारणी प्रगणकना (Calculation of Ratable Value for Tax assesment) असेल,

कर आकारणी सूचना (Tax assesment Notice) असेल, कर देयक (Tax bill after appeal & settlement) असेल ,मागणी सूचना (Demand Notice after expiry of due date per tax payments) असेल,हरकतींची नोदंवही असेल, कर कमी /जादा केल्याचे प्रभागनिहाय नोंदवही असेल, मागणी नोंदवही (Demand Register) असेल, वेळोवेळीचे थकबाकीदारांची (Defaulters) ची यादी असेल, दररोजचा जमेचा तक्ता (Daily Collective Scroll) असेल, कर वसूली अधिकाऱ्यांचा कामाचा अहवाल (Tax Collecters performance statement) वसूली टक्केवारीसह असेल.

फ़) महानगरपालिकेच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना वरील (इ) च्या संगणक प्रणाली (Software) चे तपशीलवार प्रशिक्षण देणेत येईल.

ज) सदरील सर्वेक्षणाच्या कामाबाबत संबंधित संस्थेस करावयाची अदाई पुढीलप्रमाणे असेल.

१. शहरातील सर्वेक्षणाचे एकूण काम (Total Survey) महानगरपालिकेच्या प्राधिकाऱ्याच्या योग्य त्या पडताळणीनंतर व समाधानकारकरित्या पूर्ण केल्यानंतर ठरलेल्या रकमेच्या २५% रक्कम अदा केली जाईल.

२. शहरातील मालमत्तांचे काम पूर्णपणे झाल्यानंतर (after completion the entire survey work) मालमत्ताधारकांना सूचना (Special Notice) संस्थेतर्फ़े देऊन त्यावरील योग्य त्या हरकतींची सुनावणी व हरकतींचे अंतिम निराकरण झाल्यानंतर कामाची २५% रक्कम दिली जाईल.

३. महानगरपालिका कर कायद्यानुसार /नियमानुसार जाहीर सूचना (Public Notice) महापालिकेमार्फ़त प्रसिध्द करण्यात येऊन त्यावरील हरकतींची सुनावणी व हरकतींचे अंतिम निराकरण आणि संगणकीकरणाचे काम पूर्ण केल्यानंतर कामाची २५% रक्कम देणेत येईल.

४. कर देयकांची पडताळणी, व सर्वेक्षण कामाच्या खरेपणाची व अधिकृततेची होऊन त्याचे संबंधितांना वाटप झाल्यानंतर (Distribution of bills and after verification corrections of the survey) आणि संगणकीकरणाचे काम पूर्ण केल्यानंतर उर्वरित २५% रक्कम देण्यात येईल.

## ६. सर्वेक्षण संस्थेस अदा केलेल्या रकमांचा तपशील.

औरंगाबाद शहरातील महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण मे.स्पेक कंपनीने चालू केल्यानंतर त्यांना याबाबत आजतागायत रक्कम रू.१,१८,७२,५१९/- अदा करण्यात आलेले आहेत. त्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | १२५८१ | १५.१२.२००५ | रू.१५,००,०००/- |
| २ | १५८७९ | २७.०२.२००६ | रू.१०,००,०००/- |
| ३ | १६७२१ | १३.०३.२००६ | रू.१०,००,०००/- |
| ४ | ७९६० | १८.१०.२००६ | रू.२५,००,०००/- |
| ५ | ११७१८ | ०६.०१.२००७ | रू.१३,२४,२८०/- |
| ६ | १२३५२ | १७.०१.२००७ | रू.२५,००,०००/- |
| ७ | ४४७४ | १८.०८.२००७ | रू.२०,४८,२३९/- |
| | | **एकूण** | **रू.१,१८,७२,५१९/-** |

## ७. घर नंबर प्लेटची तपासणी.

घर नंबर प्लेटची तपासणी स्पेक कंपनीशी औरंगाबाद शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण करतेवेळी निविदेतील अटी व शर्तीच्या क्रमांक ५.४ नुसार ॲल्युमिनियम धातूची घर नंबर प्लेट ही २२० मी.मी. लांबीची, ७५ मी.मी. रूंदीची आणि ४ मी.मी. जाडीची असावी असे स्पष्टपणे नमूद केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था, स्टेशन रोड,औरंगाबाद यांचेकडून सदरील घर नंबर प्लेटची तपासणी करण्यात आली. त्याचा तपशील प्राचार्यानी त्यांचे पत्र क्र. औप्रस/औ/POTS/ २००८, दिनांक १४.०८.२००८ अन्वये कळविला आहे, तो पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | विवरण |
|---|---|---|
| १ | पाटीची लांबी | L = 210 mm |
| २ | पाटीची रूंदी | B = 70 mm |
| ३ | पाटीची जाडी (विनाअक्षर) | $T_2$ = 1.20 mm |
| ४ | पाटीची जाडी (अक्षरासह) | $T_1$ = 2.14 mm |
| ५ | पाटीचे वजन (रंगासह) | W = 54 gram |
| ६ | पाटीचा धातू | M = Aluminium Alloy. |

यावरून असे सिध्द होते की, स्पेक कंपनीने विहीत घर नंबर परिमान करारानुसार विहीत केलेल्या आकारमानाच्या व दर्जाच्या घर नंबर प्लेट्स बसविलेल्या नाहीत.

## ८. प्रभाग अधिकाऱ्यांनी स्पेकच्या सर्वेक्षणाबाबत दिलेले अहवाल.

स्पेक सिस्टीम लि.हैद्राबाद कंपनीने केलेल्या कामाचा प्रभाग (वॉर्ड) अधिकाऱ्यांनी अहवाल दिला आहे, त्याचा प्रभागनिहाय तपशील पुढील प्रमाणे आहे.

### प्रभाग – अ

१. वार्डांतर्गत २९,१७७ मिळकतींचे सर्वेक्षण झाल्याचे कळविले आहे. तथापी, प्रत्यक्षात २४,००० मिळकतींचे समरी गोषवारा रजिस्टर देण्यात आले.

२. वार्डांतर्गत एकूण १९,३६१ देयके देण्यात आलेली असून अद्याप ९,८१६ मिळकतींचे देयक स्पेककडून अप्राप्त आहे.

३. अनेक मोहल्यांची/ भागांची देयके आजपावेतो अप्राप्त आहे. याबाबत एजन्सीला पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे.

४. वार्डांतर्गत बऱ्याच घरांना नंबर प्लेट बसविण्यात आलेल्या नाहीत.

५. सन २००४-२००५ मध्ये प्राप्त आक्षेप व त्यावर केलेली कार्यवाहीबाबत या विभागास माहिती देण्यात आलेली नाही.

६. आजपावेतो १०७१ आक्षेप प्राप्त झालेले असून आणखीही आक्षेप प्राप्त होत आहेत.

७. जुन्या बांधकामास कर आकारणी असतांनाही नविन दराने कर आकारणी व तसेच वाढीव बांधकामासही संपूर्ण घरास नविन दराने कर आकारणी केल्याचे दिसून येते.

८. संगणकीय केलेल्या Data बाबत या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना योग्य प्रकारे Training देण्यात आलेली नाही.

९. मिळकतींचे (समरी) गोषवारा रजिस्टर हे मोहल्ला निहाय नाहीत.

१०. अनेक ठिकाणी मालमत्ता धारकांचे अपूर्ण नांव काही ठिकाणी चूकीचे नांव तसेच भाडेकरूचे नांव मागणी देयकांवर दिलेले आहे.

### प्रभाग – ब

१. प्रत्येक मालमत्तेचा स्थळदर्शक नकाशा व मालमत्तेचा तपशील दर्शविणारा नकाशा तयार करून संगणकीकृत केलेला नाही.

२. वॉर्डनिहाय मालमत्ता दर्शविणारा नकाशा व सर्व मालमत्तांचे चर्तुसीमा दर्शविणारा नकाशा तयार करून दिलेला नाही.

३. या संबंधी तयार करण्यात आलेला सॉफ़्टवेअर व त्यातील माहिती संगणकात प्रस्थापित करून देण्यात आलेली नाही.

४. वॉर्ड - ब कार्यातयात एक संगणक संच व प्रिन्टर दिलेला असून तो मा.उपआयुक्त सिडको यांच्या दालनात दिलेला आहे. तसेच स्टेशनरी उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

५. मालमत्ता मालकी हक्का संबंधित कागदपत्रे मालमत्ता धारकाकडून सर्वेक्षणाच्या वेळी घेतलेली नाही. चूकीच्या नावाने भाडेकरूच्या नावाने व टायअल होल्डर च्या नावाने आकारणी करण्यात आल्याचे निदर्शनास येते.

६. विहीत नमुन्यात मालमत्ताधारकांची स्वाक्षरीसह अभिलेख उपलब्ध करून देण्यात आलेला नाही.

७. सर्वेक्षणाच्या वेळी संस्थेची टीम प्रशिक्षित तीन व्यक्तींची टीम आढळून आलेली नाही. सदर संस्थेने अप्रशिक्षित कर्मचारी (अनस्कील्ड) नेमणूक करून सर्वेक्षण केलेले आहे. असे निदर्शनास आले.

८. स्पेक संस्थेने घर नं. प्लेट्स तयार करून प्रत्येक मालमत्तेला बसव्यिात आलेले नाही. सदर काम अपूर्ण असून या कामाबाबत कोणताही लेखी अहवाल या कार्यालयात सादर केलेला नाही अथवा माहिती दिलेली नाही.

९. अहवाल न दिल्याने घर नं. प्लेट साईज बाबत या कार्यालयात माहिती नाही तसेच प्लेट्सवर असेसमेन्ट नंबर नमूद केलेला नाही.

१०. स्थळ नकाशा व जोत्याचा नकाशा व आकारी प्रभाग नकाशा तयार केलेला नसून संगणकीकृत केलेला नाही.

११. मागणी रजिस्टर, हरकती नोंदवही, कर कमी जादा केल्याचे प्रभागनिहाय नोंदवही , थकबाकी दारांची यादी इ.प्रकारचे दस्तावेज उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.

१२. तसेच स्पेक कंपनीने सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात कोणत्याही मालमत्तेची नोटीस अथवा मागणी बील दिलेले नाही. सन २००७-२००८ या आर्थिक वर्षातील डिसेंबर २००७ मध्ये सन २००६-२००७ व सन २००७-२००८ या दोन वर्षाचे एकत्र मागणी बिल स्पेक कंपनीने वाटप केलेले आहे. यामुळे मिसींग प्रॉपर्टी बऱ्याच प्रमाणात होती व तसेच बऱ्याच प्रमाणात बिल वाटप करण्यात आलेले नाही. असे नागरीकांच्या तक्रारी वरून लक्षात आले.

१३. बिल भरणा केलेला असतांना बिलातून रक्कम वजा झालेली नाही. त्यामुळे नागरीकांना मनस्ताप व चकरा मारणेची वेळ आलेली आहे.

१४. तसेच काही नागरीक अक्षरश: वॉर्ड कार्यालयात वाद घालतात. त्यामुळे नागरीकांनी तात्पुरती दुरूस्ती करून द्यावी लागते. बऱ्याच नागरीकांनी या कार्यालयास किराणा दुकानाची उपमा दिलेली आहे.

१५. चालु आर्थिक वर्षात जुलै महिन्यापासून संगणक प्रणाली बंद करून ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे नागरीकांना नावात दुरूस्ती व अतिरिक्त बिलाची प्रत देता येत नाही. यामुळे मालमत्ता कर भरणा करणाऱ्या नागरीकांची गैरसोय होत आहे.

# प्रभाग – क

१. कॉम्प्युटर लावले आहे. प्रिंटर वॉर्ड -ड मध्ये नेले आहे.

२. मालमत्ता कराच्या नोटीसा ५०% तयार केल्या आहेत. ५०% नोटीसा बाकी आहेत.

३. मालमत्ता कराचे नंबर प्लेट पूर्ण लावलेले नाही. ४०% प्लेट लावणे बाकी आहे व काही ठिकाणी चूकीचे नंबर प्लेट लावले आहे. काही घरांना दोन नंबर प्लेट लावले आहेत.

४. कर आकारणी करतांना मालमत्ताचे मोजमाप बाहेरून घेतलेले आहे. त्यामुळे अवाढव्य कर आकारणी करण्यात आली आहे.

५. जुना कर असतांना नविन दराने कर आकारणी केली आहे. तसेच नविन देयकावर जुना मालमत्ता क्रमांक टाकलेला नाही त्यामुळे वसूली करतांना अडचण येत आहे.

६. तक्रारी अर्ज २१६० या प्रभागात प्राप्त झाले आहे व अजून प्राप्त होत आहे. तसेच ५०% नोटीसा मिळाल्यानंतर पुन्हा आक्षेप प्राप्त होतीलच.

७. उर्वरीत नोटीस प्राप्त झाल्यानंतर पुन्हा तक्रारी अर्ज येतील.

८. मालमत्ता कराचे मागणी देयक (छपाई प्रिंट)९००० (त्यापैकी ६५७ प्रिंट - अ ला पाठविण्यात आले)

९. कॉम्प्युटरमधील असलेली मालमत्ता १८००० (स्पेक कंपनीने सर्वेक्षण केलेली स्पेक कंपनीची मालमत्ता)

१०. टॅक्स बिल कलेक्शनचे सॉफ़्टवेअर कॉम्प्युटरमध्ये लोड केलेले आहे.

११. ऑबजेक्शन आणि हेअरींग चे सॉफ़्टवेअर कॉम्प्युटरमध्ये लोड केलेले आहे.

१२. तसेच स्पेक कंपनीने टाकलेल्या घर नंबरवरून त्या नंबरची मालमत्ता आपण चेक करू शकतो त्यासाठी त्यांनी View property details मध्ये New property details असे ऑप्शन दिलेले आहे.

१३. तसेच महानगरपालिकेचा जुना रेकॉर्ड चेक करण्यासाठी सुध्दा Old property details असे ऑप्शन दिलेले आहे.

१४. वॉर्ड - क मधील बिल काढण्यासाठी Tax Bill collection ऑप्शन कॉम्प्युटरमध्ये लोड केलेले आहे.

१५. नविन व जुनी मालमत्ता यासाठी स्पेक कंपनीने New property information & old roperty information असे Option चे सॉफ़्टवेअर कॉम्प्युटरमध्ये लोड केलेले आहे.

१६. स्पेकची मालमत्ता कराची समरी रजिस्टर –१६

१७. लिंकअप केलेली मालमत्ता –

१८. मालमत्तेची मोजणीचा नकाशा फ़क्त चेक करण्यासाठी Abode Ledar असे ऑप्शन कॉम्प्युटरमध्ये लोड केलेला आहे.(नविन नकाशा बनविण्यासाठी अॅटो कार्डची सिडी इन्स्टॉल केलेली नाही)

१९. स्पेक कंपनीने Assessment Comparision,Generate Tax Bill तसेच Dimand Ragister linking असे Option चे सॉफ़्टवेअर कॉम्प्युटरमध्ये लोड केलेले आहे.

२०. तक्रार सुनावणी नोटीस व फ़क्त दुरूस्तीचे सॉफ़्टवेअर कॉम्प्युटरमध्ये लोड केलेले आहे.

२१. एच.सी.एल.चे कॉम्प्युटर व एच.पी.लेसर जेट १०२० चे प्रिंटर.

२२. किबोर्ड व माऊस.

## प्रभाग – ड

१. वॉर्ड -ड अंतर्गत झालेल्या सर्वेचे अनुषंगाने सन २००४-२००५ मध्ये किती मिळकतींना नोटीस दिल्या याबाबत एजन्सीचा अहवाल अप्राप्त.

२. दिलेल्या नोटीसचे उत्तरी किती आक्षेप अर्जावर सुनावणी झाली याबाबतचा एजन्सीचा अहवाल अप्राप्त.

३. माहे एप्रिल - मे- २००८ मध्ये वॉर्ड -ड कार्यालयास एकूण १२ ते १३ हजार देयके वाटप करण्यास देण्यात आलेली होती ती सर्व वाटप करण्यात आलेली आहे. तथापी उर्वरीत देयके अप्राप्त आहेत.

४. देयके वाटप करण्यास पुरविण्यात आल्यावर प्राधान्याने असे निदर्शनास आले आहे की, देयके ओळीने नाहीत. मधील बऱ्याच घरांची देयके अप्राप्त आहेत. देयके वाटपास देतांना एजन्सीने चेक लिस्ट देण्याचे मान्य केले होते. तथापी चेकलिस्ट सुध्दा देण्यात आलेली नाही.

५. वॉर्ड कार्यालयातर्फ़े वाटण्यात आलेल्या देयकावर माहे ऑगस्ट २००८ सुरवातीपावेतो २०६० आक्षेप प्राप्त झालेले असून सदर आक्षेपांची सुनावणीची कार्यवाही हाती घेतलेवर प्रामुख्याने असे निदर्शनास येते की,

   अ. मोठ्या प्रमाणात मिळकतीचे जुने करआकारणी बाबतचे अभिलेख (Old Assessment) नोंदी केलेल्या नाहीत व संगणकामध्ये लिंकिंग करता येत नाही.

   ब. मोठ्या प्रमाणात मिळकतीचे बाहेरील बाजुने मेजरमेंट (Outer Measurement) घेतलेले असल्याचे दिलेल्या नकाशा वरून निदर्शनास येते.

   क. बऱ्याच मिळकत धारकांच्या नावात तफ़ावत आहे.

ड. बऱ्याच मिळकती जुन्याच असून वापरात अथवा बांधकामात वाढ वा बदल झालेला नसतांना सुध्दा त्यांना नविन दराने कर आकारणी झाल्याची बाब दिसून येते.

६. उक्त मिळकती पैकी देयके वाटप करतांना बऱ्याच मिळकतींना नविन नंबरप्लेट लावलेल्या नसल्याची बाब निदर्शनास येते.

७. बऱ्याच मिळकतींना नंबर प्लेट लावल्या तथापी स्पेकचे रेकॉर्ड नुसार नाहीत. या बाबींमुळे नावानुसार,रेकॉर्डवरील मिळकतीत फ़रक असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

८. वॉर्ड कार्यालयास उपलब्ध करून दिलेल्या संगणकास हाताळणीबाबत कार्यालयीन कर्मचाऱ्यांना कुठलीही माहिती दिलेली नसल्याने सदर संगणक हाताळणी करणे शक्य होत नाही.

## प्रभाग –इ

१. स्पेक कंपनी मार्फ़त एक संगणक प्रिंटरसह प्राप्त झालेला असून त्यामध्ये फ़क्त जुन्या शहराचाच डेटा समाविष्ट आहे. एन –२, एन-३, एन-४ या सिडको प्रभागाचा डेटा त्यामध्ये समाविष्ट नाही.

२. स्पेक कंपनी मार्फ़त सन १.४.२००५-०६ पासून ते दि.३१.३.०९ पर्यंतचे थकबाकी व चालू मागणी दर्शविलेले जुन्या शहराचे १८५१९ बीले प्राप्त झालेली आहे. तसेच सन १.४.२००६-०७ ते दि.३१.३.०९ पर्यंतचे एन-२,एन-३,एन-४ या सिडको प्रभागाचे ५६२४ बीले प्राप्त झाली आहेत. साधारणपणे १०,०००/- संगणकीकृत देयके प्रीन्ट करून दिलेले नाही.

३. स्पेक कंपनी मार्फ़त २००४-०५ पूर्वी कर आकारणी झालेल्या मालमत्तेस कर आकारणी करणे अपेक्षित नसतांना सरसकट सर्व मालमत्तेला कर आकारणी करण्यात आलेली आहे. त्यामुळे आक्षेपाचे प्रमाण वाढलेले आहे.

४. या प्रभागाच्या कार्यक्षेत्रात जवळपास ३०,००० ते ३५,००० च्या दरम्यान मालमत्ता असून २८,००० ते ३०,००० च्या दरम्यान मालमत्तेचे सर्वेक्षण केलेले आहे. त्यामुळे जवळपास ५००० ते ७००० च्या आसपास मालमत्ता कर आकारणी पासून सुटलेले आहे.

५. कर आकारणी करतांना भरून घेणत आलेले माहिती पत्रक, हिशोब तक्ता व वाटप करण्यात आलेल्या खास नोटीसीची तामीली व मूळ प्रत या विभागास प्राप्त झालेल्या नाहीत.

६. खास नोटीस वाटप केल्यानंतर प्राप्त झालेल्या आक्षेपावर घेतलेल्या सुनावणीनंतर दुरूस्त करण्यात आलेल्या कराच्या माहितीचे आक्षेप अर्ज आक्षेप नोंदविलेले रजिस्टर व मालमत्ता कर कमी जास्त केलेले रजिस्टर या विभागास प्राप्त झालेले नाहीत.

७. या प्रभागाचे समरी रजिस्टर प्रमाणित करून प्राप्त झालेले नाहीत.

८. कर आकारणी करतांना ब्लॉक वाईज तयार करण्यात आलेले नकाशे या विभागाने मागणी करूनही प्राप्त झालेले नाहीत.

९. संगणकामध्ये रोखपालास पावती फ़ाडण्यासारखे सॉफ़्टवेअर टाकण्यात आलेले नाही.

१०. मालमत्ता करावर आलेल्या आक्षेपानुसार दुरूस्त करण्यात आलेला मालमत्ता कर संगणकात दुरूस्त करण्यासाठीचा कोडवर्ड दिलेला नाही.

११. स्पेक कंपनी मार्फ़त सर्व घरांना ठराविक नमुन्यात नंबर प्लेट लावलेले आहेत का, याचा अहवाल सादर केलेला नाही.

१२. मालमत्ता कर आकारणी करतांना जुन्या मालमत्तेस करण्यात आलेल्या आकारणीनुसार इंटरलिंकींग करून दिलेली नाही.

१३. नविन कर आकारणी करतांना माहिती पत्रकाआधारे हिशोब तक्ता व नोटीसा तयार करता आली पाहिजे.

## प्रभाग – फ

१. मालमत्ता कराचे मागणी देयक (छपाई प्रिंट)- १६००० (त्यापैकी ३००० प्रिंट दुसऱ्या वार्डातील असल्याने ते त्या त्या वार्डास वितरीत करण्यात आले.)

२. कॉम्प्युटर मधील असलेली मालमत्ता – ३२००० (स्पेक कंपनीने सर्वेक्षण केलेली स्पेक कंपनीची मालमत्ता)

३. टॅक्स बिल कलेक्शनचे सॉफ़्टवेअर कॉम्प्युटरमध्ये लोड केलेले आहे.

४. ऑबजेक्शन आणि हेअरींग चे सॉफ़्टवेअर कॉम्प्युटर मध्ये लोड केलेले आहे.

५. तसेच स्पेक कंपनीने टाकलेल्या घर नंबरवरून त्या नंबरची मालमत्ता आपण चेक करू शकतो त्यासाठी त्यांनी View Property details मध्ये New Property details असे ऑप्शन दिलेले आहे.

६. तसेच महानगरपालिकेचा जुना रेकॉर्ड चेक करण्यासाठी सुध्दा Old Property details असे ऑप्शन दिलेले आहे.

७. वॉर्ड - फ मधील बिल काढण्यासाठी Tax Bill Collection ऑप्शन कॉम्प्युटरमध्ये लोड केलेले आहे.

८. नविन व जुनी मालमत्ता यासाठी स्पेक कंपनीने New property Information & Old Property information असे Option चे सॉफ़्टवेअर कॉम्प्युटरमध्ये लोड केलेले आहे.

९. स्पेकची मालमत्ता कराची समरी रजिस्टर –१६

१०. लिंकअप केलेली मालमत्ता –६०००

११. मालमत्तेची मोजणीचा नकाशा फ़क्त चेक करण्यासाठी Abode Ledar असे ऑप्शन कॉम्प्युटरमध्ये लोड केलेला आहे. (नविन नकाशा बनविण्यासाठी अॅटो कार्डची सिडी इन्स्टॉल केलेली नाही).

१२. स्पेक कंपनीने Assessment Comparision, Generate Tax Bill, तसेच Dimand Ragister Lingking असे Option चे सॉफ़्टवेअर कॉम्प्युटमध्ये लोड केलेले आहे.

१३. तक्रार सुनावणी नोटीस व फ़क्त नावात दुरूस्तीचे सॉफ़्टवेअर कॉम्प्युटरमध्ये लोड केलेले आहे.

१४. एच.सी.एल.चे कॉम्प्युटर व एच.पी.लेसर जेट १०२० चे प्रिंटर.

१५. किबोर्ड व माऊस.

१६. एकूण २०७१ आक्षेपांचे अर्ज प्राप्त झालेले असून आणखीही आक्षेपांचे प्राप्त होण्याची शक्यता आहे.

## ९. स्पेक सिस्टीम लि.हैद्राबाद कंपनीने बनवून दिलेल्या संगणक प्रणालीबाबत. (Software)

स्पेक सिस्टीम लि.हैद्राबाद कंपनीने केलेल्या करारानुसार महानगरपालिकेस सर्वेक्षणाच्या कामासंदर्भातील संगणक प्रणाली प्रस्थापित (Install) करून दिलेली आहे. दिनांक १४.८.२००८ रोजी चौकशी समितीने वॉर्ड -क कार्यालयात सदरील प्रस्थापित संगणक प्रणालीची पाहणी केली असता पुढील बाबी आढळून आल्या.

१. सर्वसाधारणपणे सदरील संगणकप्रणाली चांगली आहे, पण त्याच्या हाताळणी व वापराबाबत संबंधित प्रभाग (वॉर्ड) अधिकारी व कर्मचाऱ्यांना योग्य ते प्रशिक्षण दिल्याचे दिसून येत नाही.

२. सदरील संगणकप्रणाली मध्ये इमारत बांधकाम दर्जाचे वर्गीकरण (Classification of Building Construction) याबाबत उल्लेख नाही. उद.अे,बी,सी,डी,इत्यादी.

३. संगणकप्रणालीतील वेगवेगळ्या माहिती व तपशीलाची छपाई (प्रिंट) सुलभपणे व सहजपणे निघत नाही. त्यासाठी तो तपशील दुसऱ्या प्रणालीत घेवून नंतरच प्रिंट निघते. त्याकरीता संगणक तज्ञच लागतो. सदरील कामे सुलभतेने होणेसाठीची सुविधा सदर संगणक प्रणालीतच असणे गरजेचे आहे.

४. सवेक्षण केलेल्या इमारतीचा Zone/ Ward व Area Location चा नकाशा उपलब्ध नाही व तो कसा उपलब्ध करावा याची माहिती दिलेली नाही.

५. कर आकारणी प्रपत्र (Tax Calculation Sheet) सर्वेक्षणानंतर कंपनीने सदरील प्रणालीत भरलेले नाही.

६. कर आकारणी तपास यादी (Check List) मिळू शकत नाही.

७. देयक मागणी पत्र (Bill of Demand) तयार होत नाही.

८. प्रभाग –ड च्या वार्डातील साधारणपणे १९,००० मालमत्तांपैकी फ़क्त ३००० मालमत्तांचे जुन्या करआकारणी तपशीलाशी ताळमेळ (Lingking) करून दिला आहे. उर्वरीत १६,००० मालमत्तांचे Linking चे काम कंपनीने केलेले नाही.

९. सदरील सर्वेक्षण संगणक प्रणालीचे सुलभ वापराबाबत माहिती (Steps to Operate Software) वॉर्ड अधिकाऱ्यांना पुरविलेली नाही.

१०. मालमत्ता कर आकारणी नोंदवही तयार होत नाही.

११. तक्रारी किंवा हरकतींची नोंदवही तयार होत नाही.

१२. मालमत्ता धारकांच्या थकबाकीचा तपशील निघत नाही.

१३. थकीत मालमत्ताधारकांची दिलेल्या निर्देशानुसार (जसे एक लाखावरील थकबाकीदार ,दहा लाखावरील थकबाकीदार इ.) यादी तयार होत नही किंवा निघत नाही.

## १०. असमाधानकारक कामाबाबत नोटीस.

उपआयुक्त तथा तत्कालीन कर निर्धारक व संकलक श्री.सोमनाथ शेटे यांनी स्पेक सिस्टीम लि.कंपनीस त्यांचे असमाधानकारक कामाबाबत दिनांक २२.११.२००७ रोजी कायदेशिर नोटीस दिली आहे. त्याचा थोडक्यात तपशील पुढील प्रमाणे आहे.

१. निविदेतील अटी व शर्तीनुसार कामाचे आदेश दिल्यापासून सहा महिन्याच्या कालावधीत शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण व संगणकीकरणाचे काम पूर्ण करावयास हवे होते. तथापी एजन्सीने विहीत अवधीत पूर्ण केले नाही. औरंगाबाद महानगरपालिकेने सदरील कामाची अखेरची मुदत दिनांक ३०.०६.२००७ ठरवून दिली. तरी देखील सदरील एजन्सीने निविदेतील अटी व शर्तीनुसार अपेक्षित काम केलेले नाही.

२. दिनांक १८.१०.२००७ रोजी तत्कालीन आयुक्तांनी वॉर्ड अधिकारी व एजन्सी प्रतिनिधींच्या बैठकीत स्पष्ट केले की सुमारे तीन वर्षाची मुदतवाढ देऊनही एजन्सीच्या कामाची प्रगती असमाधानकारक आहे. एजन्सीने अपूर्ण ठेवलेली कामे पुढीलप्रमाणे आहेत.

अ) महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांचे सर्वेक्षण मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ व तद्नुषंगीक नियमातील तरतूदीनुसार पूर्ण केलेले नाही.

ब) निविदेच्या अटी व शर्तीनुसार विहीत केलेल्या आकाराची नंबर प्लेट प्रत्येक मिळकतींच्या दारावर लावण्यात एजन्सी अयशस्वी ठरली आहे.

क) प्रत्येक मिळकतीचे सर्वेक्षणाची मागणी नोंदवहीशी (Demand Register) मेळ घालण्याचे (Linking) काम अद्याप केलेले नाही.

ड) सिडकोतील मिळकतींचे जोत्यांचे नकाशे (Floor Plan) पूर्ण केलेले नाही.

इ) वॉर्डनिहाय मालमत्तेचा स्थिती दर्शक नकाशा व वॉर्डनिहाय निर्धारण योजना (Wardwise Locality maps and Wardwise assesment Plan & giving all the boundries of assesment wards) एजन्सीने तयार केलेल्या नाहीत.

फ़) कंत्राटात आदेशित केल्यानुसार मागणी देयकांचे ९०% अहवाल तयार करण्यात एजन्सी अयशस्वी ठरली आहे.

ज) सर्वेक्षण केलेल्या मालमत्ताच्या कर आकारणीचा तपशील (Detail Data) व थकबाकीदारांची यादी देण्यात आलेली नाही.

झ) वॉर्डनिहाय (सीडीसह) मागणी नोंदवही (Demand Register) तयार केलेली नाही.

ट) या संदर्भात तयार केलेल्या संगणक प्रणाली (Software) वापराबाबतचे सर्व संबंधित महानगरपालिका कर्मचऱ्यांना प्रशिक्षण दिलेले नाही.

ठ) करआकारणीस आव्हान देणारे आक्षेपांची वॉर्डनिहाय नोंदवही तयार केली नाही आणि अपील सुनावणीनंतर अंतिम मागणी नोंदवही व कर मागणी देयके तयार केलेली नाहीत.

ड) वॉर्डनिहाय करआकारणीत वाढ किंवा घटींची (Increase or Decrease) नोंदवही तयार केलेली नाही.

ढ) महिना अखेरीस दैनिक जमेची यादी (Daily Collection scroll) दिलेली नाही.

ण) मालमत्ता निर्देशांक व तद्नुषंगीक तपशील शिघ्रतेने पाहता येत नाही.(Porperty Index & relevant details for quick searching of data)

त) सिडको भागातील साधारणत: ७००० मालमत्तांचे सर्वेक्षण होणे बाकी आहे. सर्वेक्षण न झालेल्या मालमत्तांची यादीही दिलेली नाही.

थ ) सर्वेक्षणाची सर्व माहिती इंटरनेटवर टाकणेचे (Uploading of complete survey data on Internet ) काम झालेले नाही.

द) एजन्सीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८ मधील शेड्युल डी तील नियमानुसार आणि करारनाम्यानुसार काम केले नसल्यामुळे महानगरपालिकेचा साधारणपणे प्रतिवर्षी ३० (तीस) कोटींचा तोटा होत आहे. सन २००३ ते २००७ पर्यंत त्यामुळे मालमत्ता करांची वसूली करता आलेली नाही.

३ विहीत कालावधीत उक्त बाबींची पूर्तता केली नसल्याने व कराराचा अंमल न केल्यामुळे एजन्सीची सुरक्षा अनामत (Security Deposit) व्यपगत (Forfeit) करण्यात येते. तसेच एजन्सी त्यांच्या (अकार्यक्षमतेमुळे) रू. १२० कोटी चा तोटा देणेस बांधील असून त्यांना

अदा केलेली रक्कम रू.१,१८,७२,५१९/- देखील वसूल पात्र आहे. अशा प्रकारे जर एजन्सीने एकूण रक्कम रू.२,३८,७२,५१९/- द.सा.द.शे. १८% व्याजासह महानगरपालिकेत १५ दिवसांत जमा न केल्यास औरंगाबाद महानगरपालिका सदरील एजन्सी विरोधात योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यास मोकळी राहील. तसेच करार अंमल न केल्याने झालेल्या नुकसानीमुळे, महानगरपालिका तोट्याबद्दलची नुकसान भरपाई मागणेस मोकळी राहील.

## ११. अपूर्ण कामांबाबत महानगरपालिकेचे पत्र.

विद्यमान कर निर्धारक व संकलक श्री.खालेद अरब यांनी त्यांचे पत्र क्र. एएमसी/टीएसी/७६२/२००८ दिनांक ३१.०७.२००८ अन्वये स्पेक सिस्टीम प्रा.लि. हैद्राबाद यांना सर्वेक्षणाचे काम अपूर्ण असल्याबाबत कळविले असून त्यातील महत्वाचे मुद्दे पुढील प्रमाणे आहेत.

१. सर्वेक्षणाचा प्राथमिक अहवाल आणखीही सादर केलेला नाही.

२. मालमत्ता व घरांवर विशिष्ट ठिकाणी घर नंबर प्लेट्स बसविलेल्या नाहीत.

३. शहरातील सहा प्रभागातील मागणी नोंदवही ( Demand Register) व सर्वेक्षण केलेल्या मालमत्तांची एकमेकांशी जुळणी ( Linking) केलेली नाही.

४. प्रभागवार स्थळदर्शक नकाशे (Wardwise Locality Maps) व प्रभागवार असेसमेंट प्लॅन हस्तांतरीत केलेले नाहीत.

५. कर आकारणीचा तपशील थकबाकीदारांच्या यादीसह सादर केलेला नाही.

६. मालमत्ता सर्वेक्षण व कर आकारणीच्या संगणक आज्ञावलीची स्वतंत्रपणे हाताळणी करण्यासाठी महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना योग्य ते प्रशिक्षण दिलेले नाही.

७. सोर्स कोडसह संगणक आज्ञावली (Software) व सर्वेक्षणाचे संगणकीकरण नाही.

८. सर्वेक्षण न झालेल्या (Missing Properties) मालमत्तांचा शोध घेतलेला नाही.

९. इंटरनेटवर मालमत्ता कराबाबत व सर्वेक्षणाबाबतची संपूर्ण माहिती (Complete Data)टाकलेली नाही.

वरील बाबींमुळे कराराचा (गंभीर रित्या) भंग झालेला आहे. सर्वेक्षण एजन्सीच्या चूकीच्या कार्यपध्दतीमुळे शहरातील मालमत्ताधारकांना खूप मनस्ताप झाला आहे. शहरातील ५०% पेक्षा जास्त मालमत्ता करदात्यांनी त्यांच्या तक्रारी नोंदविल्यामुळे त्याची सुनावणी घेण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला आहे. कंपनीने काम पूर्ण केल्याखेरीज त्यांनी केलेले काम व दिलेली सर्व माहिती निरूपयोगी ठरली आहे.

## १२. प्रत्यक्ष क्षेत्रावर चौकशी समितीची तपासणी.

स्पेक कंपनीने केलेल्या मालमत्तांच्या सर्वेक्षणाबाबत चौकशी समितीने मुख्य लेखा परीक्षकांच्या सूचनेनुसार विविध वॉर्डात जाऊन प्रत्यक्ष मालमत्तांची मोजमापे घेऊन पाहणी केली. सदरील मालमत्तांचे अनुज्ञेय करमूल्य काढले त्याचा तपशील पुढील प्रमाणे

## १) वॉर्ड – अ

महानगरपालिका औरंगाबाद वॉर्ड - अ अंतर्गत येणाऱ्या खालील मिळकत धारकांच्या मिळकतींची मुख्य लेखा परीक्षक कार्यालयातील श्री.अभंग यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आली असता खालील प्रमाणे तफ़ावत दिसून येते.

१. **श्री.अनंत मसाजी मेश्राम –** श्री.अंतराम उर्फ़ अनंत मसाजी प्लॉट नं.-६, हनुमान टेकडी, पहाडसिंगपुरा यांच्या मालमत्तची प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता सदर मिळकतीमध्ये एकूण सहा (६) खोल्या असून पैकी चार (४) खोल्या जुन्या आहेत. उर्वरीत दोन (२) खोल्यांचे नविन बांधकाम केले आहे. जुन्या चार (४) खोल्यांवर (बांधकामावर) आकारणी क्र.९८२/९५-९६ अन्वये कर योग्य मूल्य रू.२४७३/- त्यावर एकूण कर रू.९१८/- प्रती वर्ष प्रमाणे कायम केलेले आहे.

नविन दोन खोल्यांचे क्षेत्रफ़ळावर नविन दराने २२९६ चौ.मी. × रू.९५०/- मासिक भाडे रू.२१८/- वार्षिक भाडे रू.२६१६/- १०% कमी रू.२६२/- नविन कर योग्य मूल्य रू.२३५४/- अधिक जूना कर योग्य मूल्य रू.२४७३/- असे एकूण कर योग्य मूल्य रू.४८२७/- त्यावर एकूण कर रू.२००३/- इतका मालमत्ता कर स्पेक सिस्टीम प्रा.लि.ने लावायला पाहिजे होता. परंतू सदर एजन्सीने सदर मिळकतीस कर योग्य मूल्य रू.२१६५६ इमारतीचे बाहेरील मोजमाप घेवून (Outer Diamenssion) आकारणी केलेली दिसून येते. सदर मिळकतीस मोठ्या निवासीमध्ये समाविष्ट केले आहे. ते चूकीचे आहे. कारण सदर इमारतीचे जूने क्षेत्रफ़ळ ४७.४० चौ.मी. व नविन क्षेत्रफ़ळ २२.९६ चौ.मी. असे एकूण क्षेत्रफ़ळ ४७.४०+२२.९६ = ७०.३६ चौ.मी. इतके क्षेत्रफ़ळ येते म्हणून सदर मिळकत मोठ्या निवासीमध्ये मोडत नाही. तरी मोठ्या निवासी कर बंद करून सुधारित कर योग्य मुल्य रू.४८२७/- कायम करायला पाहिजे होता.

यावरून असे दिसून येते की, सदर मिळकतीचे लिंकींग केलेले नाही. (सोबत माहिती पत्रक जोडले आहे. )

२. **श्री.कांतीलाल मोतीलाल भोज –** श्री.कांतीलाल मोतीलाल भोज, प्लॉट नं, ५२/बी सतपाल नगर हनुमान टेकडी परिसर पहाडसिंगपुरा, औरंगाबाद

यांच्या मिळकतीची पाहणी केली असता सदर मिळकतीमध्ये एकूण चार (४) खोल्या असून त्यास आकारणी क्र. वॉर्ड अ/२२/२००५-०६ कर योग्य मूल्य रू.४२२३/- त्यावर एकूण कर रू.१७५१/- इतका कायम करण्यात आला आहे. स्थळ पाहणी व मोजमापे घेतलेली माहितीपत्रक सोबत जोडण्यात आली आहे.

स्पेक सिस्टीम प्रा.लि.ने.सदर इमारतीचे मोजमाप बाहेरून (Outer Diamenssion) घेतले आहे. त्याचा तक्ता सोबत जोडला आहे. प्रत्यक्ष घेतलेले मोजमाप प्रमाणे एकूण क्षेत्रफ़ळ ४५.३० चौ.मी. रू.९.५०/- मासिक भाडे रू.४३०/- वार्षिक भाडे रू.५१६०/- १०% कमी दराने कर योग्य मूल्य रू.४६४४/- (इतर कर निवासी दराने) येत आहे. पूर्वी ASS/ वॉर्ड -अ/२२/०५-०६ अन्वये कर योग्य मूल्य रू.४२२३/- त्यावर एकूण कर रू.१७५१/- इतका कायम केलेला आहे.

स्पेक सिस्टीम प्रा.लि.ने इमारतीच्या बाहेरून (Outer Diamenssion) मोजमापे घेतले असून त्याचे माहिती पत्रक सोबत जोडले आहे. (Outer Diamenssion) प्रमाणे १२००×१२००= १४४ चौ.मी. रू.९.५० मासिक भाडे रू.१३६८ वार्षिक भाडे रू.१६४१६/- १०% कमी रू.१६४२/- करयोग्य मूल्य रू.१४७७४/- त्यावर एकूण कर रू.१०६२१/- प्रतीवर्ष कायम केला आहे. सन २००५-६ ची कर आकारणी क्र.वॉर्ड -अ /२२/०५-०६ अन्वये कर योग्य मूल्य रू.४२२३/- इतकी कर योग्य मूल्य अपेक्षित असतांना स्पेक सिस्टीम प्रा.लि. ने सदर मिळकतीचे लिंकींग न करता रू.१४७७४/- इतका कर योग्य मूल्य रूपये कायम केला आहे. तो चूकीचा असून पूर्वीची कर योग्य मूल्य रू.४२२३/- कायम करणे योग्य होता. परंतू तसे करण्यात आले नाही. (सोबत माहितीपत्रक जोडले आहे.)

**३. श्रीमती रशिदा बी.फ़त्ते मोहम्मद नविन नांव श्रीमती रशिदा बेगम सालम चाऊस –**

जुने घर क्र. १-१९-३६, नविन घर क्र.१-२२-६८ मो.जूना बाजार या मिळकतीची प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता सदर मिळकतीचे बांधकाम पूर्ण जूने असल्याचे दिसून येते. सदर मिळकतीस फ़ेर आकारणी ८९-९० च्या अगोदर केलेली आहे. त्याच्या कर योग्य मूल्य रू.३७८/- त्यावर एकूण कर रू.१७७/- प्रती वर्ष प्रमाणे आहे.

सदर मिळकतीचे बांधकाम विटा,सिमेंट,छतावर लोखंडी पत्रे आहेत. त्यामुळे सदर मिळकत – क वर्गात येते. मिळकती मध्ये नविन बांधकाम किंवा बांधकामात वाढ किंवा वापरात बदल झालेला नसतांना स्पेक सिस्टीम प्रा.लि.ने केलेली कर आकारणी क्र.८००४०/०४-५ अन्वये कर योग्य मूल्य रू.१९४४०/- त्यावर एकूण कर रू.९४२८/- इतका कायम केला आहे.

बांधकामात बदल किंवा वापरात बदल नसतांना एजन्सीने कोणत्या आधारे व कशा पध्दतीने कर लावला हे कळत नाही. सदर मिळकतीची जूनेच बांधकाम असल्याने व त्यात कोणत्याही प्रकारचा बदल नसल्याने नविन कर आकारणी करण्याची गरज नव्हती. जुनीच कर योग्य मूल्य रू.३७८/- कायम करायला पाहिजे होता.

| | |
|---|---|
| स्पेक सिस्टीम प्रा.लि.ने कायम केलेला कर योग्य मूल्य रू.१९४४०/- त्यावर एकूण कर रू.९४२८/- प्रती वर्ष | जूना कर योग्य मूल्य रू.३७८/- त्यावर एकूण कर रू.१७७/- प्रती वर्ष. |

४. **श्री.ग्यानबा रूख्माजी जानवळकर –** प्लॉट नं.१२,१३ मो.श्रावस्ती कॉलनी, पेठेनगर यांच्या मिळकतीची स्थळ पाहणी केली. त्याचा पाहणी अहवाल सोबत (माहिती पत्रक) जोडले आहे. सदर मिळकतीमध्ये एकूण पाच (५) खोल्या असून पैकी दोन (२) खोल्या जून्या असून बाकी तीन (३) खोल्या नविन बांधल्या आहेत. विटा, सिमेंट,प्लास्टर,छतावर लोखंडी पत्रे नविन बांधकामावर असून सदर मिळकत सी वर्गात मोडते जुन्या दोन (२) खोल्यांचे क्षेत्रफ़ळ २५.९२ चौ.मी. इतके असून त्याचा कर योग्य मूल्य रू.६८०/- त्यावर एकूण कर रू.२२५/- इतका आहे. नविन

बांधकाम क्षेत्रफ़ळ २३.५५ चौ.मी. रू.६.३०/- प्रमाणे मासिक भाडे रू.१४८/- वार्षिक भाडे रू.१७७६/- १०% कमी रू.१७८/- कर योग्य मूल्य रू..१५९८/-इतका येवू शकतो. जुना कर योग्य मूल्य रू.२२७८/- इतका अपेक्षित असतांना स्पेक सिस्टीम प्रा.लि. ने सदर मिळकतीस लिंकींग न करता कर योग्य मूल्य रू.७५६०/- कायम करण्यात आला आहे.

स्पेक सिस्टीम प्रा.लि. ने केलेली आकारणी ऐवजी सुधारित कर योग्य मूल्य रू.२२७८/- कायम केला पाहिले होता तसे करण्यात आले नाही. (सोबत माहितीपत्रक जोडले आहे.)

५. **श्री.दिलीप गंगाधर सरपाते –** प्लॉट नं.५७,घर नं.१-८-४९१ मो.पेठेनगर,औरंगाबाद या मिळकतीची प्रत्यक्ष स्थळपाहणी केली असता मालमत्ता करात सुधारणा होवू शकते.

सदर मिळकतीस पूर्वी मालमत्ता कराची आकारणी करण्यात आली होती. त्याचा जूना कर योग्य मूल्य रू.९१८/- त्यावर एकूण कर रू.३६०/- प्रती वर्ष कायम केला होता. पूर्वी लोखंडी पत्र्याच्या चार खोल्या होत्या त्या चार खोल्यावर मालमत्ता कराची आकारणी करण्यात आली होती. असे चौकशी अंती दिसून आले. संबंधित मिळकत धारकाने पूर्वीचे जून बांधकाम पाडून त्या ठिकाणी नविन आर.सी.सी.चे महानगरपालिकेची परवानगी घेवून चार (४) खोल्यांचे बांधकाम केले आहे. त्याचा तक्ता सोबत जोडला आहे. (नविन क्षेत्रफ़ळ ६६.७४ चौ.मी.)

स्पेक सिस्टीम प्रा.लि.ने आकारणी क्र.७९६०९/- ०४-५ अन्वये करयोग्य मूल्य रू.२६५७/- त्यावर एकूण कर रू.१८५७/- इतका कायम केला आहे. प्रत्यक्ष पाहणी व घेण्यात आलेल्या मोजमापे प्रमाणे एकूण क्षेत्रफ़ळ ६६.७४ चौ.मी. रू.९.५०/- भाडे रू.६३४ वार्षिक भाडे ७६०८/- १०% कमी रू.७६१/- कर योग्य मूल्य रू.६८४०/- इतका कर योग्य मूल्य अपेक्षित असतांना स्पेक सिस्टीमने २६५७ इतका कर योग्य मूल्य कायम केला आहे. कोणत्या आधारे व कोणत्या नियमानुसार सदर कर योग्य मूल्य कायम केला आहे हे समजून येत नाही.

पूर्वीचा जुना कर योग्य मूल्य रू.९१८/- व स्पेकचा कर योग्य मूल्य रू.२६५७/- हे दोन्ही बंद करून सुधारित कर योग्य मूल्य रू.६८४७/- त्यावर इतर कर निवासी दराने नियमाप्रमाणे कायम करणे योग्य होता. परंतु तसे स्पेक सिस्टीम प्रा.लि. ने केले नाही.(सोबत माहिती पत्रक जोडले आहे.)

## २. वॉर्ड – ब

दिनांक २० ऑगस्ट २००८ रोजी मुख्य लेखा परीक्षक यांच्या सूचनेनुसार वॉर्ड कार्यालयात प्राप्त झालेल्या स्पेक सिस्टीम लि.हैद्राबाद या कंपनीने केलेल्या कर आकारणी संबंधाने प्राप्त आक्षेप अर्जापैकी त्यांनी सांगितलेल्या खालील अर्जाची पाहणी मुख्य लेखा परीक्षण विभागाचे श्री.पैठणे यांच्या समवेत केली. वॉर्ड - ब कार्यक्षेत्रात स्पेक सिस्टीम लि. हैद्राबाद या कंपनीने केलेल्या कर आकारणी संबंधाने खालील मालमत्तांची पाहणीत आढळून आलेल्या त्रुट्या संबंधाने खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येतो.

१. **श्री.विजय अण्णा बोराडे –** मालमत्ता धारकाने नोंदविलेला आक्षेप अर्ज दिनांक १.८.२००८ नुसार प्रत्यक्ष स्थळावर पाहणी केली असता संबंधिताचे घरास स्पेक घर क्र.B/N-११/अ/३६ आकारणी १८७१७/०६/०७ आहे. कर योग्य मूल्य रूपये २५२७२ निवासी दर्शविण्यात आलेले आहे. कर आकारणी माहिती पत्रकात संबंधिताचे घरास आऊटर मोजमाप प्रमाणे कर आकारणी केली होती. प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून मोजमाप केले असता सदर घराचे कर योग्य मूल्य रूपये ५६५७ कायम होते. पूर्वीचे कर योग्य मूल्य रद्द करून रूपये ५६५७/- कर योग्य मूल्य कायम करण्यात आले आहे.

२. **श्रीमती गिता पंडित आस्वार (मंगेश गॅस एजन्सीज) –** एन –८, प्लॉट क्र. ४८ ह्या मालमत्तेस स्पेक कंपनी मार्फ़त आ.क्र.५६३०/२००६ - २००७ नुसार कर योग्य मूल्य ७५८०६/- नुसारदिनांक १.४.२००६ पासून कर आकारणी करण्यात आली होती. दिनांक २०.८.२००८ रोजी लेखा परीक्षण विभागाचे श्री.पैठणे यांच्या समक्ष स्थळ पाहणी करून मालमत्ता धारक यांचे वाढीव बांधकाम झालेले आहे, त्यानुसार दिनांक १.४.२००८ पासून सुधारित कर आकारणी करून कर योग्य मूल्य रूपये २६८३७०/- दिनांक १.४.२००८ पासून कायम करण्यात आले आहे.

३. **श्रीमती इंद्रा ओंकार कक्कर(ओंकार गॅस एजन्सीज)** - प्लॉट नं.५ एन-८, सिडको ह्या मालमत्तेस स्पेक कंपनी मार्फ़त आ.क्र.५६३/२००६-२००७ कर योग्य मूल्य ३०२२०/- नुसार आकारणी करण्यात आली होती. प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून मोजमाप घेण्यात आले असून त्यानुसार निवासी कर योग्य मूल्य १९४४/- व निवासेत्तर कर योग्य मूल्य ७५२८७/- दिनांक १.४.२००८ पासून सुधारित करण्यात आले आहे.

४. **श्री.उमेश काथार वाणी (हॉटेल तरंग) –** एन-७, आरसी-पी १-१५/११ सिडको ह्या मालमत्तेस स्पेक कंपनी मार्फ़त आ . क्र . २१००५ / २००६-२००७ कर योग्य मूल्य ७१८३/- नुसार कायम करण्यात आले होते. लेखा परीक्षण विभागाचे श्री.पैठणे यांच्या स्थळ पाहणी नुसार प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून व मोजमाप करून सुधारित कर योग्य मूल्य ५०८५७/- दिनांक १.४.२००६ पासून कायम करण्यात आले आहे.

५. **सौ.मंजुश्री श्रीपतराव कुलकर्णी –** एन-५, प्लॉट नं. ८५२ ह्या मालमत्तेस स्पेक कंपनी मार्फ़त आ.क्र.६१३/२००६-२००७ कर योग्य मूल्य ७९८१/- नुसार कायम करण्यात आले होते. लेखा परीक्षण विभागाचे श्री.पैठणे यांच्या स्थळ पाहणी नुसार प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून व मोजमाप करून सुधारित कर योग्य मूल्य ९४०६/- दिनांक १.४.२००६ पासून कायम करण्यात आले आहे.

## ३)वॉर्ड – क

मुख्य लेखापरीक्षक यांनी स्वत: जातीने प्रभाग – क मधील काही मालमत्तांची जायमोक्यावर क्षेत्र तपासणी केली. स्पेक कंपनीने केलेले सर्वेक्षण आणि वास्तव तपासणीत खूप तफ़ावत आढळून आली.

१. **मोहम्मद अमीन अब्दुल रज्जाक,नविन घर क्र.३–२–३७४:–**

आकारणी क्र.१०३४८५/०४-०५ मोहल्ला, नवाबपुरा रमनस्तपुरा औरंगाबाद अभिलेख,प्रमाणे (स्पेक सिस्टीम) सदरील मिळकतीने एकूण क्षेत्रफ़ळ ५३५.१४ चौ.मी. निवासेत्तर वापराचे दर प्रती चौ.मि.२२.६० प्रती महानुसार कर योग्य मूल्य १,३०,१२९/- नुसार एकूण कर रू.११६२४७/- दि.१.४.२००५ पासून पुढे कायम करण्यात आले आहे.

प्रत्यक्ष स्थळ पाहणी (मा.मुख्य लेखा परीक्षक यांचे समवये) मोजमाप घेतली असता एकूण क्षेत्रफ़ळ निवासेत्तर वापरासाठी २५०.४१ चौ.मी. (तळ मजला व तळ घर) पहिला मजल्यावर याच मालमत्ता धारकांचे निवासी वापरासाठी – अ प्रकार बांधीव घर आहे. याचे क्षेत्रफ़ळ जवळ पास १५० चौ.मी. असण्याची शक्यता आहे. तसेच यापूर्वी सदरील मिळकतीवर सन २०००-

२००१ मध्ये आकारणी क्र. १०७६/२०००-०१ नुसार कर आकारणी एकूण क्षेत्रफ़ळ ६१.२० चौ.मी. निवासेत्तर वापरासाठी अस्तित्वात असलेल्या बांधकामास कर आकारणी विभागामार्फ़त कर योग्य मूल्य ७४७४/- रूपये प्रती वर्ष कायम करण्यात आली आहे. करीता जूने कराची नविन कर आकारणी शी लिंकिंग करून दुरूस्तीचे कर आकारणी करणे आवश्यक आहे. करीता खालील प्रमाणे कर आकारणी करणेत आली आहे.

**निवासेत्तर वापर –** एकूण क्षेत्रफ़ळ २५०.४१-६१.२० (कर आकारणी क्र.१०७६/२०००-०१)= १८८.८० चौ.मी. प्रचलित दर २२.६० ×१८८.८० = ४२६७ × १२= ५१२०४-(१०% सूट) = ५१२०= ४६०८४ वाढीव बांधकामाचे कर योग्य मूल्य ४६०८४/= जुनी आकारणी क्र.१०७६/२०००-०१ चा कर योग्य मूल्य ७४७४/- एकूण कर योग्य मूल्य ५३५५८/- नुसार एकूण कर रूपये ४२५७९/- कायम करणे योग्य तसेच निवासी वापराचे क्षेत्रफ़ळ १५० चौ.मी. प्रचलित दर ९.५० प्रती चौ.मी.महा नुसार मासिक वाजवी भाडे १४२५ वार्षिक भाडे १७१००-(१०% सूट) = १७१०/- कर योग्य मूल्य १५३९०/- प्रमाणे एकूण कर रू.७४६७/- कायम करणेत आली.

२. **मो.अशरफ़ मो.अब्दुल मजीद (दुरूस्तीचे नांव) कर आकारणी क्र. १०४८४/२००४–०५ मो.नवाबपुरा, रमनस्तपुरा,औरंगाबाद:–** अभिलेख प्रमाणे (स्पेक सिस्टीम) सदरील मिळकतीवर – अ प्रकार बांधकामाचे क्षेत्रफ़ळ २०८.६२ चौ.मी.निवासी वापरासाठी व ३२४.१४ चौ.मी. निवासेत्तर वापरासाठी असलेल्या बांधकामाकरीता निवासेत्तर वापरायचे कर योग्य मुल्य रू.७९१२१/- प्रमाणे एकूण कर रू.८८२०९/- इतके कायम करण्यात आले आहे व निवासी वापरासाठी असलेली मिळकतीचे कर योग्य मूल्य २१४०६/- दिनांक १.४.२००५ पासून पुढे कायम करण्यात आले आहे.

**प्रत्यक्ष स्थळ पाहणी –**(मा.मुख्य लेखा परीक्षक यांचे समवये)सदरील मिळकतीस उपरोक्त नमूद केलेली मिळकत ज्यांचा घर क्र.३-**२–** ३७२ आकारणी क्र.१०३५८४/०४-०५ प्रमाणे बांधकाम निवासी वापराचे क्षेत्रफ़ळ व निवासेत्तर

वापराचे क्षेत्रफ़ळा मध्ये कोणतेही तफ़ावत व बद्दल नसल्याचे प्रत्यक्ष स्थळावर आढळून आले आहे. सदरील मिळकतीला उपरोक्त नमूद (mirror) म्हणण्यास हरकत नसावी तसेच कार्यालयीन अभिलेखाची तपासणी केली असता सन २०००-०१ या आर्थिक वर्षामध्ये कर आकारणीक्र . १०७५ / २०००-०१ नुसार निवासेत्तर वापरासाठी अस्तित्वात असलेली मिळकतीची कर आकारणी याचा कर योग्य मूल्य ७४७४/- रूपये प्रतीवर्ष कायम करण्यात आले आहे. करीता जूनी कराची नविन कर आकारणीची लिंकिंग करून आकारणी करणे आवश्यक होते. करीता खालील प्रमाणे कर आकारणी करणेत आली.

**निवासेत्तर वापर –**एकूण क्षेत्रफ़ळ २५०.४१-६१.२०(कर आकारणी क्र.१०७६/२०००-०१)= १८८.८० चौ.मि. प्रचलित दर २२.६० ×१८८.८०=४२६७ ×१२=५१२०४-(१०% सूट) = ५१२०= ४६०८४ वाढीव बांधकामाचे कर योग्य मुल्य ४६०८४/- जुनी आकारणी क्र.१०७६/२०००-०१ चा कर योग्य मूल्य ७४७४/- एकूण कर योग्य मूल्य ५३५५८/- नुसार एकूण कर रूपये ४२५७९/- कायम करणे योग्य तसेच निवासी वापराचे क्षेत्रफ़ळ १५० चौ.मि. प्रचलित दर ९.५० प्रती चौ.मी. महानुसार मासिक वाजवि भाडे १४२५ वार्षिक भाडे १७१००- (१०% सूट)= १७१०× कर योग्य मूल्य १५३९०/- प्रमाणे एकूण कर आकारणी रू.७४६४/- कायम करणेत आली.

३. **अब्दुल मुनाफ़ अब्दुल रज्जाक,घर क्र.३–२–३७१ आकारणी क्र. १०२५२८ / २००४ –०५ मो.नवाबपुरा (कॅप्टन ऑटो पेन्ट) औरंगाबाद**.

कार्यालयीन अभिलेख (स्पेक सिस्टीम) प्रमाणे सदरील मिळकतीला निवासेत्तर वापराचे क्षेत्रफ़ळ १६.२० चौ.मी. व निवासी वापराचे क्षेत्रफ़ळ ९४३.४२ चौ.मी. प्रमाणे निवासी वापराचा कर योग्य मुल्य ९६७९० व निवासेत्तर वापराचा कर योग्य मुल्य ३९५३/- प्रमाणे एकूण कर रू.८२६९६.८८/- इतका कायम करण्यात आला आहे.

**प्रत्यक्ष स्थळ पाहणी –** (मा.मुख्य लेखा परीक्षक यांचे समवये) प्रत्यक्ष मोजमाप

घेण्यात आले असता सदरील मिळकती मध्ये तळघर व तळ मजला पूर्णपणे निवासेत्तर वापरासाठी वापरण्यात येत आहे. तळ मजला तळ घराचा एकूण क्षेत्रफ़ळ ३६१.२० चौ.मी. नुसार निवासेत्तर वापराचा कर योग्य मुल्य ८८१६१/- प्रमाणे एकूण कर रू.७००८७/- इतकी येतील तसेच पहिल्या मजल्यावर असलेले निवासी वापरासाठी क्षेत्रफ़ळ जवळपास १५० चौ.मी. असल्याने त्याचे कर योग्य मूल्य रू.१५३९०/- प्रमाणे एकूण कर रू.७४६४/- इतके येतील.

**४. अब्दुल मजीद अब्दुल शकूर (दुरूस्तीचे नांव) घर क्र.३-२-३७५ आकारणी क्र.१०३५५७/२००४-०५ नवाबपुरा,औरंगाबाद**.

कार्यालयीन अभिलेख (संगणक स्पेक सिस्टीम) प्रमाणे निवासी वापराचे एकूण क्षेत्रफ़ळ ८२४.७२ चौ.मी. बांधकामाचा प्रकार – अ वर्ग प्रमाणे कर योग्य मूल्य ८४६१८/- प्रमाणे एकूण कर रू.६९२९५.०८/- इतके कायम करण्यात आले. दिनांक १.४.२००५ पासून पुढे कायम करण्यात आली.

**प्रत्यक्ष स्थळ पाहणी –** (मा.मुख्य लेखा परीक्षक यांचे समवये) प्रत्यक्षक मोजमाप घेतले असता तळ मजला व तळ घराचा वापर पूर्णपणे निवासेत्तर वापरासाठी होत आहे. तळ मजल्याचा चटई क्षेत्र १३६.०३ तसेच तळ घराचा चटाई क्षेत्रफ़ळ सुध्दा जवळपास १५० चौ.मी. असल्याचे शक्यता आहे. तसेच घर मालकांचे म्हणने नुसार पहिला मजला निवासी वापरात आहे. त्यानुसार तळ घर व तळ मजल्याचा चटाई क्षेत्रफ़ळ २८६.०३ चौ.मी. असल्याने निवासेत्तर वापराचे प्रचलित दर २२.६० प्रती चौ.मी.प्रती महानुसार कर योग्य मूल्य ६९८११/- प्रमाणे एकूण कर रू.५५४९९/- इतके येतील. तसेच निवासी वापराचे क्षेत्रफ़ळ १५० चौ.मी.असल्याने त्याचे कर योग्य मूल्य रू.१५३९०/- प्रमाणे एकूण कर रू.७४६४ /- इतके आकारणेत येतील.

**५. परमवीर अब्दुल हमीद सांस्कृतिक सभागृह म्यू.क्र.(नविन) ८१०२०७ मालमत्ता धारक महानगरपालिका,औरंगाबाद.**

सदर मिळकत पूर्णपणे औरंगाबाद महानगरपालिकेचे असून या मिळकतींना फ़क्त घर क्र. द्यावयाचे होते. तरी स्पेक सिस्टीम यांनी सदरील मिळकतीवर कर आकारणी करून

कर योग्य मूल्य ४२५३२/- निवासी दरानुसार दिनांक ०१.०४.२००५ पासून कायम केले. सदर आकारणी रद्द करणेत येईल.

६. **मंदिर (विठ्ठल रूखमाई मंदिर) म्यू.घर क्र.३-१०-१४१ आकारणी क्र.१२७९७९/२००४ -२००५ बायजीपुरा गल्ली क्र.१८,औरंगाबाद.**

सदर मिळकतीस (अभिलेख प्रमाणे) एकूण क्षेत्रफ़ळ ५५.८२ चौ.मी. गृहित धरून – अ प्रकार बांधकामास कर योग्य मूल्य रू. ५७२४/- तसेच अतिरिक्त जमिनीचा कर ६६९१/- रू.दिनांक ०१.०४.२००५ पुढे कायम करण्यात आलेला आहे.

प्रत्यक्ष स्थळ पाहणी केले असता पूर्ण मिळकत धार्मिक स्थळ म्हणून मंदिरासाठी वापरल्या जात आहे व बांधकाम सुध्दा – क प्रकार बांधीव आहे. तसेच सदर मिळकती मध्ये भाडेकरून सुध्दा नाही औरंगाबाद मनपाचे नियमानुसार धार्मिक स्थळा करीता मालमत्ता कर आकारू शकत नाही. तरी स्पेक सिस्टीम द्वारा सदरील मिळकतीस – अ प्रकार बांधकामाचे दरानुसार कर आकारण्यात आलेला आहे. सदर कर रद्द करण्यात येईल.

## ४) वॉर्ड -ड

दिनांक १४ ऑगस्ट २००८ रोजी मुख्य लेखा परीक्षक यांनी वॉर्ड कार्यालयात प्राप्त झालेल्या स्पेक सिस्टीम लि.हैद्राबाद कंपनीने केलेल्या कर आकारणी संबंधाने प्राप्त आक्षेप अजपैकी खालील अर्जांची पाहणी वॉर्ड अधिकारी ,वॉर्ड -ड यांचे समवेत केली. वॉर्ड -ड कार्यक्षेत्रात स्पेक सिस्टीम लि.हैद्राबाद या कंपनीने केलेल्या कर आकारणी संबंधाने खालील मालमत्तांच्या पाहणीत आढळून आलेल्या त्रुट्या संबंधाने खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येतो.

| अ. क्र. | मालमत्ता धारकांचे नांव | स्पेक कर आकारणी क्रमांक | स्पेकने आकारणी केलेला कर | मालमत्तेचा जुना कर |
|---|---|---|---|---|
| १ | लक्ष्मण सखाराम भावसार | १०१४५५/२०४-२००५ | ७५२७/- | १३९०/- |
| २ | रविंद्र श्रीनिवास धोंगडे<br>(स्पेकचे नांव: सुहास काशिनाथ खर्डीकर , अलकनंदा सुहास खर्डीकर) | १४४६५५/२००४-२००५ | ३०,१९८/- | ५४३/-<br>२०४६/- |
| ३ | डॉ.पानसे व्ही.डी. | ११२२१९/२००४-२००५ | ११,०९०/- | ४२६०/- |
| ४ | डॉ.किशोर पारगांवकर | १३६०२७/२००४-२००५ | ३९,३७३/- | २५७७/- |

१. **लक्ष्मण सखाराम भावसार**- मालमत्ता धारकाने नोंदविलेल्या आक्षेप अर्ज क्रमांक २२२१ दिनांक १३.०८.२००८ नुसार प्रत्यक्ष स्थळावर पाहणी केली असता संबंधिताचे स्पेक घर क्रमांक २-७-१४१ असून कर आकारणी क्रमांक १०१४५५/२००४-२००५ आहे व कर योग्य मुल्य १२८६७ निवासी दर्शविण्यात आलेले आहे. कर आकारणी माहिती पत्रकात संबंधिताचे बांधकाम ए-टाईप दाखविण्यात आलेले आहे व ११ खोल्या दर्शविण्यात आलेल्या असल्याचे दिसून येते तसेच स्पेक घर क्रमांक २-७-१४१ चा नकाशा व प्रत्यक्ष जागेवरील बांधकाम नकाशा याची पाहणी मध्ये मेळ दिसून आला नाही. सदरील घर हे जायमोक्यावर पाहणीमध्ये मातीचे असून बांधकामात/ वापरात बदल झाल्याचे दिसून आलेले नाही. घर क्रमांक २-७-१४१ ला झालेली कर आकारणी अयोग्य व चूकीची असल्याचे दिसून येते. सदरचे घर खूप जुने आहे ज्याचा काही भाग पडावयास आलेला आहे. करीता जुने कर योग्य मुल्य कायम ठेवणेत येईल.

२. **रविंद्र श्रीनिवास धोंगडे (स्पेकचे नांव – सुहास काशिनाथ खर्डीकर,अलकनंदा सुहास खर्डीकर )** मालमत्ता धारकाने नोंदविलेल्या आक्षेप अर्ज क्रमांक २२२२ दिनांक १३.०८.२००८ नुसार प्रत्यक्ष स्थळावर पाहणी केली असता स्पेक घर क्रमांक २-७-३० असून कर आकारणी क्रमांक १४४६५५/२००४-२००५ आहे व कर योग्य मुल्य ३३८०४ निवासेत्तर दर्शविण्यात आलेले आहे. प्रत्यक्ष पाहणी मध्ये बांधकाम व वापरात बदल झाल्याचे आढळून आले नाही. औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे कर आकारणी क्रमांक १२५८/१९९९-२००० नुसार कर योग्य मुल्य ११७७ दिनांक ३०.०३.९९ पासून आकारण्यात आलेले आहे. बांधकाम व वापरात प्रत्यक्ष जागेवर बदल झालेला नसल्याने स्पेकची आकारणी रद्द करून जुन कर योग्य मुल्य कायम ठेवण्याचे ठरले.

३. **डॉ.पानसे व्ही.डी. –** मालमत्ता धारकाने नोंदविलेल्या आक्षेप अर्ज क्रमांक ६४५ दिनांक ०३.०७.२००८ नुसार प्रत्यक्ष स्थळावर पाहणी केली असता स्पेक घर क्रमांक २-१७-२०० असून कर आकारणी क्रमांक ११२२१९/२००४-२००५ आहे व कर योग्य मुल्य १८९५६ निवासी दर्शविण्यात आलेले आहे. अर्जदार यांनी प्रत्यक्ष पाहणी मध्ये त्यांचे घराचा तळ मजला १९८० साली व पहिला व दुसरा मजला सन २००० साली बांधकाम केलेले

असल्याचे सांगितले. त्यानुसार कर आकारणीत दुरूस्ती करून देण्याची मागणी केली. तसेच स्पेक घर क्रमांक २-१७-२०० चा नकाशा व प्रत्यक्ष जागेवरील बांधकाम नकाशा याचा पाहणी मध्ये मेळ दिसून आला नाही. सबब पाहणीत आढळून आले नुसार अर्जदाराने मान्य केले प्रमाणे कर आकारणीत दुरूस्ती करण्याचे ठरले.

**४. डॉ.किशोर पारगांवकर –** मालमत्ता धारकाने नोंदविलला आक्षेप अर्ज क्रमांक ६९५ दिनांक ०४.०७.२००८ नुसार प्रत्यक्ष स्थळावर पहाणी केली असता स्पेक घर क्रमांक २-१८-६४ असून कर आकारणी क्रमांक १३६०२७/२००४-२००५ आहे व कर योग्य मुल्य ४९५३६ निवासेत्तर दर्शविण्यात आलेले आहे. प्रत्यक्ष पाहणी मध्ये अर्जदाराचे निवास स्थान असून स्पेकच्या माहिती पत्रकात हॉस्पिटल दर्शविण्यात आलेले असून ३० खोल्या दर्शविण्यात येवून कर आकारणी केल्याचे दिसून येते. प्रत्यक्ष पाहणीत जागेवर हॉस्पिटल नसून निवासस्थान असल्याचे व सदरील निवासस्थान जुनेच आहे. बांधकाम व वापरात प्रत्यक्ष जागेवर बदल झालेला नसल्याने स्पेकची आकारणी रद्द करून कर आकारणीत दुरूस्ती करण्याचे ठरले.

५) **श्री.सितलादेवी मंदीर ट्रस्ट** - टिळकपथ, औरंगाबाद मालमत्ता धारकाने नोंदविलेला आक्षेप अर्ज क्रमांक १४१ दिनांक ११.०६.०८ नुसार प्रत्यक्ष स्थळावर पाहणी केली असता स्पेक घर क्रमांक २-०७-१९७ असून कर आकारणी क्रमांक १०१५५४/२००४-२००५ आहे व कर योग्य मुल्य निवासी १९६९९ व निवासेत्तर –१७५७२ दर्शविण्यात आलेले आहे. प्रत्यक्ष पाहणी मध्ये सदरील नोंदणीकृत ट्रस्ट असून धार्मिक देवस्थान (मंदीर) आहे. करीता मंदिराला झालेल्या कर आकारणी बाबत द्विसदस्यीय समिती समोर प्रकरण ठेवून निर्णय घेण्याचे ठरले.

## ५)वॉर्ड –इ

दिनांक २० व २१ ऑगस्ट २००८ रोजी मुख्य लेखा परीक्षक विभागातील श्री.पैठणे, कार्यालय अधिक्षक, यांनी वॉर्ड कार्यालयात प्राप्त झालेल्या स्पेक सिस्टीम लि.हैद्राबाद या कंपनीने केलेल्या कर आकारणी संबंधाने प्राप्त आक्षेप अर्जापैकी त्यांनी सांगितलेल्या खालील अर्जाची पाहणी श्री.मोटे, कनिष्ठ अभियंता यांच्या समवेत केली. वॉर्ड -ई कार्यक्षेत्रात स्पेक सिस्टीम लि.हैद्राबाद यांनी केलेल्या कर आकारणी संबंधाने खालील मालमत्तांची पाहणीत आढळून आलेल्या त्रुट्या संबंधाने खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येतो.

| अ.क्र. | मालमत्ता धारकाचे नांव | स्पेक कर आकारणी क्रमांक | स्पेकने आकारणी केलेले कर योग्य मुल्य | पाहणी अंती सुधारीत होणारे कर योग्य मुल्य |
|---|---|---|---|---|
| १ | इंद्रजीत सुरेश शहा, प्रेरणानगर,गारखेडा घर नं. ४-१६-२२० | १०१७/ २००४-२००५ | ११,२००/- निवासी | १०,२०६/- निवासी |
| २ | एस.डी.डोणगांवकर प्लॉट क्र. एफ़ - १-६१, एन-४,सिडको,औरंगाबाद. | २३८१८/ २००६-२००७ | ९०,८८२/-निवासेत्तर | ५,२१७/-(१/४/०६ ते ३१/०३/०८) ११,५१३/- (१/४/०८ पासून पुढे कायम) निवासी |
| ३ | सौ.कमला दिपप्रकाश गुप्ता,प्लॉट क्र.-३१५,एन-३ सिडको,हॉटेल देवदिप सिडको,औरंगाबाद. | १४०४४/ २००६-२००७ | ६५,५४५/- निवासेत्तर | ९३,३२२/- निवासेत्तर |
| ४ | वर्षा रंगनाथ शिंदे, घर क्र.४-१५-५०२, इंद्रप्रस्थ हौ.सो.गारखेडा,परिसर औरंगाबाद. | १०१४३७/ २००४-२००५ | १९,१५३/- निवासेत्तर | ११,८०५/- निवासी |

१)**<u>इंद्रजीत सुरेश शहा –</u>** मालमत्ता धारकाने नोंदविलेला आक्षेप अर्ज क्रमांक ७२७/०८, दिनांक १९.७.२००८ नुसार प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता संबंधिताचे स्पेक घर क्र.४-१६-२२० असून कर आकारणी क्रमांक -१०१७/२००४-०५ आहे व कर योग्य मुल्य ११,२००/- निवासी दराने दर्शविण्यात आलेली आहे. कर आकारणी माहिती पत्रकात संबंधिताचे बांधकाम अ टाईप दाखविण्यात आलेले आहे. स्पेकने दिलेला घर क्र.४-१६-२२० नुसार प्रत्यक्ष जागेवरील स्थळ पाहणी केली व त्यांना २००१ पूर्वी आकारण्यात आलेल्या कराची व बांधकाम क्षेत्रफ़ळाची तपासणी केली असता तेव्हाचे बांधकाम क्षेत्रफ़ळ ४५.०१ चौ.मी. होते. त्या क्षेत्रफ़ळाचा व कर मुल्याचा विचार केलेला नाही. त्यांनी संपूर्ण घर नविन दाखविलेले आहे. जुने कर योग्य मुल्य व नविन बांधकाम केलेले क्षेत्रफ़ळ ७६.५६ चौ.मी. नुसार सुधारित कर योग्य मुल्य रूपये १०,२०६/- येत असून हया प्रमाणे कर योग्य मुल्य दि.१.४.२००५ पासून सुधारित करण्याचे ठरले.

२)**एस.डी.डोणगांवकर** -मालमत्ता धारकाने नोंदविलेला आक्षेप अर्ज क्रमांक -५०५/०८, दि.९.६.२००८ नुसार प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता संबंधिताचे स्पेक घर क्र.एन-४ , एफ़ -१-६१ असून कर आकारणी क्रमांक २३८१८/२००६-०७ आहे व कर योग्य मुल्य ९०,८८२/-निवासेत्तर दराने दर्शविण्यात आलेले आहे. सदरील इमारतीची स्थळ पाहणी केली

असता तळ मजल्याचे बांधकाम १.४.२००६ पासून झालेले असून पहिल्या मजल्याचे बांधकाम १.४.२००८ पासून वापराजोगे झालेले आहे. व सदरील इमारत संपूर्ण निवासी वापरात आहे. त्यामुळे स्पेक मार्फ़त करण्यात आलेली आकारणी चूकीची असून तळ मजल्या वरील बांधकाम क्षेत्रफ़ळ ७४.३४ चौ.मि. विचारात घेवून कर योग्य मुल्य रूपये ५,२१७/- दि.१.४.२००६ ते ३१.३.२००८ पर्यंत निवासी दराने निश्चित करणे योग्य राहील व दि.१.४.२००८ पासून पहिल्या मजल्याचे बांधकाम पूर्ण झाले असल्याने तळ मजला रूपये कर योग्य मुल्य निवासी दराने निश्चित करणे योग्य राहील. सदरील इमारत निवासी वापरात असल्याने व क्षेत्रफ़ळ १५० चौ.मी. वर असल्याने मोठा निवासी कर, कर योग्य मुल्याच्या १० टक्के दि.१.४.२००८ पासून लागू करण्याचे ठरले.

**३)सौ.कमला दिपप्रकाश गुप्ता (हॉटेल देवदिप) –** सदरील मालमत्ता धारकास स्पेक मार्फ़त कर कमी लागल्याचे निदर्शनास आल्याचे व तशी शंका निर्माण झाल्याने दि.२१.८.२००८ रोजी मुख्य लेखा परीक्षक यांचे प्रतिनिधी श्री.पैठणे यांच्या सोबत स्थळ पाहणी केली असता व प्रत्यक्ष इमारतीचे मोजमाप घेतले असता स्पेक मार्फ़त करण्यात आलेल्या कर आकारणी मध्ये तफ़ावत दिसून आली. स्पेकने कर आकारणी क्रमांक - १४०४४/२००६-०७ अन्वये कर योग्य मुल्य रूपये ६५,५४५/- निवासेत्तर दराने आकारण्यात आलेले आहे. स्थळपाहणी अंती अ टाईप चे बांधकाम क्षेत्रफ़ळ ४६२.५० चौ.मि.आढळून आले असून क टाईप चे बांधकाम क्षेत्रफ़ळ १४४.५६ चौ.मी. आहे. दोन्ही क्षेत्रफ़ळानुसार कर योग्य मुल्य काढल्यानंतर ६३,३२२/- कर योग्य मुल्य निश्चित होते. त्यामुळे स्पेकने केलेल्या सर्वेक्षणानुसार निश्चित केलेले कर योग्य मुल्य रूपये ६५,५४५/- ऐवजी स्थळ पाहणीत आढळून आल्यानुसार ९३,३२२/- कर योग्य मुल्य रूपये निवासेत्तर दराने दि.१.४.२००६ पासून सुधारित करण्याचे ठरले.

४)**वर्षा रंगनाथ शिंदे** - मालमत्ता धारकाने नोंदविलेला आक्षेप अर्ज क्रमांक -५३३/०८ दिनांक १७.६.२००८ नुसार प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता संबंधिताचे स्पेक घर क्र.४-१५-५०२ असून कर आकारणी क्रमांक- १०१४३७/२००४-०५ आहे व कर योग्य मुल्य १९,१५३/- निवासेत्तर दराने दर्शविण्यात आलेली आहे. स्थळ पाहणी मध्ये सदरील इमारत पूर्णत: निवासी वापरात असून प्रत्यक्ष मोजमाप घेतले असता ११५.०५ चौ.मी. बांधीव क्षेत्रफ़ळ आहे. इमारतीचे बांधकाम अ प्रकारात आहे. बांधकाम क्षेत्रफ़ळ ११५.०५ चौ.मी. विचारात घेता कर योग्य मुल्य रूपये ११,८०५/- निश्चित होते. त्यामुळे स्पेक कंपनी मार्फ़त निश्चित

केलेले कर योग्य मुल्य रूपये १९,१५३/- (निवासेत्तर दर) ऐवजी कर योग्य मुल्य रूपये ११,८०५/- निवासी दराने दि.१.४.२००५ पासून सुधारीत करण्याचे ठरले.

सोबत मुळ आक्षेप अर्ज व त्यानुसार स्पेकची कर आकारणी संबंधाने माहिती व प्रत्यक्ष जाय मोक्यावर गोळा केलेली माहितीची छायांकित प्रत जोडण्यात येत आहे.

## ६)वॉर्ड – फ

१. **श्री.प्रेमदास विष्णु गजभारे** -मालमत्ता धारकाने नोंदविलेल्या आक्षेप अर्जानुसार प्रत्यक्ष स्थळावर पाहणी केली असता स्पेक घर क्र. ४-११-२१३ असून जुना घर क्र.४-१८-३४/पी आहे. संबधिताचे कर योग्य मुल्य १९५७/- निवासी दर्शविण्यात आलेले आहे. स्पेक कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी मोजमाप कमी घेतल्याने त्यांचाकर कमी आकारलेला आहे. ते दुरूस्त करण्यात आले. .(सोबत तक्ता जोडला आहे.)

२. **श्री.गणसिंग यमाजी राठोड**- मालमत्ता धारकाने नोंदविलेल्या आक्षेप अर्जानुसार प्रत्यक्ष स्थळावर पाहणी केली असता स्पेक घर क्र. ४-११-३६२ असून जुना घर क्र.४-१८-३४/१०८ आहे. संबंधिताचे कर योग्य मुल्य २५९६ /- निवासी दर्शविण्यात आलेले आहे. स्पेक कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी निवासी कर आकारलेला होता आणि निवासेत्तर क्षेत्रफ़ळाचा कर आकारलेला नव्हता. करीता स्पेकची आकारणी रद्द करून निवासी करयोग्य मुल्य रू.१८९०/- व निवासेत्तर करयोग्य मूल्य रू.१२८५/- कायम ठेवण्याचे ठरले. (सोबत तक्ता जोडला आहे.)

३. **श्री.आशिष मधुकर कोटगीरे–** मालमत्ता धारकाने नोंदविलेल्या आक्षेप अर्जानुसार प्रत्यक्ष स्थळावर पाहणी केली असता स्पेक घर क्र. ४-२८-६५९ असून कर योग्य मुल्य २२९०७/- निवासी दर्शविण्यात आलेले आहे.स्पेक कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी क्षेत्रफ़ळ जास्तीचे दर्शवून मालमत्ता कर जास्तीचा आकारलेला होता. प्रत्यक्ष पाहणीत करयोग्य मूल्य रू.१०९५/- कायम ठेवण्यात आला आहे. (सोबत तक्ता जोडला आहे.)

४. **श्रीमती लोचणबाई विश्वनाथ गिरी**- मालमत्ता धारकाने नोंदविलेल्या आक्षेप अर्जानुसार प्रत्यक्ष स्थळावर पाहणी केली असता स्पेक घर क्र.F-TC-२-G३८ असून कर योग्य मुल्य ६९२९६/- निवासेत्तर

दर्शविण्यात आलेले आहे. स्पेक कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी क्षेत्रफ़ळ जास्तीचे दर्शवून मालमत्ता कर जास्तीचा आकारलेला होता. प्रत्यक्ष मोजमाप घेतल्यानंतर करयोग्य मूल्य रू. ४४०६/- इतका ठरविण्यात आला आहे. (सोबत तक्ता जोडला आहे.)

५. **श्री.दशरथ सरीचंद राठोड–** मालमत्ता धारकाने नोंदविलेल्या आक्षेप अर्जानुसार प्रत्यक्ष स्थळावर पाहणी केली असता स्पेक घर क्र. ४-११-७०६ असून जुना घर क्र.४-१८-३४/१७६ असा आहे. संबंधिताचे कर योग्य मुल्य २३४१४/- निवासी व १३१०७/- निवासेत्तर दर्शवून मालमत्तेस निवासेत्तर कर आकारणी केलेली होती. (सोबत तक्ता जोडला आहे.)

६. **बँक ऑफ़ बडोदा–** मालमत्ताधारकाने नोंदविलेल्या आक्षेप अर्जानुसार प्रत्यक्ष पाहणी केली असता मालमत्ता क्र.४-१०-१९० करयोग्य मुल्य १०२०६/- निवासेत्तर दर्शवून सदर मालमत्ता भाडेतत्वावर कर आकारणी केलेली असतांना व २००६ पूर्वीचा भाडेकरू असल्याने, भाडेतत्वावर कर आकारणी करणे आवश्यक होते. परंतु स्पेक कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी क्षेत्रफ़ळानुसार कर आकारणी केलेली होती. (सोबत तक्ता जोडला आहे.)

## १३. चौकशी समितीचे निष्कर्ष.

१. औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील मालमत्तांचे सर्वेक्षण खाजगी संस्थेमार्फ़त कऱ्याचा निर्णय घेण्यापूर्वी मूल्यनिर्धारण अधिकारी यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार मालमत्ता कर विषयक मूळ अभिलेखे अद्यावत करणे गरजेचे होते. तथापि ते न करताच सदरील सर्वेक्षण प्रक्रिया पार पाडल्यामुळेच शहरातील नागरिकांच्या व लोकप्रतिनिधींच्या तक्रारी वाढल्याचे दिसून येते. सदरील सर्वेक्षण खाजगी संस्थेमार्फ़त करण्यास सन २००३-२००४ मध्ये (तत्कालीन) काही नगरसेवकांनी कडाडून विरोध केला होता. या संदर्भात अत्यंत गांभीर्याने विचार करून व साऱ्या बऱ्या वाईट परिणामांचा सखोल व तुलनात्मक अभ्यास केला असता, तर मालमत्ता सर्वेक्षणाचे काम खाजगी संस्थेत देण्याचा निर्णयच झाला नसता. परंतु दुर्दैवाने सदरील खाजगी सर्वेक्षणाचा निर्णय व अंमल करण्यात आला आहे.

२ औरंगाबाद महानगरपालिकेने स्पेक या संस्थेमार्फ़त शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतल्यानंतर दिनांक १.४.१९८९ पासून केलेल्या जुन्या मालमत्तांच्या कर आकारणीच्या अभिलेख्यांतील आकडेवारी आधारभूत मानणे आवश्यक होते, तथापि तसे झालेले नसल्यामुळे स्पेक कंपनीने जुन्या मालमत्तांना पूर्वीपासून कर आकारणी केलेली असतांना अकारण नविन दराने कर आकारणी केलेली दिसून आली. जुन्या मालमत्तांना कोणताही बदल नसेल आणि वापरात बदल नसेल तर जुन्या मालमत्ता कराचे

करयोग्य मूल्य बदलण्याचे काही एक कारण नाही पण याचे भान न ठेवताच मालमत्ता आकारणी केल्यामुळे जुन्या मालमत्ताधारकांना मन:स्ताप झाल्याचे दिसून येते. याच दरम्यान भरीस भर म्हणजे करमुल्य निर्धारण विभागच रद्द केल्यामुळे स्पेक कंपनीच्या कामावर प्रभावी असे नियंत्रण राहू शकले नाही. त्यामुळे खाजगी संस्था स्पेक सिस्टीम प्रा.लि. हैद्राबाद मार्फ़त सर्वेक्षणाचा महानगरपालिकेला व शहरातील जनतेला काहीच फ़ायदा झालेला दिसून येत नाही.

३ चौकशी समितीने प्रत्यक्ष क्षेत्रावर जाऊन शहरातील विविध भागातील मालमत्तांच्या सर्वेक्षण कामाची तपासणी केली असता एकूण ३९ मालमत्तांपैकी एकाही मालमत्तेची कर आकारणी स्पेकने बरोबर केल्याचे आढळून आले नाही. तपासणीतील सर्व प्रकरणी चूकीची कर आकारणी केल्याचे दिसून आले. स्पेकने केलेल्या सर्वेक्षणात व प्रत्यक्षात चौकशी समितीने केलेल्या पाहणीत फ़ार मोठी तफ़ावत दिसून येते. साधारणपणे ५ ते १५% वाढ किंवा घट समजू शकते, पण बऱ्याच प्रकरणात साधारणत: १००% पेक्षा जास्त वाढ दिसून आली. तर काही प्रकरणी मोठ्या प्रमाणात घट आढळून आली. याचा एकच अर्थ निघतो की, सर्वेक्षण करणाऱ्या स्पेक या संस्थेने काळजीपूर्वक व गांभीर्याने तथा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील अनूसूची ड मधील प्रकरण ८ च्या तरतूदीनुसार सर्वेक्षणाचे काम केलेले नाही.

४. सर्वेक्षणाचे कामाबरोबरच सर्व मालमत्तांना विहीत आकारमानाची घर नंबर प्लेट बसविण्याच्या निविदेतील अट क्र.५.४ नुसार अट घालण्यात आली होती. त्याचे पूर्णपणे पालन तर केले नाहीच परंतु चौकशी अहवालातील परिच्छेद ७ मध्ये दिलेल्या तपशीलानुसार नंबर प्लेटस विहीत आकारमानापेक्षा कमी आकारमानाच्या तयार करण्यात आल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे.

तसेच सुमारे ७०,००० प्लेटस् महानगरपालिकेच्या इमारतीत इस्तत: पडून आहेत. त्याचे छायाचित्र अहवालासोबत जोडले आहे. सदरील प्रकरणातील उपलब्ध अभिलेख्यांतील आकडेवारीनुसार स्पेक कंपनीने शहरातील १,६४,११२ मालमत्तांचे सर्वेक्षण केले आहे. त्यापैकी सुमारे ४२,००० मालमत्तांवर त्यांनी नंबर प्लेट्स लावलेल्या असून उर्वरीत १,२२,११२ मालमत्तांना नंबर प्लेट लावलेल्या नाहीत.

५. शहरातील संपूर्ण मालमत्तांच्या सर्वेक्षणासोबतच त्याचे संगणकीकरण (Total Computerisation) आणि संपूर्ण तपशील इंटरनेटवर प्रस्थापित करण्याचे ठरले होते. त्यासोबतच या संदर्भात संगणक आज्ञावली (Software) तयार करून त्याचे हाताळणीबाबत प्रशिक्षणही महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना देण्याचे निविदेच्या अट क्र.५ मध्ये नमूद केलेले होते. तथापि याचेही पालन स्पेक संस्थेने केलेले नाही असे चौकशी समितीस आढळून आले. त्याबाबत महानगरपालिकेने स्पेक संस्थेस दिनांक २२.११.२००७ रोजी कायदेशीर नोटीस बजावली आहे व तसेच दिनांक ३१.७.२००८ रोजीही सदरील कामाच्या कराराचा भंग केल्याचे कळविले आहे. (कृपया अहवालातील परिच्छेद क्र.१० व ११ वाचावा) यावरून स्पेक कंपनीचे काम पूर्णपणे चूकीच्या पध्दतीने

झालेले दिसून येते. या संदर्भातील कोणतेही काम स्पेक कंपनीने गांभीर्याने व काळजीपूर्वक केलेले दिसत नाही.

६. वरील सर्व अहवालाचे अवलोकन केले असता सदरील खाजगी संस्थेच्या सर्वेक्षणाबाबत महानगरपालिकेतील संबंधित, विभागाच्या अधिकाऱ्यांच्या भूमिकाही अत्यंत उदासिन दिसून येतात. सदरील कामाच्या निविदेच्या अटींप्रमाणे काम होत नसताना तसेच सर्वेक्षणाबाबत गंभीर तक्रारी, वर्तमानपत्रातील सर्वेक्षणाबाबत विरोधी बातम्या येऊनही आणि अनेक नगरसेवक,पदाधिकारी व मा.महापौरांनीही सर्वेक्षणाबाबत नापसंती व्यक्त करूनही सदरील स्पेक संस्थेस पाठीशी घालणाऱ्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद ठरते.

७. निविदेतील अट क्र.६ नुसार सर्वेक्षण कामाबाबत चार टप्प्यात संबंधित संस्थेस रक्कम द्यायचे ठरलेले होते. (निविदेतील अट क्र.६) तथापि संबंधित विभागातील व लेखा विभागातील अधिकाऱ्यांनी हेही काळजीपूर्वक न तपासता स्पेक संस्थेस आजतागायत रू.१,१८,७२,५१९/- अदा केलेले आहेत. (कृपया अहवालातील परिच्छेद ५ ज व ६ पहा)

८. स्पेक या संस्थेने केलेल्या मालमत्ता सर्वेक्षणाचा अहवाल प्रभाग –ड वगळता सर्व प्रभाग अधिकाऱ्यांनी दिला आहे. सदरील अहवालात स्पेक संस्थेने सर्वेक्षण संदर्भातील बरीचशी कामे पूर्ण केल्याचे कळविले आहे. प्रत्यक्षात मात्र खूप कामे अपूर्ण असल्याचे आढळून आले आहे. प्रभाग ब, ई व फ़ मधील मालमत्ता कर विषयक कामकाज समाधानकारक आहे. प्रभाग अ, क व ड च्या प्रभाग अधिकाऱ्यांनी मालमत्ता कर विषयक कामकाजात गतिमानता आणणे आवश्यक आहे. सर्वच प्रभागातील कार्यालयात आणखीही बऱ्याच मालमत्तांची मागणी सूचनापत्रे (Demand Notice) संबंधित मालमत्ताधारकांना पोचविलेली नाहीत. अनेक मालमत्तांचे आणखीही सर्वेक्षण झालेले नाही. औरंगाबाद शहरातील २४२ नागरिकांकडे मालमत्ता कर आणि पाणीपट्टीची थकबाकी नऊ कोटी असल्याचे दिसून आले. त्याची वार्डनिहाय स्थिती पुढील प्रमाणे आहे.

| **वॉर्ड** | **एक लाख व त्यावरील थकबाकीदार संख्या** | **२ ते ५ लाख थकबाकीदार संख्या** | **५ ते १० लाख थकबाकीदार संख्या** |
|---|---|---|---|
| अ | १६ | -- | -- |
| ब | ३५ | २० | १२ |
| क | ३२ | -- | -- |
| ड | ६२ | -- | -- |
| इ | २६ | १३ | ०८ |
| फ़ | ३६ | -- | -- |

उपरोक्त प्रमाणे प्रचंड थकबाकी वसूली बाबत संबंधित वॉर्ड अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष दिसून आले. त्यामुळे महानगरपालिकेचे प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे. या करीता वॉर्ड अधिकाऱ्यांनी कालबध्द कार्यक्रम नेटाने व तातडीने राबविणे आवश्यक आहे. या संदर्भात प्रशासनाने तातडीने संबंधितांना कार्यप्रवृत्त करणे आवश्यक आहे.

वॉर्ड कार्यालयात कर वसूली या विशिष्ट कामाकरिताच पुरेशा प्रमाणात कर्मचारी वर्ग देण्यात आलेला नाही. वॉर्ड कार्यालयाची वसूलीकरीता एकसारखी संरचना करून त्याप्रमाणे कर्मचारी वर्ग उपलब्ध करून वॉर्ड कार्यालय अधिक सक्षम करणे गरजेचे आहे. म्हणून ही बाब प्रशासनाने गांभीर्याने घ्यावी.

## १४. चौकशी समितीच्या शिफारशी.

१. सदरील स्पेक सिस्टीम प्रा.लि. (यांना तातडीने कळवून) त्यांचेकडे असलेले सर्व अभिलेखे, सर्वेक्षणाची संगणक आज्ञावलीबद्दल माहिती, संकेतांक, कोड नंबर इ. येणे असलेल्या संगणक Laptop व Printer त्वरीत हस्तगत करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सर्वेक्षणाच्या संगणक आज्ञावली (Software) बाबत महानगरपालिकेच्या किमान २० अधिकारी / कर्मचाऱ्यांना अद्यावत प्रशिक्षण स्पेक सिस्टीम प्रा.लि. हैदराबाद या संस्थेने देणे आवश्यक आहे. याबाबत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. याबाबत सदरील संस्थेने टाळाटाळ केल्यास किंवा हयगय केल्यास किंवा परि.३(अ) व (ब) मधील रक्कम भरण्यास टाळाटाळ केल्यास त्यांचेवर महानगरपालिका प्रशासनाने फ़ौजदारी कार्यवाही करावी, अशी चौकशी समिती शिफ़ारस करते.

२. चौकशीतील सर्व मुद्यांचे अवलोकन केले असता स्पेक सिस्टीम प्रा.लि. हैद्राबाद या संस्थेने महानगरपालिकेशी केलेल्या मालमत्ता सर्वेक्षणा संदर्भातील कराराचा भंग केलेला असल्याने उक्त करारातील (टेंडर नोटीस मधील) अट क्र. १० व ११ नुसार महानगरपालिकेने सदरील संस्थेशी केलेला करार बडतर्फ़ (Terminate) करावा अशी शिफ़ारस करण्यात येते. त्यानुषंगाने स्पेक या संस्थेची महानगरपालिकेत जमा केलेली अनामत रक्कम रू.१५,२६,०००/- जप्त करून महानगरपालिका निधीत जमा करण्यात यावी अशी चौकशी समिती शिफ़ारस करते.

३.(अ)१. मालमत्ता सर्वेक्षणाचे कामाच्या निविदेतील अट क्र. ५.४ नुसार स्पेक संस्थेने सर्वेक्षण केलेल्या सर्व मालमत्तांना नंबर प्लेट्स बसविलेल्या नाहीत. स्पेक संस्थेने १,६४,११२ मालमत्तांचे सर्वेक्षण केल्याचे संचिकेत नमूद केलेले आहे. त्यापैकी साधारणपणे फ़क्त ४२,००० मालमत्तांनाच घर नंबर प्लेट्स बसविलेल्या आहेत. म्हणजेच आणखी १,२२,११२ मालमत्तांना सदरील प्लेटस बसवाव्या लागतील. सदरील प्लेट्स बसविण्याचा खर्च साधारणपणे प्रति प्लेट रू.१०/- धरून (१२२११२ ×१० ) रूपये १२,२१,१२०/- येईल.

२. महानगरपालिकेत पडून असलेल्या नंबर प्लेट्सची संख्या सुमारे ७०,००० गृहीत धरली तरी आणखी ४४११२ नंबर प्लेट्स महानगरपालिकेस बनवून घ्याव्या लागतील त्याचा खर्च हा रू.२० प्रमाणे रूपये ८,८२,२४०/- येईल.

स्पेक कंपनीने ज्या नंबर प्लेट्स बनविल्या आहेत त्याही निविदेतील अट क्र.५.४ नुसार विहीत केलेल्या आकारमानापेक्षा अर्ध्याच जाडीच्या आहेत. म्हणून सदरील बनविलेल्या नंबर प्लेट्सचीही अर्धी रक्कम (१,१२,०००×१०) रूपये ११,२०,०००/- वसूलपात्र ठरते.

३. अशा प्रकारे घर नंबर प्लेट्स बसविणेच्या कामात केलेल्या कचराईबद्दल एकूण रक्कम रू.(१२,२१,१२०+८,८२,२४०+११,२०,०००) रूपये ३२,२३,३६०/- (बत्तीस लाख तेवीस हजार तीनशे साठ) वसूलपात्र ठरते.

(ब). सदरील सर्वेक्षण करण्यास विलंब झाल्याबद्दल निविदेतील अट क्र.६ नुसार दिनांक १.८.२००७ ते ३१.३.२००८ या कालावधीचा (२४४ दिवस × ५०००) दंड रूपये १२,२०,०००/- स्पेक सिस्टीम प्रा.लि. हैद्राबाद यांचेकडून वसूल पात्र ठरतो.

४. स्पेक संस्थेने सर्वेक्षण केलेल्या मालमत्ता करासंदर्भातील तक्रारीबाबत वॉर्ड अधिकारी व वॉर्ड अभियंता यांनी मालमत्ताधारकांचे म्हणणे ( Hearing ) सुनावणी अंतर्गत लक्षात घेऊन दुय्यम आवेक्षकांचे सहाय्याने सदर मालमत्तांची .फेरतपासणी करून योग्य तो कर लावून प्रकरणे तातडीने निकाली काढण्याची कार्यवाही करावी. तसेच प्रलंबित मालमत्ता कराची आणि पाणीपट्टीची मागणी देयक (Demand Bills / Notices) वॉर्ड अधिकारी व वॉर्ड अभियंता यांनी परस्पर समन्वय ठेवून त्वरीत संबंधित मालमत्ताधारकांना तामील करण्याची कार्यवाही युध्दपातळीवर करण्यात यावी अशी चौकशी समितीची शिफ़ारस आहे.

५. मालमत्ता कर व पाणीपट्टी करवसूलीत संपूर्ण पारदर्शकता येणेकरीता स्पेक संस्थेने मालमत्ता सर्वेक्षणानंतर देयकांची रक्कम स्वीकारणे व संगणकावरच त्याची छपाई (Print) घेणे व एकाच वेळी संबंधित मालमत्तेच्या कराबाबतचा तपशील उपलब्ध होण्यासाठी संगणक आज्ञावली (Software) तयार केली आहे. तथापि त्याचा वापर वॉर्ड कार्यालयात होतांना दिसून आला नाही. सदरील कामाचे संपूर्ण संगणकीकरणासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी आणि कोणत्याही परिस्थितीत हस्तलिखीत देयके भविष्यात देण्यात येऊ नयेत अशी चौकशी समितीकडून शिफ़ारस करण्यात येते.

६. शहरात अनेक मालमत्तांचे सर्वेक्षण अद्याप झालेले नाही ही बाब गांभिर्याने घेऊन वॉर्ड अधिकाऱ्यांनी त्यांचे सर्वेक्षण तातडीने हाती घेण्याची आवश्यकता आहे. अन्यथा या संदर्भातील महानगरपालिकेच्या नुकसानीची जबाबदारी संबंधित वॉर्ड कार्यालयांवर टाकण्याची प्रशासनाने कार्यवाही करावी अशी चौकशी समितीची शिफ़ारस आहे.

७. औरंगाबाद शहरातील मालमत्ता सर्वेक्षणांचे स्पेक सिस्टीम प्रा.लि.हैद्राबाद या संस्थेचे कामकाज चूकीच्या पध्दतीने होत असतानाही त्याबाबत वेळीच हस्तक्षेप किंवा कार्यवाही न करण्याबद्दल जबाबदार असलेल्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ नुसार योग्य अशी शास्तीची कार्यवाही करण्याची चौकशी समितीकडून शिफ़ारस करण्यात येते, जेणेकरून भविष्यात अशा प्रकारे महानगरपालिकेची फ़सवणूक कोणीही करणार नाही.

## मा.सभापती,स्थायी समिती,महानगरपालिका,औरंगाबाद यांचे आदेशानुसार केलेल्या चौकशीचा अहवाल.

## प्रकरण : न.भू.क्र.१२९६० मौ.जाफ़रगेट येथील श्री.प्रेमचंद सुराणा व इतर यांचे सुधारित रेखांकन प्रकरणाची चौकशी.

श्री.प्रेमचंद प्रतापमल सुराणा व इतर यांचा सुधारित रेखांकन नगर भूमापन क्रमांक १२९६० मौ.जाफ़रगेट प्रकरणी दिनांक २४.७.२००८ रोजी संपन्न झालेल्या मा. स्थायी समितीमध्ये उपआयुक्त (सिडको) यांना चौकशी करण्याचे आदेशित केले. त्यानुसार श्री. सोमनाथ शेटे, उपायुक्त (सिडको) यांनी त्यांचा अहवाल दिनांक ३०.७.२००८ रोजी मा.सभापती, स्थायी समिती, महानगरपालिका,औरंगाबाद यांना सादर केला आहे.

सदरील अहवालानुसार या प्रकरणात बऱ्याच आक्षेपार्ह बाबी असून अनियमितता देखील झालेली आहे. उपायुक्त (सिडको), यांनी दिलेल्या अहवालात नमूद केल्यानुसार सुधारित रेखांकन प्रस्तावाचे प्रकरण हाताळतांना विविध स्तरावरील अधिकारी / कर्मचारी यांनी निष्काळजीपणा,वस्तुनिष्ठ माहिती लपविणे, तसेच महानगरपालिकेच्या हिताचा विचार न करणे व महापालिकेच्या मालमत्तेला क्षती पोहोचवणे या चूका झालेल्या आहेत. सदर प्रकरणात सखोल चौकशी होवून जबाबदारी निश्चित करण्याकरीता मुख्य लेखा परीक्षक यांचेकडून लेखा परीक्षण होणे आवश्यक असल्याचे नमूद केलेले आहे.

मा.सभापती, स्थायी समिती, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्र. मनपा/सभापती/२००८/१७३, दिनांक ३१.७.२००८ अन्वये मुख्य लेखा परीक्षक यांना संपूर्ण प्रकरणाची तपासणी करण्याचे आदेशित केले आहे. तांत्रिक बाबींच्या अनुषंगाने श्री.जयंत खरवडकर,शाखा अभियंता व श्री.एस.एस.कुलकर्णी,शाखा अभियंता यांनाही सहाय्य करण्याच्या सूचना सदरील आदेशात दिलेल्या आहेत.

नगररचना विभागातील अभिलेख सुधारित रेखांकन संचिका न.भू.क्र.१२९६० मौ.जाफ़रगेट या संचिकेतील टिपणी व कागदपत्राआधारे उपायुक्त (सिडको) यांच्या प्राथमिक चौकशीतील मुद्दे व सुधारित रेखांकन प्रस्तावाची संचिका यांची तपासणी केली असता खालील बाबी आढळून आल्या.

मुद्येनिहाय निरीक्षण अहवाल पुढीलप्रमाणे-

**मुद्या क्र.१:** या प्रकरणामध्ये सुधारीत रेखांकन प्रस्तावासोबत दाखल करण्यात आलेले मालकी हक्काचे कागदपत्रे जसे की, नगर भू-मापन कार्यालयाचे आखीव पत्रिका (पी.आर.कार्ड) व मिळकतीचा संपूर्ण मोजणी नकाशा जमीन मालकाच्या नावे असणे आवश्यक आहे ही बाब तपासण्यात आलेली दिसून येत नाही. विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.६.२.२ नुसार मालकी हक्काची प्रथम खात्री करणे नियमानुसार बंधनकारक आहे.

## चौकशीचे अभिप्राय

संचिकेतील पान क्र.एनएस/१ परिच्छेद क्रमांक १ ते ५ यामध्ये मालकी हक्कासंबंधी टिपणी कनिष्ठ अभियंता श्री.एस.बी.राठोड यांनी केली आहे. यामध्ये त्यांनी प्रकरणातील त्रुटी उपस्थित करून पूर्तता करणेस कळविण्याचा अहवाल दिला आहे. त्यानंतर या प्रकरणांत श्री.एस.बी.राठोड यांचा पुढे कोठेही अहवाल नाही. त्यानंतर या प्रकरणाची छाननी शाखा अभियंता श्री.ए.ए.तनपुरे यांनी केली आहे. त्यामुळे मालकी हक्काची खात्री श्री.तनपुरे शाखा अभियंता यांनी करणे आवश्यक होते. तथापि, प्रस्तावाची मंजूरीसाठी शिफ़ारस करण्यापूर्वी विकास नियंत्रण नियमानुसार संपूर्ण मिळकत नमूद न.भू.क्र. १२९६० त्यांच्या हद्दी, सिमा,क्षेत्र,अस्तित्वातील बांधकाम (परवानगी/ भाडे) यांची खात्री केल्याचे दिसून येत नाही. तसेच प्रकरणांत संबंधित अर्जदाराने सादर केलेला G.P.A या बाबत देखील योग्य ती तपासणी केल्याचे आढळून येत नाही. सदरील प्रकरणी श्री.ए.बी.देशमुख उपअभियंता (नगररचना) यांची भूमिका "नरोवा कुंजरोवा " अशीच आहे. तथापि त्यांनीही स्पष्ट मत देणे आवश्यक होते.

**मुद्दा क्र.२.** शासन मंजुर विकास नियंत्रण नियमावली नियम क्र. ६.२.१२ नुसार कोणताही विकास परवानगीचा प्रस्ताव दाखल करतांना संपूर्ण मिळकतीच्या मालमत्ता कराबाबत व थकबाकी बाबत बेबाकी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदरील बाब प्रस्तावाच्या छाननीमध्ये तपासण्यात आल्याचे दिसून येत नाही.

## चौकशीचे अभिप्राय

सुधारित रेखांकन संचिकेत संपूर्ण न.भू.क्र.१२९६० मधील अस्तित्वातील सर्व इमारती व खुले भूखंड यांचा मालमत्ता कर व इतर कर व पाणीपट्टी पूर्ण भरणा करून महानगरपालिकेच्या प्रभाग कार्यालयाकडून बेबाकी प्रमाणपत्र घेणे आवश्यक होते. सदरील बेबाकी प्रमाणपत्र प्राप्त केल्याशिवाय संचिकेत प्रस्ताव मंजूरीची शिफ़ारस करणे महानगरपालिकेच्या हिताचे नाही. बेबाकी प्रमाणपत्र न घेणे यामध्ये निष्काळजीपणा व महानगरपालिकेच्या वसूलीला खीळ घालण्याचे कृत्य आहे व याकरीता सर्व स्तरावरील अधिकाऱ्यांना जबाबदार धरावे लागेल.प्रस्ताव मान्यतेसाठी शिफ़ारस करणारे शाखा अभियंता श्री.ए.ए.तनपुरे, कनिष्ठ अभियंता, श्री.एस.एल.चामले, तत्कालीन सहाय्यक संचालक नगररचना ,श्री.एम.डी.राठोड व श्री.आर.डी.जोशी यांनी याबाबत प्रस्ताव सादर करण्यापूर्वी या बाबींची खात्री करणे आवश्यक होते, ते केलेले दिसत नाही.

**मुद्दा क्र.३.** विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. १३.३ मध्ये रेखांकनातील खुल्या जागेचे निकष व बंधने देण्यात आली आहेत या नियमावलीतील उपनियम १३.३.१.२ नुसार खुल्या जागेचे आकारमान व बाजुंची मर्यादा यांचे प्रमाण

निश्चित करण्यात आले आहे. खुल्या जागेची लांबी व रूंदी प्रमाणात असणे गरजेचे आहे व त्यास असलेला पोच रस्ता या बाबत निकष ठरविण्यात आलेले आहे. सुधारित रेखांकनाच्या छाननीत या नियमाकडे पुर्णत: डोळेझाक करून अनियमित आकाराची नियमानुसार अनुज्ञेय न होऊ शकणारी खुली जागा मान्य करण्याची शिफ़ारस केल्याचे आढळून येते. ही बाब तांत्रिक अधिकाऱ्यांच्या ज्ञानाचा अभाव अथवा हेतुपुरस्सर केलेली चूक आहे हे स्पष्ट होते.

## चौकशीचे अभिप्राय

रेखांकनातील खुली जागा विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.१३.३.१.२ नुसार असणे आवश्यक आहे. लांबी रूंदीचे प्रमाणे आकारमान, खुलीजागा मध्यवर्ती ठिकाणी व नियमित आकारमानाची असणे आवश्यक आहे. याबाबत कोणीही टिपणी केली नाही. श्री.ए.ए.तनपुरे, श्री.एस.एल.चामले, श्री.एम,डी.राठोड, श्री.आर.डी.जोशी या सर्वांनी या मुद्यांकडे दुर्लक्ष केलेले दिसून येते.

**मुद्या क्र.४** प्रस्तावित रेखांकनातील अनियमित आकाराची खुली जागा ज्याचा न.भु.क्र.१२९६०/१०/१ असा आहे. ही जागा भागश: विकास योजनेमधील आरक्षण क्रमांक ५४ ने बाधीत आहे. याबाबत पूर्वीच्या मंजूर रेखांकन नकाशावर स्पष्ट उल्लेख असतांना सुधारीत रेखांकन प्रस्तावात याबाबत तपासणी करण्यात आली नाही व कोणतीही टिपणी करण्यात आली नाही. विकास योजना प्रस्तावाबाबत दुर्लक्ष करणे ही बाब गंभीर आहे.

तसेच मूळ रेखांकनात खुली जागा म्हणून देय केलेला भूखंड नं.भू.क्र.१२९६०/१३ हा मुख्य रस्त्यावर मोक्याच्या जागी व नियमित आकारात आहे. आता नव्याने प्रस्तावित खुली जागा न.भु.क्र.१२९६०/१०/१ ही वेड्यावाकड्या आकाराची अनियमित स्वरूपाची व कोणत्याही मुख्य रस्त्यावर (Frontage) नसलेली एखाद्या बोळीप्रमाणे आहे.

ही बाब संचिकेमध्ये कोणत्याही स्तरावरील टिपणीत नोंदविली गेली नाही. तसेच मूळ रेखांकन खुल्या जागेचे क्षेत्र २५८३.१२ चौरस मीटर एवढे असून ही जागा महानगरपालिकेकडे वर्ग झालेली असतांना नवीन खुली जागा २३५८.०० चौरस मीटर क्षेत्राची म्हणजेच २२५.१२ चौरस मीटर क्षेत्र कमी करून मान्य करण्याचे शिफ़ारस केली आहे. ही बाब देखील निश्चितच महानगरपालिकेच्या हिताच्या विरूध्द आहे.

## चौकशीचे अभिप्राय

मंजूर विकास योजनेतील आरक्षित जागा ही रेखांकनातील खुली जागा म्हणून प्रस्तावित करणे व अशी खुली जागा मान्य करण्याची शिफ़ारस करणे ही गंभीर बाब असून नगररचना विभागातील संबंधित अभियंत्यांची अशी चूक कोणत्याही परिस्थितीत माफ़ करता येणार नाही. या चूकीसाठी सर्वच (टिपणी लिहीणारे) अधिकारी /कर्मचारी जबाबदार आहेत.

**मुद्दा क्र.५** मंजुर रेखांकन आदेश क्र.एमसी/टीपीएस/एलवायटी/३५९/८२ दिनांक ११.०३.१९८२ मधील अट क्र.७ नुसार रेखांकनातील खुली जागा न.भु.क्र.१२९६०/१३ क्षेत्र २५८३.१२ चौरस मीटर नगरपरिषदेमध्ये (Vest) वर्ग झाली आहे म्हणजेच ही मालमत्ता नगरपरिषदेच्या मालकीची व नगरपालिकेमध्ये निहित असल्याने त्या मालमत्तेचे हस्तांतरण करता येत नाही तसेच त्याचे क्षेत्रफ़ळ कमी करता येत नाही. या जमिनीची विल्हेवाट लावण्याकरीता महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेची आवश्यकता आहे. या संचिकेमध्ये सर्वसाधारण सभेच्या मान्यतेचा उल्लेख नाही.

## चौकशीचे अभिप्राय

दिनांक ११ मार्च १९८३ च्या रेखांकन आदेशातील इतर सर्व अटींनुसार रेखांकनाचा विकास झाला आहे. रेखांकनधारकास रेखांकन आदेशातील सर्वच अटी बंधनकारक आहेत. रेखांकनातील खुली जागा नगरपरिषदेमध्ये (Vest) वर्ग झाल्याने ती महानगरपालिकेची मालमत्ता आहे. आखिव पत्रिकेवर ले -आऊटची खुली जागा अशी नोंद आहे. नगरभूमापन कार्यालयाच्या चूकीने मूळ जमीन मालकांची नांवे कमी केली नाहीत ही केवळ तांत्रिक बाब असून त्यामुळे वस्तुस्थितीमध्ये बदल होत नाही. सदरील खुली जागा ही महानगरपालिकेची मिळकत असल्याने महानगरपालिका सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे असे स्पष्ट मत आहे. ही बाब किमान अधिकारी स्तरावर तरी तपासणे आवश्यक होते. तसेही दिसून येत नाही.

**मुद्दा क्र.६** विधी सल्लागार यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्र.जा.क्र./मनपा/विधी/१२६७/२००३ दिनांक २०.११.२००३ नुसार न्यायालयाने दावा डिसमिस केल्याचे कळविले व मनाई हुकूम नाही, सदरील जागेवरील अतिक्रमण काढावे व म्युटेशन करावे असे कळवूनही तत्कालीन सहाय्यक संचालक,(नगररचना) प्रशाकीय अधिकारी व मालमत्ता अधिकारी यांनी या पत्राची दखल घेतली नाही कोट्यावधी रूपयाची मालमत्ता महानगरपालिकेच्या हातून जाता कामा नये या भावनेतून तत्परतेने दखल घेणे

आवश्यक असतांनाही विधी विभागाच्या पत्राकडे दुर्लक्ष करण्यात आले ही खेदजनक बाब आहे.

## चौकशीचे अभिप्राय

विधीसल्लागार यांच्या दिनांक २०.११.२००३ च्या पत्राकडे दुर्लक्ष केले यास तत्कालीन मालमत्ता अधिकारी, तत्कालीन प्रशासकीय अधिकारी व तत्कालीन सहाय्यक संचालक (नगररचना) हे तीन अधिकारी व्यक्तिश: जबाबदार आहेत. ही बाब अतिशय गंभीर आहे. महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीने तातडीने कोट्यवधी रूपयांच्या मालमत्तेवरील अतिक्रमणे काढून ती ताब्यात घेणे आवश्यक होते. तथापि अशी कार्यवाही झालेली दिसून येत नाही. त्यामुळे या अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**मुद्या क्र.७** सदरील प्रस्तावामध्ये मुखत्यारआम भारत म्हणून कागदोपत्री स्वाक्षऱ्या केल्याचे आढळते परंतु मूळ मालकांनी संबंधितांना मुखत्यारनामा दिला आहे काय तसेच ज्यांचे मुखत्यार आम आहे ती व्यक्ति आज हयात आहे किंवा नाही या बाबी काळजीपूर्वक तपासल्या गेल्या नाहीत असे दिसते. तसेच मुखत्यारनामा नोदंणीकृत नसून तो फ़क्त नोटरीद्वारा प्रमाणित आहे. ही बाब सुध्दा योग्य नाही.

## चौकशीचे अभिप्राय

खोटा मुखत्यारनामा सादर करणे, स्वाक्षऱ्या करणे, मयत व्यक्तिचा मुखत्यारनामा सादर करून प्रस्ताव सादर करणे या बाबींसाठी संबंधित अर्जदारावर फ़ौजदारी गुन्हा दाखल करणे आवश्यक आहे.

**मुद्या क्र.८** संचिकेमध्ये पान क्र.५४९ सी/७७ मध्ये नोटीस जा.क्र. / मनपा / नरवि / ३१२ /२००४ दिनांक ०५.०२.२००४ मध्ये स्पष्टपणे कळविण्यात आले आहे की,

अ) प्रस्ताव नकाशा प्रतीवर सर्व मिळकतधारकांचे नाव नमूद करून स्वाक्षऱ्या करणे आवश्यक.

ब) दि.दा.क्र.८८/२००१ चा विचार करून प्रस्ताव दाखल करावा.

क) प्रस्ताव नकाशावर भूखंडाची मोजमापे, जमिनीच्या हद्दीची मोजमापे दर्शविणे आवश्यक, कलरकोड करणे आवश्यक.

ड) अस्तित्वातील बांधकामातील खुलासा, बांधकाम परवानगी / भोगवटा प्रमाणपत्राबाबत.

वरील महत्वाच्या मुद्यांसह इतर त्रुटींची पुर्तता करण्यास कळविण्यात आल्याचे दिसते त्यानंतर सदरील मुद्यांचा खुलासा न करता संचिकेमध्ये केवळ अर्जदाराच्या हिताचा विचार करून पुढील टिपणी झाल्याचे दिसते. वरील मुद्यांची पुर्तता न करता कार्यालयाने स्वत:हून जाहिर प्रगटन देणे, संबंधितांना युपीसीने नोटीस पाठवून कागदोपत्री पुरावे तयार करण्याचा प्रयत्न

करणे ही गोष्ट संबंधितांच्या महानगरपालिका संस्थेशी असलेल्या सचोटी व कर्तव्य परायणता या संशय घेण्याइतपत गंभीर आहे.

## चौकशीचे अभिप्राय

संचिकेतील पान क्र.५४९ वरील जा.क्र./मनपा/नरवि/३१२/२००४, दिनांक ०५.०२.२००४ मध्ये उपस्थित केलेल्या त्रुटींची पूर्तता होणे आवश्यक होते. त्रुटींची पूर्तता न करता प्रस्ताव मान्यतेसाठी शिफ़ारस करणे प्रशासकीय दृष्टीने अयोग्य बाब असून त्यामध्ये अधिकारी व कर्मचारी यांच्या सचोटी व कर्तव्यपरायणतेबाबत संशय निर्माण होतो. त्याकरीता तत्कालीन सहाय्यक सचांलक (नगररचना) व तत्कालीन कनिष्ठ अभियंता यांना जबाबदार धरावे लागेल.

**मुद्दा क्र.९** नगर भुमापन क्रमांक १२९६०/१३ क्षेत्रफ़ळ २४९४.५० या भूखंडाच्या आखीव पत्रिकेवर खुली जागा लेआऊट मधील अशी नोंद आहे व ही नोंद २८.१२.१९८२ रोजी दिलेल्या रेखांकन आदेशानुसार घेण्यात आल्याचे नमूद केले आहे. करिता सदरील (Recreational Open Space) खुली जागेच्या मालकी व वापराबाबत कोठेही संदिग्धता नव्हती केवळ या खुल्या जागेच्या नोंदी सोबत मुळ जमीन मालकाचे नांव नगर भुमापन कार्यालयातील कर्मचाऱ्याच्या चुकीने कमी करण्यात आले नाही याबद्दल महाराष्ट्र महसूल संहिता १९६६ चे कलम १५५ नुसार मा.जिल्हाधिकारी यांना विनंती करून आखीव पत्रिकेतील या नोंदीबाबत दुरूस्ती करून घेणे शक्य होते परंतु तत्कालीन संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी महानगरपालिकेच्या हिताचा विचार न करता अर्जदारास महानगरपालिकेची जागा परत देण्याच्या दृष्टीने टिपणी केल्याचे दिसून येते. याबाबत सखोल चौकशीची गरज वाटते.

## चौकशीचे अभिप्राय

नगरभूमापन क्रमांक १२९६०/१३ वरील रेखांकनातील खुली जागा असतांना खाजगी व्यक्तीचे नांव पी.आर.कार्डावरून कमी करण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही या उदासीनतेकरिता तत्कालीन सहाय्यक संचालक नगररचना व तत्कालीन मालमत्ता अधिकारी यांच्यावर जबाबदारी ठेवावी लागेल.

**मुद्दा क्र.१०** मंजूर रेखांकनातील अटी व शर्तीनुसार तसेच संबंधित जमीन मालकांनी रेखांकन मंजुरीचे प्रस्ताव स्टॅम्प पेपरवर दिलेला करारनामा यामध्ये असलेल्या उल्लेखाप्रमाणे या रेखांकन स्वयं:विकास पध्दतीने (Self Development) करण्याची हमी दिली आहे. या लेआऊटमध्ये बेटरमेंट चार्जेस भरण्यात आले नाहीत. परंतु विकासाची सर्व कामे कोणी व केव्हा केली याबाबत संचिकेत कोणतीही टिपणी नाही. बेटरमेंट चार्जेस जमा न करता महानगरपालिकेने विकास

कामे केली असल्यास त्याचा निष्कारण बोजा महानगरपालिका तिजोरीवर पडला काय याची तपासणी होणे आवश्यक वाटते.

## चौकशीचे अभिप्राय

शहर अभियंता यांच्याकडून या रेखांकनात नमूद कार्यक्षेत्रावर महानगरपालिकेचे विकास कामांवर खर्च केल्याचा अहवाल उपलब्ध झाल्यास खर्चाची रक्कम प्रथम रेखांकनधारकांकडून वसूल करण्यात यावी व दिलेल्या मुदतीत रकमेची वसूली रेखांकन धारकाकडून न झाल्यास या संचिकेत टिपणी करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांकडून एकूण रकमेची समान विभागणी करून त्यांच्याकडून व्यक्तिश: वसूल करावी.

**मुद्या क्र.११** प्रस्तावित सुधारित रेखांकन नकाशात खुल्या जागेत दोन बाजुने प्रस्तावित पोच रस्ते दाखविले आहेत. परंतु दोन्ही बाजुने प्रस्तावित केलेले रस्ते पोच रस्ते होऊ शकत नाही कारण पूर्व बाजुस रेखांकनातील भूखंडातून पोच रस्ता दाखविला असून त्यामध्ये रेखांकनातील मूळ भूखंडाचे क्षेत्र कमी होत आहे. व या भूखंडधारकाची संमती प्रस्तावित रेखांकन नकाशावर नाही तसेच संचिकेत याबाबत कोणत्याही स्तरावर स्पष्ट अहवाल नाही.

पश्चिम बाजुस असलेल्या १५ मीटर विकास योजना रस्ता व रेखांकनाची जागा यामधील नियोजित पोच रस्त्याचे क्षेत्र अर्जदाराच्या मालकीचे नाही त्यामुळे हा देखील पोच रस्ता होऊ शकत नाही. मूळ मंजूर रेखांकनात रस्त्याची रूंदी प्लॉट क्र.९ च्या पूर्वेस १० मीटर होती आता ती ९ मीटर करण्यात आली आहे. या प्रकरणात कार्यालयाने वृत्तपत्रात जाहीर प्रगटन देऊन मूळ रेखांकनात कोणताही बदल केला नसल्याचे जाहिर केले आहे. तथापी प्रत्यक्षात वरील प्रमाणे अनेक बदल करून विसंगती निर्माण केली आहे. तसेच कार्यालयाने स्वत:च्या खर्चाने याबाबत जाहिर प्रगटन देणे ही बाब देखील योग्य वाटत नाही.

वरील सर्व आक्षेपार्ह बाबी लक्षात घेता या सुधारीत रेखांकन प्रस्तावाचे प्रकरण हाताळतांना कार्यालयाच्या विविध स्तरावरील अधिकारी / कर्मचारी यांनी निष्काळजीपणा, वस्तुनिष्ठ माहिती लपविणे, तसेच महानगरपालिकेच्या हिताचा विचार न करणे व महानगरपालिकेच्या मालमत्तेला क्षति पोहोचवणे या चुका केल्या आहेत. याबाबत जबाबदारी निश्चित करून त्यांच्या चुकांच्या प्रमाणात शास्ती लावण्याची आवश्यकता आहे. जेणेकरून संबंधितांकडून किंवा इतरांकडून वरील प्रमाणे गंभीर चुका होऊ नयेत याकरिता चुका करणाऱ्यांच्या चुकांवर पांघरूण न घालता त्यांना शासन करणे संस्थेच्या / सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. करिता प्रकरणात सखोल चौकशी होऊन जबाबदारी निश्चित करण्याकरिता या प्रकरणाचे मुख्य लेखा परीक्षक महानगरपालिका,यांचेकडून लेखा परीक्षण होणे देखील आवश्यक आहे असे मत आहे.

## चौकशीचे अभिप्राय

मुद्या क्र.११ मध्ये उपस्थित केलेल्या तांत्रिक बाबी गंभीर असून यामध्ये महानगरपालिकेच्या फसवणूकीचा हेतू स्पष्ट होतो. तरी या करिता श्री.ए.ए.तनपुरे, श्री.एस.एल.चामले, श्री.एम.डी.राठोड व श्री.आर.डी.जोशी यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी लागेल.

## चौकशी समितीचा निष्कर्ष व शिफ़ारस

सदरील प्रकरणात आढळून आलेल्या बाबी अतिशय गंभीर असून उपलब्ध अभिलेख व विद्यमान सहाय्यक संचालक (नगररचना) यांची टिपणी पाहता महानगरपालिकेची सरळ सरळ फ़सवणूक करण्याचा संबंधितांचा हेतू यातून सिध्द होतो. त्यामुळे महानगरपालिकेच्या व सार्वजनिक हिताच्या दृष्टीने याबाबत महानगरपालिका प्रशासनाने पुढील प्रमाणे तातडीने कार्यवाही करावी असे चौकशी समितीचे स्पष्ट मत आहे.

१. महानगरपालिका प्रशासनाने सदरील न.भू.क्र. १२९६० खुल्या जागेवरील अतिक्रमणे हटवून ती मालमत्ता तातडीने आपल्या ताब्यात घ्यावी.

२. सदरील प्रकरणातील अर्जदाराने खोटा मुखत्यारनामा सादर करणे, बनावट स्वाक्षऱ्या करणे, मयत व्यक्तिंचा मुखत्यारनामा सादर करून प्रस्ताव दाखल केला व महानगरपालिकेची दिशाभूल केल्यामुळे महानगरपालिका प्रशासनाने संबंधित अर्जदारावर व त्या अर्जदारास मदत करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर फ़ौजदारी गुन्हा दाखल करावा.

३. सदरील प्रकरणात तत्कालीन सहाय्यक संचालक नगररचना,श्री.एम.डी.राठोड व श्री.आर.डी.जोशी यांच्या भूमिका सचोटी, निष्ठा व कर्तव्यपरायणता या दृष्टीने संशयास्पद दिसून येते. महानगरपालिकेच्या कोट्यावधी रूपयाच्या न.भू.क्र.१२९६० या मोकळ्या जागेचे इतरांना हस्तांतर करण्याची तयारीच वरील अधिकाऱ्यांनी चालविल्याचे सिध्द होते. त्यामुळे महानगरपालिका प्रशासनाने त्यांच्या विरोधात शासनाकडे महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम (८) नुसार जबर शिक्षेचा प्रस्ताव पाठवावा.

४. सदरील प्रकरणांत महानगरपालिकेचे अधिकारी श्री.ए.ए.तनपूरे, (शाखा अभियंता) व श्री.एस.एल.चामले, (कनिष्ठ अभियंता) हे देखील दोषी असल्याचे सिध्द झाल्यामुळे महानगरपालिका प्रशासनाने, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,१९४९ चे कलम ५६ (१)(ब) अन्वये त्यांना तात्काळ निलंबीत करून त्यांचे विरोधात उक्त अधिनियम व महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम (८) या तरतूदीनुसार जबर शिक्षेच्या अनुषंगाने कार्यवाही करावी.

५. तत्कालीन मालमत्ता अधिकारी व तत्कालीन प्रशासकीय अधिकारी यांनी विधी सल्लागारांनी स्पष्टपणे अतिक्रमण हटवून मालमत्ता ताब्यात घेण्याच्या सूचना दिलेल्या असतांनाही काहीच कार्यवाही न केल्यामुळे त्यांचीही या प्रकरणी उदासिनता दिसून येते. त्यांचे विरूध्द मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ प्रमाणे योग्य त्या शास्तीची कार्यवाही करावी.

# शिक्षण सेवकांच्या नेमणूकीतील प्रक्रियेतील तक्रारीबाबत प्राथमिक चौकशी.

शिक्षण विभागाच्या शिक्षण सेवक भरती संचिकेच्या पान क्र.३३ वरील दिनांक २६.०२.२००९ रोजीच्या मा.आयुक्त यांच्या अभिप्रायातील सूचनेनुसार सदरील संचिकेची तपासणी केली असता पुढील प्रमाणे निष्कर्ष दिसून येतात.

१. शासन निर्देशाप्रमाणे दिनांक १२.१२.२००८ व दिनांक १३.१२.२००८ रोजी शिक्षण सेवक भरती करता घेतलेल्या मुलाखतीनुसार निवड याद्या अंतिम करण्यात आल्या. त्यानुसार संबंधितांना निवड झाल्याचे पत्र देण्यात आले. दिनांक १६.३.१९९९ च्या शासन निर्णयानुसार महिलांचे समांतर आरक्षणात चूक झाल्याने तत्कालीन मा.आयुक्त तथा अध्यक्ष निवड समिती यांचे आदेशान्वये प्रथम जाहीर झालेली गुणवत्ता यादी रद्द करण्यात आली व तसे संबंधित उमेदवारांना कळविण्यात आले.

ज्या उमेदवाराची निवड रद्द करण्यात आली त्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर तत्कालीन मा.आयुक्त यांनी सूचना दिल्या की, तक्रारदार ८ उमेदवारांना

१. बरसाळे वर्षा अर्जून
२. डीडोरे स्वाती सदाशिव
३. बडक मिनाक्षी वसंतराव
४. शिसोदे स्वाती बाबासाहेब
५. काथार दिपाली मधुकर
६. मेहनाज कौसर
७. अंजूम परविन इलियास व
८. चिस्ती रूमाना सलीम

या उमेदवारांना नियुक्ती देवून समायोजित करावे. हे करत असतांना त्यांचे पेक्षा अधिक गुण असणाऱ्यांना सुध्दा रिक्त पदावर नेमणूक देवून समायोजित करावे, अशा सूचना दिलेल्या होत्या. त्याच बरोबर विशेष प्रवर्गातील मागासवर्गीय उमेदवारांनाही पूर्वीचे उमेदवार रूजू न झाल्यास त्या –त्या संवर्गातील उमेदवारांना गुणवत्तेनुसार नेमणूक देण्यात यावी अशीही सूचना दिनांक २४.२.२००८ रोजी तत्कालीन मा.आयुक्तांनी दिलेल्या होत्या.

३. दिनांक १७.१२.२००८ रोजी १७ उमेदवारांची प्रतिक्षा यादी बनविण्यात आली. त्यातील मराठी खुला संवर्ग प्रतिक्षा यादीमध्ये बरसाळे वर्षा अर्जून, डिडोरे स्वाती सदाशिव, बडक मिनाक्षी वसंतराव अशी अनुक्रमे ०३ नांवे अनुक्रमांक २,३ व ४ वर गुणानुक्रमे दर्शविण्यात आले.

४. मराठी खुला प्रतिक्षा वर्गातील निवड करून त्यानंतर निवड रद्द झालेल्या उमेदवारास सर्वात शेवटी बडक मिनाक्षी वसंतराव यांचे नांव आहे.

५. शिक्षण विभागाच्या शिक्षण सेवक भरती संचिकेतील प्रतिक्षा यादी मध्ये “खान तरन्नुम बशीर खान ” यांचे नांव ४/१ असा क्रमांक देवून नव्याने समाविष्ट केल्याचे दिसून येते. सदरील नांव मूळ प्रतिक्षा यादी मध्ये नसतांना ते शिक्षण विभागातील कर्मचाऱ्याने नव्याने समाविष्ट केल्याचे आढळून आले. सोबत मूळ प्रतिक्षा यादीची प्रत व नव्याने समाविष्ट प्रतिक्षा यादी ( जी की , संचिकेत उपलब्ध आहे ) ती सोबत जोडली आहे.

६. या संदर्भात तत्कालीन शिक्षणाधिकारी श्रीमती लतिका धेनक यांना चौकशीसाठी दिनांक २७.२.२००९ रोजी बोलावले असता त्यांनीही “ खान तरन्नुम बशीर खान ” हे नांव नंतर कोणीतीरी समाविष्ट केल्याचे स्पष्ट करून असे सांगितले की, सदरील संचिकेतील पान क्र.२८ व २९ बदलून नविन पान ज्यामध्ये “खान तरन्नुम बशीर खान ” यांचे नांव समाविष्ट करून संचिका मा.आयुक्तांना सादर केलेली आहे.

७. शिक्षण विभागाच्या सदरील संचिकेतील पान क्र.२८ व २९ खरोखरंच बदल्याचे दिसून आले. पहिल्या मूळ पानावर “ खान तरन्नुम बशीर खान ” हे नांव नसतांना या पानावर येतेच कसे ? ही बाब अत्यंत गंभीर असून सदरील नांव समाविष्ट करण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांच्या विरूध्द कडक कार्यवाही करणे आवश्यक वाटते.

सदरील प्रकरणी “ खान तरन्नुम बशीर खान ” यांना नेमणूक देण्याचे कोणतेही सबळ कारण नाही. सदरील नांव वगळता इतर उमेदवारांना नेमणूक देण्यास हरकत नाही.

# सर्व शिक्षा अभियान प्राथमिक तपासणी अहवाल.

## १. भांडार वस्तु खरेदीतील अनियमितता :

शासन निर्णय (उद्योग उर्जा व कामगार विभाग) क्रमांक भांखस १०८८ (२५१२५/उद्योग-६, दिनांक ०२ जानेवारी १९९२ व भांखस १०९३/१६३५ उद्योग-६ दि.१६ जुलै १९९३ नुसार भांडार वस्तु खरेदी बाबत सविस्तर शासनादेश / सुचना दिलेल्या आहेत. त्यात पुढील सुचनांचा समावेश आहे.)

अ) सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेने रू.१०००/- पर्यंत विना दरपत्रक खरेदी करणे.

ब) रू. १०००/- वरील व रू.५०,०००/- पेक्षा कमी दरपत्रके मागवून खरेदी करणे.

क) रू.५०,०००/- व त्यापेक्षा अधिक निविदा मागवून खरेदी करणे.

उक्त शासनादेशाचे पालन न केल्यामुळे सर्व शिक्षा अभियानांतर्गत खरेदी मध्ये अनियमितता आढळून आली.

## १. विना निविदा खरेदी :

| अ. क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | एजन्सीचे नांव | खरेदी तपशील | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५२ | ३१.१०.२००७ | अमय ट्रेडर्स ,औरंगाबाद | इन्वर्टर | ८३,२१५/- |
| २ | ६५ | २७.११.२००७ | मे.यश ट्रेडर्स कं.औरंगाबाद | स्टेशनरी | ५४,१३७/- |
| ३ | ११४ | २६.०२.२००८ | मे.औरंगाबाद कन्झ्युमर को.ऑ.सोसायटी औरंगाबाद. | फ़र्निचर | ९९,९४५/- |
| ४ | ११७ | २६.०२.२००८ | मे.औरंगाबाद कन्झ्युमर को.ऑ.सोसायटी औरंगाबाद. | फ़र्निचर | ९९,९४५/- |
| ५ | ११७ | २६.०२.२००८ | मे.वैष्णवी इंटरप्रायझेस औरंगाबाद | कॅनवस कॅप्स | ५५७०८/- |
| ६ | ११९ | २९.०२.२००८ | मे.औरंगाबाद कन्झ्युमर को.ऑ.सोसायटी औरंगाबाद. | कंपास टिफ़ीन वॉटर बॅग | १२७९७३/- |
| ७ | १२० | २९.०२.२००८ | मे.औरंगाबाद कन्झ्युमर को.ऑ.सोसायटी औरंगाबाद. | खेळणी | १४९९५०/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | १५२ | ३१.०३.२००८ | यश ट्रेडर्स कं.औरंगाबाद | ऑफ़िस व ट्रेनिंग हॉल नुतनीकरण | ६२५०६/- |
| ९ | १५३ | ३१.०३.२००८ | ए अॅन्ड एम डिझायनर औरंगाबाद | डिजीटल बॅनर्स | ६०५६३/- |
| १० | १५७ | ३१.०३.२००८ | सुयोग आर्ट मटेरियल पुणे | आर्ट ट्रेनिंग | ३१२६४५/- |
| ११ | १५९ | ३१.०३.२००८ | मे. झुम इन्फ़ो सोल्युशन प्रा.लि. | मटेरियल | २,३२,७४६/- |
| | | | | | **१२,३९,३८८/-** |

वरील खरेदी करतांना शासन परिपत्रक क्र. शिक्षण विभाग एम आय एस /१०६८/६८४-६ दिनांक २७ ऑगस्ट १९७० चा आधार घेतला आहे. सदरील आदेश शासन निर्णय दिनांक ०२ जानेवारी १९९२ नुसार निष्प्रभ झालेले आहेत.

## मा.सभापती, स्थायी समिती, महानगरपालिका,औरंगाबाद यांच्या दिनांक २६.२.२००९ च्या आदेशानुसार रिलायन्स समुह गट विमा योजनेच्या प्रकरणाच्या चौकशी बाबतचा अहवाल.

### १. महानगरपालिका कर्मचाऱ्यांकरीता गट विमा योजना :

औरंगाबाद महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांकरीता गट विमा योजना असावी अशी संकल्पना पुढे आली. त्यानुषंगाने सर्वप्रथम कामगार अधिकारी यांनी रिलायन्स जनरल इन्शुरन्स योजने अंतर्गत प्रत्येक कर्मचाऱ्यास रू.५४.९० मासिक कपात करण्याबाबत (प्रथम टप्प्यात फ़क्त शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबत) प्रस्तावित करण्यात आले.

तद्नुसार १ मे २००७ पासून पहिला हप्ता शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांच्या पगारातून कपात करण्यासाठी परिपत्रक काढण्याबाबत कामगार विभागाने प्रस्तावित केले. त्यामध्ये रिलायन्स जनरल इन्शुरन्स या कंपनीचे रिलायन्स समुह गट विमा योजनेचा दर सर्वात कमी (म्हणजेच रू.५४.९० पैसे ) असल्यामुळे सदरील प्रस्ताव मंजूरीसाठी सादर केला . मात्र प्रशासनाने शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांबरोबरच महानगरपालिकेतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनाही सदर योजना लागू करण्याबाबतचा निर्णय घेतला. वरील मंजूरीच्या अनुषंगाने प्रशासनाने जा.क्र.मनपा/कावि/४५/२००७, दिनांक ३०.४.२००७ नुसार परिपत्रक निर्गमित केले.

परिपत्रकामध्ये परि.-२ मध्ये दर महा ५१२ मासिक कपात केल्यास ३० वर्षाच्या सेवेनंतर कर्मचाऱ्यांची जमा होणारी रक्कम १.८० होते. ती रक्कम बोनससह रू.५८४०००/- होईल असे म्हटले आहे. परंतु याचा उल्लेख रिलायन्सच्या पत्रात आढळून येत नाही. तसेच टिपणीमध्ये हि बाब नमूद केलेली दिसत नाही. त्यामुळे ही योजना राबविण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता करून घेतली नाही. तसेच कर्मचाऱ्यांना परिपत्रक काढून आयुक्तांची मान्यता नसलेल्या बाबींचा समावेश परिपत्रकामध्ये करण्यात आला आहे. तसेच परिपत्रकामध्ये दैनिक वेतनावरील व ठराविक वेतनावरील कर्मचाऱ्यांना ही योजना लागू राहील असे म्हटले आहे. याबाबत योग्य ती कार्यप्रणाली विशद करण्यात आलेली नाही.

त्यामुळे या योजनेचा मासिक हप्ता दैनिक /ठराविक वेतनावरील कर्मचाऱ्यांच्या कोणत्या शिर्षकाखाली केला जाईल हे कळत नाही. तथापि मा.आयुक्तांनी मंजूर केलेल्या प्रस्तावा व्यतिरिक्त बाबी परिपत्रकात आढळतात व त्यात विसंगती आढळून येते.

याच परिपत्रकानुसार संबंधित कर्मचाऱ्यांनी ३१ मे २००७ पर्यंत या योजनेची लेखी संमती व कंपनीचा अर्ज भरून न दिल्यास या योजनेत सहभागी करून घेता येणार नाही असे म्हटले आहे. संचिकेची तपासणी केली असता एकाही कर्मचाऱ्यांनी अशा प्रकारची लेखी संमती आणि रिलायन्स कंपनीचा अर्ज भरून दिलेला संचिकेत आढळत नाही. याउलट कामगार अधिकारी यांनी त्वरीत नविन प्रस्ताव सादर केला की, मनपातील ३४९० कर्मचारी व शिक्षण विभागातील ६१७ कर्मचारी असे एकूण ४१०७ कर्मचाऱ्यांचा मासिक हप्ता रू.२२५८८५/- एवढा प्रथम हप्ता कामगार कल्याण निधीमधून अदा करून नंतर कर्मचाऱ्यांचा हप्ता कामगार कल्याण निधीमध्ये वळती

करण्यात येईल तथापि यास मा.आयुक्तांची मंजूरी घेतली याबाबत असे निदर्शनास येते की, कामगार कल्याण निधी हा वेगळा फ़ंड असून कोणताही निर्णय घेतांना समितीची बैठक घेवून निर्णय घेतल्यानंतरच अंमलबजावणी करता येते. परंतु सदरच्या प्रकरणात कामगार कल्याण समितीची बैठक न घेता रू.२२५८८५/- एवढा खर्च करण्याचा /धनादेश देण्याचा निर्णय घेण्यात आला.

मयतांच्या वारसांना विमा रक्कम अदा करण्यासाठी दिड लाख रूपये ३ वर्षासाठी मुदत ठेव ठेवण्याबाबत तसेच एक लाख रूपये ११ महिन्यासाठी मुदत ठेवीने ठेवण्याबाबत आणि रक्कम रू.५०,०००/- नगदी स्वरूपात देण्याबाबत चर्चा झाली असल्याचे संचिकेवरून दिसते. परंतु सदर रक्कम कोणत्या योजनेमध्ये ठेवण्यात येणार आहे त्यासाठी लागणारे आवश्यक ती कागदपत्रे संबंधित कर्मचाऱ्यांच्या वारसाकडून संमतीद्वारे करून घेतलेले नाही. तसेच कंपनीशी अशा प्रकारचा करारनामा किंवा कार्यादेश /करारनामा आढळून येत नाही. त्यामुळे सदर निर्णय हे परस्पर घेण्यात आल्याचे निदर्शनास येते.

## २. चौकशीचे आदेश व चौकशी :

दिनांक २६.२.२००९ च्या मा.स्थायी समिती बैठकीत कामगार गट विमा योजनेतील गैरव्यवहार व अनियमिततेबाबत सन्माननीय सदस्यांनी चर्चा करून या संदर्भात चौकशी करण्याची मागणी केली. त्यानुषंगाने मा.सभापती, स्थायी समिती यांनी या प्रकरणी मुख्य लेखा परीक्षकांना चौकशी करण्याचे आदेशित केले.

सदरील प्रकरणी प्राथमिक चौकशी केली असता खालील बाबी आढळून आल्या त्याचा मुद्येनिहाय अहवाल पुढील प्रमाणे -

**<u>मुद्या क्र.१ :</u>** महानगरपालिका औरंगाबाद अंतर्गत रिलायन्स लाईफ़ इन्शुरन्स कंपनी यांनी पत्र देवून कळविले होते की, महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना जिवन विमा लागू केल्यास प्रत्येक कर्मचाऱ्याचा या योजनेत मासिक हप्ता रू.५४.९० राहील व त्यामध्ये नैसर्गिक मृत्यु झाल्यास रू.२.०० लाख रूपये विम्याची रक्कम मिळेल, अपघाती मृत्यु झाल्यास ३ लाख रूपये मिळतील. तथापि रू.५०,०००/- नगदी धनादेशाद्वारे संबंधित मयतांच्या वारसदारास देण्यात येईल असे ठरल्यानंतर दिनांक २.११.२००७ नुसार धनादेश क्र.३३६९४६ दिनांक १३.११.२००७ रोजी मयतांचे वारसदार १) श्रीमती पार्वतीबाई मुलचंद राठोड, २) शेवंताबाई बाबुराव वाघमारे यांना प्रत्येकी दिड लाख प्रमाणे धनादेश देण्यात आला व तो धनादेश रद्द करून विजया बँकेला प्रत्येकी दीड लाख प्रमाणे दोन मयत कर्मचाऱ्यांच्या वारसाच्या नावे तीन लाख रूपयाचा डी.डी.देण्यात आल्याचे दिसते. त्यासाठी मा.आयुक्त यांची दिनांक १७.११.२००७ रोजी मंजूरी घेण्यात आलेली आहे. तथापि उक्त दोन कर्मचाऱ्यांच्या डी.डी.साठी रू.६८०/- कमिशन देण्यात आल्याचे दिसते.

**चौकशीचा अभिप्राय.**

रिलायन्स लाईफ़ इन्शुरन्स कपंनी मार्फ़त मनपाने सदर योजना स्विकारतांना त्यामध्ये अटी व शर्ती तयार करण्यात आलेल्या संचिकेत दिसत नाही. त्यामुळे दिलेला धनादेश रद्द करून डी.डी. द्यावा लागला तसेच त्याचा खर्च रक्कम रू.६८०/- मनपाच्या फ़ंडातून करण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी असे दिसते की, प्रशासनाने पुरेशी काळजी घेतलेली नाही.

**मुद्या क्र.२** : आय.सी.आय.सी.आय, लाईफ़ इन्शुरन्स कंपनी तसेच रिलायन्स लाईफ़ इन्शुरन्स कंपनी यांचा विचार करता हप्त्याचा सर्वात कमी दर दर्शविलेली म्हणजेच रू.५४.९० रिलायन्स लाईफ़ इन्शुरन्स यांनी विमा काढण्यासाठी शिक्षकांची संख्या ५०२, वर्ग -४ चे ११५ व मुख्य कार्यालयातील ३४९० असे एकूण ४१०७ कर्मचाऱ्यांचा विमा काढण्यात आला व मासिक हप्त्याविषयी तसेच सहामाही हप्त्याविषयी मा.आयुक्त यांच्याशी रिलायन्स कंपनीचे व्यवस्थापक व त्यांचे अधिकारी यांची चर्चा झाली आहे असे संचिकेच्या तपासणीअंती दिसते.

**चौकशीचा अभिप्राय**

सदर योजने अंतर्गत शिक्षक वर्ग, वर्ग-४ चे कर्मचारी व मुख्य कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांचा विमा काढण्यात आलेला असून त्या कर्मचाऱ्यांची नावाची यादी संचिकेत आढळून आलेली नाही. तसेच त्याचे भरलेले फ़ॉर्म व त्यांचा किती हप्ता रिलायन्स कंपनीला पाठविला हातो याचे अभिलेखे दिसून आलेले नाहीत.

मा.आयुक्त, यांच्याशी नेमकी चर्चा काय झाली व त्यांनी कोणत्या सूचना दिल्या याबाबतीत कोणतीही माहिती संचिकेत नाही. तथापि शिक्षकांचा ,वर्ग-४ कर्मचाऱ्यांचा , तसेच अधिकारी व कर्मचारी यांचा हप्ता कपात करून कामगार कल्याण निधीमध्ये जमा केल्यानंतर रिलायन्स कंपनीला पाठविला किंवा कसे याबाबत खात्री करण्यासाठी अभिलेखे किंवा नोंदवही कामगार विभागाने ठेवलेले नाही.

**मुद्या क्र.३ :** दिनांक १ मे २००७ पासून एक वर्षासाठी रिलायन्स लाईफ़ इन्शुरन्स कंपनीला समुह गट विमा योजना लागू करण्याबाबत मान्यता आहे. १ मे २००७ पासून आतापर्यंत तीन कर्मचाऱ्यांचा सेवेत असतांना मृत्यु झाला आहे. तिन्हीही कर्मचाऱ्यांच्या विम्याचे पैसे मिळणे बाबत कळविण्यात आलेले असून ते खालील प्रमाणे -

१) श्री.बाबुराव हिराजी वाघमारे, मृत्यु दिनांक १२.५.२००७.

२) श्री.रतन लोखंडे, मृत्यु दिनांक ३.५.२००७.

दोन कर्मचाऱ्यांचे वारसाचे कागदपत्र प्राप्त झाले असून श्री.राठोड यांचे वारसाचे कागदपत्र अद्याप मिळालेले नाही. रिलायन्स लाईफ़ इन्शुरन्स कंपनीचे पुणे येथील

संचालक श्री.सिंग साहेबयांच्या बरोबर सवितस्तर चर्चा करण्यात आली असून सर्व कागदपत्रांची पूर्तता करण्यात आलेली आहे. आस्थापना विभागातून उपलब्ध असेलेली सीडी तसेच शिक्षण विभागातील सर्व शिक्षकांची अद्ययावत माहिती देण्यात आलेली आहे. तसेच मासिक विम्याचा हप्ता थांबविण्यात आलेला असून तसे लेखा विभाग, शिक्षण विभाग यांना कळविण्यात आलेले आहे. पुढील सूचना मिळेपर्यंत रिलायन्स इन्शुरन्स कंपनीला मासिक विम्याचे पैसे देण्यात येवू नये असे कळविण्यात आलेले आहे.

दिनांक १९.९.२००७ रोजी श्री.सिंग साहेब, संचालक रिलायन्स कंपनी मोबाईल नं.०९४२२०४३९९२ यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे. त्यांनी सांगितले की ४ ते ५ दिवसांत मास्टर पॉलिसी व मयतांचे धनादेश देण्याबाबत कळविले आहे. संबंधित कंपनीचे व्यवस्थापक व संचालक यांच्या संपर्कात असून नियमान्वये कार्यवाही करण्यात येत आहे असे नमूद आहे.

**<u>चौकशीचा अभिप्राय .</u>**

तपासणीअंती असे निदर्शनास येते की, तीन कर्मचाऱ्यांच्या मृत्यु झालेला आहे. सर्व कागदपत्रांची पूर्तता झालेली आहे व दिनांक १९.९.२००७ रोजी श्री.सिंग संचालक याच्याशी चर्चा करण्यात आली व त्यांनी सांगितले की ४ ते ५ दिवसांत मास्टर पॉलिसी मयतांचे धनादेश देण्याबाबत कळविले आहे. तसेच नियमान्व्ये कार्यवाही होत आहे. तथापि सदर सादरीकरणावर मा.उपआयुक्त व मा.आयुक्त यांच्या स्वाक्षरी नाहीत व याबाबत वरिष्ठांना याबाबत माहिती देण्यात आली नसून आपल्याच स्तरावर निर्णय घेण्यात आलेला आहे ही बाब संशयास्पद दिसून येते.

**<u>मुद्या क्र.४ :</u>** सदरील योजने अंतर्गत दिनांक ३०.९.२००७ रोजी मा.आयुक्त साहेब यांच्या सोबत चर्चा करण्यात आली असून मयतांच्या वारसदारास त्यांच्या वारसांची कागदपत्रे तपासून दोन लाख रूपये अदा करणे आहे. दोन लाख पैकी दीड लाख रूपये फ़िक्स डिपॉझिट मध्ये १ वर्षासाठी ठेवण्याबाबत व रूपये पन्नास हजाराचा धनादेश देण्याबाबत आदेशित केले आहे.

तरी दीड लाख रूपये फ़िक्स करणे व रू.पन्नास हजाराचा धनादेश देणे बाबत असे नमूद करण्यात आले आहे.

**<u>चौकशीचा अभिप्राय .</u>**

रिलायन्स लाईफ़ इन्शुरन्स समुह गट विमा योजने अंतर्गत चर्चेनुसार मयताच्या वारसास दिड लाख फ़िक्स करणे बाबत तसेच पन्नास हजारांचा धनादेश देण्याचे ठरले परंतु त्याला मा.आयुक्त यांची मंजूरी नसून स्वाक्षरीही नाही. तसेच संचिकेतील (एन-१३ मधील) परि.क्र.३९ उपआयुक्त या शब्दाला  खाडाखोड करण्यात आलेली दिसते. यावरूनसंशय निर्माण होतो ही बाब अतिशय गंभीर स्वरूपाची आहे.

**<u>मुद्या क्र.५ :</u>** रिलायन्स लाईफ़ इन्शुरन्स योजने अंतर्गत एन-१५ वरील मा.आयुक्त यांच्या बरोबर चर्चा करून खालील प्रमाणे ठरले.

1) दीड लाख रूपये तीन वर्षासाठी मुदत ठेवीने ठेवण्यात आले.यामध्ये रकमेत वाढ होणार असून पुन्हा जिवन विम्याची सुरक्षा त्यामध्ये आहे. मुदत ठेवीमध्ये लाखाच्या asset मध्ये व्याजासह मिळणार आहे + जिवन सुरक्षा Automatic Investment + Plant Reliance Life Insurance com.Ltd.

२) १ लाख रूपये बँकेमध्ये ११ महिन्यासाठी मुदत ठेवीने ठेवण्याबाबत धोरण निश्चित झालेले असून ११ महिन्यानंतर ती रक्कम व्याजासह मयताच्या वारसदारास मिळेल.

३) रू.५०,०००/- नगदी धनादेशाद्वारे संबंधित मयताच्या वारसदारास तात्काळ देण्याबाबत आदेशित केलेले आहे.

## <u>चौकशीचा अभिप्राय</u>

रिलायन्स लाईफ़ इन्शुरन्स योजने अंतर्गत दिड लाख ३ वर्षासाठी मुदत ठेव तसेच व्याजासह मिळणार आहे असे सांगण्यात आले तसेच त्यामध्ये जिवन सुरक्षा + Automatic Investment Plant १ लाख रूपये ११ महिन्यासाठी व पन्नास हजार रू.नगदी असे मा.आयुक्त यांचे निर्देश नुसार तीन वर्षासाठीच गुंतवणूक करण्याऐवजी ६ किंवा १० वर्षाचा कालावधी वाढविण्यात आला. ही बाब आक्षेपार्ह व गंभीर आहे. मयतांचे वारस यांच्या काढलेल्या पॉलिसीची कागदपत्रे सादर केलेली आहेत. त्यानुसार पाहणी केली असता रक्कम रू.१,५०,०००/- इतक्या रकमेची आजच्या स्थितीत मुल्य फ़क्त रू. ६५,०००/-ते रू.५५,०००/- पर्यंत मुल्य झाल्याचे दिसून येते. म्हणजेच कामगारांना रू.८५,०००/- ते रू.९५,०००/- इतके आर्थिक नुकसान झालेले आहे. त्यामुळे कामगारांचे कल्याण ऐवजी आर्थिक नुकसानच केल्याचे स्पष्ट होते. ही बाब अतिशय गंभीर आहे. मयतांच्या वारसांना या योजनेबाबत कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही व या योजनेबाबत संपूर्ण सत्यता लपविण्यात आली. तथापि हेतूपुरस्पर कर्मचाऱ्यांची फ़सवणूक करण्यात आलेली आहे हे स्पष्ट होते. यात कामगार अधिकारी यांची भूमिका सचोटी, निष्ठा तसेच कर्तव्यपरायणता या दृष्टीने संशयास्पद दिसून येते व कामगार अधिकारी यांनी आपल्या स्तरावर सर्व निर्णय घेतल्याचे दिसते व प्रशासनाची दिशाभूल केल्याचे दिसते. ही बाब अतिशय गंभीर आहे. (सोबत ६ व १० वर्षाबाबतचा तक्ता जोडण्यात येत आहे.)

**मुद्या क्र. ६ : रिलायन्स गट विमा योजना नोंदवही व बृहतपत्राबाबत :**

रिलायन्स गट विमा योजना प्रकरणाच्या चौकशी बाबतीत कामगार अधिकारी यांना अनेकवेळा लेखी व तोंडी कळवून वरील विषया संदर्भातील अभिलेखे व नोंदवह्या देण्याबाबत कळविले होते. या संदर्भात असे दिसून आले आहे की, गट विमा योजनेचे कोणतेही हिशोब किंवा लेखे मुळात कामगार विभागाने ठेवलेच नाही. त्यामुळे प्रत्येक कर्मचाऱ्यांचा विमा हप्ता वेळेवर दिला किंवा नाही याची खात्री किंवा पडताळणी करता येत

नाही. तसेच याबाबतच्या प्रकरणाच्या नोंदवही, बृहतपत्र (Broad Sheet) चौकशीस कामगार विभागाने ठेवलेल्या नाहीत.

## ३. मयत कामगारांच्या वारसांचे जवाब :

रिलायन्स समुह गट योजने अंतर्गत मयतांच्या वारसाचे नांव व वारसाने खालील प्रमाणे जबाब नोंदविले आहेत. सदरील जबाब मुख्य लेखा परीक्षकां समक्ष नोंदविलेले आहेत.

**१) श्रीमती गोदावरीबाई शिवाजी पवार –**

माझे पती शिवाजी पवार महानगरपालिकेत कार्यरत असतांना कामगार कल्याण निधी अंतर्गत रिलायन्स गट समुह विमा योजनेचे ते पॉलिसीधारक होते. त्यानुसार मी वारसदार असल्यामुळे मला सांगण्यात आल्यानुसार रू.१,५०,०००/- तीन वर्षासाठी मुदत ठेव एक लाख रूपये (११ महिन्यासाठी) तसेच ५०,०००/- मृत्युनंतर देण्यात येईल. परंतु रिलायन्स विमा योजनेविषयी आम्हाला कोणतीही माहिती देण्यात आली नाही व विमा योजनेच्या मिळणाऱ्या फ़ायद्याविषयी तसेच विमा योजनेच्या अटी/शर्ती दरवर्षी भरावा लागणारा हप्ता याविषयी सुध्दा कोणतीही माहिती देण्यात आली नाही. आम्ही कामगार अधिकारी यांच्याकडे गेलो असता त्यांनी आम्हाला सांगितले कागदपत्रे आणून रू.तीन लाख रूपये घेवून जा. माझे मेडीकल कामगार अधिकारी व अभिकर्ता यांनी करून घेतले व त्यानंतर महावीर गोठीचा माणूस घरी आला व रिलायन्स ऑफ़िसला जाऊन तुमची पॉलिसी दाखवा असे सांगितले त्यानंतर आम्ही रिलायन्स ऑफ़िसला गेलो व महावीर गोठींना भेटल्यानंतर त्यांनी आम्हाला सांगितले तीन वर्षानंतर तुम्हाला पॉलिसीचे पैसे मिळून जातील. उक्त प्रकरणानंतर एका वर्षानंतर मला फ़ोन आला की, रू.७५,०००/- भरा नसता तुमचे पैसे बुडतील असे कंपनी कर्मचाऱ्यांकडून सांगण्यात आले.

**२) श्रीमती पार्वतीबाई माणिक बोडखे –**

माझे पती माणिक बोडखे महानगरपालिकेत कार्यरत असतांना कामगार कल्याण निधी अंतर्गत रिलायन्स गट समुह योजनेचे ते पॉलिसीधारक होते. त्यानुसार मी वारसदार असल्यामुळे मला सांगण्यात आल्यानुसार रू.१,५०,०००/- तीन वर्षासाठी मुदत ठेव तसेच एक लाख रू.(११ महिन्यासाठी) ५०,०००/- मृत्युनंतर देण्यात येईल व रिलायन्स लाईफ़ इन्शुरन्स मध्ये रू.१,५०,०००/- तीन वर्षाकरीता ठेवावे लागेल असे सांगण्यात आले. रिलायन्स विमा योजनेचा फ़ायदा किती होईल वार्षिक हप्ता किती लागेल या विषयी माहिती देण्यात आलेली नाही. त्यानंतर कामगार अधिकारी मनपा यांच्याकडून दोन व्यक्ती माझ्या घरी आल्या व त्यांनी आम्हाला सांगितले की,घरातील लोकांचा अचानक मृत्यु झाल्यास दिड लाखाचे तीन लाख मिळतील असे सांगितले तसेच पॉलिसीची तपासणीअंती पॉलिसीचा कार्यकाळ ६ वर्षाचा दिसून आला. तसेच वार्षिक हप्ता ७५,०००/- राहील. पॉलिसी क्र. Contact No. ११६१९२०९ दिनांक २९.२.२००८ .

**३) श्रीमती अल्का आनंदसिंग राजपुत –**

माझे पती आनंदसिंग राजपुत महानगरपालिकेत कार्यरत असतांना कामगार कल्याण निधी अंतर्गत रिलायन्स गट समुह योजनेचे ते पॉलिसीधारक होते. त्यानुसार मी वारसदार असल्यामुळे मला सांगण्यात आल्यानुसार रू.१,५०,०००/- तीन वर्षाकरीता मुदत ठेव एक लाख रू.११ महिन्यासाठी मुदत ठेव व तसेच ५०,०००/- मृत्युनंतर देण्यात येईल. परंतु रिलायन्स विमा योजनेबाबत मला कोणतीही माहिती देण्यात आली नाही व फ़ायद्याविषयी तसेच विमा योजनेच्या अटी शर्ती काय आहेत किती हप्ता भरावा लागेल याविषयी मला कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. त्यानंतर कामगार अधिकारी यांनी मला दीड लाख रूपये घेवून जा असे सांगितले त्यानंतर अद्यापपर्यंत माझे मेडीकल करण्यात आलेले नाही. तीन वर्षात तुमचे पैसे डबल होतील असे मला सांगण्यात आले. तसेच मला पॉलिसी ६ वर्षाची देण्यात आली. (सोबत पॉलिसी क्र.१२०७२९९७ दिनांक १९.६.२००८.)

**४) श्रीमती राणीबाई सतपाल चंडालिया –**

माझे पती सतपाल चंडालिया महानगरपालिकेत कार्यरत असतांना कामगार कल्याण निधी अंतर्गत रिलायन्स गट समुह योजनेचे ते पॉलिसीधारक होते. त्यानुसार मी वारसदार असल्यामुळे मला सांगितल्याप्रमाणे रू.१,५०,०००/- तीन वर्षाकरीता मुदत ठेव एक लाख रूपये (११ महिन्यासाठी) मुदत ठेव व तसेच ५०,०००/- मृत्युनंतर देण्यात येईल. परंतु रिलायन्स विमा योजनेबाबत मला कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही व विमा योजनेच्या फ़ायद्याविषयी तसेच विमा योजनेच्या अटी/शर्ती काय आहे. दरवर्षी किती हप्ता भरावा लागणार याविषयी कोणतीही माहिती मला देण्यात आलेली नाही. त्यानंतर मा.आयुक्त यांच्या हस्ते मला चेक देण्यात आला होता. परंतु कामगार अधिकारी यांनी माझ्या हातातून तो चेक त्वरीत वापस घेतला व मला सांगितले की हा चेक मी जमा करीत आहे. याचे तुम्हाला साडेचार लाख रूपये मिळतील व तुमच्या मुलीचे लग्न धुमधडाक्यात होईल तसेच तुम्हाला विस हजार रूपये व्याज सुध्दा मिळेल असे मला कामगार अधिकारी यांनी सांगितले.

पॉलिसीचे सर्व कागदपत्रे पोस्टाने तुमच्या घरी येतील विमा प्रतिनिधीशी माझी कधीही विमा पॉलिसी संबंधात भेट झालेली नाही.

(माझा पॉलिसी क्र. ११२४२७३८ दिनांक १८.१२.२००७ कार्यकाळ ६ वर्षाचा)

**५) श्रीमती छगाबाई रतन लोखंडे –**

माझे पती रतन लोखंडे महानगरपालिकेत कार्यरत असतांना कामगार कल्याण निधी अंतर्गत रिलायन्स गट समुह योजनेचे ते पॉलिसीधारक होते. त्यानुसार मी वारसदार असल्यामुळे मला सांगितल्यानुसार रू.१,५०,०००/- तीन वर्षाकरीता मुदत ठेव एक लाख रूपये ११ महिन्यासाठी मुदत ठेव तसेच ५०,०००/- मृत्युनंतर देण्यात येईल.

रिलायन्स विमा योजनेबाबत मला कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही व विमा योजनेच्या फ़ायद्याविषयी विमा हप्ता (Premium या विषयी कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही.) पतीचा मृत्यु झाल्यानंतर मी कामगार अधिकारी यांच्याकडे गेले असता त्यांनी मला सांगितले तुम्हाला दीड लाखाचे तीन लाख रूपये मिळतील.

माझा विमा पॉलिसी क्र.११२४२३१७ दिनांक २६.१२.२००७ ६ वर्षाकरीता कागदपत्रे देण्यात आले.

**६) श्रीमती सावित्रीबाई लिंगू पवार –**

माझे पती लिंगू पवार महानगरपालिकेत कार्यरत असतांना कामगार कल्याण निधी अंतर्गत रिलायन्स गट समुह योजनेचे ते पॉलिसीधारक होते. त्यानुसार मी वारसदार असल्यामुळे मला सांगितल्यानुसार रू.१,५०,०००/- तीन वर्षाकरीता मुदत ठेव एक लाख रूपये ११ महिन्यासाठी मुदत ठेव ५०,०००/- मृत्युनंतर त्वरीत देण्यात येईल.

त्यानंतर कामगार अधिकारी माझ्या घरी आले व त्यांनी सांगितले की तीन लाख रूपयाचा धनादेश तुम्हाला मिळणार आहे. त्याकरीता तुम्ही मुख्य कार्यालयात या. मुख्य कार्यालयात येवून कामगार अधिकारी यांना भेटलो. त्यांनी मला रू.५०,०००+ १,००,०००/- असे एकूण १,५०,०००/- चे धनादेश दिले सदर धनादेश मी देना बँकेमध्ये माझ्या खात्यात जमा केले परंतु वरील दोन्हीही धनादेश तीन वेळेस बाउन्स झाले. याबाबत कामगार अधिकारी यांच्याकडे गेलो व यासंदर्भात विचारणा केली.त्यांनी सांगितले की आठ ते दहा दिवसाने बँकेत धनादेश टाकून पहा. रू.१,५०,०००/- इतक्या रकमेची रिलायन्स कंपनीची पॉलिसी काढावी लागेल ती तीन वर्षाची राहील त्यानंतर तुम्हाला डबल रक्कम मिळेल असे सांगितले.

तथापि रिलायन्स विमा योजनेबाबत व विमा योजनेच्या फ़ायद्याविषयी अटी /शर्ती विषयी माहिती देण्यात आलेली नाही व विमा योजनेत किती हप्ता येईल याबाबतीत सुध्दा माहिती देण्यात आलेली नाही.

**७) श्रीमती सुमन प्रकाश घुले –**

माझा मुलगा श्री.प्रकाश घुले महानगरपालिकेत कार्यरत असतांना कामगार कल्याण निधी अंतर्गत रिलायन्स गट समुह योजनेचे ते पॉलिसीधारक होते. त्यानुसार मी वारसदार असल्यामुळे मला सांगितल्यानुसार रू.१,५०,०००/- तीन वर्षाकरीता मुदत ठेव एक लाख रूपये ११ महिन्यासाठी मुदत ठेव तसेच ५०,०००/- मृत्युनंतर देण्यात येईल.

परंतु रिलायन्स विमा योजनेविषयी मला कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही व विमा योजनेच्या मिळणाऱ्या फ़ायद्याविषयी तसेच अटी/शर्ती बाबत व दरवर्षी भराव्या लागणाऱ्या हप्त्याबाबत कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही.

माझ्या मुलाचा मृत्यु झाल्यानंतर मी कामगार अधिकारी यांच्याकडे जवळजवळ १ वर्ष सारख्या फ़ेऱ्या मारल्या परंतु मला उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. काही काळानंतर पॉलिसीचे कागदपत्रे मिळाले व ते दाखवले असता कामगार अधिकारी यांनी सदर विमा

पॉलिसी ६ वर्षाकरीता आहे व त्या ७५,०००/- हजाराच्या दोन पॉलिसीज आहेत व प्रत्येक वर्षाकरीता तुम्हाला ७५,०००/- प्रमाणे दोन पॉलिसीचे रू.१,५०,०००/- एवढे भरावे लागेल असे सांगण्यात आले.

पॉलिसी क्र.१) ११५२६०७४ दिनांक २४.२.२००८ - ६ वर्षाकरीता

२) ११५२५६६५ दिनांक १७२.२००८ - ६ वर्षाकरीता

**८) श्रीमती बालिश धरमपाल डुलगच –**

माझे पती धरमपाल डुलगच महानगरपालिकेत कार्यरत असतांना कामगार कल्याण निधी अंतर्गत रिलायन्स गट समुह योजनेचे ते पॉलिसीधारक होते. त्यानुसार मी वारसदार असल्यामुळे मला सांगितल्यानुसार रू.१,५०,०००/- तीन वर्षाकरीता मुदत ठेव एक लाख रूपये ११ महिन्यासाठी मुदत ठेव तसेच ५०,०००/- मृत्युनंतर देण्यात येईल.

रिलायन्स विमा योजनेबाबत मला कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही व विमा योजनेच्या फ़ायद्याविषयी तसेच हप्त्याविषयी कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही.

मी कामगार अधिकारी यांच्याकडे गेले असता त्यांनी मला सांगितले की आपली हप्त्याची कपात झालेली नाही. त्यांची पगार स्लिप आणून द्यावी तरच आपले पैसे मिळतील असे मला सांगण्यात आले.

तथापि अद्यापपर्यंत मला पैसे मिळालेले नाही.

रिलायन्स समुह गट विमा योजनेबाबत कामगार विभागामार्फ़त सुरू करण्यात आलेली संचिका, संबंधिताने उपलब्ध करून दिलेली आहे. परंतु या संचिकेत मूळ योजनेचे कागदपत्र संबंधितांनी योजनेची माहिती करारनामा कार्यादेश नियम अटी, महानगरपालिकेची भूमिका कर्मचाऱ्यांच्या वारसाबाबत माहिती क्लेम मिळण्याबाबतच्या अटी व शर्ती पॉलिसीधारकांना विम्या संबंधीची माहिती विविध योजनेमध्ये बदल करण्याचे अधिकार यामध्ये सहभाग आहे किंवा नाही याबाबतची माहिती क्लेम कोणाच्या नावाने मंजूर करण्यात येईल याबाबतची माहिती या योजनेत कंपनीशी किंवा कर्मचाऱ्यांशी वाद निर्माण झाल्यास त्याची कार्यपध्दती या बाबीचा उल्लेख आढळून येत नाही.

त्यामुळे या योजनेचा मुख्य उद्येश काय आहे आणि कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे फ़ायदे काय आहे. त्यांना निर्माण होणाऱ्या अडचणी कशा पध्दतीने सोडविल्या जाणार आहे याचा उल्लेख नसल्यामुळे हा प्रस्ताव अपूर्ण वाटतो. या प्रकरणात संबंधिताने आपल्या अधिकारात योजनेतील प्लान वारंवार बदललेला आहे. यामध्ये कर्मचाऱ्यांची कर्मचाऱ्यांच्या वारसाची संमती घेतली नाही व त्यांना विश्वासात घेतलेले नाही. त्यामुळे त्यांच्या पैशाचा दूरउपयोग केलेला दिसतो. कामगार अधिकारी यांनी अद्यापही खालील अभिलेखे उपलब्ध करून दिलेली नाहीत.

१) कामगार विभागाने उपरोक्त निधीमधून काही साहित्य खरेदी केलेले असल्यास त्यांच्या नोंदवह्या इत्यादी.
२) विभागाअंतर्गत २००५-२००६ पासून अर्थसंकल्पिय तरतूदीनुसार करण्यात आलेल्या खर्चाच्या संचिका.

## ४. रिलायन्स गट विमा योजने अंतर्गत केलेल्या दोषारोपाबाबत :

उक्त बाबतीत कामगार कल्याण निधी अंतर्गत रिलायन्स गट समुह विमा योजने अंतर्गत कामगार अधिकारी यांचेवर खालील प्रमाणे दोषारोप आहेत.

१. रिलायन्स गट समुह विमा योजनेचे अंतर्गत कामगारांचे मृत्यु नंतर त्यांच्या वारसदारांना विम्याची रक्कम तीन ते चार महिने झाल्यानंतरही मिळाली नाही.

२. समुह गट विमा योजने अंतर्गत मुदत ठेव रक्कम रू.१,५०,०००/- असून तीन वर्षासाठी एक रकमी मुदत ठेवीसाठी असतांना ती रक्कम ६ ते १० वर्षासाठी प्रती वर्ष रू.१.५०,०००/- ठेवण्यात आलेली आहे. या बाबीसाठी मा.आयुक्त यांची मान्यता नाही.

३. कामगार कल्याण निधी अंतर्गत रिलायन्स गट समुह योजनेमध्ये वारसाच्या नावाने रक्कम रू.१,५०,०००/- ठेवीची रक्कम असून त्या रकमेचे आजचे मुल्य फ़क्त रू.६५००० ते ५५०००/- असे झालेले असून यामुळे कामगारांच्या वारसांना रक्कम रू.८५०००/- ते ९५०००/- आर्थिक नुकसान झालेले आहे.

## ५. कामगार अधिकारी श्री.डी.बी.लोखंडे यांचा खुलासा.

कामगार अधिकारी, महानगरपालिका,औरंगाबाद यांना रिलायन्स गट विमा योजने अंतर्गत सुरू असलेल्या चौकशी मधील आरोप पत्रानुसार लेखी खुलासा मागविण्यात आला. त्यांनी दिनांक ३०.४.२००९ रोजी खुलासा सादर केला आहे. तो पुढील प्रमाणे आहे.

**मुद्या क्र.१ च्या** उत्तरी संबंधिताचे असे म्हणणे आहे की, सदर योजना माझ्याकडून काढून श्रीमती जयश्री कुलकर्णी, वैद्यकीय अधिकारी यांचेकडे संचिका देण्यात आली. त्यांनी रिलायन्स कंपनी बरोबर बैठका घेवून या वर्षाचा निर्णय घेतला. दोन महिने संचिका त्यांचेकडे होती. सहा महिन्यानंतर कोणतेही क्लेम न पाठविता माझ्याकडे संचिका ६ महिन्यानंतर वर्ग केली. त्यानंतर मी सर्व क्लेम कंपनीकडे पाठविले. पुढे त्यांनी कर्मचारी सेवेत असतांना मृत्यु झाले असता मा.न्यायालयातून वारसाचे प्रमाणपत्र काढण्यासाठी सहा महिने लागतात. कधी कधी एक वर्ष लागते, विनावारस प्रमाणपत्राशिवाय आपण क्लम पाठवायचे का ? अशी विचारणा केली आहे.

**मुद्या क्र.२** च्या खुलाशामध्ये कामगार अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, तीन वर्षासाठी मुदत ठेवीने रक्कम ठेवण्याबाबत संचिकेमध्ये मा.आयुक्तांची मान्यता घेण्यात आली आहे. फ़क्त तीन वर्षाच्या ठेवी बाबतच मला माहिती आहे. सदरील गुंतवणूक करत असतांना रिलायन्सचे कर्मचारी मयत वारसदाराच्या घरी जावून विम्याचे कागदपत्र पूर्ण केलेले आहे व त्यावर त्यांची स्वाक्षरी व संमती आहे. या विभागाशी त्यांचा काही संबंध नाही. तसेच हे पैसे गुंतविण्याबाबत माझा निर्णय नाही. यास माझा विरोध होता मी फ़क्त टिपणी सादर केलेली आहे. मी बैठकीमध्ये नव्हतो. तत्कालीन आयुक्त व रिलायन्सचे श्री.महाविर गोठी यांच्यामध्येच चर्चा होवून निर्णय घेण्यात आले.

**मुद्या क्र.३** च्या खुलाशा मध्ये कामगार अधिकारी श्री.लोखंडे यांचे असे म्हणणे आहे की, विम्याची संकल्पना व हेतू सूचना व आदेश तत्कालीन मा.आयुक्त श्री.गुप्ता साहेब यांचे आहेत या

विम्यामध्ये रक्कम गुंतविण्यामागे माझे मत / संती कधीच नव्हती यापूर्वी १ वर्षे भारतीय जीवन विम्याचीच कार्यवाही केलेली आहे. त्याचे अवलोकन व्हावे.

तसेच सदरील विम्याची मुदत तीन वर्षाची आहे. तीन वर्षानंतर रकमेच्या मुल्याबाबत विचार करणे गरजेचे आहे. तीन वर्षाची मुदत संपलेली नाही. मध्येच हा प्रश्न विचारून मुल्य लक्षात घेणे योग्य नाही. तीन वर्षानंतर जर मुल्य कमी झाले तरच आर्थिक नुकसान झाले असे समजले जाईल. जर तीन वर्षानंतर त्याचे मुल्य वाढवून जास्त रक्कम व्याजासह मिळाल्यानंतर हा प्रश्न येणार नाही.

हा सर्व निर्णय मा.तत्कालीन आयुक्त, श्री.गुप्ता साहेब व श्री.महाविर गोठी,सल्लागार रिलायन्स कंपनी यांचा आहे. याबाबत त्यांचे मार्गदर्शन घ्यावे ही विम्याची रक्कम गुंतविण्यामागे त्यांची कल्पना व हेतू काय होता. मी फ़क्त आदेशाचे पालन केलेले आहे. प्रेशराईज टॅक्टीज व शासकीय बळाचा वापर करून माझ्याकडून काम करून घेतलेले आहे असे अनेक प्रश्न आहे त्याचा उल्लेख या ठिकाणी करत नाही.

या प्रकरणात डॉ.कुलकर्णी व रिलायन्सचे अधिकारी व मा.गुप्ता साहेब यांच्या संयुक्त बैठका घेवून हे निर्णय घेतलेले आहे. मी दरवाज्याबाहेर बैठकाच्या बाहेर उभा होतो. मला बैठकांमध्ये बसण्याची परवानगी नव्हती. त्यामुळे माझ्याकडून अनियमिततेबाबत व दोषारोपाबाबत विचारणा होते. वारंवार आपणास लक्षात आणून सुध्दा माझ्या विरूध्द कार्यवाही केल्या जात आहे. माझ्याकडून फ़क्त माहिती घेत आहे असा शब्द प्रयोग करून पत्रामधील भाषा फ़क्त श्री.लोखंडे यांनाच वापरायची आहे. बाकीचे निर्णय घेणारे निर्दोष व सदोष आहेत कारण ते स्वर्ण आहेत म्हणून.

## ६. श्री.लोखंडे यांच्या खुलाशावर चौकशी समितीचा अभिप्राय.

**मुद्या क्र. १ मधील** खुलाश्यामध्ये संबंधिताने सहा महिन्यापर्यंत संचिका आरोग्य विभागाकडे असल्याचे म्हटले आहे. परंतु संचिकेची पाहणी केली असता सदर संचिका दिनांक २२.५.२००८ पासून २१.७.२००८ पर्यंतच आरोग्य विभागाकडे होती. त्यानंतर सदर संचिका कामगार अधिकारी यांचेकडे वर्ग करण्यात आली. त्यामुळे हा खुलासा चूकीचा आहे. याबाबत कामगार अधिकारी कुठलाही पुरावा, जा.क्र. किंवा अंतर्गत केलेला पत्रव्यवहाराबाबत संदर्भ खुलाश्यात सादर केलेला नाही.

**मुद्या क्र.२ मधील** कामगार अधिकारी यांचा खुलासा समाधानकारक नाही. कामगार अधिकारी यांनी पैसे गुंतवणूक करण्याबाबत त्यांचा निर्णय नाही यास त्यांचा विरोध होता याबाबत कुठलाही पुरावा खुलाशा सोबत सादर केलेला नाही. या योजनेच्या अटी, शर्ती नियम, कार्यपध्दती क्लेम दाखल करण्यासाठी विहित कालावधी ,त्याला आवश्यक असणारे कादगपत्रे, कंपनीचे या योजनेचा सहभाग काय आहे ? याबाबत एक जबाबदार अधिकारी म्हणून प्रस्ताव सादर करणे व पत्र व्यवहार करणे अपेक्षित होते. फ़क्त वरिष्ठांनी सर्व मंजूरी दिली आहे मला या बाबत काही माहिती नाही असे म्हणणे बेजबाबदारपणाचे ठरते . गुंतवणूक करण्यासाठी फ़क्त तीन वर्षाची मा.आयुक्तांनी मंजूरी असतांना कामगार अधिकारी यांनी सहा ते दहा वर्षापर्यंत परस्पर कोणचीही कार्यालयीन मंजूरी न घेता गुंतवणूक केली असून यामुळे कर्मचाऱ्यांच्या वारसदाराचे आर्थिक नुकसान होत आहे

**मुद्या क्र. ३ मधील** खुलाशामध्ये कामगार अधिकारी श्री.डी.बी.लोखंडे यांनी कुठलेही लेखी पुरावे पत्रव्यवहार, टिप्पणी सादर केलेल्या नाही. तसेच १,५०,०००/- ठेवीची रक्कम परस्पर प्रशासकीय मंजूरी न घेता आपल्या स्तरावर सहा ते दहा वर्षासाठी गुंतवणूक केली या गुंतवणूकीसाठी संबंधित कंपनीकडून करारनामा मा.आयुक्तांच्या मंजूरीने केलेला नाही. त्यामुळे या रकमेचे मुल्य रू.६५,०००/- ते ५५,०००/- असे झाले व पर्यायाने कामगाराच्या वारसांना रू.८५,०००/- ते रू.९५,०००/- आर्थिक नुकसान झाले. त्यामुळे कामगार अधिकारी या योजनेचे व्यवस्थित अभ्यास न करता मोघम स्वरूपाचा प्रस्ताव प्रशासनासमोर ठेवून वरिष्ठांची दिशाभूल केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते . त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या वारसांचे आर्थिक नुकसान झाले असल्याचे निदर्शनास येते. तसेच चौकशीत किंवा कोणत्याही कामात सवर्ण किंवा असवर्ण असा भेदाभेद करता येत नाही. यातून श्री.लोखंडे यांचा चौकशीवर दबाव आणण्याचा प्रयत्न दिसून येतो.

एकूणच संबंधिताचा खुलासा मुद्येसुद नाही तसेच समाधानकारकही नाही.

## ७. चौकशी समितीचे निष्कर्ष व शिफ़ारशी :

१. सदरील प्रकरणाच्या प्राथमिक चौकशीत मयत कर्मचाऱ्यांच्या विमा रकमेच्या पुनर्गुंतवणूकीमध्ये वारसदारांचे प्रचंड आर्थिक नुकसान झालेले दिसून आले. पुनर्गुंतवणूकीचा कालावधी वाढविणे आणि अव्यवहार्य असे वार्षिक हप्त्याच्या प्रकरणी कामगार अधिकारी यांची भूमिका संशयास्पद दिसून येते. त्यामुळे या प्रकरणी कामगार अधिकारी यांचेवर योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करून त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येते.

२. कामगार गट विमा योजनेचे लेखे व नोंदवह्या एकत्रितरित्या व अद्ययावत करणे अत्यंत आवश्यक आहे. जेणेकरून एकाच वेळी विमायोजनेचे चित्र त्वरीत तपासून खात्री करता येईल. प्रशासनाने या संदर्भात तातडीने अभिलेख्यांआधारे गट विमा योजना एकत्रित नोंदवही (Broad Sheet) तयार करण्याची व्यवस्था करावी.

३. मयत कर्मचाऱ्यांच्या वारसदाराच्या विमा रकमेच्या पुनर्गंतवणूकीमध्ये झालेल्या नुकसानीस रिलायन्स कंपनीही प्राथमिक दृष्ट्या जबाबदार दिसते. कारण सदरील विमा योजनेची संपूर्ण माहिती विमा धारकांना मिळणे हा त्यांचा हक्क आहे. परंतु असे झालेले दिसून येत नाही. तरी या प्रकरणी विधी विभागाच्या सल्ल्याने संबंधितांविरूध्द कायदेशिर कार्यवाही करण्यात यावी.

# काटकसरीच्या उपाय योजना

१. **महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या (कार्यालयीन वापरासाठी) चारचाकी वाहनाबाबत :**

औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत सर्व विभागप्रमुख, काही वर्ग-२ व वर्ग-३ संवर्गातील अधिकारी /कर्मचारी यांना प्रशासनामार्फ़त कार्यालयीन कामकाजासाठी चार चाकी वाहन (कार व जीप इ.) देण्यात आले आहे. सन २००७-०८ या आर्थिक वर्षात डिझेल व पेट्रोल खरेदीसाठी रू.१.९३ कोटी इतका खर्च झाल्याचे प्राप्त माहितीआधारे नमूद करण्यात येते.

वास्तविकत: विभागप्रमुख, वॉर्ड अधिकारी आणि अत्यावश्यक सेवेतील अधिकाऱ्यांनाच प्रशासनामार्फ़त चारचाकी वाहन कार्यालयीन वापरासाठी देणे अभिप्रेत आहे. मात्र अत्यावश्यक सेवे व्यतिरिक्त असणारे काही शाखा प्रमुख, उपअभियंता व अन्य कर्मचाऱ्यांना चारचाकी वाहन देण्यात आले आहे. परिणामी महापालिकेचा अनावश्यक होत आहे.

सबब, प्रस्तावित करण्यात येते की, विभागप्रमुख, व अत्यावश्यक सेवेतील अधिकाऱ्यां व्यतिरिक्त ज्या अधिकारी / कर्मचारी यांना चारचाकी वाहन देण्यात आले आहे. त्यांचेकडून असे वाहन तात्काळ काढून घ्यावे, जेणेकरून अनावश्यक खर्चास आळा बसेल, चारचाकी वाहनाऐवजी अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांना नियमानुसार अनुज्ञेय वाहनभत्ता मंजूर करण्यात यावा.

२. **दूरध्वनी व मोबाईल फ़ोन्स यावरील खर्चाबाबत :**

सन २००६-०७ या वर्षात महानगरपालिके अंतर्गत दूरध्वनी कक्ष विभागप्रमुख व वर्ग-१ मधील अधिकाऱ्यांच्या निवासस्थानी व कार्यालयात असलेल्या स्वतंत्र दूरध्वनी यावरील खर्च हा रू.३२.६७ लक्ष इतका असून सन २००७-०८ मधील हा खर्च रू.३४.०६ लक्ष इतका असल्याचे दिसून आले आहे. दूरध्वनी व मोबाईल देयके याबाबत अधिक माहिती घेतली असता असे निदर्शनास आले आहे की, महानगरपालिकेअंतर्गत कार्यरत दुय्यम आवेक्षक, कनिष्ठ अभियंता ,शाखा अभियंता ,उपअभियंता, कार्यालय अधिक्षक आणि सर्व विभाग प्रमुख व शाखाप्रमु यांना महापालिका प्रशासनाने सिम कार्ड सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तसेच प्रतिमाह पदनिहाय आर्थिक मर्यादा (उदा.७५०/- रू.५०० इ.) मंजूर केली आहे. या व्यतिरिक्त काही वर्ग-४ संवर्गातील कर्मचाऱ्यांनाही सिमकार्ड सुविधा आर्थिक मर्यादेसह देऊ केली आहे. याशिवाय बहुतांश सर्वच विभागप्रमुखांकडे (निवासस्थानी व कार्यालयात) स्वतंत्र दूरध्वनी (Landline Phone ) देण्यात आला आहे, अथवा विभागप्रमुखांच्या वापरातील दूरध्वनीचे देयके (Landline Phone Bills ) महापालिका अदा करते. सदरची बाब ही अत्यंत आक्षेपार्ह असून ती अनियमित स्वरूपाची आहे.

वरील बाब विचारात घेता असे प्रस्तावित करण्यात येते की, फ़क्त विभागप्रमुख यांना व अत्यावश्यक सेवेतील अधिकाऱ्यांना सिमकार्ड सुविधा असणे संयुक्तिक आहे. त्यामुळे विभागप्रमुखां व्यतिरिक्त सर्व अधिकारी / कर्मचारी यांना देण्यात आलेली सिमकार्ड आर्थिक मर्यादा सुविधा रद्द करावी. तसेच विभाग प्रमुख व अन्य अधिकारी यांच्या निवासस्थानी असलेल्या दूरध्वनीची (Landline Phone ) देयके अदा करणे तात्काळ थांबवावीत. जेणेकरून फ़ार मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या खर्चात काटकसर करणे शक्य होईल परिणामी महापालिकेचे आर्थिक हित जोपासले जाईल.

३. **खाजगी तत्वावर कचरा उचलणे व साफ़सफ़ाई खर्च :**

औरंगाबाद महानगरपालिकेद्वारा महानगरपालिका हद्दीतील काही कचरा उचलणे व साफ़सफ़ाई करण्यासाठी खाजगी तत्वावर काम करून घेण्यात येते. सन २००६-०७ या आर्थिक वर्षात खाजगी तत्वावर साफ़सफ़ाई व कचरा उचलण्यासाठी रू.१.२३ कोटी इतका खर्च झाला आहे. तर सन २००७-०८ या आर्थिक वर्षात हाच खर्च रू.४.९१ कोटी इतका झाल्याचे प्राप्त माहितीवरून दिसून येते. म्हणजेच सन २००७-०८ या आर्थिक वर्षातील खर्च हा चौपट वाढला आहे. ही बाब समर्थनीय नसल्याने संबंधित विभागाने ती पडताळून पाहण्यांची व त्यात व्यवहार्य अशी काटकसर करणेची आवश्यकता आहे.

४. **जाहिराती व प्रसिध्दीवरील खर्च :**

महापालिकेमार्फ़त विविध विकास कामे करण्यासाठी संबंधित विभागाकडून निविदा मागविण्यासाठी वर्तमान पत्रातून वेळोवेळी निविदा सूचना प्रसिध्द करण्यात येते. तसेच महापालिकेद्वारा जनहितार्थ वेळोवेळी जाहीर आवाहन, प्रेसनोट इ.वर्तमान पत्रातून प्रसिध्दीस दिल्या जातात. तसेच विविध कार्यक्रमांचे छायाचित्रे घेण्यात येतात. सन २००७-०८ या वित्तीय वर्षात जाहिराती व प्रसिध्दी इत्यादींवर सुमारे रू.१.४६ कोटी इतका खर्च करण्यात आल्याचे दिसून येते. सन २००६-०७ या वित्तीय वर्षातील जाहिराती व प्रसिध्दीवरील खर्चाच्या तुलनेत सदर खर्च हा सुमारे रू.साहेसहा लक्ष इतका जास्त आहे. काही वृत्तपत्रांना बातम्या देऊनही आपण मनपाचे काम सुलभ (बिनाखर्च) करु शकतो याचाही विचार होणे आगत्याचे आहे. महापालिका प्रशासनाने जाहिराती व प्रसिध्दीवरील खर्चात किमान ६०% ते ७०% कपात करणे अपरिहार्य वाटते. त्यादृष्टीने काही प्रमाणात अनावश्यक जाहिराती, जाहिरातींचा आकार, जाहिरात प्रसिध्दीची माध्यमे इत्यादींबाबत आढावा घ्यावा व सदर खर्चात काटकसरीची उपाययोजना करावी असे प्रस्तावित करण्यात येते.

५ **विद्युत खर्चात बचत करणे –**

शहरातील व मनपा कार्यालयातींल विद्युत वापरात बचत होण्यास खुप वाव आहे. दिवसाही अनेक ठिकाणी रस्त्यावर दिवे चालुच राहतात. तसेच मनपा कार्यालयांतील वातानुकूल यंत्रे काही सन्मानीय अपवाद वगळुन बंद करणे बाबत तातडीने सूचना देणे, आवश्यक वाटते.

**६ विविध सत्कार व साहेळे कार्यक्रमांच्या खर्चात काटकसर करणे –**

मनपाची आर्थिक स्थिती सुधारेपर्यंत तातडीने सर्व सत्कार सोहळे व कार्यकम बंद करून मा. महापौर व मा. आयुक्त यांना अत्यावश्यक वाटतील. तेवढेच कार्यक्रम आयोजित करणे भविष्यात आवश्यक वाटते.

**७ मनपा पदाधिकारी व अधिकारी यांचे दौ–यात कपात करणे –**

मा. महापौर, मा. सभापती व मा. आयुक्त यांचे संमतीने कोणत्याही पदाधिकारी व अधिका-यांचा मनपा क्षेत्राबाहेरचा दौरा मान्य करण्यात येऊ नये अशी शिफारस करण्यात येते.

**८ फर्निचर/स्टेशनरी/रंगरंगोटी/झेरॉक्स इत्यादी खर्चात काटकसर करणे –**

मनपा कर्मचारी अधिका-यांनी फर्निचर/स्टेशनरी/रंगरंगोटी/सजावट झेरॉक्सवरील खर्चात काटकसर करण्याबाबत सूचना देणे आवश्यक आहे. या खर्चातही साधारणपणे ५०% कपात करता येईल.

**९ शाही बाबींवरील (Luxury Item) खर्च अमान्य करणे –**

काटकसरीच्या धोरणांतर्गत तातडीने सर्वांना सूचीत करून शाही बाबींवरील (Luxury Item) खर्च तातडीने बंद करण्यास सांगावे. अन्यथा याची संबंधिताकडुन वसुली व्हावी, अशी शिफारस करण्यात येते.

**मुख्य लेखा परीक्षक**
महानगरपालिका,औरंगाबाद.